बाबा
कदम

डोंगरची मैना

कादंबरी

बाबा कदम

दिलीपराज प्रकाशन

प्रकाशक
राजीव दत्तात्रय बर्वे,
मॅनेजिंग डायरेक्टर,
दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.,
२५१ क, शनिवार पेठ, पुणे - ४११०३०.

website: www.diliprajprakashan.in
email : info@diliprajprakashan.in

© सौ. कुमुदिनी वीरसेन कदम
'आनंद', बालक मंदिराजवळ,
ताराबाई पार्क, कोल्हापूर.

नवीन आवृत्ती - १ डिसेंबर ०७

ebook : July 2020

प्रकाशन क्रमांक - १५४६

मुखपृष्ठ - विजय मराठे

या कादंबरीतील मध्यवर्ती कल्पना निवेदन
करताना ती तन्मय होऊन ऐकणाऱ्या व हे सर्व
सत्य घडले का? असे विचारणाऱ्या
सौ. सुधाताई व श्री. प्रभाकर मायदेव
यांना सप्रेम अर्पण
- बाबा कदम

प्रकरण १

दुपारचे दोन अडीच झाले असतील. माडीवरच्या गॅलरीत प्रताप खेळ मांडून बसला होता. इतक्यात खाली रस्त्यावरून आवाज आला.

'आली, आली, ऽऽ आली ऽऽऽ डोंगरची मैना आली. डोंगरची मैना आली.' प्रतापनं गॅलरीतून खाली वाकत पाहिलं, तो ओरडत जाणारा माणूस डोक्यावर टोपली घेऊन पुढे निघाला होता. प्रतापला समजेना 'डोंगरची मैना' म्हणजे काय? तो तिसऱ्या मजल्यावरच्या झुंजारारावांच्या खोलीत गेला आणि त्याने विचारले.

"थोरले डॅडी, डोंगरची मैना म्हणजे काय हो?" वामकुक्षी घेऊन कॉटवर उठून बसलेले झुंजारराव जांभई देऊन म्हणाले,

"तुमच्या डॅडींना विचारा."

प्रताप दुसऱ्या मजल्यावरच्या संग्रामच्या खोलीत आला. "डॅडी, डोंगरची मैना म्हणजे काय हो?"

किंचित चमकून संग्राम म्हणाला, "मला नाही माहीत, तुमच्या बडीमांना विचारा." तेथून प्रताप खाली तळमजल्यावर आला आणि स्वेटर विणत बसलेल्या सरलाबाईंना त्याने विचारले,

"बडी माँ, डोंगरची मैना म्हणजे काय हो?"

सरलाबाईंनी प्रतापला जवळ ओढून हातातला लोकरीचा गोळा खाली ठेवला, प्रतापच्या कपाळावर आलेले केस मागे सारले आणि त्याच्या कपाळाचा पापा घेत म्हणाल्या, "तुमच्या मम्मीला विचारा." तो पाय आपटत यशोमतीच्या खोलीत आला.

ती कसलंतरी इंग्रजी पुस्तक वाचत बसली होती. बाजूला नोटस्ची वही होती. हातातले पुस्तक बाजूला ठेवून प्रतापला छातीशी घट्ट कवटाळून म्हणाली, "बाळ, तुम्ही मोठ्ठे झालात की मग तुम्हाला 'डोंगरची मैना' म्हणजे काय हे समजेल!"

"ते समजायचं तेव्हा समजू दे, आत्ताच सांगा तुम्ही मला 'डोंगरची मैना' म्हणजे काय?"

एक दीर्घ निश्वास सोडून यशोमती म्हणाली, 'डोंगरची मैना' या दोन शब्दाचा अर्थ सांगायला महिना दोन महिने लागतील."

"पण आता थोडक्यात सांगा ना?"

"बाळ, त्या शब्दांचा अर्थ थोडक्यात सांगण्यासारखा नाही. जा, खेळत बसा वर गॅलरीत."

शेवटी यशोमतीनेही प्रतापला 'डोंगरची मैना' या शब्दांचा अर्थ सांगायचं टाळलं.

प्रताप माडीवर गॅलरीत आला. तिथं त्यानं आपल्या खेळाचा पसारा मांडला होता. त्यात बॅटरीवर चालणारी छोटी रेल्वे होती. मोटारबोट होती. तीत मेणबत्ती लावून पाण्याच्या टबात सोडली की बुडूबुडूबुडू करीत ती पाण्यातल्या टबात फेऱ्या मारीत असे. पण त्याचं

खेळात लक्षच लागेना.

झुंजारराव पुण्यामुंबईला काही कामानिमित्त गेले की, नातवासाठी विविध प्रकारची खेळणी घेऊन येत. ती खेळणी नवी आहेत तोपर्यंत रात्रंदिवस प्रताप त्यांच्याशी खेळत असे. स्प्रिंगवर चालणारा, उड्या मारणारा कुत्रा नवीन होता तोपर्यंत त्याला आपल्या अंथरुणात घेऊन तो झोपत होता.

झुंजारराव मोरे एकेकाळचं कोल्हापुरातलं फार मोठं प्रस्थ होतं. त्यांच्या तीन पिढ्या कोल्हापूरच्या छत्रपतींच्या सेवेत गेल्या होत्या. छत्रपती शाहू महाराजांचे वडील श्रीमंत आबासाहेब घाटगे हे कागलचे जहागीरदार! यशवंतराव व बापूसाहेब ही त्यांची दोन मुले. यशवंतराव कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले आणि त्यांचे नामाभिधान 'शाहू छत्रपती' असे झाले. या शाहूंच्या सोबत कागलवरून कोल्हापूरला येणाऱ्या त्यांच्या कंपॅनियनमध्ये हैबतराव मोरे होते. छत्रपती शाहू महाराज जेव्हा इंग्लंडला गेले तेव्हा त्यांच्या समवेत पिराजीराव इंगळे, बाळा कदम वगैरे शाहूच्या समवयीन कंपॅनियननाही विलायतची यात्रा घडली होती.

छत्रपती शाहूंनी राज्यकर्त्या इंग्रजांचा बारकाईने अभ्यास केला. त्यात वक्तशीरपणा, मुत्सद्दीपणा, जातपात न मानण्याची त्यांची वृत्ती, शिक्षणाचे महत्त्व इत्यादी गोष्टी होत्या.

भारतातल्या संस्थानिकांच्या मुलांना इंग्लंडला घेऊन जाण्यामागे ब्रिटिश राज्यकर्त्यांचा एक हेतू होता. राजपुत्रांना ऐषआरामी जीवनाची चटक लागावी; मद्य आणि मदिराक्षींच्या सहवासात त्यांनी रमावे. राजकारणापासून चार हात दूर रहावे म्हणून संस्थानिकांना अनेक कायद्यातूनही वगळण्यात आले होते. भारतीय दंडसंहिता, म्हणजे (Indian Penal Code) हा कायदा संस्थानिकांना लागू नव्हता. भारतात आणखीन काही वर्षे आपल्याला निर्विघ्नपणे सत्ता उपभोगता यावी हाच राज्यकर्त्यांचा त्यामागे इरादा होता.

श्रीमंत शाहू छत्रपतींनी राज्यकर्त्यांची कुटिल नीति अचूक ओळखली. ते मद्यापासून अलिप्त राहिले. त्याचवेळी ब्रिटिशांची जातपात विरहित समाज रचना त्यांनी सखोल अभ्यासली. लंडन शहराचे रस्ते झाडणारा 'जॉन' हा जसा खिश्चन तसाच इंग्लडचा राजा 'जॉर्ज' हाही खिश्चन, त्यांच्यातही प्रोटेस्टंट आणि कॅथॉलिक असे किरकोळ मतभेद होते, पण सहसा ते विकोपाला जात नसत. भारतात मात्र इंग्रज येण्याच्या अगोदरपासून सतराशे साठ जाती, पोटजाती होत्या. अनेक 'धर्म' अस्तित्वात होते. ह्या जाती आणि धर्म नाहीशा व्हाव्यात असं राज्यकर्त्या ब्रिटिशांना मुळीच वाटत नव्हते. त्यांचे तत्त्व होते 'फोडा आणि झोडा' Divide and Rule.

श्रीमंत शाहू छत्रपतींनी इंग्लंडवरून परत आल्यानंतर आपल्या संस्थानातील जातीपाती नाहीशा करण्याच्या दृष्टीनं पावलं उचलायला प्रारंभ केला. शिक्षणाला अग्रक्रम देऊन निरनिराळ्या जातीधर्माच्या मुलांना सुशिक्षित करण्याच्या हेतूनं शिक्षणाच्या सुविधा द्यायला सुरुवात केली. केवळ पुरुष वर्ग सुशिक्षित होऊन उपयोगाचं नव्हतं म्हणून स्त्रियांच्या शिक्षणालाही प्रोत्साहन दिले. छत्रपती शाहूंना आपल्या पुत्राच्या अकाली आणि अपघाती निधनाचे फार मोठे दु:ख झाले. नेजकुंभोजच्या रानात रानडुकरांच्या शिकारीला गेलेल्या प्रिन्स शिवाजीराजे यांना घोड्यावरून पडून मृत्यू आला. सर्वांत मोठे प्रश्नचिन्ह छत्रपती शाहूंच्या समोर उभे होते ते, नुकतीच सून म्हणून राजघराण्यात आलेल्या राणी 'इंदुमतीं' चे पुढे काय करायचे? राजघराण्याच्या रीतीरिवाजानुसार त्यांचा पुनर्विवाह करून देणे अशक्य होते. म्हणून छत्रपती महाराजांनी इंदुमतींना खूप शिकवून 'डॉक्टर' करायचे ठरवले. पण इंदुमतींचे दुर्भाग्य त्या मॅट्रिक होताच छत्रपती शाहू महाराजांचे निधन झाले.

राजघराण्याच्या निकट असणाऱ्या त्यांच्या कंपॅनियनपैकी हैबतराव मोरे यांनी मात्र

शाहू महाराजांची शिकवण जपून ठेवली. त्यांनी आपला मुलगा झुंजार याला बालपणापासूनच जातपात न मानायचे संस्कार घडवायला सुरुवात केली होती.

झुंजारराव अत्यंत उमद्या स्वभावाचे, देखणे आणि धाडसी होते. छत्रपती शाहूंच्या मृत्यूनंतर छत्रपती राजाराम हे करवीरच्या गादीवर आले. ते काहीसे सौम्य प्रकृतीचे, स्वभावाने शांत असे होते. त्यांनीही आपल्या पित्याचा समाज सुशिक्षित करण्याचा वारसा काही काळ जोपासला.

झुंजारराव बी.ए. झाल्यानंतर कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी पुण्याला गेले. फर्स्ट एल.एल.बी. उत्तीर्ण झाले आणि त्याचवेळी वडील हैबतरावांचे निधन झाले. आंबवड्याची शेती सांभाळण्यासाठी कोणीच नव्हतं. म्हणून झुंजाररावांना आपलं कायद्याचं शिक्षण अर्धवट सोडून कोल्हापूरला परत यावं लागलं होतं. पन्हाळा तालुक्यात आंबवडे गावच्या हद्दीत मोऱ्यांची जायदाद होती. गावात मोठा वाडाही होता. त्याला मोऱ्यांची 'गढी' म्हणत. चिरेबंदी दगडाची मोऱ्यांची 'गढी' इतकी वर्षे होऊनही अजून भक्कम अशा अवस्थेत उभी होती.

हैबतरावांच्या मृत्यूनंतर झुंजाररावांचे लग्न एक वर्षाच्या आत करण्यात आले. फलटणच्या निंबाळकर घराण्यातल्या सरलाताई, मोऱ्यांची सून होऊन कोल्हापुरात आल्या. शहरात लहानाच्या मोठ्या झालेल्या सरलाताईंना आंबवड्यासारख्या खेड्यात करमणार नव्हते. म्हणून झुंजाररावांनी रंकाळा तलावाच्या परिसरात जुने घर घेऊन ते पाडून त्या ठिकाणी तीन मजली घर बांधले. डाव्या बाजूला गार्डन आणि उजव्या बाजूला घाट आणि टॉवर, समोर पश्चिमेला बारमाही पाण्यानं तुडुंब भरलेला रंकाळा तलाव.

झुंजाररावांनी स्वत:साठी तिसऱ्या मजल्यावर एक खोली बांधली. खोलीसमोर दहा बाय बाराची एक गच्ची केली. त्या गच्चीवरून झुंजाररावांनी आजपर्यंत कित्येक सूर्यास्त बघितले. पश्चिमेचे आकाश सूर्यास्ताच्या समयी इतके विलोभनीय दिसे की, सूर्यास्त झाल्यानंतर देखील तेथून उठू नये असं वाटावं.

झुंजारराव आणि सरलाताई या दोघांचं वास्तव्य तिसऱ्या मजल्यावर असे.

लग्न झाल्यानंतर निंबाळकरांची लाजरी बुजरी सरला बघता बघता मोऱ्यांच्या घराण्याशी एकरूप झाली. पहिला मुलगा संग्राम! बापासारखाच उजळ रंगाचा, पण डोक्याने काहीसा तापट. सरलाताईंना संग्रामच्या पाठीवर एक मुलगी व्हावी असे वाटत असतानाच त्यांच्या गर्भाशयात काहीतरी बिघाड झाला आणि त्यांच्यावर 'इमर्जन्सी हिस्टेरोक्टॉमी' नावाची अवघड शस्त्रक्रिया करावी लागली. सरलाबाई त्या दुखण्यातून बऱ्या झाल्या. पण दुसऱ्या अपत्याची त्यांची आशा कायमची मावळली. त्या प्रसंगापासून त्यांना समागमाचे सुखही लाभेना.

झुंजारराव संग्रामचे फार लाड करीत नसत. ते म्हणत, 'बापजाद्यांनी शे-दोनशे एकर मागे ठेवलेल्या जमिनी पुढे मागे राहतीलच याची खात्री देता येत नाही. स्वत:च्या पायावर उभं राहाण्यासाठी शिक्षण घे!'

त्याच सुमाराला देश स्वतंत्र झाला. काँग्रेसची राजवट आली. त्या काँग्रेस सरकारमध्ये शेतकऱ्यांना खुष करण्यासाठी कुळकायदा आला. 'कसेल त्याची जमीन' या कायद्यानुसार शेतकऱ्यांनी मोऱ्यांच्या जमिनीवर हक्क सांगायला सुरुवात केली. ज्या गोष्टीची झुंजाररावांना पूर्व कल्पना होती, नेमकी तीच गोष्ट घडत होती.

रोज उठून कोर्टकचेऱ्या कराव्यात हा झुंजाररावांचा पिंड नव्हता. त्यांनी आपल्या कुळांशी तडजोड करण्याचे ठरवले. ते कुळांना म्हणाले, 'मला फक्त पन्नास एकर जमीन सोडा आणि उरलेली सर्व तुम्ही वाटून घ्या!' कुळे २०० एकरांचे मालक झाली.

आंबवडे गावचा जिवबानाना फार समजूतदार होता. त्याने मध्यस्थी केली आणि झुंजारारावांची एका कटकटीतून सुटका झाली. पन्नास एकर जमीन झुंजाररावांच्या हातात आली तरी ते एकटे पन्नास एकर जमीन कसू शकणार नव्हते. आंबवडे परिसरातील शेतकऱ्यांचे सहाय्य त्यांना घ्यावेच लागणार होते.

दुसऱ्या महायुद्धानंतर महागाई वाढू लागली. केवळ ५० एकर जमिनीच्या उत्पन्नावर विसंबून रहावे लागणार होते. त्यात दिवसेंदिवस पाऊस कमी होत चालला होता, शेतावर राबण्यासाठी लोक मिळत नव्हते. खतांच्या किंमतीही वाढू लागल्याचं पाहून झुंजारारावांनी उपजीविकेसाठी काहीतरी व्यवसाय करायचं ठरवलं.

झुंजारारावांचा जुना दोस्त दाजीबा घोरपडे हा तरुणपणी पहिलवानकी करीत होता. कोल्हापूर संस्थानात पहिलवानकी प्रतिष्ठित मानली जायची. त्यात छ. शाहू महाराजांनंतर छ. राजाराम महाराजांनीही कुस्तीला प्रोत्साहन देणे सुरूच ठेवले. मोतीबाग तालीम, गंगावेश तालीम, पाटाकडील तालीम, दिलबहार तालीम अशा गल्लोगल्ली तालमी होत्या. वर्षातून तीन-चार वेळा खासबागेच्या प्रचंड मैदानात प्रतिष्ठेच्या कुस्त्या होत. पंजाब, लुधियाना, हरियाणा येथून नामांकित पहिलवान कुस्त्यासाठी कोल्हापुरात येऊन तळ ठोकायचे. त्यांना संस्थानातून हवी ती मदत मिळत असे. लोखंडी पहार वाकवण्याची ताकद असलेले पहिलवान संध्याकाळी कोल्हापुरातल्या राजरस्त्यावरून हत्तीसारखे डुलत फिरायला निघाले की त्यांना पहायला लोक गर्दी करीत. कोल्हापुरातही त्यावेळी उत्तरेकडून आलेल्या पहिलवानांना 'आस्मान' दाखवण्याची ताकद असलेले दहा-वीस पहिलवान होते. उत्तरेकडचे पहिलवान ताकदीने प्रचंड होते. तर कोल्हापुरातले पहिलवान डावपेचात उजवे ठरत. कुस्त्यांच्या वेळी पाऊण लाख लोक बसण्याची क्षमता असलेले खासबाग मैदान माणसांनी फुलून जायचे. जुन्या मल्लांना मानाचे स्थान होते. नवीन पोरांना डावपेच शिकवणाऱ्या अनुभवी पहिलवानांना 'वस्ताद' असं संबोधलं जायचं. काही लोक वस्तादांना 'उस्ताद' ही म्हणत. हे उस्ताद कोण हे ओळखण्याची एक खूण होती. त्यांचे दोन्ही कान भजासारखे फुगलेले असत आणि चालताना ते लोक काखेत चेंडू धरल्यासारखे डुलत डुलत चालत. हे उस्ताद लोक कमरेला लुंगी आणि वर मलमलीचा शर्ट घालीत. गळ्यात चांदीची पेटी डुलत असे.

दाजीबा घोरपडे उस्तादाच्या दोन मोटारी होत्या. त्या कोल्हापूर, जोतिबा, पन्हाळा अशा रस्त्यांवर धावायच्या. पण पुढे पुढे दाजीबा उस्तादाला तो व्यवसाय पेलवेना.

त्या दिवशी झुंजारराव गंगावेश तालमीकडून पापाच्या तिकटीकडे निघाले असताना दाजीबा त्यांना पाहून पुढे आला आणि मुजरा करून म्हणाला, "सरकार, सांज केलीसा गावात याला?"

झुंजाररावांना मिशांवर पालथी मूठ फिरवण्याचा छंद होता. ते दाजीबाच्या मुजऱ्याचा स्वीकार करून म्हणाले, "दाजीबा तू, पैलवानकी बंद करून मोटारी घेतल्यास, तसा मलाही एखादा व्यवसाय सुचव की! शेतीत काही दम राहिला नाही. कुळांना जमिनी दिल्या आणि त्यांनी मला ५० एकर रान कसून द्यायचं कबूल केलं, पण खेड्यातले लोकसुद्धा आताशी विश्वासू राहिले नाहीत!"

"आक्षी बराबर बोललासा सरकार! मलाबी थोरल्या म्हाराजानी कत्त्यानीत इस एकर माळ दिलाता. म्या त्यो सपाट करून त्यात थोडी शेतीबी केलती! पर तुमी म्हंतासा तसं शेतीत काय ऱ्हायलं न्हाई म्हनंनासा! पर तुमाला एक सांगू सरकार?"

"सांग की."

"तुमीच तुमच्या शेतावर एक ल्हानगं घर बांधा! सोता मालक डोळ्यांसमोर हाय

म्हनल्यावर फसवाफसवी न्हाई होत! मी बी कत्त्यानीत घर बांधल्यापस्नं खंडी दोन खंडी जुंदळं येत्यात म्हणनासा घरात.''

''पण मला फक्त शेतीवर विसंबून भागत नाही रे. खर्च जास्त आहे. दुसरा काहीतरी व्यवसाय सुचव!''

फुगलेल्या कानाच्या पाळ्यांवरून हात फिरवीत उस्ताद म्हणाला, ''माजी जोतिबा पनाळा सर्वीस घेतास? मीबी कट्टाळोय!''

झुंजारराव म्हणाले, ''पण फक्त जोतिबा पन्हाळ्याला असे रोज कितीसे लोक ये-जा करणार?''

''सुरुवात तर करा, मागनं गगन बावडा, आंबा, ईशाळगड अशी सर्वीस वाडवा!''

''बरं आहे. तुझ्या सूचनेचा विचार करायला हरकत नाही.'' त्या दिवशी उस्ताद घोरपडेनं सांगितलेली सूचना रात्री त्यांनी सरलाबाईंना सांगितली. त्या म्हणाल्या ''मोटार धंद्याला प्रतिष्ठा नसते सरकार!''

''झक मारतीय प्रतिष्ठा. प्रामाणिकपणे कसलाही व्यवसाय करून पोट भरायला कोणाची भीती आहे? आमच्या वाड्यावरची स्वत:ला सरकार, जहागीरदार म्हणवून घेणारी मंडळी या प्रतिष्ठेच्या पायी रसातळाला गेली. बापजाद्यांच्या जमिनी त्यांनी फुकापासरी विकून खाल्ल्या. आता काय हाल आहेत त्यांचे आपण बघतो ना? पुण्याला आमच्या जाधवरावांच्या मुलानं हॉटेल काढलं. तेव्हा आमची जातभाई मंडळी म्हणाली, ''शेवटी लोकांचं खरकटं काढायचा धंदा निवडलात होय?''

जाधवरावांनी लोकांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष केलं, नेकीने हॉटेल चालवलं. आज त्यांची दोन मुलं फॉरेनमध्ये शिकतात! मुलं अजून वीस पंचवीस वर्षांची नाहीत तोवर त्यांना राजे-रजवाड्यांच्या मुली सांगून यायला लागल्यात!

आपला संग्रामही चांगला शिकला तर त्याला बॅरिस्टर करायचं माझ्या मनात आहे.

मला साधं लॉ ग्रॅज्युएट होता आलं नाही. आबासाहेब अकाली गेल्यामुळं मला कायद्याचं शिक्षण अर्ध्यात सोडून यावं लागलं ना? आता निदान मुलानं तरी माझी अपुरी इच्छा पूर्ण करावी.''

''संग्राम तसे हुषार आहेत!''

''हुषार आहेत, पण इतर बाबतीत! परवा न्यू हायस्कूलचे हेडमास्तर भेटले होते. ते म्हणत होते, संग्रामबाळ खेळात हुषार आहेत. पण त्यांचं अभ्यासाकडं असावं तसं लक्ष नाही.''

'''दरवर्षी पास होतातच ना?''

''पास? कसे पास होतात ठाऊक आहे का? कॉप्या करतात म्हणून माझ्या कानावर आलंय! हे कसले माझी अपुरी स्वप्नं पूर्ण करणार?''

''अजून तसे लहानच आहेत, संगूबाळ.''

''लहान? अहो अठरा वर्षांचा घोडा झालाय? तीन वेळा मॅट्रिकला धडका मारल्या. तिथं कॉपी करून पास नाही होता येत! त्यात लहान आहेत, लहान आहेत असे म्हणून तुम्ही त्याला शेफारून ठेवता.''

घरी कोणत्याही विषयाची चर्चा सुरू झाली की ती शेवटी संग्रामच्यावर येऊन ठेपायची. झुंजारराव त्याचे गुणदोष काढणार आणि सरलाबाई त्याची बाजू घेणार. 'संग्राम' आज शिकारीला जायचं आहे.' म्हटल्यावर एका पायावर तयार! आम्ही काय शिकारी केल्या नाहीत? पण आबासाहेबांनी पहिल्यांदा आमच्या हातात बंदूक दिली ती आम्ही २५ वर्षाचे झालो तेव्हा. मोऱ्यांच्या घराण्यात शिकारीची आवड रक्तातच आहे हे आम्हाला मान्य. पण

यांच्या रक्तात तो गुण थोडा अधिक आहे! स्वत: काही कमाई करा आणि मग शिकार खेळा. नको कोण म्हणतो?''

इतक्यात झुंजाररावांची छोटी प्रतिकृती असावी असा संग्राम हॉकीची स्टिक घेऊन आला. नुकतीच आपल्या विषयी आईवडिलांत चर्चा झालेली असावी हे दोघांच्या चेहऱ्यावरून संग्राम तात्काळ जाणत असे. अलीकडे तो झुंजाररावांचे तोंड टाळत असे.

बाथरूममध्ये जाऊन त्याने हात-पाय धुतले. टॉवेलने तोंड पुसत तो किचनमधे गेला. झुंजाराव डोळे बारीक करून त्याच्या हालचाली न्याहाळत होते.

स्वयंपाकघरात सरलाबाईंनी दूध गरम करून कपात ओतले. संग्रामने कपाटातला बोर्नव्हिटा चमचा भरून दुधात घातला.

''मां, आज फार भूक लागलीय. खायला काय घेऊ?''

''बिस्किटं देऊ?''

''द्या. पण ती चॉकलेट क्रीमची द्या, पार्लेची नकोत! मला आवडत नाहीत.''

आई मुलातला हा संवाद बाहेर हॉलमध्ये बसलेले झुंजाराव मिशांवरून पालथी मूठ फिरवीत ऐकत होते. संग्रामचं दूध घेऊन झाल्यावर तो बाहेर आला, तेव्हा झुंजाराव म्हणाले, ''यंदा जर मॅट्रिकला सुटला नाहीत, तर सरळ आंबवड्याला राहून शेती करायची! नाहीतर दाजी घोरपड्यानं सुचवल्याप्रमाणे आम्ही गगनबावडा विशाळगड सर्व्हिस सुरू करणार आहोत. त्यात लक्ष घाला.''

संग्राम गोरा, नाकेला, ओठावर नुकत्याच फुटलेल्या कोवळ्या मिसरुडाचा तलवार कट मारलेला. डोक्यावर केस वाढलेले, कपाळावर आलेले केस एकसारखे मागे सारायची त्याला सवय होती. त्याकडे पहात झुंजाराव म्हणाले,

''टाळक्यावरचं हे जंगल अगोदर कमी करा! नाटक सिनेमातल्या लोकांनी अशा झिंज्या वाढवाव्यात!''

खाली मान घालून संग्राम निमूटपणे झुंजाररावांचा उपदेश ऐकत होता. झुंजाररावांना उलट बोलायची त्याला हिम्मत नव्हती. ते जे जे बोलतील ते निमूटपणे ऐकायचे, आणि बाहेर पडले की सर्व विसरून जायचे हे त्याला पक्के ठाऊक होते.

''जा, आणि साडेसातच्या आत घरात परत या! कुठल्यातरी कट्ट्यावर बसून उडाणटप्पू पोरांबरोबर चकाट्या पिटत नका बसू!''

सरलाबाईही निमूटपणे झुंजाररावांचे बोलणे ऐकत. त्या दिवशी त्यांना न राहवल्याने त्या म्हणाल्या,

''सरकार, तुमच्या वेळची परिस्थिती वेगळी होती. आता जमाना बदलला आहे. आजकालची तरुण मुलं अशीच वागणार!''

''बाईसाहेब तुम्ही यांचे भलते लाड करून ठेवलेत हं! एक दिवस तुम्हाला त्याने पश्चात्तापाची वेळ नाही आणली तर मला विचारा?''

मिशांवर पालथी मूठ फिरवीत झुंजाराव बसल्या जागेवरून उठले.

0-0

प्रकरण २

गंगावेशीतल्या मोऱ्यांच्या जुन्या वाड्याची डागडुजी करण्यात आली. रंकाळ्यावरची जागा विकत घेण्याअगोदर झुंजाररावांचे वास्तव्य याच वाड्यात होते. इथेच सरलाबाईंनी मोऱ्यांची सून म्हणून उंबऱ्यावरचे धान्याचे माप पायाने ढकलून गृहप्रवेश केला होता. पुढे दोन वर्षांनी संग्रामचा जन्मही त्याच वाड्यातल्या अंधाऱ्या खोलीत झाला होता.

झुंजारराव रंकाळ्यावरच्या घरात जरी राहायला गेले तरी दिवसातून एकदा तरी त्यांची जुन्या वाड्याकडे एक फेरी व्हायची.

कुंभारगल्लीकडून गंगावेशीला जाणाऱ्या या रस्त्यावर मोऱ्यांच्या वाड्यासमोर मोठा बोर्ड लागला.

'झुंजार मोटार सर्व्हिस' प्रोप्रायटर झुंजारराव मोरे (आंबवडेकर).

दाजी घोरपड्याच्या मोटारी जुन्या झाल्या होत्या. त्या लक्ष्मीपुरीत भंगारवाल्यांना विकून टाकल्या. झुंजारावांनी फोर्ड कंपनीतून चार सर्व्हिस गाड्या खरेदी केल्या. त्यातल्या दोन कोल्हापूर गगनबावडा आणि दोन गाड्या कोल्हापूर विशाळगड या 'रूट' वर धावू लागल्या. प्रत्येक गाडीवर दोन माणसं. एक ड्रायव्हर आणि एक क्लिनर! पॅसेंजरकडून पैसे गोळा करण्याचे काम क्लिनर करी. ड्रायव्हरला ड्रायव्हिंगबरोबर मेकॅनिकचे काम करावे लागे.

गाडीत ड्रायव्हर शेजारी एक फ्रंट सीट व मागे आडवी एक सीट होती. त्या मागे दोन्ही बाजूस दोन कोचिंग केलेले बाक, मधल्या मोकळ्या जागेत पॅसेंजरांची बोचकी आणि पॅसेंजर्स बसत.

झुंजार मोटार सर्व्हिस सुरू व्हायच्या अगोदर संस्थानं विलीन झाली होती. महाराजांच्या मोटार गॅरेजकडं काम केलेल्या अनुभवी ड्रायव्हरना व क्लिनरना झुंजारावांनी नेमून घेतले. त्यामुळे एरव्ही मोटार धंद्यातल्या लोकांत आढळणारी बनवेगिरी जाणवत नव्हती. क्लिनर पॅसेंजरकडून पैसे गोळा करताना चार-आठ आणे कमी पडले तर स्वत:च्या खिशातले त्यात घालून पॅसेंजरला इच्छित स्थळी पोहचते करी.

त्या सर्व्हिसला टाईम टेबल असं नव्हतं. गाडी भरली की क्लिनर शिटी वाजवी. ड्रायव्हर स्टार्टर ओढी. वाटेत कुठेही पॅसेंजरने हात करावा. गाडी थांबत असे किंवा कोणा पॅसेजरला वस्तीवरच्या घरी जायचं असेल तर क्लिनर त्याच्या विनंतीनुसार गाडी थांबवत असे.

बघता बघता झुंजार ट्रान्सोर्ट कंपनी लोकप्रिय झाली. ड्रायव्हर क्लिनरचा पगार, पेट्रोल, वेअरटेअर हा खर्च वजा जाता झुंजाररावांना त्या काळात रोज शे-चारशे रुपये मिळू लागले.

तुम्ही हा हलका मोटार धंदा का करता असं विचारण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती.

नेहमी येणाऱ्या जाणाऱ्या शेतकरी लोकांशी झुंजाररावांचे जिव्हाळ्याचे सबंध वाढू लागले. झुंजाररावांना जातीभेदाचे वावडे होते. सर्व जातीधर्माच्या लोकांना ते समान वागणूक देत. त्याप्रमाणे त्यांनी आपल्या ड्रायव्हर-क्लिनरनाही सूचना देऊन ठेवल्या होत्या. म्हाताऱ्या -

कोताऱ्या आणि अपंगत्व असणाऱ्या पॅसेंजरना क्लिनर हाताला धरून गाडीत चढवण्यास मदत करी.

आंबा, मलकापूर, विशाळगड, उदगीर हा जंगलविभाग. झुंजाररावांना या भागाचे विशेष आकर्षण होते. कारण त्या जंगलात विपुल शिकार होती. उदगीरला धनगर समाज मोठा होता. त्यातल्या मंगू धनगराशी झुंजाररावांची जवळीक झाली होती.

त्याचं असं झालं, सहा-सात वर्षांपूर्वी मे महिन्यात दुपारी अडीच तीनच्या सुमारास 'आली आली डोंगरची मैना आली' असा पुकारा करीत एक मध्यम वयाचा धनगर वेळूच्या पाटीतून कोकणातली करवंदं आणि जांभळं विकत चालला होता. त्याच्या मागोमाग त्यांची आठ-नऊ वर्षाची परकर पोलक्यातली गोरी झिपरी मुलगी चालली होता. तिच्याही डोक्यावर छोटी टोपली होती. सरलाबाईंना करवंदं खाण्याची लहर आली. त्यांनी त्या धनगराला वाड्यात बोलावलं. आपल्या डोक्यावरची पाटी उतरून खाली ठेवत तो मुलीकडं पहात म्हणाला, "'शेवा, ठेव खाली तुजी बी पाटी!"

सरलाबाईंनी मंगूला विचारलं, "हिचं नाव. नाव काय म्हणालास?"

"तिचं नाव आहे शेवंता, आम्ही हिला 'शेवा' च म्हनतो!"

"एक रुपयाची करवंदं दे. ताजी आहेत ना?" सरलाबाईंनी विचारलं.

"आवो आक्कासाब तोंडात टाकून तर बगा, उदगीरच्या डोंगरातली हैत! आत लालभडक!"

"लहानपणी आमच्या वडिलांसोबत कोकणात शिकारीला जायची तेव्हा वडील बाहेर पडले की मी तिथल्या रेस्ट हौसमागे भटकायची! अरे करवंदं हातानं तोडायचीच नाही. फांदी वाकवून तोंडाजवळ आणायची आणि हात न लावता खायची! काय चव असायची म्हणतोस?"

"ही बी तसलीच हैत. काल सांच्या पारी तोडल्यात." घेतलेली करवंदे पाण्यात घालून त्यातलं एक तोंडात घालीत सरलाबाई त्या मुलीकडं निरखून पहात म्हणाल्या,

"तुझी शेवंता शाळेत जाते का?"

"कसली आलीय साळा आक्कासाब, सा सा म्हैने मास्तरचा पत्त्याच नसतो!"

"पण हिचं लग्न मात्र लवकर करू नको हं!"

"मी बी तसंच म्हंतोय पर आमची जमात लई आडगी. लवकर शेवंताला नवरा बग म्हंत्यात."

"पण आता कायदा झालाय. मुलगी १८ वर्षाची झाली नसताना तिचं लग्न करणं हा गुन्हा आहे. ते लग्न करणाऱ्या आईवडिलांना सुद्धा दंड, शिक्षा होवू शकते."

अनपेक्षितरीत्या त्या वाड्यात आपल्या लग्नाची चर्चा होईल याची कल्पनाही नसलेली शेवंता गोरामोरी झाली.

"फार झालं तर हिला पुढं शिकव!"

"काय शिकीवतोय आक्कासाब?"

"घरी कोणकोण असतं?"

"शेवंताशिवाय दुसरं तिसरं कोणी नाही. शेवंता वर्सा दीड वर्साची असतानाच हिची आई मेली."

"आता उन्हाळ्यात ही जांभळं करवंदं विकतोस. एरव्ही दुसरा उद्योग काय करतोस?"

"मेंढरं हुती मागिंद्या, मरून गेली. आता गायरं हैत सात-आठ, एक म्हस बी हाय!"

त्यांचं बोलणं चालू असतानाच बाहेरून झुंजारराव वाड्यात आले. त्यांनी करकर वाजणाऱ्या आपल्या वहाणा उंबऱ्याजवळ काढून ठेवल्या. त्यांना पहाताच सरलाबाईंनी

डोक्यावरचा पदर सावरला. ते सरलाबाईंना उद्देशून म्हणाले, "बघून खा हं करवंद! खराब करवंद आजार उकरून काढतं!"

"मला कल्पना आहे त्याची. म्हणून मिठाच्या पाण्यात घालून मगच खाते आहे. कुण्या गावचा रे तू."

"उदगीरजवळ, आम्हा धनगरांची वस्ती हाय जी! मागिंद्या तुम्ही उदगीरच्या डोंगरात एक्कूल मारला व्हतासा, तवा मी त्या हाक्यातच हुतो."

"पाच पन्नास जण हाक्यास येतात. कोणाची म्हणून ओळख ठेवणार? बरं आता त्या भागातली परिस्थिती कशी आहे?"

"हाय बरी. पर आदनं मदनं एखादा बिबळ्या येतो आणि गायरं मारतो!"

"चालायचंच! जंगलं कमी झाली. त्या प्राण्यांनी जगावं तरी कशावर?"

अशी चर्चा त्या दोघांत चालली असताना सरलाबाईंनी त्या बापलेकीसाठी चहा बनवला. एका बशीत बिस्किटं ठेवली. त्याकडं पहात संकोचून मंगू म्हणाला.

"हे कशाला आन्लासा? सकाळच्या पारी भाजल्याला बांगडा आन् नाचन्याची भाकरी खाल्लाव की?"

"असू दे! एवढ्या कपभर चहानं काही होत नाही. घे!"

झुंजाररावांच्याकडे खेड्यापाड्यातले लोक शिकारीच्या वर्द्या घेऊन यायचे. त्यावेळी त्या लोकांचंही चहानेच स्वागत केलं जायचं. मोऱ्यांच्या घराण्यात प्रत्येकाला समान वागणूक मिळे.

चहा घेतल्यावर सरलाबाईंनी करवंदाचे पैसे दिले पण मंगू ते घेईना. तेव्हा सरलाबाई म्हणाल्या, "अरे पैसे घे ना, एवढं दुरून आलास, उन्हातान्हात डोक्यावर हे ओझं घेऊन फिरतोस, त्या श्रमाचं मोलतरी मिळायला पाहिजे!"

"नगं नगं आक्कासाब. आज सरकारांची जवळनं वळख झाली, लई समाधान झालं. "आक्कासाहेब, मोरे सरकाराचं आमच्या भागात लई नाव हाय! मी त्यांच्या शिकारीच्या हाक्यात एकदा दोनदा हुतो तवा बगिटलंय!"

"बरं, आता अधूनमधून आलास तर येत जा." मोरे कुटुंबाचा मंगू धनगरांचा तो स्नेह हळूहळू वाढत होता. तो एरव्ही, डोंगरातली शिकेकाई, रिठे, आवळे आणून सरलाबाईंना द्यायचा! दरवेळी शेवंता मंगूसोबत यायची नाही, पण प्रत्येकवेळी सरलाबाई तिला बहिणीच्या मुलीचे फ्रॉक्स, स्कर्टस् ब्लाऊज आणि सलवार खमीज असले जुने शहरी कपडे द्यायच्या! खरं तर सरलाबाई शेवंताच्या प्रेमात पडल्या होत्या. गोरी गोमटी शेवंता काहीशी अबोल होती. पोटाला एखादी मुलगी यावी ही त्यांची इच्छा काही पूर्ण होणार नव्हती. म्हणून बहिणीच्या मुलीवर सुद्धा त्या लोभ करीत होत्या. बेबी चंदाही अधूनमधून मोऱ्यांच्या वाड्यात रहायला यायची!

दिवस चालले होते. एके दिवशी घाईघाईने मंगू धनगर आला आणि झुंजाररावांच्या पायावर डोकं टेकून रडू लागला. झुंजाररावांना समजेना नेमकं काय घडलंय. त्याला पायापासून अलग करीत त्यांनी विचारलं. "अरे घडले काय ते तरी सांगशील की नाही?"

मंगू हुंदके देत बोलू लागला.

"सरकार मी काय जगत नाही. माझी दुभती गाय वाघानं मोडली."

"मोडली म्हणजे मारली?"

"व्हय जी! दुबती गाय हुती माजी!"

"झालं गेलं त्याचा शोक करू नको. मी येतो तुझ्यासोबत. उद्या हाका काढू. तो

बिबळ्या मारल्याशिवाय मी परत नाही येणार!''

मंगूनं ती हकिगत नंतर सरलाबार्इंना सांगितली. त्यांच्याबद्दल सहानुभूती व्यक्त करीत त्या म्हणाल्या, ''पण अगोदर तुम्हा गावकऱ्यांना वाघाची चाहूल लागली नव्हती?''

'''लागली हुती जी. गावकऱ्यानी फारिष्टात अर्जबी केलता. फारीस्टर म्हनाला, वाघ जनावराला धोका करू दे मग बघू! मी माझी गाय मोडल्यावर गेलतो फारीष्ट खात्यात तर म्हनला आम्ही पिंजरा लावतो! आठ धा दीस झालं त्येंचा पत्त्याच न्हाई!''

''असाच असतो बघ सरकारी कारभार! आमचे सरकार येतील आणि त्याचा बंदोबस्त करतील! शेवंता बरी आहे का?''

''हाय जी. तीच ते दिशी गयरासंग माळावर गेली होती. ती रडत आरडत सांगत आली.''

''मंगू. पण इतकी मोठी गाय वाघ नाही मारत रे!''

''निस्त रगत पितोय गाईचं, धड ततंच टाकून गेलाय.''

झुंजारराव मोरे मंगू बरोबर उदगीरला आले. ते आल्याचं समजताच उभा धनगरवाडा जमला. जो तो त्या वाघाला केव्हा कुठं बघितला याचे वर्णन करू लागला. झुंजाररावांनी आत्तापर्यंत जे वाघ मारले होते, ते सर्व 'मॅनईटर' म्हणजे नरभक्षक होते. त्यांचा अभ्यास त्याबाबतीत सखोल होता. हवालदिल झालेल्या धनगरांना दिलासा देत ते म्हणाले, '''हाक्यात सापडला तर सुटणार नाही.''

''पर सरकार फारीष्टर म्हंतो, बिबळ्या मारायला बंदी आहे.''

''तिथं ऑफिसात बसून बंदी घालायला त्यांच्या बापाचं काय जातं? बघू मला कायदा मोडल्याबद्दल काय शिक्षा करतात?''

झुंजाररावांनी कायद्याचा बराच अभ्यास केला होता. राईट ऑफ प्रोटेक्शन ऑफ लाईफ अँड प्रॉपर्टी हे कलम अगदी स्पष्ट होतं. जो कोणी माणसाच्या जिवाला धोका करील अगर त्याच्या मालमत्तेचं नुकसान करील त्याला प्रतिबंध करण्याचा हक्क माणसास आहे. हे कलम प्रामुख्याने माणसाच्याच बाबतीत वापरले जायचे! पण इथे जंगलातला बिबळ्या जर धनगरांची गाईगुरं दिवसा ढवळ्या मारू लागला तर गावकऱ्यांनी काय फक्त बघत बसावं? हे फॉरेष्ट खातं नालायक आहे. म्हणे वाघाने माणसाला इजा केली तर बघता येईल! एकदा माणसाचा प्राण गेल्यानंतर काय बघणार आहेत?

झुंजाररावांना फॉरेस्ट खातं ओळखत होतं. ते त्या भागातले प्रख्यात शिकारी होते. त्यांच्या विरुद्ध काही तक्रार करताना फॉरेस्ट खात्याला दहादा विचार करावा लागत होता.

दुसऱ्या दिवशी सगळ्या गावकऱ्यांनी हाक्या धरला. वाघ जिथून पुढे जाण्याची शक्यता होती तिथे झुंजारराव आपली 'थर्टी स्प्रिंगफील्ड' रायफल 'लोडेड' करून बसले. वाघ त्यांच्या समोर आल्या आल्या झुंजाररावांची गोळी त्याचा वेध घेणार होती. गावकरी जिवाच्या आकांताने आरडा ओरडा करीत हातातले रॉकेलचे मोकळे डबे वाजवत पुढे पुढे चालले होते. इतक्यात जनावराची पायलट वाजल्याचा आवाज आला. झुंजाररावांनी बंदूक सरसावली. पण पालापाचोळा वाजवत येणारे ते एक भेकर होते. झुंजाररावांनी आपली रायफल वर केली. ते भेकराच्या शिकारीला आलेले नव्हते.

सकाळी नऊच्या सुमारास गावकऱ्यांनी धरलेला हाक्या संध्याकाळपर्यंत चालला. हा ऽऽऽ हू ऽऽऽ करून गावकऱ्याचा घसा बसला. डबे बडवून हाताला गोळे आले पण वाघाने त्या सर्वांना चकवले. तो केव्हा कुठे गायब झाला लोकांना समजलेच नाही. सूर्य मावळल्यानंतर हाक्या बंद झाला. झुंजारराव बसलेल्या जागेवरून उठले. मंगू धनगर निराश होऊन म्हणाला.

"सरकार, जनावर लई बनेल हाय. एवढ्या उभ्या गावच्या हाक्यातून निसाटलं."

"होय पण काहीही करून त्याला मारलंच पाहिजे. नाहीतर तो 'मॅनइटर' नरभक्षक होण्याची दाट शक्यता आहे. यापूर्वी त्याच्यावर कोणी बंदूक झाडली होती काय? सकाळी पाण्यावर मी त्याची पावलट बघितली. त्याचा मागचा उजवा पाय जायबंदी झालेला असावा. म्हणूनच तुझी गाय मारल्यानंतर तो गाईचं फक्त रक्त पिऊन गेला. सर्वसाधारणपणे वाघाने ती गाय ओढून न्यायला हवी होती."

"आम्हालाबी त्येचं आचिट वाटलं! पर तुमचा अंदाज अगदी बरोबर हाय सरकार, मागिदया गावकऱ्यांनी पाळकाच्या दिवशी हाक्या काढला हुता तव माया धनगरानं आपल्या ठेचणाळचा त्येच्यावर बार टाकला हुता, तवाच त्येचा पाय आदू झालाय म्हनंनासा!"

"होय, पण अशी जंगली जनावरं जायबंदी करून सोडायची नसतात. कालांतराने तीच नरभक्षक होतात. आता त्या बिबळ्याचा उजवा पाय दुखावल्यामुळेच तो मारलेलं जनावर ओढून नेऊ शकला नाही! या वाघासारखं जनावर दुबळं झालं की हमखास नरभक्षक होतं."

"ते का बरं सरकार?"

जाता जाता झुंजारराव म्हणाले, "अरे या जगात सर्वात मारायला सोपा प्राणी कोणता असेल तर तो माणूस! त्याला गवा रेड्याचे बळ नाही किंवा हरण, भेकराची चपळताही नाही. वाघानं अचानक झडप घातलेला माणूस त्याच्या कचाट्यातून सुटणंच कठीण!"

अशी चर्चा करीत सर्वजण मंगूच्या वस्तीवर परत निघाले. सूर्यास्त व्हायला थोडा अवधी होता. अस्ताला निघालेल्या सूर्याची सोनेरी किरणे जंगलावर पसरली होती. थंड हवा सुटली होती. वातावरण आल्हाददायक होतं. पण झुंजारराव किंवा हाक्यातले गावकरी काहीसे नाराज होते. वाघानं त्या सर्वांना चकवून गुंगारा मारला होता.

धनगर वाडीवर मोरे सरकार आज राहणार होते.

"मंगू, आज जेवायला काय करतोस रे?"

"काय करू दे? अंड्याचा रस्सा करू दे? का तुमची बारा लंबर देतासा, झाडावर बसल्यालं एखादं कोंबडं मिळतेय का बघतो!"

झुंजाररावांनी आपली डबलबारी १२ बोअरची बंदूक सोबत आणली होती. ती बॅगेतून काढून मंगूकडे दिली आणि म्हणाले, "जरा बेतानं, आजूबाजूला बघून बार काढ. ही घे काडतुसं!"

"त्येची काय बी काळजी करू नगंस, सरकार. झाडावर बसलेलं कोंबडंच मारायचं हाय मला."

मंगू झुंजाररावांना वस्तीवर सोडून एकटा 'लालपाणी' या नावानं ओळखल्या जाणाऱ्या डोंगरातल्या घळीकडं आला.

लालपाणी हा त्या भागातला बाराही महिने न आटणारा पाण्याचा झरा होता. रोज संध्याकाळी जंगली कोंबडी कस्तर तिथं पाण्यावर यायची. पोटभर पाणी पिऊन झालं की लगतच्या धावड्यावर किंवा शिरशीच्या झाडावर फडफड करीत वर जाऊन बसायची. मंगू लालपाण्यावर आला आणि एक जंगली कोंबड्यांचा थवा पाण्यावर आला. सर्वात पुढे होता कुर्रेबाज तुरेवाला कोंबडा. तो अत्यंत सावधपणे इकडे तिकडे पहात होता. एखादा रानबोका किंवा मुंगूस कोंबड्यावर झडप घालायची शक्यता असते. तोंडाने 'क्वाव क्वाक' असा कळपातल्या इतर कोंबड्या इशारा देत तो ऐटबाज पक्षी झऱ्याजवळ आला. त्याच्या आदेशानुसार अगोदर कोंबड्या पाणी पिऊ लागल्या म्होरक्या मागे राहून सावधपणे देखरेख करीत होत्या. कोंबड्यांचे पाणी पिऊन झाल्यावरच त्याने झऱ्यात आपली चोच बुडवली.

बाजूला झुडुपात दडून बसलेल्या मंगूला तो अंधुक प्रकाशात स्पष्ट दिसत होता. पण त्याच्यावर बार टाकावा असं मंगूला वाटलं नाही. सात-आठ माद्यांना पोरकं आणि निराधार करावं असं त्याला वाटलं नाही.

कोंबडा सावधपणे आपली तहान भागवून झुडुपातून नाहीसा झाला. मंगू ज्या शिसवीच्या झाडाखाली बसला होता, त्याच झाडाच्या शेंड्यावर एक नेटकी कोंबडी बसलेली मंगूनं हेरली आणि बार टाकला. फडफड करीत जखमी झालेली कोंबडी खाली पडली. ती तडफडून शांत झाली. मंगूनं पाय धरून उचलली. बंदूक खांद्याला लावून त्याने वस्तीची वाट धरली. जाता जाता तो कोंबडीची पिसं उपसू लागला.

इकडं वस्तीवर झुंजारराव वेताच्या खुर्चीवर आराम करीत पडले होते. पौर्णिमा एक दोन दिवसांवर आल्याने शुभ्र चांदणे पडले होते. झाडांच्या शेंड्यावर असंख्य काजवे सामुदायिक दीपप्रज्ज्वलन करीत होते. रातकिड्यांनीही सूर धरला. अंधुक अशा प्रकाशात झुंजाररावांना मंगूची चाहूल लागली. ते म्हणाले.

"काय रे, सापडलं का कोंबडं? मघा बार ऐकला."

मंगू पडवीवर आला. एव्हाना त्यानं सर्व कोंबडी सोलली होती. शेवंताला त्याने हाक मारली. "थाळी घिऊन ये गं पोरी!"

"कोंबडी मिळाली होय रे?"

"व्हय सरकार, कोंबडाबी हुता. पर मारला नाही!"

"का नाही मारलास!"

"काय सांगू सरकार त्याचा रुबाब? त्याला मारावंसंच वाटलं नाही!"

"जातिवंत शिकाऱ्याचं ते लक्षण आहे. अरे शिकार झाली तरी तिला काही मर्यादा आहेत. शिवाय पाण्यावर आलेला पक्षी आणि प्राणी मारू नये असा कायद्याचा दंडक आहे. त्याला एकच अपवाद, 'सँडग्रोव्हज' हा पक्षी माळावर रहातो, कुर्डू आणि गवताच्या बियावर जगतो. पण त्याला निसर्गाचे जबरदस्त असे संरक्षण देणारे पंख लाभलेले असतात. पाण्यावर आल्याशिवाय तो पक्षी कोणालाच दिसत नाही. म्हणून शिकारीच्या कायद्यात ती सवलत देण्यात आलीय."

मोरे सरकारांची माहिती ऐकत ऐकत मंगूने कोंबडी साफ करून तिचे कोयत्याने तुकडे करून दिले. शेवंताने ती आत नेऊन चुलीवर शिजत घातली.

थोड्या वेळानं वास सुटला, "मंगू माझ्या बॅगेतली रमची बाटली काढ, ग्लासही आहेत बघ बाजूला. दोन ग्लास काढ!"

"दोन कुणाला सरकार?"

"तुला थोडी रम घे ना? चांगली मॅच्युअर्ड सिक्कीम रम आहे ती!"

मंगूने रमची बाटली आणि ग्लास आणून मोरे सरकाराकडं दिले. त्यांनी स्वत:साठी एक पेग त्यात थोडं पाणी घालून ग्लास उंचावून मंगूला म्हणाले, "चिअर्स!"

मंगूने थोडं पाणी घालून आपला ग्लास एका दमात संपवला आणि म्हणाला, "आमा गरिबांना आसली दारवा बापजल्मी भेटत न्हाई."

चंद्र आता बराच वर आला होता. मंगूनं झुंजाररावांचा फोल्डींग कॉट जोडला. त्यावर गादी पसरली. बेडशीट घालताना तो म्हणाला, "सरकार भाईर झोपतो म्हंतासा खरं, फाटंचा लई गारठा पडतोया!"

"काही हरकत नाही."

शेवंतानं झणझणीत रानकोंबडीचा रस्सा बनवला. झुंजारराव जेवायला बसले.

झुंजारराव म्हणाले, ''तुझ्या हाताला भलतीच चव आहे पोरी?''

शेवंता त्या कौतुकानं संकोचली. मंगू म्हणाला, ''वैनी सरकारानी मागिद्या माशांचं कोरड्यास केल्यास मला जरा दिलं हुतं, काय चव हुती म्हंतासा?''

सरलेच्या हाताखाली ही वर्ष सहा महिने राहिली तर तिच्याही पेक्षा चांगले पदार्थ बनवायला ही शिकेल.

गप्पा मारत जेवण रंगलं. झुंजारराव बाहेर आले. चंद्र बराच वर आला होता. मघापेक्षा चांदणं अधिक पांढरंशुभ्र झालेलं होतं. काजव्याचा प्रकाश फिक्का पडत होता. दूर जंगलात कूक कूक, कूक असा कप्पू कवडा ओरडत होता. मधेच एक टिटवी टिट टिट टिट्या ढ टीट अशी ओरडत गेली. ती पाठोपाठ वस्तीवरचं काळं कुत्रं भेसूर आवाजात रडू लागलं.

टिटवीचं ओरडणं आणि कुत्र्याचं रडणं त्या भागात अशुभ समजलं जायचं!

झुंजारारावांचा असल्या भाकड गोष्टींवर बिलकूल विश्वास नव्हता. ते कॉटची मच्छरदाणी खाली ओढून आरामात झोपी गेले.

0-0

प्रकरण ३

मंगू झुंजाररावांच्या कॉटखाली जमिनीवर झोपला होता. त्यानं खाली अंथरायला आणि पांघरायला हातविणीचं घोंगडं घेतलं होतं. झोपण्यापूर्वी मंगूनं त्याच्या कुलदैवत 'बिरोबाचं' स्मरण केलं. गावावर आलेलं बिबट्याचं संकट नाहीसं व्हावं अशी प्रार्थनाही त्यानं केली.

मध्यरात्र टळून गेली होती. रातकिड्यांनी सूर धरला होता. चंद्र जसा मध्यावर आला, तसा बाजूच्या झाडावरील काजव्यांचा प्रकाश मंद होत गेला. ग्रीष्माचा उन्हाळा. त्यात वारा कोणीतरी बांधून घातल्यासारखा स्थिर. मघाशी ओरडणारी टिटवी आणि भेसूर रडणारं कुत्रं दोन्ही थांबली होती. दूर धनगर घळीतला कप्पूकवडा मात्र कुठंतरी पिठाची गिरणी चालावी असा आवाज करीत होता.

झुंजारराव गाढ झोपी गेल्यानंतर मंगूही अंगावरच घोंगडं मुस्कटून झोपला.

मध्यरात्रीच्या सुमारास ऊर फाडणारे ते झुंजारावांचे ओरडणे ऐकू आले, 'मंगू ऽऽऽ मंगू ऽऽऽ मेलो रे' त्याचबरोबर बिबट्या वाघाचे गुरगुरणेही मंगूला ऐकू आले. मंगू ताडकन् उठला. घोंगड्या शेजारी असलेला कोयता घेऊन झुंजारावांच्या कॉटकडं धावला. बिबट्याने झुंजारावांच्यावर झेप घेतली होती. प्रथम तो मच्छरदाणीत काहीसा गुरफटला गेला. नंतर त्याने झुंजारावांच्यावर हल्ला केला. अचानक झोपेतून जागे झालेल्या झुंजारावांनी वाघाचे पुढचे दोन्ही पाय आपल्या हातात पकडले होते. गुरगुरत बिबट्या त्यांना खाली पाडून त्यांच्या नरडीचा घोट घेणार इतक्यात वाघच ओरडून मागे कोसळला. झुंजारावांच्यावर प्राणघातक हल्ला करणारा तो क्रूर बिबट्या मंगूनं कोयत्याने केलेल्या वारामुळे ओरडत खाली कोसळला. त्याच्या कवटीची दोन भकलं झाली होती. बाहेरची दंगल ऐकून शेवंता हातात कंदील घेऊन बाहेर धावली. झुंजारावांच्या छातीवर वाघाच्या पंजाचे ओरखडे उठले होते. आतून रक्तस्राव होत होता. त्यांच्या उलटलेल्या कॉटजवळ बिबट्याचे डोकं फुटलेले धूड निश्चल पडले होते.

बघता बघता उभा धनगरवाडा जमला. दिवसभरात गाववाल्यांच्या हाक्याला झुकांडी देऊन सटकलेला बिबट्या कपाळमोक्ष होऊन खाली कोसळला होता.

मंगू धनगराने झुंजारावांची सुटका केली. आणखी एक दोन क्षणातच बिबट्यानं त्यांचं नरडं फोडून रक्त प्राशन केलं असतं.

छातीची चाळण झालेले झुंजारराव मंगूचा हात हातात घेऊन म्हणाले.

"तू इथं शेजारी होतास म्हणून आज माझे प्राण वाचले. माझ्या रायफलच्या गोळीत त्याचा मृत्यू नव्हता, तो तुझ्या या कोयत्यात होता." रक्तानं माखलेला कोयत्याकडे पहात झुंजारराव म्हणाले, "तरीच मला रात्री बाहेर झोपू नका असं वारंवार तू म्हणत होतास."

लोकांचा गलका वाढला. हळूहळू पूर्व उजळली. नित्यनियमाने त्या भागात सूर्योदयाला भिन्न आलाप करणारे पक्षी जागे झाले. इकडून तिकडे त्यांचे भिरभिरणे सुरू झाले.

सूर्यकिरणे डोकावली. प्रथम झाडांचे शेंडे उजळले. नंतर हळूहळू जंगलही स्पष्ट दिसू

लागले.

हां हां म्हणता बातमी उदगीरच्या पोलीस पाटलाला समजली. त्यानं वाघ मारल्याची हकिगत मलकापूरला कळवली. सकाळी दहाच्या सुमारास फॉरेस्टचे बीट गार्डस् आणि पोलीस आले.

झुंजाररावांनी वयोवृद्ध अशा धनगराकडून जखमांना लावण्यासाठी झाडपाला घेतला.

दुपारी एकदीडच्या सुमारास झुंजाररावांना कोल्हापुरात सी. पी. आर. मध्ये दाखल करण्यात आले. ही बातमी समजताच जिल्ह्यातील वरिष्ठ पोलीस अधिकारी झुंजाररावांची विचारपूस करण्यासाठी आले. त्यांना नेमकी हकिगत समजल्यानंतर त्यांनी झुंजाररावांचे आणि मंगूचे अभिनंदन केले.

घरी सरलाबार्इंना आणि संग्रामला समजताच दोघेही तातडीनं सी.पी. आरमधे धावले. झुंजाररावांना स्पेशल वॉर्डमध्ये ठेवलं होतं. दोन नर्सेस आणि एक डॉक्टर झुंजाररावांच्या कॉटशेजारी बसून होते.

पुढारीचे संपादक प्रतापसिंग जाधव स्वत: हॉस्पिटलमध्ये आले. त्यांना झुंजाररावांच्या त्या चित्तथरारक झुंजीचे वृत्त ऐकून आश्चर्य वाटले. ते म्हणाले, ''आजवर कोल्हापूर संस्थानात अनेक उपद्रवी बिबटे मारले गेले. पण अशा तऱ्हेने मंगूने मारलेल्या या बिबळ्याची रोमांचकारी हकिगत थक्क करणारी आहे. मोरे, सरकार, आपणही बिबळ्याचा प्रतिकार अत्यंत समर्थपणे केलात याबद्दल तुमचेही अभिनंदन!'' दुपारी झुंजाररावांना कोल्हापुरात आणल्याची बातमी समजताच अनेक परिचितही दवाखान्याकडे धावले. तशी झुंजाररावांची प्रकृती स्थिरच होती. पण येणारे जाणारे वाढल्याने सिव्हिल सर्जननी उत्साही 'व्हिजिटर्सवर' बंदी घातली.

एरव्ही मंगू धनगराची कोणीही दखल घेतली नसती. पण स्वत:चा जीव धोक्यात घालून बिबट्याचा कपाळमोक्ष केल्यामुळे पुण्या-मुंबईच्या पेपरवाल्यांनी मंगूचे फोटो छापले.

सर्वात कहर केला तो जिल्ह्याच्या फॉरेस्ट ऑफिसरने! त्याला मंगूने बिबट्या मारल्याची घटना आवडली नव्हती. तो म्हणाला, ''वाघ हा प्रोटेक्टेड प्राणी आहे! त्याला कोणालाही मारता येणार नाही. शिवाय उदगीरचे जंगल प्रोटेक्टेड फॉरेस्ट आहे.''

झुंजारराव म्हणाले, ''पण तुमचे प्रोटेक्टेड प्राणी माणसं मारू लागले तर लोकांनी काय बघत बसायचे? हे प्राणी मानवी वस्तीत येणार नाहीत हे पहायची जबाबदारी तुमची!''

''हो आहे. पण त्यासाठी ग्रामस्थांनी अगर धनगरांनी आमच्या ऑफिसला आपल्या भागात बिबट्याचा वावर वारंवार होत असल्याबद्दल वर्दी द्यायला हवी होती.''

मंगू म्हणाला, ''धा बारा आर्ज दिल्यात. सापळा आज लावतो, उद्या लावतो असं करून टाळाटाळ करत होतं तुमचं खातं!''

झुंजाररावांना हॉस्पिटलमध्ये समजलं फॉरेस्टच्या लोकांनी बिबट्याचं कातडं पंचनामा करून आपल्या ताब्यात घेतले आहे. झुंजारराव फॉरेस्ट ऑफिसरला म्हणाले, ''ते कातडं ट्रॉफी म्हणून मला हवं आहे!''

''ते तसं देता येणार नाही.''

''ठीक आहे!''

दुसऱ्या दिवशीच्या सर्व पुण्यामुंबईच्या पेपरमधून झुंजारराव व मंगूच्या त्या अभूतपूर्व झुंजीची बातमी फोटोसहित छापण्यात आली. गृहमंत्रालयातून गृहमंत्र्याच्या पी. ए. चे झुंजाररावांना अभिनंदनाचे पत्र आले. त्यात म्हटलं होतं, ''गृहमंत्र्यांनी कोल्हापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आल्यानंतर आपल्याला समक्ष भेटून आपले व मंगू धनगराचे अभिनंदन करायचे ठरवलेले आहे!''

मिशांवरून पालथी मूठ फिरवीत झुंजारराव सरलाबाईंना म्हणाले, "आता त्या वाघाचं कातडंही विनासायास घरी येतं बघा."

झुंजारारावांच्यावर सी. पी. आर. मध्ये एक आठवडाभर उपचार झाल्यानंतर त्यांना 'डिसचार्ज' मिळाला. तो मिळाल्यानंतर अनेक लोक त्यांना रंकाळ्यावरच्या घरी भेटायला आले. त्यात बरेच परिचय नसलेलेही होते. परिचयाच्या लोकांप्रमाणेच अपरिचित व्यक्तींनीही त्या घरात गर्दी केली.

झुंजारारावांना कोल्हापूरला येण्यापूर्वी पुण्यात कायद्याचा अभ्यास अर्ध्यात सोडून यावं लागलं होतं. कायद्याची परीक्षा द्यायची त्यांची इच्छा अपुरी राहिली होती. शिक्षण थांबलं पण झुंजारारावांचे कायद्याबद्दलचे आकर्षण काही कमी झाले नव्हते.

निरनिराळ्या हायकोर्टाचे गाजलेले निकाल ते लॉ-रिपोर्टर्स मधून वाचत. किरकोळ बाबतीत कोणी खेडूत वा परिचित सल्ला विचारायला आला तर आनंदाने ते मोफत सल्ला देत. एकदा त्यांना सरदार मित्रानी विचारलं, "लॉ ग्रॅज्युएट होऊन काय कोर्टात वकिली करायचं ठरवलंत की काय?"

"मुळीच नाही! मला स्वत:ला आवड आहे म्हणून लॉ-ग्रॅज्युएट व्हायचे. ही पहा माझी लायब्ररी!"

सरदार मित्र म्हणाले, "आता तुम्ही कशाला या वयात नसत्या फंदात पडता? मुलाला हवं तर वकील करा. ते शोभून दिसेल."

"मला काय शोभून दिसतं आणि दिसत नाही हे मला चांगलं समजतं. त्यासाठी कोणाच्या सल्ल्याची गरज नाही."

त्यावेळी झुंजारारावांची चाळीशी उलटली होती. या वयात त्यांनी कायद्याच्या अभ्यासाचा ध्यास धरावा हे बऱ्याच जणांना रुचत नव्हते.

दवाखान्यातून डिसचार्ज मिळेपर्यंत मंगू त्यांच्या सेवेला कोल्हापुरातच होता. तो त्यांना डिसचार्ज मिळताच आपल्या धनगर वाड्यावर निघून गेला. तो आठ दिवसांनी अचानक झुंजारारावाना भेटायला आला. "सरकार फारीस्ट खात्यानं मला ही नोटीस पाठीवलीय बघा!"

झुंजारारावानी नोटीस वाचली आणि ते हसत हसत म्हणाले, "या सरकारी नोकरीत किती बिनडोक माणसं भरलीत याचं हे चांगलं उदाहरण आहे." नोटिसीत म्हटलं होतं.

"झुंजारराव मोरे आणि तू मंगू बिस धनगर तुम्ही दोघांनी संगनमत करून बिबट्या मारलात. तो मारण्याचा तुम्हाला परवाना नव्हता. याबाबत तुमच्यावर कायदेशीर कारवाई का करू नये याचं उत्तर आठ दिवसात द्यावे, कळावे."

या नोटिशीची एक प्रत झुंजारराव मोरे व कलेक्टर कोल्हापूर यांनाही पाठवण्यात आली आहे.

ते प्रकरण चांगलंच रंगलं.

झुंजारारावांना दुसऱ्या दिवशी नोटिशीची प्रत मिळाली. त्यांनी त्या नोटिशीला सविस्तर उत्तरही तयार केलं.

'मे. फॉरेस्ट ऑफिसर कोल्हापूर यांना

झुंजारराव हैबतराव मोरे, रा रंकाळा यांचे तुम्ही पाठवलेल्या नोटिशीला उत्तर खालीलप्रमाणे

महाशय,

२५ मे या दिवशी मी मुक्कामास उदगीर येथील धनगरवाड्यात मंगू धनगराच्या वस्तीवर होतो. मी तिकडे जायचे कारण म्हणजे, धनगर वस्तीतल्या अनेकांनी आपल्याला

बिबट्या उपद्रव देतो असे सांगितले होते. त्याचवेळी मंगू धनगराची दुभती गाय वाघानं ठार केली. तत्पूर्वी मंगू आणि इतर धनगरांनी बिबट्या वाघाचा बंदोबस्त करावा असे आठ-दहा अर्ज तुमच्या ऑफिसला दिले होते. ते तुम्ही लोकांनी कचऱ्याच्या बादलीत फेकून दिले असावेत. नागरिकांच्या जीवित आणि वित्ताबद्दल तुमच्या खात्याला काडीइतकी आस्था नाही.

मी तो बिबट्या मारण्यासाठी दि. २४ मे या दिवशी त्या भागात हाक्या धरला होता. पण तो बिबट्या हाक्यातून माघारी फिरला. मला त्यादिवशी तो मारता आला नाही. म्हणून दुसऱ्या दिवशी म्हणजे २५ मे रोजी पुन्हा हाक्या काढायचे ठरवले व मी मुक्कामाला मंगू धनगराच्या वस्तीवर राहिलो. मी मंगूच्या छपरापुढे अंगणात कॉटवर झोपलो. मंगू माझ्या कॉटशेजारी जमिनीवर घोंगडं टाकून झोपला. मध्यरात्र उलटून गेल्यानंतर दीड दोनच्या सुमारास बिबट्याने माझ्यावर अचानक प्राणघातक हल्ला केला. मी ओरडलो. माझे ओरडणे ऐकून कॉटशेजारी झोपलेला मंगू तात्काळ जागा झाला. त्याने त्याच्या कोयत्याने बिबट्याच्या डोक्यावर प्रहार केला आणि माझी सुटका केली. मंगूने क्षणाचा जरी विलंब केला असता तरी त्या क्रूर प्राण्याने माझा बळी घेतला असता. भारताच्या फौजदारी कायद्यात जर एखाद्या व्यक्तीने दुसऱ्यावर प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न केला, तर हल्लेखोराला ठार मारण्याचे अधिकार दिले आहेत. मग तो हक्क एखाद्या क्रूर प्राण्याच्या बाबतीत का वापरता येणार नाही? मंगूने व मी दोघांनी संगनमत करून बिबट्याची हत्या केली असं आपण नोटिशीत म्हणता, पण माझ्या छातीवर बिबट्याने काढलेले ओरखडे, डाव्या हाताचे प्रॅक्चर झालेले मनगट, यावर सी.पी.आर. मधल्या डॉक्टरनी उपचार केले ते उगाच गम्मत म्हणून काय?

तुम्ही आमच्यावर कारवाई करूनच बघा, तुमच्या खात्याची लक्तरं जगजाहीर होतील. शिवाय (Malicious Prosecution) केल्यासाठी तुमच्यावर न्यायालयीन कारवाई करण्यात येईल. तसेच माझ्या प्राणावर आलेले संकट मंगूने स्वत:चा जीव धोक्यात घालून वाचवल्याबद्दल तोही गौरवास पात्र आहे.

त्या वाघाचे कातडे तुम्ही पंचनामा करून ताब्यात घेतले आहे. ते योग्य तऱ्हेने रंगवून टॅनिंग करून मला देण्यात यावे.

यापुढे आपण कुठल्याबाबतीत कारवाई करणे गरजेचे आहे याबाबत जाणकारांचा पूर्व सल्ला घ्यावा.

कळावे आ
झुंजारराव है. मोरे.
आंबवडेकर
मंगू बिस बंडगर, (धनगर रा. उदगीर)
तालुका शाहूवाडी

त्या नोटिशीचे उत्तर वाचल्यानंतर फॉरेस्ट ऑफिसर पिसाळ यांचे पित्त खवळले, पण आपण एक हुशार आणि जबरदस्त व्यक्तीची उगाच कळ काढली असे वाटले. तरीही पिसाळांना ते कातडे मोऱ्यांना परत करायची इच्छा नव्हती.

पुढे १५ दिवसांनी वनमंत्री झुंजाररावांना भेटायला आले. त्यांनी बिबट्याचे कातडे झुंजाररावांना सन्मानाने दिले. "मुख्यमंत्र्यांच्या आदेशावरून मी सर्व प्रकरणाची कसून चौकशी केल्यानंतर त्या बिबट्याचे कातडे तुम्हाला देत आहे."

"म्हणजे अजून लोकनियुक्त प्रतिनिधींनी व्यवहार सोडला नाही म्हणायचा! असो! उपमुख्यमंत्री मला भेटायला येणार आहेतच त्यावेळी मी त्यांचेही आभार मानीन!"

या बिबट्या प्रकरणामुळे झुंजारारावांच्या लौकिकात अधिक भर पडली. हे सर्व घडू शकलं ते झुंजाररावं केवळ जमीनदार होते किंवा खानदानी घराण्यातले होते म्हणून नव्हे तर त्यांना कायद्याचे सखोल ज्ञान होते म्हणून. सरलाबाईंना ते नेहमी म्हणायचे 'संग्रामला 'फुल फेज्ड' वकील मला बनवायचंय ते यासाठी! या कोर्टातून त्या कोर्टात पन्नास शंभर रुपयांसाठी त्याने फिरता कामा नये! मोजकेच चार दोन सेशनचे खटले चालवले तरी पुरे! आता माझं ते वय निघून गेलं हो! तरीही मी प्रयत्न करीतच राहीन.'

सरलाबाईंना आपल्या बुद्धिमान आणि धाडसी पतीबद्दल नितांत आदर होता. विशेषत: या उलट घराण्याचा बडेजाव सांगणारे, मोठमोठ्या राजेशाहीशी जवळीक असल्याचे वारंवार बोलणारे त्यांना आवडत नसत.

मंगू गावी परत जाण्यापूर्वी मोरेंच्या वाड्यात आला. त्यावेळी सरलाबाई त्याला म्हणाल्या, "मंगू, तू सरकारांच्या जवळ नसतास तर काय झालं असतं याची मी कल्पनाच करू शकत नाही!"

"तसं कसं हुईल वैनींसरकार? मी तुमच्या हातचं मीठ खाल्यालं आहे. मिठाला का हुईना पर मी जागणारच!"

"माझं कुंकू तू वाचवलंस. एवढे उपकार करून ठेवलेस ते कसे फेडावेत?"

"तस्लं काय डोक्यात आणू नका, वैनीसरकार. माज्या जिवात जीव हाय तंवर मी सरकारांच्या पाठीशी ऱ्हानारच हाय!"

एक साधा गरीब धनगर आणि दुसरे राजेरजवाड्यांच्या सहवासात लहानाचे मोठे झालेले खानदान घराण्यातले झुंजाररावं, यांच्यातली ती मैत्री अतिशय अकृत्रिम अशी होती.

त्या बिबट्याच्या प्रसंगानंतर झुंजाररावांनी मंगूला पोलीस हेडक्वार्टरमध्ये जमा झालेली एक सिंगल बॅरल बारा बोअर बंदूक घेऊन दिली. ती बंदूक खांद्यावर टाकून मंगू धनगर बिनधास्तपणे उदगीरच्या घनदाट जंगलात फिरू लागला. क्वचित प्रसंगी एखादा रानकोंबडा किंवा कस्तर मिळाला तर मोरे सरकारांच्यासाठी तो कोल्हापूरला घेऊन यायचा. सरलाबाई त्याला जेवणखाण आणि गाडी भाड्यासाठी १०-२० रु द्यायच्या.

असाच एकदा एक जंगली कोंबडा मारून तो झुंजाररावांच्यासाठी घेऊन आला असताना घरी संग्रामशिवाय कोणीच नव्हतं. सरलाबाई बहिणीच्या घरी गेल्या होत्या. झुंजारराव ऑफिसात होते.

संग्रामने तो कोंबडा बघितला आणि तो मंगूला म्हणाला, "मंगू मामा, मला एकदा जंगली कोंबड्याची शिकार करायची आहे! मी काडतुसं घेऊन येतो."

"सरकारांची परवानगी हाय का?"

"ते देणार नाहीत तशी परवानगी. मी माँची परवानगी मात्र घेईन!"

"एक दोन म्हैने जावू द्यात, आता पावसूळा हाय, कांटं डसत्यांत!"

"कांटं म्हणजे?"

"कांटं म्हणजे जळवा! कधी अंगावर चडून रगत पिल त्येचा नेम न्हाई!"

आपली पिंडरी दाखवत मंगू म्हणाला, "एवडा पावसूळा जाऊ द्या. तुमी या कोंबडं मारायला."

झुंजाररावांनी संग्रामला एक 'मेड इन जर्मनी'ची दोन नंबरची एअरगन घेऊन दिली होती. ती घेऊन तो आंबवड्याच्या शेतावर जाऊन कवडे मारायचा. अभ्यासात दुर्लक्ष करणारा संग्राम निशाणबाजीत अव्वल दर्जाचा होता. पुढे पुढे त्याची शिकारीची हौस वाढू लागली. त्याच सुमारास झुंजाररावांचे मेव्हणे बाजीराव भोसले अमेरिकेत बिझिनेस मॅनेजमेंटचा ११ वर्षे

अनुभव घेऊन भारतात आले. आल्या आल्या ते आपल्या बहिणीकडे म्हणजे सरलाबाईंच्याकडे राहिले. झुंजाररावांनी आंबा, विशाळगड, उदगीर या डोंगरी भागात प्रवासी वाहतूक कंपनी चालू केल्याचं जेव्हा बाजीरावांना समजलं तेव्हा ते म्हणाले, "जिजाजींनी हा चांगला व्यवसाय सुरू केला आहे."

सरलाबाई म्हणाल्या, "फार व्याप वाढवून घेतला आहे. अधून मधून ते गाडीबरोबर मुक्कामालाही जातात!"

"आणि शिकारीचा छंद?"

"तो चालू आहेच! तुम्हाला त्यांनी एक वर्षामागे बिबळ्या मारण्यासाठी मोहीम काढलेली हकिगत ठाऊक नाही वाटतं? त्या बिबळ्या वाघाचीच हे शिकार होणार होते. मंगू धनगरामुळे यांचे प्राण वाचले."

मग सरलाबाईंनी तो सर्व प्रकार बाजीरावांना सांगून म्हटलं, "असेच मागे विशाळगडच्या रस्त्यावर गाडी बंद पडली तेव्हा रस्त्यावर झोपून रात्र काढावी लागली होती."

"आक्का यावर एक चांगला उपाय आहे."

"कोणता?"

"अमेरिकेत मोटार होम नावाची गाडी बनवतात. ती गाडी कुठेही पार्क करता येते. गाडीत चार माणसांची झोपायची, राहायची, जेवायची सर्व व्यवस्था असते. शिवाय छोटे बाथरूम आणि टॉयलेटही असते. मी असल्या गाडीतून मेक्सिकोपर्यंत प्रवास करून आलोय. जिजाजी आता मोटार धंद्यात आहेत. त्यांना मी या मोटारहोमची कल्पना सांगतो. ते तसली गाडी इथं कोल्हापुरातही बनवून घेऊ शकतील! आज एवढा वेळ कुठे गेलेत?"

"शेतावर जावं लागतं अधूनमधून. रात्री येतील परत!"

"म्हणजे कुळकायद्यातून तुम्ही वाचलात तर?"

"ते कुठलं, जुनी कुळं होती! त्यांना २०० एकर जमीन वाटून टाकली. फक्त पन्नास एकर जमीन आमच्याकडं राहिली. सरकार म्हणाले, आपल्याला २०० एकर जमीन कसता येणं अशक्य आहे."

"अगदी चांगलं केलंत, आक्का. ही पन्नास एकर जमीन चांगली पिकली तर तुम्हाला काही कमी पडणार नाही. बरं, आमचे भाचे काय म्हणतात?"

"त्यांनी ग्रॅज्युएट होऊन कायद्याचं शिक्षण घ्यावं असं सरकारांना वाटतं, पण..."

"पण काय? शिक्षण बंद केलं की काय संग्रामनी?"

"बंद नाही केलं म्हणा, पण शिक्षणात म्हणावं तसं त्यांचं लक्षच नाही."

"उद्याच्या जगात शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही आक्का!"

"सरकारही तेच म्हणतात. स्वत:ला वकील होता आलं नाही याची अजून त्यांना खंत वाटते. कायद्याची पुस्तकं मात्र मागवतात, लोकांना कायद्याचे सल्ले देतात, तो छंदच आहे त्यांना!"

"छान! एकीकडं शेती, मोटार धंदा हे व्याप असताना कायद्याची आवड? अशी उदाहरणं दुर्मिळ आक्कासाहेब!"

"ते बिबट्या वाघाचं प्रकरण निर्माण झालं होतं ना तेव्हा केवळ यांच्या कायद्याच्या ज्ञानामुळं त्यावर पडदा पडला."

बहीणभाऊ बराच वेळ घरगुती बाबींवर चर्चा करीत राहिले. शेवटी बहिणीनं त्यांना विचारले,

"बाजीराव आता तरी लग्न करून घ्या."

''लग्न? आक्कासाहेब त्या फंदात मी पडायचं नाही असं ठरवलंय!''

''मागे माझ्या कानावर आलं होतं, काहीतरी.''

''काहीतरी म्हणजे अमेरिकेत माझी मैत्रीण आहे हेच ना?''

''हो ऽऽऽ पण गोऱ्या कातडीच्या बायका एकनिष्ठ नसतात. वर्ष दोन वर्ष झाली की काहीतरी कुरापत काढून जोडीदाराला सोडून जातात!''

''म्हणूनच मला लग्नाच्या फंदात पडायचं नाहीए! आता अगदी सुखात आहे मी तिथं! आणखी तीन वर्षांनी मी कायम भारतात रहायला येणार! तिथं मन लागत नाही आताशी! सामानगडाच्या पायथ्याशी छोटा बंगला बांधून जिजाजींसारखी थोडी शेती करायची म्हणतोय! धांदल धावपळीच्या जीवनाचा आता कंटाळा आला आहे! अकरा वर्षे कशी गेली समजले नाही!''

''पण मला वाटतं अजून वेळ गेलेली नाही. तुम्ही लग्न करून घ्यावं!''

''बघू, इकडं कायमस्वरूपी राहायला आल्यानंतर ठरवू.''

इतक्यात बाहेर गेलेले झुंजारराव परत आले. बाजीरावांना आलेले पाहून म्हणाले,

''आँ ऽऽऽ अमेरिका केव्हा आली?आणि अचानक कसे? लग्न बिग्न ठरवलंय की काय इकडं!''

''जिजाजी, तुम्हा लोकांना एखादी व्यक्ती स्वतंत्र आणि विनापाश रहावी असं वाटतच नाही का? आता आक्कासाहेबांनीही तेच ऐकवलं! पण जिजाजी, थोडंसं स्पष्ट बोलतो, क्षमा करा. इव्हिलीन नावाची सॅनडिएगोला माझी एक मैत्रीण आहे. गेली सहा-सात वर्षे आमची मैत्री टिकून आहे. आम्ही दोघांनीही एकमेकांना वचन दिलंय!''

''कसलं?'' कोटाची बटणं काढून कोट हँगरला अडकवीत झुंजाररावांनी विचारलं.

''एकमेकाला सोडून जायचं नाही. कितीही मतभेद झाले तरी सामोपचाराने त्रयस्थांच्या हस्तक्षेपाशिवाय मिटवून टाकायचे!''

''तुम्ही इथं स्थाईक व्हायला आल्यानंतर?''

''अजूनतरी ती म्हणते मी तुमच्या सोबत इंडियाला येणार! बघू, पुढचं पुढं, आज त्याची चिंता काय करायचीय!''

बाजीरावांनी मोटारहोमची केलेली सूचना झुंजाररावांना एकदम पसंत पडली.

त्यांनी उद्यमनगरमध्ये मॉडर्न बॉडी बिल्डर्स या गॅरेजच्या कल्पक प्रोप्रायटरशी चर्चा केली. एक फोर्ड कंपनीची नवी चासी खरेदी केली. दोन महिन्यात ते काम पूर्ण होणार होते. खेड्यापाड्यात मुक्कामाला जाताना त्यांना मोटारहोमचा फारच उपयोग होणार होता. बाजीरावांनी अमेरिकेवरून मोटारहोमचे डिझाईन मागवून घेतले. अधूनमधून ते आपल्या गावातून कोल्हापूरला येऊन बॉडी बिल्डिंग करण्याच्या कामावर लक्ष ठेवू लागले. आपल्याला एक नवे आव्हान आहे असे समजून गाडी बांधणाऱ्या मेकॅनिकने आपले कौशल्य पणाला लावले. पाचाच्या ऐवजी चार लोकांची रहायची, जेवायची, झोपायची व्यवस्था होईल असे मोटारहोम तयार झाले. गाडीत छोटा फ्रिâज, गॅस, स्टोव्ह, गाडीवर चार दिवस पुरेल इतकी पाण्याची टाकी, छोटे बाथरूम कम टॉयलेट इतक्या पद्धतशीर रीतीने बसवले की ती अद्ययावत गाडी परदेशातूनच आयात केलीय असे प्रथम पहाणाऱ्याला वाटावे.

झुंजारराव गाडी पूर्ण झाल्यावर कोल्हापूरच्या आर.टी.ओ ऑफीसकडे पासिंगसाठी घेऊन आले. तेव्हा तिथं जमलेल्या मोटार व्यावसायिकांनी गाडी पाहून आश्चर्य व्यक्त केले. 'नेव्ही ब्ल्यू' रंगानं रंगवलेली गाडी पाहून जो तो कोल्हापूरच्या कारागिराचे कौतुक करू लागला. या कोल्हापुरात म्हादबा मेस्त्रींनी ऑईल इंजिन प्रथम बनवले. नंतर त्यांनी आचार्य अत्र्यांच्या

सूचनेवरून फिरता रंगमंचही बनवला होता. गाडी कोल्हापुरात जेव्हा रस्त्यावर फिरू लागली तेव्हा रस्त्यावर थांबून लोक गाडी पाहू लागले.

झुंजारराव‍ांनी त्या गाडीला नाव दिले 'सह्याद्री.'

0-0

प्रकरण ४

दिवस चालले होते. झुंजाररावांनी कायद्याचा अभ्यास बराच केला. पण त्यांना परीक्षेला बसणे काही शक्य झाले नाही. अशातच त्यांच्यावर एक आपत्ती कोसळली. त्यांनी सुरू केलेली झुंजार मोटार ट्रान्स्पोर्ट बंद करावी लागली होती. महाराष्ट्रात स्टेट रोड ट्रान्स्पोर्ट सुरू होणार होते. पण ती सुरू करण्यापूर्वी ज्यांच्या प्रवासी गाड्या होत्या, त्या मालकांना योग्य अशा नोकऱ्या एस.टी. खात्यात दिल्या जाणार होत्या. त्यांच्याकडे कामाला असलेल्या कर्मचाऱ्यांना एस.टी.त सामावून घेण्यात येणार होते.

झुंजाररावांना तशा अर्थाचे पत्र मिळाले. त्यांना मुलाखतीला बोलावले. आजपर्यंत मोरे घराण्यात कोणीही सरकारी नोकरी केलेली नव्हती. फक्त छत्रपतींची सेवा केली होती. झुंजाररावांनी तीही केली नव्हती. कारण त्यांचा स्वभाव कुणाचे आधिपत्य मानणाऱ्याचा नव्हता. शिवाय त्याच सुमारास संस्थानेही विलीन झाली. संस्थानिकांना तनख्यावर विसंबून रहावे लागले होते. पूर्वीसारखे त्यांना पदरी नोकरचाकर ठेवणे शक्य होणार नव्हते.

म्हणूनच कुळ-कायदा अस्तित्वात आल्यानंतर झुंजाररावांनी आपली २५० एकर जमीन कुळांना देऊन फक्त ५० एकर आपल्या उपजीविकेसाठी ठेवून घेतली. केवळ शेतीच्या उत्पन्नावर समाधान मानणेही झुंजाररावांना पसंत नव्हते. म्हणून त्यांनी झुंजार मोटार ट्रान्स्पोर्ट सुरू केली. मोजक्याच सहा गाड्या घेतल्या. विश्वासू ड्रायव्हर आणि क्लिनर नेमले. रोज शे-चारशेची कमाई होत होती. सगळं कसं मनासारखं चाललं होतं आणि अशातच वाहतूक व्यवसायाचं राष्ट्रीयीकरण करण्याचे निर्णय घेण्यात आले.

झुंजारराव नोटिसीप्रमाणे ठरल्यावेळी एस. टी. ऑफीसला गेले. तेथे डिव्हिजनल कंट्रोलर म्हणून 'मिरांडा' या खिश्चन अधिकाऱ्याची नेमणूक झाली होती. मिरांडासाहेब पूर्वी इंडियन आर्मीत होते. मोठे लोभस आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व असलेले मिरांडासाहेब झुंजारराव आल्याचे समजताच स्वत: उठून केबिनच्या बाहेर आले.

गोरेपान, नाकेले, ओठावर पीळ दिलेल्या मिशांचे झुंजारराव उठून उभे राहिले. मिरांडासाहेबांनी त्यांच्या उजव्या हातात हात दिला. आणि त्यांना आपल्या केबिनकडे नेत म्हटलं,

"आपल्याला भेटायला मी फार आतुर होतो. आपल्याबद्दल मी बरंच काही ऐकलेलं आहे. तुम्हाला शिकारीचा छंद आहे म्हणे!"

"हो, जातो अधूनमधून शिकारीला!"

मिरांडासाहेब म्हणाले, "आम्हाला रानडुकराच्या मटणाचे फार आकर्षण आहे. केव्हातरी एकदा तुमची शिकार पहायची इच्छा आहे."

"जाऊ, जरूर जाऊ. पण तुम्ही लोक मला एस.टी. खात्यात सामावून घेणार म्हणजे नेमकं काय करणार?"

"तुमच्या अनुभवाला योग्य अशी नोकरी आम्ही तुम्हाला देऊ. आमच्याकडे DTO,

ATS अशी पदं आहेत. त्यापैकी तुम्हाला योग्य ती पोष्टींग मिळेल.''

झुंजारराव मोठ्याने हसले. ''DTO, ATS असली नोकरी मी करणार नाही. आमच्या बापजाद्यांनी फक्त छत्रपतींची सेवा केली. पण आता संस्थानं विलीन झाली. संपला तोही खानदानी जमाना.''

''पण आता राष्ट्रीयीकरण झालेल्या एस.टी.त एखादे पद भूषवा ना?''

''अंगावर खाकी डगला अडकवून किती गाड्या आल्यागेल्या याचा हिशेब ठेवणे मला शक्य होणार नाही. वरिष्ठांना सलाम करणंही मला या जन्मी जमणार नाही. फक्त माझ्याकडे जी सोळा-सतरा माणसं आज ड्रायव्हर आणि क्लिनर म्हणून काम करतात, त्यांना तुमच्या खात्यात सामावून घ्या म्हणजे झालं! माझी काही चिंता करू नका, पोटापुरती शेती आहे मला, यापुढे तिथंच राहून शेतीत लक्ष घालणार आहे मी! माझ्या सहा प्रवासी गाड्या मला विकून टाकाव्या लागणार आहेत. त्यांना फारशी किंमतही येणार नाही. तुमच्या डिपार्टमेंटला आमच्या सारख्या मोटार मालकांना काही नुकसान भरपाई देता येते का पहा!''

मिरांडासाहेब विनम्रपणे म्हणाले, ''आपण म्हणता ते अगदी योग्य आणि न्याय्य असेच आहे. पण आय यम् सॉरी. कॉंपेन्सेशनची अद्यापतरी तरतूद दिसत नाही.''

''बघा, आमची अपेक्षा तुमच्या खात्याला कळवा. ही काही माझी एकट्याचीच सूचना आहे असं समजू नका. प्रायव्हेट ऑपरेटर्स म्हणून लहान मोठे दहावीस लोक मला भेटले. तेच म्हणाले शासन काहीतरी नुकसान भरपाई देते का पहा!''

''उगाच तुम्हाला आशेवर ठेवणार नाही मी! तसा अद्याप कोणताच प्रस्ताव खात्यात मंजूर करण्यात आलेला नाही!''

''ठीक आहे आम्ही न्यायालयात दाद मागू.''

''माय सिंपथीज आर वुईथ यू!''

''थॅंक्यू ऽऽऽ! पण साहेब मला तुमचा स्पष्टवक्तेपणा फार आवडला हं! आपण एकदा माझ्या मोटारहोममधून आंबा किंवा विशाळगडच्या जंगलात शिकारीला जाऊ.''

''मिस्टर मोरे, आपल्या व्यवसायावर सरकारने गदा आणली म्हणून आगपाखड करणारे बरेच लोक मी पाहिलेत. पण तुमच्या सारखी समंजस आणि समजूतदार व्यक्ती आज प्रथमच पहातो आहे.''

''थॅंक्स्'' खुर्चीवरून उठता उठता झुंजारराव म्हणाले, ''आज ना उद्या खासगी उद्योगांचं राष्ट्रीयीकरण हे होणार होतं. ते अटळ आहे. त्याबाबत आदळआपट करणं हे शहाणपणाचं नाही! पण माझ्याकडे असलेल्या ड्रायव्हर आणि क्लिरना मात्र तुमच्या खात्यात व्यवस्थित सामावून घ्या म्हणजे झालं!''

मिरांडासाहेब झुंजारारावांना निरोप देण्यासाठी आपल्या खुर्चीतून उठले. बाहेरच्या दारापर्यंत जाताना म्हणाले, ''मिस्टर मोरे, त्याबाबतीत अगदी निर्धास्त रहा. आमचा अधिकारी येईल तेव्हा त्या लोकांचे सामुदायिक असे एक निवेदन द्या म्हणजे झालं!''

झुंजारराव पायातले चढाव बाहेर ठेवून आत आले होते. ते त्यांनी दाराबाहेर येताच पायात चढवले. मिरांडासाहेब झुंजारारावांच्या पहिल्याच भेटीत प्रभावित झाले.

जाता जाता काहीतरी आठवल्यासारखे करीत झुंजारराव म्हणाले, ''साहेब, तुम्हाला केव्हा शिकारीला यायला जमेल तेव्हा या म्हणा, पण त्यापूर्वी जर शिकार झाली तर 'पोर्क' पाठवून देऊ का?''

''व्हेरी काईन्ड ऑफ यू! जरूर जरूर पाठवा!''

झुंजारराव वाड्याकडे आले. ते मनातून काहीसे अस्वस्थ होते. जी झुंजार मोटार

ट्रान्स्पोर्ट त्यांनी आठदहा वर्षे सांभाळली ती काळाच्या पडद्याआड जाणार होती. त्याजागी एस.टी.च्या लालपिवळ्या रंगवलेल्या बिनचेहऱ्याच्या गाड्या आंबा, विशालगड, गगनबावडा, उदगीर या मार्गावर धावणार होत्या.

झुंजारराव कपडे बदलून आत आले. सरलाबाईंनी त्यांना विचारले.

"झाली का भेट साहेबांची? काय म्हणाले?"

"भेट झाली. पण त्यांनी सुचवलेली कोणतीच नोकरी मी स्वीकारणार नाही असं त्यांना स्पष्ट सांगून टाकलं! संग्राम कुठं आहे?"

"आज त्याचा रिझल्ट होता ना?"

रडतखडत संग्रामचं शिक्षण चाललं होतं. मॅट्रिक तिसऱ्या प्रयत्नानंतर पास झालेला संग्राम आता राजाराम कॉलेजात इंटरच्या वाऱ्या करीत होता.

"माझ्या मनात आलं होतं एस.टी.च्या साहेबाला सांगायचं, माझ्या ऐवजी माझ्या मुलाला एस. टीत नेमून घेता आलं तर बघा!"

"काही हरकत नव्हती तशी विनंती करायला."

"पण बाईसाहेब सरकारी किंवा निमसरकारी नोकरी झाली तरी ती जबाबदारीनं करावी लागते. तुम्ही त्याला लाडावून ठेवला आहे."

"आमच्या मागे काय होणार त्याचं कुणास ठाऊक?"

"परवा बाजीरावांचं अमेरिकेवरून पत्र आलंय. संग्राम इकडे यायला तयार आहे का पहा म्हणतात!'

"तिकडं जाऊन कसली नोकरी करणार आहे?"

"बाजीरावांच्या बऱ्याच कंपनीत ओळखी आहेत. कुठंतरी चिकटवून टाकतील."

"मला नाही वाटत तो जाईल म्हणून. गेला तर नाव कमवेल अशी आजतरी त्याची लक्षणं नाहीत."

"परवा ताई आली होती. ती म्हणत होती, बऱ्याच मुलींच्या वडलांनी संग्रामच्या स्थळाबद्दल तिला विचारलं होतं म्हणून."

"अद्याप एक पैसाही कमवायची अक्कल नाही आणि त्याचं लग्न करा! त्या मुलीला तरी पोसता येईल का त्याला? आमचं राहू द्या. आम्ही कसेही पोट भरून खाऊ. एवढ्यात त्याच्या डोक्यात हे लग्नाचं वेड भरवू नका."

"पण एकदा का लग्न झालं की मुलं समजूतदार होतात. त्यांना जबाबदारीची जाणीव होते."

"चुकीची समजूत आहे तुमची. मी त्याला फार चांगला ओळखतो. अतिशय बेजबाबदार आणि खुशालचेंडू आहे तो! "एव्हाना ग्रॅज्युएट व्हायला हवा होता. एल. एल. बी. तर दूरच राहिलं! त्याच्या बाबतीत आमचं तेवढंच एक स्वप्न होतं. शेती सांभाळून पन्हाळ्याला, नाहीतर मलकापूरच्या कोर्टात जरी त्यानं वकिली केली असती तरी त्याचं चालण्यासारखं होतं. मोटार धंद्यामुळं त्या भागात असंख्य लोक मला ओळखतात, त्याचा त्याला फायदा निश्चित झाला असता! पण ह्या जर तरच्या गोष्टी आहेत. जाऊ द्या. अलीकडे तो माझंच तोंड चुकवतो आहे. मला समजत नाही असं नका समजू! लाडावून ठेवला आहे तुम्ही त्याला."

संग्रामबाबत अलीकडे सरलाबाईही काहीशा सचिंत झाल्या होत्या. तसं संग्रामचं लग्न व्हायचं वय जरी झालेलं असलं तरी जोपर्यंत तो काही कमावत नाही तोवर त्याचं लग्न होता कामा नये असं झुंजारराव‌ांना वाटत होतं आणि त्यात काहीच वावगं नव्हतं.

रंकाळ्यावरच्या घरात झुंजारराव गच्चीत उभे होते. समोर दिसणारा रंकाळा तलावाचा

परिसर कितीही न्याहाळला तरी कंटाळा येत नसे. दिवसातल्या कुठल्याही क्षणी तलावाकडं पहावं, त्याचं दर्शन मोहक वाटे. थंडीच्या दिवसात पाण्यावर दाट धुकं पसरलेलं असे. तर दुपारी धुकं निवळल्यावर उन्हात चमचम करणाऱ्या लाटा उसळत. संध्याकाळी तर गच्चीतून उठूच नये असं वाटे. प्रत्येक संध्याकाळ नवे रंग आणि ढंग घेऊन यायची. पश्चिम क्षितिजावर होणारी ती रंगांची उधळण पहाताना सूर्यास्त झाल्याशिवाय तेथून उठूच नये असं वाटे.

त्या संध्याकाळी झुंजारराव गच्चीत बसले असताना सरलाताई जिन्यावरून वर आल्या.

झुंजारारावांच्या बाजूला उभं राहून म्हणाल्या, "ताईची लहानपणापासूनची मैत्रीण पद्माबाई आल्या आहेत. त्यांना थोडा कायदेशीर सल्ला हवा आहे!"

"कायदेशीर सल्ला? तो एखाद्या वकिलाकडून घ्या म्हणावं. मी अर्धवट कायदा शिकलेला माणूस! गुंतागुंतीची बाब असली तर मी कसला त्यांना सल्ला देणार?"

"ताई त्यांना घेऊन खाली आली आहे. आपल्या घरापर्यंत आल्यानंतर एकदम दुसऱ्या वकिलाकडून सल्ला घ्या म्हणून त्यांना वाटेला लावणं बरं नाही दिसत! शिवाय पद्माबाई विधवा आहेत!"

विधवा म्हटल्याबरोबर झुंजारारावांचा आवाज थोडा बदलला.

"पण या पद्माबाई आहेत तरी कोण, कुठल्या आणि नेमका त्यांना काय प्रॉब्लेम आहे ते तरी सांगा?"

सरलाबाई म्हणाल्या, "ते सर्व तुम्ही पद्माबाईंच्या तोंडूनच ऐकलेलं बरं! पाठवू का त्यांना वर!"

सुरुवातीला आपण परिपक्व वकील नाही या कारणास्तव सल्ला द्यायला टाळणारे झुंजारराव विधवा म्हटल्यावर तयार झाले.

"पाठवा त्यांना. ताईंनाही सोबत पाठवा."

"ताईला जिना कुठं चढता येतो? पद्माबाई मात्र येतील!"

खाली सरलाबाईंनी बहिणीला आणि पद्माबाईंना चहा बिस्किटं दिली आणि त्या पद्माबाईंना म्हणाल्या, "जा आपण वर. सरकार गच्चीतच आहेत."

पद्माबाई अठ्ठावीस एकोणतीस वर्षाच्या होत्या, त्या गौरवर्णीय सरळ नाक, भव्य कपाळ आणि बदामी डोळ्याच्या होत्या. त्यांना बघताक्षणीच स्त्रीदाक्षिण्य म्हणून झुंजारराव उठून उभे राहिले. पद्माबाईंनी झुंजारारावांना वाकून नमस्कार केला. डोक्यावरचा पदर सावरत त्या म्हणाल्या,

"आपल्याला थोडा त्रास देते आहे! मी आपल्याला भेटण्यापूर्वी ३-४ वकिलांचा सल्ला घेतला. पण एकानेही मला व्यवहारी सल्ला दिला नाही. धंदेवाईकच ते! मग सुशिलाताईंना मी विचारलं, त्या म्हणाल्या, 'सरलाक्काचे मिष्टर झुंजारराव जरी वकील झाले नसले तरी ते अतिशय हुषार आणि व्यवहारी गृहस्थ आहेत. खेडोपाड्यातले लोक त्यांचा सल्ला घेण्यासाठी येतात. त्यांना अचूक असे मार्गदर्शन करतात.' "

झुंजारराव स्तुतीनं हुरळून जाण्यातले नव्हते, ते लगेच म्हणाले, "अहो खेड्यातील लोकांच्या कसल्या आल्यात समस्या? कोणाची सून नांदायला येत नाही, तर कोणाच्या तरी शेताच्या बांधावर शेजारी अतिक्रमण करतो. होता होईल तो मी त्यांच्या गावाला भेट देऊन गावची चार प्रतिष्ठित माणसं जमवतो आणि तिथल्या लोकांच्या होता होईल तो समस्या सामोपचाराने मिटवून टाकतो झालं! तुमच्या कामाचं नेमकं स्वरूप काय आहे?"

"सरकार, कामाचं स्वरूप सांगण्यापूर्वी मला थोडा माझा पूर्वेतिहास सांगावा लागेल!"

"बरं बोला!"

"मी मूळची फलटणची. तिथल्या राजघराण्याशी दुरून नातेसंबंध होते. माझे वडील पूर्वी आर्मीत होते. त्यांनी माझं लग्न सांगली जिल्हातल्या कवठे गावातल्या जहागीर घराण्यातल्या शिवराम सावंत यांच्याशी ठरवलं. शिवराम हे अतिशय देखणे आणि धाडसी होते. माझ्याशी लग्न होण्यापूर्वी ते सैन्यात दाखल झाले होते."

"अगोदर सैन्यात जायचं होतं तर लग्न कशाला केलं?"

"पण त्यांना कमिशन मिळालं ना? कमिशन्ड ऑफिसरना जिथं जिथं क्वार्टर्स असतील तेथे आपली फॅमिली घेऊन जाता येते."

"आय सी ऽऽऽ बरं पुढं काय झालं?"

"दोन-तीन वर्षे मी त्यांच्यासोबत राहिले."

"अंबाला डेहराडून, पुणे कॅन्टोनमेंट इथं आमचं वास्तव्य झालं!"

"मी थोडी अधिक माहिती घेण्यापूर्वी एक शंका विचारू?" झुंजारराव म्हणाले.

"जरूर विचारा."

"या दोन-तीन वर्षांच्या कालावधीत काही अपत्य?"

किंचित स्मित करून पद्माबाई म्हणाल्या,

"सावंताना मुलांचे फार आकर्षण होते. पण वारंवार होणाऱ्या बदल्यांमुळे आम्ही दोघांनीही निर्णय घेतला कुठंतरी स्थिरावल्याशिवाय मुलाबाळांचा व्याप मागे नको!"

"स्थिरावणार कसे? सैन्यात काय म्हणून काम करीत होते?"

"प्रथम सेकंड लेफ्टनंट म्हणून दाखल झाले. नंतर कॅप्टनचं प्रमोशन मिळालं."

"बरं पुढं?"

"इतक्यात काश्मीरचा प्रश्न निर्माण झाला. सावंताना फूलवामा जिल्ह्यात पोस्टिंग आलं. तिथं ते जॉईनही झाले. पण तेथून श्रीनगरला येताना त्यांच्या जीपला अपघात झाला. जीप दोनशे फूट दरीत कोसळली. ते जागीच ठार झाले."

लक्ष देऊन पद्माबाईंची हकिगत ऐकणारे झुंजारराव काहीसे भावनाप्रधान होऊन म्हणाले,

"अरेरे, वाईट झालं! तेव्हा तुम्ही कुठं होता?"

"मी कवठ्याला होते. सेन्याधिकाऱ्यांची तार आल्यावर आम्ही सारे हवालदिल झालो. सासरे त्या बातमीच्या धक्यानं गेले."

"शिवरामना दोन भाऊ आहेत, एक विजय आणि दुसरे उदय! आमचे लग्न होण्यापूर्वीच विजयचे लग्न झाले होते. उदयचे नंतर झाले. यांचे क्रियाकर्म पार पडल्यानंतर सावंतांच्या घरचं वातावरण बदललं! दिरांनी यांचे सर्व शिल्लक पैसे हडपले. जमिनीच्या फक्त दोन वाटण्या केल्या. मी म्हणाले तीन वाटण्या व्हायला हव्यात."

"अगदी बरोबर!"

"अद्यापही ते मला शिवरामांची जमीन द्यायला तयार नाहीत. मी वाटणी मागते म्हणून दीर आणि भावजयांनी मला वाळीत टाकल्यासारखे केले."

"पण तुम्ही तुमच्या वाटणीची जमीन घेऊन करणार तरी काय? तुम्हाला काय शेतीचा अनुभव आहे?"

"माझ्या वाटणीची जमीन मला मिळाल्यानंतर ती विकून टाकीन नाहीतर कुळे लावून ती करून घेईन. पण मुळात मला ते लोक काहीच द्यायला तयार नाहीत ना?"

"सावंतांची काही पेन्शनतरी मिळत असेल ना?"

"हो. त्यावर तरी मी सध्या गुजराण करते आहे! ते लोक मला वाड्यात हिस्सा देण्यास तयार नाहीत!"

"तुमचं शिक्षण किती झालंय?"

"मी ग्रॅज्युएट आहे, बी.एड. करून कुठंतरी नोकरी करावी म्हणते. पण बी.एड.ला शिक्षण सम्राट भरमसाठ डोनेशन मागतात. तेवढे पैसेही नाहीत माझ्याकडं!"

"बरं, आणखीन एका नाजूक बाबतीत विचारतो, तसं तुमचं फार वयही झालेलं नाही, पुनर्विवाहाचा काही विचार केलात?"

पद्माबाई किंचित स्मित करून म्हणाल्या, "आमच्या माहेरचा विरोध आहे त्याला. शिवाय मलाही वाटते, एका लग्नाचा हा अनुभव, दुसऱ्या लग्नानं तरी सुखी होईन कशावरून?"

झुंजारराव म्हणाले, "पण पद्माबाई, बाई कितीही कर्तबगार असली तरी पुरुषाच्या आधाराशिवाय या जगात जगू शकत नाही!"

"माफ करा सरकार, तूर्तास मी त्या फंदात पडायचं नाही असं ठरवलंय. प्रथम माझ्या हिश्शाची जमीन मला मिळायला हवी ना? आता मला निराळीच भीती वाटू लागलीय!"

"कसली?"

"ते लोक माझ्या जिवाचं काहीतरी बरं वाईट करायला मागेपुढे पहाणार नाहीत! थोरले दीर विजय म्हणतात मला दोन मुलगे आहेत त्यातला एक दत्तक घ्या, मग तुमच्या हिश्शाची जमीन देऊ!"

"मग? काय हरकत आहे?"

"माझी इच्छा नाही सावंतांच्या घराण्यातलं मूल दत्तक घ्यायची! मला काही व्यक्तीस्वातंत्र्य आहे की नाही?"

"जरूर आहे. पण पद्माबाई हे तुमचं प्रकरण सामोपचारानं मिटण्यापैकी नाही. तुम्हाला दिरांच्या विरोधात दिवाणी दावाच लावावा लागेल!"

"झालं, म्हणजे त्या दाव्याचा निकाल माझ्या हयातीत लागणार नाही! सरकार दुसरा काहीतरी मार्ग सुचवा!"

काही क्षण विचार करून झुंजारराव म्हणाले,

"बघू. तुमच्या दिराशी सांगली जिल्ह्यातील काही प्रतिष्ठितांच्या मध्यस्थीने संपर्क साधू! पण काही झालं तरी तुम्ही पुन्हा एकट्या दुकट्या तिकडं जाता कामा नये!"

"हो, ते तर आहेच. म्हणून परवा साताऱ्याच्या कलेक्टरकडून आत्मसंरक्षणासाठी रिव्हॉल्व्हरचे लायसेन्स मिळवले आहे. रिव्हॉल्व्हरच्या भयानक किंमती झाल्यात हो! दीड दोन लाख लागतील म्हणातात. शिवाय रिव्हॉल्व्हर राहते बॅगेत आणि लायसेन्सधारी माणूस मारला जातो! अशी कितीतरी उदाहरणं घडलेली आहेत."

"खरंय. कुंभोजच्या पाटलांचं ताजं उदाहरण आहे. सहाबारी रिव्हॉल्व्हर त्यांच्या कमरेला होतं, पुढं मागे दोन भालाधारी 'बॉडीगार्ड' होते. अशा अवस्थेत पाणंदीतून अचानक येऊन हल्लेखोरांनी त्यांचं शिर धडावेगळं केलं! नंतर हल्लेखोर सापडले म्हणा, पण कोर्टात संशयाचा फायदा मिळून निर्दोष सुटले."

"म्हणूनच मी आज तुमच्याकडे आलेय. मला काय सल्ला द्याल? आता लागलीच तो द्यायला हवाय. असं नाही. विचार करून ठरवा. मी नंतर येऊन भेटेन आपल्याला."

पद्माबाई झुंजारारावांचा निरोप घेऊन उठल्या. पुन्हा त्यांनी झुंजारारावांना खानदानी नमस्कार केला आणि जिन्यावरून खाली उतरल्या.

त्या गेल्यावर झुंजारराव दीर्घ निश्वास सोडून स्वत:शीच म्हणाले, "आता या बार्इंना

कसला सल्ला देणार मी? कठीण आहे!''

सूर्यास्त झाल्यानंतर हळूहळू अंधार पडू लागला. आकाशात प्रथम एक दोन तारे उगवले. नंतर हां हां म्हणता सारे आकाश चांदण्यानी फुलून गेलं.

झुंजारराव जेवणासाठी खाली आले. त्यांना सरलाबाईंनी विचारले, ''पद्माबाईचं काम होण्यासारखं आहे का?''

''बघू. मला थोडं कठीण वाटतंय. कवठ्याचे लोक आडदांड दिसताहेत. बऱ्या बोलानं बाईना जमिनीचा हिस्सा मिळेल असं वाटत नाही.''

''प्रयत्न तरी करून पहा. मोठ्या आशेनं त्या आपल्याकडे आल्या आहेत. तरुणपणात वैधव्याची कुऱ्हाड कोसळलीय बिचारीवर!''

झुंजारराव त्यावर काही न बोलता डायनिंग टेबलवर बसून जेवू लागले.

''संग्राम आला का?''

''नाही. आज त्याच्या मित्राचा वाढदिवस आहे. बाहेरच जेवून येणार आहे.''

''मला नाही सांगितलं त्यानं! अलीकडे तो मला टाळतोच म्हणा!''

''उगाच तुम्हाला तसं वाटतं, मुलं तरुण झाली की वडिलांशी फार मनमोकळेपणा दाखवू शकत नाहीत. तरी पण यापुढे बाहेर कुठं जायचं असेल तर तुझ्या डॅडींना विचारून जात जा असं सांगेन.''

0-0

प्रकरण ५

झुंजार मोटार ट्रान्स्पोर्ट बंद झाली. ती बंद झाल्यापासून झुंजारराव काहीसे 'रिझर्व्हड' असे वागत होते. आंबवड्याच्या शेतावर दोन खोल्याचं साधं घर होतं. तिथं अधून मधून जात पण मुक्कामाला रहात नसत. त्यांच्या हितचिंतकांनी त्यांना अधून मधून शेतावर येऊन राहण्याचा सल्ला दिला होता.

मंगू धनगर केव्हातरी शेतावर यायचा. मंगू आला की झुंजारराव थोडे मनमोकळे व्हायचे! त्यादिवशी तो आंबवड्याला आला.

"सरकार तुमी ते नवीन मोटार बनवलंय त्यातनं उदगीर आंब्याला येत जावा की!"

"होय. तू म्हणतोस ते खरं आहे. कधी कधी या शहरी जीवनाचा फार कंटाळा येतो! दिलखुलास अशी कोणाची तरी मैत्री करावी म्हटले तर तसं कोणी आजूबाजूला दिसत नाही. आमच्यातले बरेच सरकार लोक आपल्या जमिनी विकून देशोधडीला लागले. अजूनही त्यांची सनातनी वृत्ती बदललेली नाही."

"पर सरकार, काय बी म्हना तुमी फारेस्ट खात्याचा आवाज मातोर बदं केला हां! फारिस्टर म्हैन्या आगुदर आला हुता उदगीरला. तवा तेनं मला बलावनं केलं होतं."

"का? तुला बोलवायचं कारण काय?"

"मी एकनाळ बंदूक घेतल्यालं तेला समजलंय, म्हनून बंदूक घिऊन बलिवलं होतं. माजं लायसन वाचून बगितल्यावर म्हनला, 'आत्मसंरक्षणासाठी तुला बंदुकीची काय गरज होती? कमरेला धारदार कोयता बारा महिने असतोच की? बिबळेसुद्धा तू कोयत्याने मारतोस."

"मी म्हनलो सायेब मोरे सरकाराच्यावर बिबट्यानं हल्ला केला म्हनून मी त्येला तोडला, म्हनून म्हंतासा व्हय!"

ते म्हणालं, "फार हुशार आहेस!"

"तेनी माझी बंदूक आतनं बाईरनं बघितली आन म्हन्ले चांगली आहे. केवढ्याला घेतलीस? म्या म्हन्लं मोरे सरकारांनी घिऊन दिली. किती पैसे दिलं मला ठावं न्हाई!"

"तुला या बंदुकीचं लायसेन्स का दिलंय ठाऊक आहे ना? ते दिलंय फक्त आत्मसंरक्षणासाठी. या बंदुकीनं तू शिकार करता कामा नये. तशी तू शिकार केल्याचं आढळलं तर तुझ्यावर खटला भरला जाईल, लायसन जप्त होईल."

"मग तू काय म्हणालास?"

"माजी एकच बंदूक दिसती व्हय तुमास्नी? अशा शेकड्यावारी बंदुका खेड्यावारी पसरल्या आहेत. आठवड्यात एक दिवस आमी कोकणात हाक्या काडतो. पाळकाचा दिस वाया जात न्हाई म्हनंनासा? ते कितीबी काय बी केलासा तरी थांबणार न्हाई! तुमचं कायदं ऱ्हात्यात हापिसात कागदावरच."

झुंजारराव म्हणाले, "चांगलं केलंस. पण मला हे नाही समजत ते बिबट्याचं प्रकरण त्या लोकांच्या डोक्यातून अद्याप जात कसं नाही?"

"साऱ्या जंगलाची वाट लावलीया सरकार या फारीष्ट खात्यानं. जंगलतोडीचं लायसन एकाद्याला देत्यात दोन एकराचं. त्यो करतोय तोड दोनशे एकराची, ते तेस्नी दिसत नाही. आन् आमच्या बाया पोरी पोटापान्यासाठी चार मोळ्या मलकापूरच्या बाजारात इकाया घिऊन निघाल्या की खटला दाकल करत्यात! तुमी त्यो फारीष्ट खात्याचा बंगला कदी बघितलायसा काय?"

"नाही रे, लव्हाळ्याला रस्त्यापासून जवळच आहे असे ऐकलं होतं!"

"रानोजी धनगर जंगलाची कंत्राटं घेतो, डोंगरात कोळशाच्या भट्ट्या लावतो. बक्कळ पैसा कमिवलाय, दोन लंबरचा!"

"त्याच्यावर काही कारवाई नाही होत?"

"कशी हुईल? म्हैन्यातनं दोनदा फारीष्टर जंगलबंगल्यात मुक्कामाला अस्तो, तवा दारू कोंबड्या रानू धनगरच पुरवितो की! लई गब्बर झालाय म्हनंनासा!"

"असा बेकायदेशीर मार्गानं मिळणारा पैसा माणसाला सुख देऊ शकत नाही."

"आमी बी आसंच म्हनत हुतो, पर तस्ल्या लोकांचं काय बी वाकडं हूत नाही. आवो सरकार, रानू धनगरानं सोताचं एकदम दोन लेल्यांड ट्रक खरेदी केल्यात. दुमजली घर बांधलंय लव्हाळ्यात. घरात फोन काय, बरफाचं कपाट काय, टेबलखुर्च्या सागवानी आणि शिसवीच्या हैत."

"मग कोणी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याच्या निदर्शनाला या गोष्टी आणत नाहीत?'

"आवो सरकार, गेल्या म्हैन्यात लई मोठा पोलिसांचा सायेब जंगल बंगल्यावर मुक्कामाला हुता. त्याला दारवाची बाटली आन्ली हुती ती दोन हज्जार रुपयाची! पास सा कोंबडं कापलंत, डझनानं अंडी उकडल्याली. मध्यानपातोर पार्टी चाल्याली!"

"तुला काय माहीत?"

"ती दिशी मी रानू धनगराच्यातच वस्तीला हुतो. सांच्यापारची एस्टी चुकली म्हनून तितंच वस्ती ऱ्हायलो हुतो! रानू मानूस म्हनून लई चांगला, सगळ्यांसंगं चांगलं वागतो, आल्या गेलेल्याला जेवायला खायाला घालतो. मंग त्येच्या ईरुद्द तक्रार कोन करनार?"

झुंजारराव मंगूने सांगितलेली राणोजी धनगराची हकिगत ऐकण्यात रंगून गेले होते. ते म्हणाले, "राणोजी मला या अगोदर कसा नाही भेटला?"

"कसा भेटणार? बारा तास आपल्याच येपात आस्तंय ते! कदी थीर नसतंय! पर काय बी झालं तरी दोस्तीला लई चांगलं!"

"तुझी त्याची जानपहेचान आहे तर?"

"न्हानपनापस्नं वळीकतो की मी त्येला! आपलं बिबट्याचं परकरन झालं का नाही तवा त्येनंबी मला लई धीर दिला हुता. त्यो म्हनला मंगू तुला काय बी हुनार नाही."

"आता मला तो फॉरेस्टचा बंगला, तो राणोजीचा दुमजली वाडा हे सगळं पहायची उत्कंठा लागून राहिलीय!'

"सरकार तुमी जवा हितं आंबवड्याच्या शेतात बंगला बंदनार हैसा तवा सगळा लाकूड फाटा तुमाला पोच करील रानू धनगर! त्येला निसतं सांगायची खोटी!"

त्यादिवशी सकाळीच झुंजारराव आंबवड्याच्या शेतावर आले होते. खालच्या पट्टीत उसाची लावण सुरू होती. त्यात वरच्या पट्टीत केलेलं कोबी, फ्लॉवर आणि टोमॅटोचं पीक काढायची सुरुवात होती. आजचा उभा दिवस त्यांना शेतावर काढावा लागणार होता.

शेतापासून पश्चिमेला एक फर्लांगावर रत्नागिरीला जाणारी डांबरी सडक होती. तेथून झुंजाररावांनी आपल्या शेतातील घरापर्यंत मोटार येईल असा दहा-बारा फुटी रस्ता बनवून

घेतला होता. आज ते आपली मोटार व्हॅन घेऊन शेतावर आले होते. मंगूनं ती गाडी आतून बाहेरून बघितली आणि म्हणाला,

"सरकार हे एवडं काम लई झॅक केलंसा बगा! ऱ्हायाची, जेवायची झोपायची सगळी शिस्त! कुणाचं डोस्कं म्हनायचं हे!"

"अरे मंगू इंग्लंड अमेरिकेच्या लोकांचं डोकं आहे हे. आमचे मेव्हणे बाजीराव भोसले यांना ओळखतोस ना तू?"

"व्हय व्हय. त्यांनी मागिद्या मला बूट करायला सांबरी बगायला सांगितली नव्हती का? पर आता सांबर कुणी मारत नाही. पेरिडच्या लहू चउलग्याकडं एक तुकडा घावला त्यो दिला बगा बाजीरावास्नी!"

"तेच बाजीराव चार-पाच महिन्यांपूर्वी आले असताना त्यांनीच या गाडीची कल्पना दिलीस म्हणेनास!"

"आता ही गाडी एकडाव माज्या वस्तीवर उदगीरला इऊद्या!"

"येईल येईल. ती वेळ यायला हवी."

इतक्यात रत्नागिरी रोडवरून एक रिक्षा खाली वळली. ती थेट झुंजाररावांच्या शेतातल्या घरासमोर येऊन थांबली. कोण आलंय बुवा? असं म्हणत झुंजारराव व्हरांड्यातून थोडं पुढं झाले. त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. पद्माबाई सावंत रिक्षावाल्याचं बिल भागवून पुढे आल्या.

डोक्यावरचा पदर सावरून त्यांनी झुंजाररावांना वाकून नमस्कार केला.

"तुम्ही कशा काय इकडे?"

"रंकाळ्यावर घरी गेले होते. वैनीसाहेब म्हणाल्या आज सबंध दिवसभर तुम्ही शेतात थांबणार आहात. मग गंगावेशीतून सरळ रिक्षा केली. वैनीसाहेबांनी तुमच्या शेताचा बरोबर पत्ता सांगितला."

"कमाल आहे तुमची! एवढ्या आडरानात पत्ता काढत आलात."

"सरकार मलाही तुम्हाला भेटावंसं वाटू लागलं होतं. नंतर मला ताईनं तुमची सगळी डिटेल माहिती सांगितली. तुम्ही आणि मंगू धनगरानं मारलेला तो बिबट्या वाघ, त्या अगोदर तुम्ही मारलेले मॅनईटर वाघ हे सगळे मी तुमच्या जुन्या वाड्यातल्या शिकारखान्यात जाऊन पाहिलेत. तुम्ही जगत असलेल्या धाडसी जीवनाबद्दल मला आकर्षण आहे. लहानपणी मीही फलटणला असताना काकांच्या सोबत हरणांच्या शिकारीला जायचे! मला काकांनी त्२२ बंदूक चालवायला शिकवले होते. धाडसी व्यक्तीबद्दल माझ्या मनात आदर आहे! म्हणून तर मी शिवरामांना न पहाताच पसंत केलं. त्यांच्यासोबत आर्मीत असताना मी भरतपूर महाराजांची ॲन्युअल डक् शूटही अटेंड केलीय. पण अचानक आयुष्याचे फासे उलटे पडले. शिवराम ॲक्सिडेंटमध्ये गेले आणि मी निराधार झाले. तेही मी सहन केलं असतं. पण सासरच्यांनी मला वाळीत टाकायचाच चंग बांधला आहे. घरातल्या जावाही शिवरामांच्या अकाली मृत्यूबद्दल मलाच जबाबदार धरू लागल्या. म्हणून मीही हट्टाला पेटले. शिवरामांच्या वाटणीची जमीन मिळवण्यासाठी कसलेही दिव्य करायची माझी तयारी आहे."

मंगूनं ट्रेमधून चहा बिस्किटं आणली. त्याच्याकडं पहात पद्माबाई म्हणाल्या,

"चांगलच ट्रेनिंग दिलंत की याला."

"तो माझी फार काळजी घेतो. कुण्या जन्माचे नाते आहे कुणास ठाऊक! बरं पद्माबाई, आमच्या शेताकडून जरा फेरफटका मारायचा का?"

"चला की, जरूर चला. स्वत:च्या मालकीच्या शेतात कधी फिरता आलं नाही! पण

इथं संधी मिळाली. सरकार तुम्ही एक चांगलं अद्ययावत घर बांधा या शेतात! ही बाजूची टेकडी दिसते ती तुमच्याच हद्दीत आहे ना? दॅट इज ॲन आयडिअल स्पॉट फॉर ए फार्म हौस.''

''पण, पद्माबाई काही घटना माझ्या आयुष्यात अशा घडल्या आहेत की कोणत्याही मला गोष्टीत आता उत्साहच उरला नाही.''

''माझी आपणास उपदेश करण्याची पात्रता नाही. तरी मी म्हणते. तुमची ट्रान्स्पोर्ट कंपनी बंद झाली. पण एवढं चांगलं कोल्हापूर पासून तेरा-चौदा किलोमीटरवर हे सोन्यासारखं शेत आहे. रंकाळ्याच्या काठावर नजर लागेल असं निवासस्थान आहे. एकुलता एक देखणा मुलगा आहे. सरलावैनींच्या सारखी सालस पत्नी आहे. समाजात मानसन्मान आहे आणि काय हवं तरी काय तुम्हाला?''

झुंजारराव त्यावर काही बोलले नाहीत. ''चला जरा खाली फिरून येऊ.''

उसाची लावण पाहून झाल्यावर टॉमेटोच्या वाफ्याकडं आले. एक रसरशीत टॉमेटो पद्माबाईंनी तोडून घेतला. तो न्याहाळत म्हणाल्या, ''काय सुंदर आहेत हो हे टॉमॅटो! माझ्या अतिशय आवडीचं फळ आहे हे! तुम्हाला टॉमेटो सूप आवडतं?''

''आवडेल. पण आमच्या सरलेला नवीन नवीन पदार्थ करायचं अलीकडे हौसच नाही! सगळ्या प्रकारचं नॉनव्हेज प्रकार मात्र चांगले बनवते!''

''मी देईन त्यांना ते ट्रेनिंग!''

त्यानंतर फ्लॉवर आणि कोबीचे वाफे पाहून झाले. पद्माबाई ते सर्व पाहून बेहद्द खूष झाल्या. घराच्या डाव्या बाजूला असलेल्या मोटार होमकडे लक्ष जाताच. लहान मुलीसारखा ऊऽऽ असा आवाज करीत पद्माबाईंनी गाडीवर बाहेरून हात फिरवला आणि म्हणाल्या,

''हा नेव्ही ब्ल्यू कलर नं?''

''हो आतून बघा नां?''

झुंजारारावांनी दार उघडलं. चार माणसांच्या निवासाची, जेवणाची खाण्याची सुविधा असलेली ती मोटार व्हॅन पाहून पद्माबाई म्हणाल्या, ''इंग्रजी सिनेमात असल्या गाड्या मी पाहिल्यात. पण तुम्ही ही गाडी कोल्हापुरात बनवली हे कुणालाही पटणार नाही. हा गॅस स्टोव्ह, तिकडे प्रिâज, वॉशबेसिन, टॉयलेट कमबाथ. सरकार खरं सांगू गाडी बघितल्यावर काय वाटलं ते?''

''काय?''

''या गाडीतून तुमच्या समवेत उभा हिंदुस्थान पालथा घालावा.''

झुंजारराव मिशावरून पालथी मूठ फिरवीत म्हणाले,

''सगळ्याच कल्पना वास्तवात उतरत नसतात. बरं आज तुमचं इकडं एवढी वाट वाकडी करून येण्याचं प्रयोजन काय?''

''माझ्या दिरांना मी त्यांच्याविरुद्ध वाटणीचा दावा दाखल करणार आहे म्हणून एक नोटीस द्यावी असं बऱ्याच जणांनी मला सुचवलंय.''

''ती तुम्ही केव्हाही देऊ शकता.''

''केव्हाही जरी देऊ शकत असले तरी ती नोटीस आपण ड्राफ्ट करावी अशी माझी विनंती आहे.''

''मी ऽऽऽ?''

''हो. कारण आपण जितक्या आत्मीयतेनं ती लिहाल तेवढी दुसरं कोणी लिहू शकणार नाही.''

झुंजारारावांनी क्षणभर विचार केला आणि ते म्हणाले, ''आणखी एक चार दिवसांनी

मला भेटा. मी नोटीस तयार करून ठेवीन.''

''आपली फी मी देईन!''

''फी ऽऽऽ? मग मी नोटीसच तयार करणार नाही. मी काही धंदेवाईक वकील नव्हे, पद्माबाई. उगाच तुम्ही सरलाच्या ताईला घेऊन आलात म्हणून मी नोटीस तयार करायला तयार झालो.''

''पण आपला वेळ आणि बुद्धी त्यासाठी वापरणार ना, त्याचा मोबदला म्हणून तुम्ही काहीतरी स्वीकारावं असं मला वाटतं.''

''त्याची आज चर्चा नको.''

त्या जायला निघाल्या तेव्हा झुंजारराव म्हणाले, ''तुमचे कागदपत्र आणून द्या. नोटीस ड्राफ्ट करून ठेवतो.''

पद्माबाई गेल्यानंतर मंगूनं झुंजारारावाना विचारलं, ''सरकार कोन ह्या आकासाब? ह्यास्नी कदी कोल्हापुरात म्या बगाय न्हाई.''

''कधीतरी येतात अलीकडे. तू त्यावेळी नसतोस. बाई कशा वाटल्या?''

''लई चांगल्या वाटल्या. मी कोन कुटला, तुमची वळक कवाची हे काय बाय इचारत हुत्या.''

''माझीच चूक झाली, आज तू अनायासे इथं होतास. मी तुझी ओळख करून द्यायला हवी होती त्यांना.

''पर त्या बाईला तरास कोन देतंय?''

''अरे शिवराम सावंत नावाच्या मिलिटरी अधिकाऱ्याबरोबर त्यांचं लग्न झालं होतं. दुर्दैवानं शिवराम सावंतांना अपघात झाला. त्यातच ते गेले. ही बाई निराधार झाली. सासरच्यांनी त्यांना नवऱ्याची गुंठाभर देखील जमीन दिली नाही. ती त्यांनी द्यावी असं त्या म्हणतात. पण ते लोक आडदांड दिसतात. सहजासहजी ते त्यांना देणार नाहीत. म्हणून जरूर पडली तर कोर्टात दावा गुदरावा लागेल. दिरांच्याविरुद्ध दिवाणी दावा म्हणजे काय असतं तुला ठाऊक नाही. आज्यानं दावा दाखल केला तर नातवाच्या हयातीत निकाल होणार! म्हणून अगोदर एक नोटीस देऊन बघायचं आहे.''

''करा, करा, सरकार तुमच्यासारका जबरदस्त मानूसच बाईच्या पाठशी हुबा ऱ्हायला तर कुठं थोडासा न्याव तरी मिळंल त्यास्नी.''

''न्याय मिळो न मिळो, तूर्तास त्यांच्या सासरच्यांना एक नोटीस मात्र द्यायची आहे.''

''तुमच्या हाताला यश येनार, सरकार, मला खात्री हाय.''

झुंजारराव बराच वेळ मंगूशी चर्चा करीत राहिले. सूर्यास्त झाल्यावर मंगूला सोबत घेऊन कोल्हापूरला निघाले.

आल्या आल्या त्यांनी सरलाबाईंना सांगितलं, ''आज मंगू आपल्याकडं जेवायला आहे.''

''इतकी संध्याकाळ करून आल्यावर दुसरीकडं कुठं जाणार तो?'' सरलाबाई म्हणाल्या.

''संग्राम कुठं दिसत नाही!'' हातातल्या घड्याळाकडं पहात झुंजारारावांनी विचारलं.

''तो आज त्याच्या मित्राच्या शेतावर जेवायला आणि राहायला गेलाय!''

''शेतावर? मी इतक्यावेळा त्याला आपल्या शेतावर बोलावलं तर आला नाही आणि आता दुसऱ्याच्या शेतावर जातो काय? आणि एवढा त्याचा जानी दोस्त आहे तरी कोण?''

''मला त्यानं सकाळी जाताना काही सांगितलं नाही.''

"आनंद आहे! मित्र कोण ठाऊक नाही आणि चिरंजीव सांगतात म्हणून तुम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवता? मॅट्रिकला दोन वाऱ्या करून आता कॉलेजला गेलाय, तोपर्यंतच आभाळाला हात टेकल्यासारखा वागायला लागलाय!"

"प्रवीण नावाचा एक मित्र त्याच्यासोबत असतो. बहुतेक त्याच्याबरोबरच शिरोळला आगरात जाणार म्हणत होता."

"एकूण काय तर चिरंजीव वाया जाण्याची ही लक्षणं आहेत!" दुसऱ्या दिवशी सकाळी दहाच्या सुमारास संग्राम आला. तो झुंजाररावांच्या समोर कधी उभा रहात नसे. त्याचं संभाषण व्हायचं ते सरलाबाईशी!

झुंजाररावांनी आपली ट्रान्स्पोर्ट कंपनी सुरू असताना एक ओपन टॉपची छोटी मॉरीस गाडी घेतली होती. ती जुन्या वाड्याच्या गॅरेजमध्ये धूळ खात पडून होती. चाकं जमिनीला टेकलेली, मशीनही गंजून गेलेलं. स्वयंपाकघरात गेलेला संग्राम बाहेर आला आणि झुंजाररावांना म्हणाला, "डॅडी, मी आपली मॉरीस गाडी दुरुस्त करून घ्यावी म्हणतो. गंगाराम मेस्त्रीला बोललो आहे. तो म्हणतो, तुम्हाला थोडक्यात गाडी दुरुस्त करून देतो!"

"गंग्या मेस्त्री एक नंबरचा लबाड आहे. तुमच्याकडून चार-पाच हजार घेईल आणि काहीतरी लावलेज्याव करून गाडी चालू करून देईल! त्या फंदातच पडू नका. तुम्ही ग्रॅज्युएट व्हा अगोदर. तुम्हाला नवी कोरी बेबी फोर्ड घेऊन देईन. समजलं का?"

"पण डॅडी, गंगाराम म्हणतो आपल्या मॉरीस गाडीचं मशीन फार "डॅमेज' झालेलं नाही."

"माझा त्या गंग्यावर विश्वास नाही. गोड बोलून जुन्या गाड्या गिऱ्हाईकांच्या गळ्यात बांधायचा त्याचा धंदा! मी आपल्या सर्व्हिस गाड्या कधी चुकूनही त्याच्याकडं दुरुस्तीसाठी पाठवल्या नव्हत्या. मोठा गोडबोल्या आहे, माल खरेदीतही कमिशन खातो."

"पण मला गंगा मामा म्हणाला, गाडी 'ओके' झाल्यावरच पैसे द्या. मजुरीसुद्धा घेणार नाही."

"अहो चिरंजीव, अद्याप तुम्ही बच्चे आहात. दुसऱ्या गॅरेजमध्ये १०-१२ वर्षे धूळ खात पडलेली ही गाडी-विना मोबदला दुरुस्त करून द्यायला गंग्या मेस्त्री काही वेडा नाही."

"पण डॅडी, मला गाडी पाहिजे."

आज पहिल्यांदाच संग्रामने हट्ट केला. आतून सरलाबाई बाहेर आल्या आणि म्हणाल्या "तुम्ही बाजीरावने सुचवायचा अवकाश की मोटारहोम बनवून घेतली. काही नाही, संग्राम म्हणतो त्याप्रमाणं त्याला मॉरीस गाडी दुरुस्त करून घेऊ द्याच! एवढी माझी विनंती ऐका!"

झुंजाररावांनी हो ना करत शेवटी परवानगी दिली. म्हणाले, "गाडी संपूर्ण रिपेअर झाल्यावर मी ट्रायल बघणार. मला जर बरी वाटली तरच 'स्टेरींग' तुमच्या हाती देईन."

झुंजाररावांनी शेवटी विचार केला. आता काही झालं तरी संग्राम सज्ञान झालेला आहे. तो माझ्याजवळ हट्ट करणार नाही तर दुसऱ्या कोणाकडे करणार? शेवटी आपण थकल्यावर एक मुलाच्या हातीच सगळी सत्ता जाणार आहे. जाऊ द्या. आठ-दहा हजारांचा तर प्रश्न आहे!

गंगाराम मेस्त्रीचं गॅरेज हायवेला होतं. त्यामुळे बेळगाव, सोलापूरपासून ते थेट रत्नागिरीपर्यंतच्या गाड्या दुरुस्तीसाठी त्याच्या गॅरेजला येत. तो थोडा बनेल होता. नाही असं नाही. पण कोणाला थापा मारायच्या हे त्याला चांगलं अवगत होतं. झुंजाररावांच्या सर्व्हिस गाड्या असल्यापासून ते गंगारामला ओळखत होते. त्यांनी त्या बंद मॉरीसच्याबाबतीत प्रत्यक्षच गंगारामशी चर्चा करायचं ठरवलं.

संग्राम गंगारामला पुढं घालून घेऊन आला. झुंजारराव तिसऱ्या मजल्यावर तलावाकडे

तोंड करून खुर्चीवर बसले होते. गंगारामने झुंजाररावांच्या ऐन उमेदीतलं दिवस पाहिले होते. झुंजाररावांनी केलेल्या शिकारीतला वाटा बऱ्याचवेळा त्याच्या घरात शिजला होता.

मुजरा करून तो बाजूला उभा राहिला.

"काय रे गंगाराम, ती मॉरीस चालेल का?"

"सरकार आत्ताच्या गाड्या शोरूम मधून आणल्या तरी गचके देतात, आपलं मॉरीसचं मशीन पूर्वीचं आहे. गाडी झकास रिपेअर करून देतो. पुन्हा ५-१० वर्षे काही एक बघावं लागणार नाही. ट्यूबाटायरी तेवढ्या नवीन घालाव्या लागतील!"

"समज, आपल्याला ती मॉरीस तू दुरुस्त केल्यावर विकावीशी वाटली तर ती कोण घेईल का?"

"ते माझ्यावर सोपवा सरकार, पण संग्रामबाळांना ५-१० वर्षे वापरू द्या की ती गाडी!"

झुंजाररावांनी स्वत:च्या आवडीप्रमाणे मोटारगाडी बनवून घेतली होती. चाळीस पन्नास हजार त्यासाठी खर्च केला होता. आता संग्रामच्या हट्टासाठी आठ-दहा हजार लागले तरी खर्च करायचे त्यांनी ठरवले.

गाडी गंगारामच्या गॅरेजला लागली. त्याने गाडी खोलली. पिस्टनपासून ते रेडिएटर, सायलेन्सर बॉक्सपर्यंत सर्व नवीन पार्टस् टाकले.

ट्यूब टायरी नवीन घातल्या. शेजारी असलेल्या ढोले पेंटरकडून गाडी रंगवून घेतली. गाडी संपूर्ण तयार झाल्यावर डाव्या बाजूला संग्रामला बसवून त्याने ट्रायलसाठी गाडी बाहेर काढली. रंकाळ्यावरून राधानगरी रस्त्याने गाडी धावू लागली.

मधेच संग्रामने विचारले, "कुठपर्यंत जायचं?"

"चला, मनसोक्त गाडी फिरवून आणू. भोगावती गेल्यानंतर तुम्ही बसा ड्रायव्हिंगला."

झुंजाररावांनी मोठ्या गाड्या कधी संग्रामला चालवायला दिल्या नव्हत्या. पण गाड्या चालवण्याचं त्याला चांगलं ज्ञान होतं. झुंजाररावांनी मोटारहोम बांधून घेतल्यापासूनच संग्रामच्या डोक्यात गॅरेजातली 'मॉरीस' दुरुस्त करायचे विचार येत होते. ते काम सहजासहजी होणार नव्हतं.

झुंजाररावांची त्याला संमती हवी होती. शेवटी ती एकदाची मिळाली.

भोगावती गेल्यानंतर संग्राम ड्रायव्हिंगला बसला. गाडी गंगारामने नव्या गाडीसारखी केली होती. संग्रामने स्टेअरींग हातात घेतल्यावर म्हटलं,

"गंगामामा, डॅडींनी एकदा ही गाडी चालवून बघायलाच पाहिजे. आता आपण कुठपर्यंत जायचं पुढं?"

भोगावतीचा परिसर म्हणजे उत्तम पिकाचा परिसर! दुतर्फा ऊसशेती बहरलेली. मधेच एखाद्या वाफ्यात भाताचं पीक कापणीला आलेलं. दूर निळसर दिसणारे सह्याद्रीचे डोंगर. वाटेत एखादं गाव लागलं की संग्राम गाडीची गती कमी करायचा. गंगाराम म्हणाला, "छोटे सरकार, आता वेळ नको. लायसन तेवढं लवकरात लवकर काढून घ्या!"

आजपर्यंत विनापरवाना मित्रांच्या गाड्या चालवणाऱ्या संग्रामचे ड्रायव्हिंग लायसेन्स नव्हते. पण आता स्वत:च्या मालकीची गाडी हातात आल्यानंतर लायसेन्स काढून घेणे त्याला अत्यावश्यक होते.

बघता बघता व्हरवड्याचा घाट ओलांडून गाडी गैबीजवळ आली. गंगाराम भाविक होता. तो गाडी थांबवून गैबीच्या देवस्थानाजवळ गेला. उदबत्त्या लावून नारळ फोडून आला.

संग्रामनं विचारलं, "आता राधानगरी किती दूर राहिली?"

"आलीच म्हणा ना, एक चार वळणं ओलांडली की राधानगरीतच जातो आपण!"

घाट माथ्यावरची गार हवा. चहूबाजूला नजर पोहोचेपर्यंत पसरलेली शेती आणि डोंगरामधून नागमोडी वळणं घेत धावणारी भोगावती नदी! सर्वच मनोवेधक होतं. गंगाराम म्हणाला, ''सरकारांनी एकदा गाडी चालवूनच बघायला पाहिजे! काडीइतकी कसर ठेवली नाही मी. आता सवडीनं ८-१० दिवसात कोचिंग तेवढं करून घिऊया!''

''हो ऽऽ, आता मला मंगू मामाकडं उदगीरलाही गाडी घेऊन जाता येईल!''

गाडी घेऊन उदगीरला जाण्यामागे संग्रामचा काय हेतू होता याचा गंगारामला अंदाज लागणं अशक्य होतं.

मंगू मामाची लेक शेवंता आता मोठी झाली होती. काहीशी अबोल शेवंता कधी मधी कोल्हापूरला मोरे सरकारांच्या घरी जायची. सरलाबाईंचा तिच्यावर अतोनात लोभ होता. सरलाबाईंना शेवंतानं आणखी थोडं शिक्षण घ्यावं असं वारंवार वाटे. एकदा त्या मंगूला म्हणाल्या देखील,

''मंगू, शेवंताला पुढे शिकवायला पाहिजे.''

''कसलं शिकिवताय वैनीसाब. आताच जातभाई माजं डोस्कं उटवायला लागत्यात.''

''का बरं?''

''लेकीचं लगीन करून टाक म्हंत्यात!''

''पण मुलीच्या वयाला अठरा वर्षे पूर्ण झाल्याशिवाय तिचं लग्न करायला कायद्यानं बंदी आहे! कितीवेळा मी सांगितलं तुला?''

''पर आमच्या धनगर जमातीला ते कबूल न्हाय!''

''सरकारांना विचार हवं तर!''

झुंजारावांना शेवंताला एक दोन वर्षे कोल्हापुरात ठेवून तिचं श्थ्उ ला नाव घालायचं होतं. पण तेव्हा ती रहाणार कुठे हा प्रश्न होता.

तो प्रश्न पुढं चारच महिन्यांनी आपोआप सुटला.

0-0

प्रकरण ६

पद्माबाईंना झुंजाररावांनी ड्राफ्ट करून दिलेली नोटीस पद्माबाईंनी सही करून, विजय आणि उदय यांना पाठवली. झुंजाररावांनी ती नोटीस अतिशय विचारपूर्वक 'ड्राफ्ट' केली होती. ती नोटीस धमकीवजा मुळीच नव्हती. सावंत घराणं हे मूळचं सावंतवाडी संस्थानातलं, तिथल्या राजेशाहीशी दुरून संबंध असलेलं. त्याचा फायदा घेऊन झुंजाररावांनी नोटिशीत लिहिलं होतं, 'तुम्हा दोघांनाही सांगायची गरज नाही. पण छत्रपती शिवरायांशी जवळचे संबध असलेल्या खेमराज भोसले सावंत घराण्याशी तुमचे थेट नाते आहे. छत्रपतींचं स्त्रीदाक्षिण्य सर्वश्रुत आहे. त्यांनी कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला सन्मानाने दिलेली वागणूक, हिरकणीसारखी गवळ्याची मुलगी जेव्हा गडाचे दरवाजे बंद झाले तेव्हा तिने आपल्या मुलासाठी अत्यंत कठीण अशी खिंड ओलांडण्याचे धाडस दाखवले. शिवाजी राजांनी त्या भागास हिरकणीबुरूज असे नाव देऊन तिला अजरामर केले. या थोर घराण्याशी दूरचे नातेसंबंध असलेल्या तुम्ही दोघांनी आपल्या निराधार अशा भावजयीला जमिनीतील हिस्सा नाकारावा ही खेदजनक घटना आहे. याबाबतीत कोर्ट कज्जे करण्यात मला स्वारस्य नाही. आपल्या घराण्याचीच अब्रू चव्हाट्यावर येणार आहे. तरी आपण उभयतांनी विचार करून मला न्याय द्यावा. शिवरामांच्या हिश्शाची जमीन माझे नावे करावी. ही विनंती.

आपली नम्र भावजय

श्रीमती पद्मा शिवराम सावंत भोसले,

त्या नोटिशीचा अपेक्षित असा परिणाम झाला. आमच्या जमिनीपैकी एक गुंठाही जमीन तुम्हाला देणार नाही असं म्हणणारे विजय आणि उदय यांनी एकत्र बसून विचार केला. उद्या पद्माबाई कोर्टात गेल्या तर शिवरामच्या हिश्शाची जवळ जवळ साठ एकर जमीन त्यांना द्यावी लागणार होती. थोडा विलंब झाला असता इतकंच!

"मग काय करायचं दादा?" उदयनं विचारलं.

"मला असं वाटतंय, पद्माबाई इथं येऊन ती जमीन कसू शकणार नाहीत. तेव्हा आपण त्यांच्या हिश्शाच्या जमिनीची आजच्या बाजारभावाने किंमत ठरवून ती किंमत त्यांना देऊन टाकावी हे बरे."

"अगदी बरोबर. त्यांनी त्या जमिनीचा ताबा घेऊन कुळाकरवी जमीन करून घ्यायचं ठरवलं तरीही अवघडच! ही तुमची हद्द, ही माझी हद्द असा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे."

दोघा भावाभावांचं एकमत झालं आणि त्याप्रमाणं त्यांनी पद्माबाईंना नोटिशीचे उत्तर पाठवले.

पद्माबाई ते उत्तर घेऊन झुंजाररावांच्याकडे आल्या आणि म्हणाल्या, "सरकार हे पहा उत्तर आलंय, वाचून पहा."

झुंजाररावांनी ते वाचून पाहिलं आणि हसत हसत म्हणाले, "कधीकधी कायद्याची

भाषा न वापरतादेखील कामं होतात हेच खरं!''

''मग आता काय करायचं?''

''त्यांच्याकडून काय होतं ते पहायचं, शिवाय आपणही त्या भागात जमिनीचे दर काय आहेत याचा अंदाज घेऊ. त्या भागातले एक दोन प्रतिष्ठित लोक माझ्या माहितीचे आहेत. त्यांना विचारू.''

त्या ६० एकर जमिनीपैकी आठ एकर बागायत होती. बाकीची ५२ एकर जिराईत होती. जमीन जरी चांगल्या प्रतीची असली तरी तो भाग दुष्काळीच. जिराईत जमीन एकरी १५-२० हजाराच्या वर जाण्याची शक्यता नव्हती. बाकीच्या आठ एकरांत पानमळा होता. तिथं द्राक्षाचं पीक घेण्यासारखं होतं. त्या आठ एकराला मात्र चांगला भाव येण्यासारखा होता. पण किंमत ठरवण्याच्या बाबतीत विजय आणि उदय यांच्यावरच सोपवणे इष्ट होते.

पद्माबार्इंना असं काही घडेल याची सुतराम शक्यता वाटत नव्हती. कवठेगावातील जुन्या वाड्यात पद्माबाई जाऊन रहाणार नव्हत्या. वाड्यातील हिश्शाबाबत आणखी थोडी रक्कम मिळाली तर बरे असे पद्माबार्इंना वाटे. पण झुंजारराव म्हणाले, ''तुम्ही त्या वाड्यात जाऊन रहाणं शक्य नाही. उगाच कटकटी वाढतील. त्यापेक्षा इथं कोल्हापुरातच एखादा प्लॉट घेऊन ३-४ खोल्या बांधून घ्या!''

झुंजारारावांचे निर्णय व्यवहाराला धरून होते. पद्माबार्इंनी त्यांचे निर्णय बिनशर्त स्वीकारले.

त्या कामाच्या निमित्ताने पद्माबार्इंचे मोऱ्यांच्या घरी जाणेयेणे वाढले. खरं म्हणजे एक तरुण विधवा वारंवार आपल्या नवऱ्याला भेटते म्हटल्यावर सरलाबार्इंची त्यावर काहीतरी प्रतिक्रिया उमटायला हवी होती. पण ती उमटत नव्हती याचेच पद्माबार्इंना आश्चर्य वाटत होते. त्याबाबतीत त्यांनी सरलाबार्इंच्या बहीण सुशिलाबाई यांच्याशी बोलायचं ठरवलं.

सुशिलाबाई हे एक आगळंच व्यक्तिमत्त्व होतं. एक मुलगी झाल्यानंतर पती-पत्नीत क्षुल्लक कारणावरून मतभेद व्हायला लागले. डफळे पोलीस खात्यात होते. पोलीस म्हटलं की थोडी अरेरावी अंगात येतेच. पण सुशिलाबाईही फलटणच्या राजेशाही घराण्याशी घनिष्ठ संबंध असलेल्या. त्यामुळे त्या डफळेंची हडेलहप्पी चालू देत नव्हत्या. आपली एकुलती एक मुलगी बेबी चंदा हिला मोठी करून तिचं लग्न करून दिलं की त्या मोकळ्या होणार होत्या. त्या उत्तम कलावंत होत्या. साड्यावर कर्नाटकी कशिदा काढणे, उलनचे स्वेटर विणणे यावर त्या उपजीविका चालवत.

त्यादिवशी पद्माबाई दुपारच्या वेळेस सुशिलाबार्इंच्याकडे आल्या. दोघीही थोड्याफार फरकाने समदु:खीच होत्या. पद्माबार्इंचा नवरा अपघातात गेला होता तर डफळे जिवंत असून सुशिलाबार्इंना ते नसल्यातच जमा होते!

पद्माबार्इंना पहातांच सुशिलाबाई म्हणाल्या, ''अभिनंदन!''

''कशाबद्दल?''

''कोर्टात न जाताही तुम्हाला तुमच्या जमिनीतला हिस्सा मिळाला नां?''

''ती सारी तुमच्या जिजाजींची कृपा! त्यांनी माझ्यावर डोंगराइतके उपकार करून ठेवलेत.''

सुशिलाबाई म्हणाल्या, ''त्यांनी केवळ तुम्हालाच मदत केली असं समजू नका. जिथं जिथं अन्याय होतोय असं त्यांना दिसेल तिथे ते अन्याय झालेल्याच्या पाठीशी उभे राहातात! मग कोणाला काय वाटेल याची थोडीसुद्धा पर्वा करीत नाहीत. मला त्यांच्या स्वभावाची पूर्ण कल्पना आहे.''

पद्माबाई ते ऐकता ऐकता काहीशा गंभीर होऊन म्हणाल्या, ''पण ताई, मला मात्र एक कोडं उलगडत नाही!''

''कोडं? कसलं कोडं?''

''तुमच्यापुढं बोलावं की नाही याबाबत मी संभ्रमात होते. पण आता बोलल्याशिवाय रहावत नाही म्हणून बोलते. कृपाकरून गैरसमज मात्र करून घेऊ नका.''

''गैरसमज? तो मी मुळीच करून घेणार नाही. बेशक बोला!''

पद्माबाईनी थोडा घसा साफ केला आणि म्हटलं, ''दीड दोन वर्षे झाली, तुमच्या जिजाजींची अन् माझी भेट होऊन.''

''ते मला ठाऊक आहे, पुढे बोला!''

''माझ्या कामात त्यांनी मला खूपच मदत केली म्हणून जमिनीचे सात-आठ लाख रुपये मला मिळाले. त्यांच्याच सल्ल्याने मी सध्या राजारामपुरीत १४ व्या गल्लीत घर बांधते आहे. पण हे सर्व घडत असताना सरलाबाईंना माझ्याबद्दल काहीच कशी असूया वाटत नाही? आपला नवरा या तरुण विधवेच्या संपर्कात वारंवार येतो हे पाहिल्यावर कोणीही पत्नी त्याबद्दल आक्षेप घेतल्याशिवाय रहाणार नाही. तुम्हाला काय वाटतं?''

''मला त्यात काही वावगं वाटत नाही. तुम्हाला सरलाच्या जीवनात घडलेल्या त्या घटनांची सखोल माहिती दिसत नाही.''

''घटना? कसल्या?''

'सांगते, सरला माझ्यापेक्षा दोन वर्षांनी मोठी. जिजाजींशी लग्न झालं तेव्हा जिजाजी पुण्यात कायद्याचा अभ्यास करत होते. पण परीक्षा देण्यापूर्वी त्यांचे वडील हैबतराव मोरे स्वर्गवासी झाले. जिजाजी एकटेच. त्यांच्यावर घरादाराची जबाबदारी पडली. शिवाय वडिलांच्या मृत्यूनंतर मुलाचा एक वर्षाच्या आत विवाह करण्याची प्रथा आहे. त्या प्रथेनुसार त्यांचं सरलाशी लग्नही ठरलं. वर्षभरात संग्रामचा जन्म झाला. पण त्यानंतर सरलाताईला एक मुलगी हवी होती. सरलाताईला पुढे दोन अडीच वर्षांनी दिवसही गेले. पण अचानक काय घडले कुणास ठाऊक, सरलाच्या पोटात अतोनात दुखायला लागलं. त्यावेळी कोल्हापुरात नामवंत अशा स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. डनिंग होत्या. तात्काळ ताईला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. तिच्या अंगावरून प्रचंड रक्तस्राव झाला. तिच्यावर 'इमर्जन्सी हिस्टेरोटॉमी' नावाची तातडीची शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. सरला त्या प्राणघातक संकटातून वाचली. पण त्यामुळं एक अनिष्ट असा परिणाम झाला.''

''तो कोणता?'' एकाग्र होऊन ऐकणाऱ्या पद्माबाईंनी विचारलं.

''ऑपरेशननंतर सरलाला पुन्हा मूल होणार नव्हतं. आणि दुसरं म्हणजे तिचा 'सेक्स' संपला. तिला जिजाजींबद्दल आदर होता, पण तशी ओढ वाटेनाशी झाली. त्यांनाही तिच्या वागण्यावरून कळून चुकलं की आपण आता 'सेक्स' बद्दल अट्टाहास धरू नये!''

''मग काय झालं?'' हनुवटीखालचा तळहात उचलून पद्माबाईंनी विचारलं.

''काय होणार? पती-पत्नी म्हणून ते एकत्र रहातात. पण एकशय्या होत नाही. जिजाजी काहीसे अलिप्त आणि एकलकोंडे झाले. सरलाताईंनी ते ओळखलं आणि घरी एकांतात असताना त्या जिजाजींना म्हणाल्या,

''सरकार, मी तुम्हाला एक सुचवू?''

''बोलाऽऽ काय सुचवणार आहात?''

''तुम्ही दुसरं लग्न करून घ्या.''

''शक्य नाही. जनाची नाही तरी मनाची मला लाज आहे! नाही म्हणायला आपल्याला

एक मुलगा आहे. आता तुम्हालाच एका मुलीची हौस होती. दुर्दैवाने ती पूर्ण होऊ शकली नाही. दुसऱ्या लग्नाचा विचारही मनात येत नाही.''

जिजाजींचं वय त्यावेळी होतं चाळीस बेचाळीस वर्षाचं. त्यावेळी द्विभार्या प्रतिबंधक कायदा नव्हता. उलट जमीनदार, इनामदार, जहागीरदार यांना दोन-तीन लग्ने करण्यात भूषण वाटे. किमानपक्षी लग्न नाही तर एखादे अंगवस्त्र ठेवण्याची त्यावेळी प्रथा होती. पण जिजाजींनी तोही विचार कधी केला नाही. संग्राम हळूहळू मोठा होत होता. त्याला खूप शिकवून लॉ ग्रॅज्युएट करायचं त्यांचं स्वप्न होतं. पण संग्रामचा पिंडच निराळा होता. शिवाय बालपणापासून शिकारीकडं त्याचा ओढा होता. जिजाजी त्याला म्हणत, प्रथम शिकून मोठा हो आणि मगच तुझ्या आवडीचे छंद जोपास. बापाच्या जिवावर छंद जोपासणारा आयुष्यात अयशस्वी झाल्याशिवाय रहात नाही.''

पण त्या वयात तो उपदेश संग्रामच्या डोक्यावरून जायचा. त्यात सरलाताईंचे लाड. एकुलता एक म्हणून त्या त्याचे सर्व हट्ट पुरवीत.

पुढे जिजाजींच्या आयुष्यात मनस्ताप करणाऱ्या लहानमोठ्या एक-दोन घटना घडल्या. पहिल्यादा त्यांची झुंजार ट्रान्स्पोर्ट बंद पडली. महाराष्ट्रात एस.टी. आली. खासगी वाहतूकधारकांच्यावर उपासमारी आली. पण जिजाजींची उपासमार होण्याची शक्यता नव्हती. वडिलोपार्जित दोनशे एकर जमीन त्यांच्या मालकीची होती. पण त्या जमिनीत कुळं होती. त्याच सुमारास कूळ-कायदा झाला. कसेल त्याची जमीन आल्याने पूर्वीची कुळे शेताचे उत्पन्न देईनाशी झाली. मग जिजाजींनी त्या सर्व कुळांना एकत्र बोलावून घेतले आणि ते त्यांना म्हणाले, ''तुमच्या विरुद्ध मी कोर्ट खटले असलं काही करणार नाही. तुमच्याकडं माझी जी २५० एकर जमीन आहे, त्यापैकी फक्त ५० एकर जमीन माझ्या उपजीविकेसाठी सोडा. बाकीची दोनशे एकर तुम्ही सर्वांनी वाटून घ्या. तुम्ही माझी ही सूचना मान्य केली तरी तुमचे आणि माझे संबंध पहिल्यासारखेच राहणार आहेत. माझी ५० एकर जमीन कसण्यासाठी मला अधूनमधून तुमचीच मदत घ्यावी लागेल. मी काळाची पावलं ओळखणारा माणूस आहे. कोर्ट, कज्जे करण्यात तुमचा आणि माझा वेळ आणि पैसा खर्च होणार आहे. तेव्हा तुम्हीच योग्य तो निर्णय घेऊन मला कळवा.''

झुंजारराव‌ांना आंबवड्यात फार मान होता. त्यांचे भारदस्त खानदानी वागणे आंबवड्याच्या लोकांनी पूर्वीपासून अनुभवले होते. एखादा गरीब ग्रामस्थ काही सल्ला विचारायला आला तर ते त्याला अचूक मार्गदर्शन करीत. गावामध्ये तेढ वाढू नये ही त्यांची भूमिका होती. त्यामुळे जिजाजींचा जमिनीबाबतचा प्रस्ताव त्यांच्या पूर्वीच्या कुळांनी बिनशर्त मान्य केला. त्याप्रमाणे सरकारी दप्तरात नोंदी झाल्या. पन्नास एकर जमिनीत सरकारांनी पैशाची पिकं न घेता त्यात निरनिराळ्या प्रकारचे धान्य पिकवण्याचे ठरवले. त्यात मोऱ्यांचं कुटुंब मर्यादित. नवरा, बायको आणि फक्त एक मुलगा. घरी लागणारं धान्य आंबवड्यातील शेतात पिकत होते. थोडाफार पैसाही वर्षाकाठी हातात येत होता. एवढी उलाढाल झाली तरी जिजाजींच्या 'स्टँडर्ड ऑफ लिव्हिंग' मधे फरक पडला नव्हता. अधूनमधून शिकार चालूच होती. मोटारहोम बनवल्यापासून जिजाजी थोडे खुषीतच होते. त्या गाडीतून ते आंबा, विशालगड, उदगीर येथे दोनदोन दिवस जाऊन वँâप करीत. मंगूसारखे नि:स्वार्थी आणि निस्पृह असे सहकारी सोबत असत.''

पद्माबाई एकाग्र होऊन झुंजारराव‌ांचे पूर्वायुष्य ऐकून म्हणाल्या.

''तरीच!''

''तरीच काय?''

"मी सरकारांना भेटायला इतक्यावेळा गेले तरी सरलाबाईंनी कधी माझ्याबद्दल शंका घेतली नाही."

"ती घेणंच शक्य नाही. सरकारांच्या स्वास्थ्यासाठी त्या कोणताही त्याग करायला तयार असतात. परवा मला म्हणाल्या,

"बरं झालं बाई पद्माबाईंची सरकारांशी तुम्ही ओळख करून दिलीत. त्यांची ओळख झाल्यापासून सरकारांच्या स्वभावात फार फरक जाणवायला लागलाय. पूर्वी मी काही बोलले तर त्यांचे त्याकडे लक्षच नसे!"

"माय गॉड! सरलाताईंच्या माझ्याशी चांगलं वागण्यामागचं रहस्य मला समजलं. पण त्यांच्या वैवाहिक आयुष्यात कोणत्याही प्रकारे मी दुरावा येऊ देणार नाही."

"तुम्ही दोघीही समूजतदार आहात. सर्वसामान्य स्त्रियांपेक्षा काहीशा भिन्न आणि आयुष्याचा अर्थ तटस्थपणे समजून घेऊन डोळसपणे जगणाऱ्या आहात. असं क्वचित आढळतं!"

पद्माबाई काही क्षण अबोल झाल्या आणि म्हणाल्या, "राजारामपुरीतला माझा बंगला तयार होत आलाय. मी तिथं रहायला जावं म्हणते."

"काय हरकत आहे?"

"माझ्या सोबत कोणीतरी सदैव रहायला हवंय! नाही तर मला पुढं मागं एकटी बाई म्हणून लोक त्रास देतील!"

"तुम्ही निश्चिंत रहा. आमचे जिजाजी तुमच्या पाठीशी आहेत तोपर्यंत तुम्हास त्रास देणाऱ्यांना दहावेळा विचार करावा लागेल."

पद्माबाईही समंजस होत्या. मोरे सरकारांच्या पत्नीबद्दल त्यांना सहानुभूती वाटू लागली. इतके दिवस झुंजाररावांशी थोडे अंतर ठेऊन वागणाऱ्या पद्माबाईंना त्यांच्याशी मोकळेपणानं वागायचा ग्रीन सिग्नल मिळाला.

झुंजारराव जेव्हा आंबवड्याला शेतात रहायला जातात, तेव्हा आपणही त्यांच्या सोबत जावे असे त्यांना वाटे. यापुढे बिनधास्तपणे त्या झुंजाररावांच्या सहवासात राहू शकणार होत्या.

सर्व काही सुरळीत चाललेलं असताना संग्राम झुंजाररावांना मानसिक त्रास देऊ लागला. कोल्हापूरच्या आसपास अनेक साखर कारखाने निघाले होते. त्या कारखान्याचे मॅनेंजिग डायरेक्टर, इतर संचालक यांची सधन पिढी उदयाला आली. झुंजाररावांना त्यांची चिंता नव्हती. पण त्यांच्या दिवट्या मुलांची चिंता होती. संग्रामचे बहुसंख्य दोस्त तीच मुलं होती. भटकायला कारखान्याच्या गाड्या, साखर कारखान्यावरचे आलिशान रेस्ट हौसेस, महिन्याकाठी मुलांना मिळणारा अनियंत्रित पॉकेटमनी, या वातावरणात वाढणाऱ्या तरुणांना संग्रामशी मैत्री करण्यात स्वारस्य होते. कारण मोऱ्यांच्या घरी त्२२ पासून ते ३०त् स्प्रिंगफिल्डपर्यंतच्या सर्व प्रकारच्या बंदुका होत्या. त्या हाताळायचे ज्ञान संग्रामला लहानपणापासूनच होते. त्यात त्याचा हट्ट म्हणून जुनी मॉरीस झुंजाररावांनी त्याला दुरुस्त करून दिली होती. त्याला जेव्हा २२ संपून २३ वे वर्ष लागले. तेव्हाची गोष्ट.

मंगू धनगराची लेक शेवंता त्यावेळी सतरा वर्षांची झाली होती. झुंजाररावांच्या सल्ल्यानुसार ती कोल्हापुरात पद्माबाईंच्या घरी सोबत म्हणून रहात होती. अधूनमधून सुशिलाबाईंची कन्या बेबी चंदाही पद्माबाईकडं दोन दिवस रहायला यायची. या दोघीही समवयस्क, पण शेवंता काहीशी अबोल आणि लाजरी होती. इकडे आल्यानंतर कितीतरी दिवस ती बेबी चंदासारखा पंजाबी ड्रेस घालायला लाजत होती. तेव्हा पद्माबाईच तिला

म्हणाल्या, "शेवंता, आता तू परकर पोलकं किंवा साडी नेसून बेबीबरोबर कुठं बाहेर गेलीस की लोकाना लागलीच समजेल तू खेडूत आहेस म्हणून! तेव्हा बेबी म्हणते तसा तू तिच्यासारखा पंजाबी ड्रेस वापरत जा! आजकाल एकजात शाळा-कॉलेजात जाणाऱ्या मुली तेच कपडे वापरतात."

"पण मी कुठं शाळा-कॉलेजात जाते?"

"आज तू जात नाहीस. पण मी तुला बाहेरून दहावीला बसवणार आहे. परवा सरकार सांगून गेलेत मला. शेवंताला शिकवायला तारांराणीतले रिटायर्ड मास्तर येतील म्हणून!"

जेमतेम मराठी सातवी झालेली, तेही उदगीरसारख्या खेड्यातल्या शाळेत आणि तेथून एकदम दहावीच्या परीक्षेला बसायचं म्हटल्यावर शेवंताला काही समजेनासं झालं. सरकार आणि पद्माबाईंनी शेवंताला पुढं शिकवायचंच असा आग्रहच धरला होता. पद्माबाईंनी तिला लागणारी सर्व पुस्तके वह्या आणून दिल्या. बघता बघता शेवंताच्या बोलण्यावागण्यात फरक पडू लागला.

जन्मत:च अप्रतिम सौंदर्य लाभलेल्या शेवंताला हळूहळू फॅशन करावी, हिंदी सिनेमातली रेडिओवर वारंवार लागणारी गाणी गुणगुणावी असे वाटू लागले. अपत्यहीन पद्माबाई देखील ती धनगराची लेक आहे हे विसरून तिच्यावर अतोनात लोभ करू लागल्या होत्या.

शेवंता कोल्हापुरात येण्यापूर्वी ४-२ महिन्याला पद्माबाईंचे कुशल विचारायला येणाऱ्या संग्रामच्या फेऱ्या मात्र वाढू लागल्या.

मंगू धनगराला मात्र कन्येच्या या स्थित्यंतराने काहीसे अस्वस्थ केले. तो झुंजारावांच्याकडे यायचा आणि म्हणायचा, "सरकार शेवंताला तुमी साळा शिकिवतो म्हंतासा, पर उद्या तिचं लगीन तरी हुईल कां? माजे सगळे जातभाई माजं डोस्कं खायाला लागल्यात. पोरीला तू बरबाद करनार म्हंत्यात!"

"तुझे जातभाई काय म्हणतात याकडे बिलकूल लक्ष देऊ नकोस. पद्माबाईकडं राहिल्यानं तिच्या बोलण्यात वागण्यात किती फरक पडला आहे. बघतोस नां?'

"मला काय आस्लं पसंत न्हाई बगा सरकार. फुडं मागं मी शेवंताला घिऊन जानार!" झुंजारराव किंचित हसून म्हणाले, "तू एक जन्मभर आंगठेबहादूर राहिलास. त्या बिचाऱ्या पोरीला तरी शिकू दे, अनायासे पद्माबाईंचा सहवास तिला लाभला आहे!"

"हाय खरं, मला काय नगो बगा!"

"बरं माझं एक ऐकशील?"

"मला काय बी आयकायचं न्हाईबगा सरकार! गरीबाला सुकानं जगू द्या!"

"अरे वेड्या, ती शिकल्यामुळे एवढं कसलं संकट तुझ्यावर कोसळणार आहे?'

'आमच्या बापजल्मी कुना धनगराची लेक एवढी शिकली नव्हती.'

"म्हणून आताही तिनं शिकू नये का? आता ती बाहेरून दहावीची परीक्षा देणार आहे. तेवढी परीक्षा होईपर्यंत तरी ती तिथं राहू द्या. पुढचं पुढं बघता येईल!"

मंगूचं झुंजारावांच्या बोलण्यानं समाधान झालं नाही. तो उठला आणि तरातरा सरलाबाईच्याकडं आला आणि चक्क गळा काढून रडायलाच लागला.

"अरे झालं काय ते सांगशील का नाही."

"वैनीसाब. सरकार माज्या पोरीचं वाटुळं करनार हैत! मला शेवंताला हितं ठेवायची न्हाई बगा! उद्या पोरीला कोन करूनबी घिनार न्हाई!"

सरलाबाईंना सर्व काही पूर्व कल्पना होती. त्या म्हणाल्या,

"तू काही एक चिंता करू नको. तिकडं सोलापूर विजापूरकडे तुमच्यातली काही सुशिक्षित धनगर घराणी आहेत. त्यांचं रहाणं वागणं देखील खानदानी असतं. ती शिकली म्हणून तिचं लग्न होणार नाही हे डोक्यातून काढून टाक! पद्माबाई मला परवा सांगत होत्या, तिची बुद्धी अतिशय तल्लख आहे. एकदा तिला एखादी गोष्ट समजावून दिली की ती कायम आठवणीत ठेवते. अरे, अशी सुशिक्षित मुलगी पोटाला आली म्हणून उद्या भाग्य उजळेलं तुझं!"

"काय काय नगो बगा मला. सरकार म्हंत्यात म्हणून तिची परक्षा हुईस्तवर ऱ्हावू दे. मागनं मी घिऊन जानार बगा."

सरलाबाई काहीतरी मध्यस्थी करतील आणि आपण शेवंताला इथून घेऊन जाऊ या आशेनं आलेला मंगू पुन्हा नाराज होऊन परतला.

0-0

प्रकरण ७

शेवंताची परीक्षा झाल्यानंतर मात्र मंगू तिला उदगीरला घेऊन जायचंच असं ठरवून निघाला. पद्माबाईंना त्याचा निर्णय काही पटला नाही. त्या त्याला म्हणाल्या,

"मंगू, शेवंता हुषार आहे रे. तिला पुढचं शिक्षण द्यायची माझी तयारी आहे. तू तिचं काय म्हणणं आहे हे तरी विचारात घे."

"तिला काय समजतं? लग्नाचं वय होऊन गेलं. गावातली माणसं, माझे जातभाई माझ्या तोंडात शेण घालायला लागल्यात! आक्कासाब, आमच्या जातीत एवडं पोरगीच्या जातीला कोन बी शिकवत न्हाईत वो."

"नसतील शिकवत, पण हिच्या नशिबानं ते मिळतंय, त्यात तू आडकाठी कशाला घालतोस?"

"मला तुमचं कायबी पटत न्हाई बगा!"

"बरं सरकारांचं, सरलाताईंचं मत तरी विचारात घे!"

"नगो नगो! सरकार तिला हितनं न्ह्याचं नावच काडू नगो म्हंत्यात, सरलाआक्काबी फुडं शिकू दे म्हंत्यात!"

"बघ, मग इतक्या लोकांचं मन दुखावून तू तिला परत घेऊन जाणार?"

"व्हय! मला त्याशिवां निर्वा न्हाई!"

मंगू शेवंताची परीक्षा झाल्यानंतर तिला इथून परत घेऊन जायचंय म्हणून हटून बसला. पद्माबाईंचं आणि मंगूचं बोलणं आतल्या खोलीतून ऐकणाऱ्या शेवंताचे डोळे अश्रूंनी भरून आले. तिला पद्माबाईंनी पोटच्या मुलीसारखा जीव लावला होता. गेल्या दोन-तीन वर्षांत शेवंतात आमूलाग्र बदल घडला होता. कोल्हापूरच्या वास्तव्यात तिच्या बोलण्यात वागण्यात खानदानीपणा उतरला होता. घरी येणाऱ्याशी ती अत्यंत अदबीनं बोलायची. जी हांऽऽशिवाय बोलायची नाही. त्यात सुशिलाताईंच्या चंदा बेबीशीही तिची मैत्री जमली होती. चंदाबेबी मैत्रिणींना घेऊन पद्माबाईंच्याकडे यायची. त्यावेळी त्यांचे जे हास्यविनोद चालायचे, ते ऐकताना शेवंता त्यांच्याशी एकरूप होऊन जायची. त्या मैत्रिणीही चांगल्या घरातल्या होत्या. त्या पद्माबाईंच्या घरी आल्या की शेवंताची स्तुती करायच्या. तिचा तांबूस गव्हाळी रंग, बदामी डोळे, हसताना डाव्या गालाला पडणारी खळी, लांबसडक कुरळे केस, कमनीय बांधा. कसल्याही प्रकारचं प्रसाधन न करता तिचं रूप अत्यंत आकर्षक दिसे. पूर्वी काहीशी अबोल असणारी शेवंता अलीकडे थोडी बोलकी झाली होती. पद्माबाईंच्या परवानगीने ती चंदाबेबीसोबत तिच्या मैत्रिणींच्या घरीही जात असे. तिथलंही बोलणं चालणं ती निरीक्षण करी. बालपणापासून उदगीरच्या धनगरवाड्यात लहानाची मोठी झालेल्या शेवंताला बाहेर जग कसं असतं याची जाणीव व्हायला लागली होती. शेवंता त्या दिवशीही मंगूसोबत गेली नाही. मंगू येऊन गेल्यानंतर त्या संध्याकाळी संग्राम आपली मॉरीस गाडी घेऊन आला. तो पद्माबाईंना 'मावशी' म्हणत असे. तो म्हणाला, "मावशी आज माझ्या मॉरीस गाडीतून तुम्हाला फिरवून

आणणार आहे.''

''कुठं? मी इथं फारसं कोणाकडं जात नसते! येऊन येऊन तुझी आई सरलाताई नाहीतर मावशी सुशिला!''

''पण आज तुम्हाला कोणाच्या घरी नाहीच नेणार.''

''मग कुठं घेऊन जातोस?''

''पन्हाळ्यावर''

''तिथं कोणाकडं?''

''कोणाकडं असं नाही. पन्हाळा हे माझं अतिशय आवडीचं ठिकाण आहे. खरं म्हणजे आमच्या डॅडींना पन्हाळ्यावर घर बांधायला जागा मिळत होती. पण त्यांनी ती घेतली नाही. ते म्हणाले मला घर बांधायचंय् पण ते आंबवड्याच्या शेतात!''

''हो, मलाही ते एकदा दोनदा तसं म्हणाले होते. त्यांना वाटतं शहरी गजबजाटापासून थोडं दूर निवांत अशा जागी छोटा टुमदार बंगला बांधावा!''

''त्यांच्या खूप योजना असतात. पण त्या प्रत्यक्षात कधी उतरत नाहीत. आता या मॉरीस गाडीचं बघा ना? इतकी वर्षे जुन्या वाड्याच्या गॅरेजमध्ये धूळ खात पडली होती. मी त्यांच्या मागे लागून लागून ती दुरुस्त करून घेतली. आज पन्हाळ्याला तुम्हाला घेऊन जातो. बघा गाडी कशी चालते ती.''

हसत हसत पद्माबाई म्हणाल्या, ''मी आले असते, पण शेवंताची परीक्षा तोंडावर आहे, ती होऊ दे, मग तिलाही सोबत घेईन! ती एकटी इथं कशी राहील?'' ट्रेमधून चहा घेऊन आलेल्या शेवंताकडे पहात संग्राम म्हणाला, ''किती दिवस चालणार आहे तुझी परीक्षा?''

''एक आठवडा. या सोमवारी सुरू झाली की पुढच्या सोमवारी संपेल.''

चहाचा एक घोट घेत संग्राम म्हणाला,

''काही हरकत नाही पुढच्या मंगळवारी किंवा बुधवारी जाऊ! पण मावशी असं करू त्या दिवशी सोबत जेवण घेऊनच जाऊ!''

''मग सरलाताईंनाही सोबत घेऊ?''

''माँ? त्या येतील की नाही कुणास ठाऊक?''

''का त्यांना कसली अडचण आहे?''

''अडचण अशी नाही. पण सहसा त्या घर सोडत नाहीत. डॅडी मोटारहोममधून गगन बावडा किंवा आंबा इथं जाऊ म्हणाले तर त्या म्हणतात खूप वेळा तिकडं जाऊन आलेय, त्यात काय नावीन्य आहे?''

''पण जेव्हा तुमची झुंजार मोटार ट्रान्स्पोर्ट होती तेव्हा त्या तिकडं अनेकवेळा तुझ्या डॅडींच्या बरोबर गेल्या असतीलच की?''

''सगळं खरंय मावशी, पण माझ्यासोबत त्या अद्याप एकदाही आल्या नाहीत.''

''बरंय, या शेवंताची एवढी परीक्षा होऊ दे. मीच त्यांना तयार करते.''

''चालेल, मी निघू?''

शेवंता संग्रामला चहा देऊन आतल्या खोलीत गेली होती. संग्रामला 'शेवंता' हे नाव काहीसं गावठी वाटत होतं. म्हणून तो तिला, अलीकडे 'सॅव्ही' म्हणायचा.

''मावशी सॅव्हीला बाहेर ये म्हणावं, तिला 'बेस्ट ऑफ लक' करायचं राहिलंय.''

''आजकाल ती मोठ्या टेन्शनमधे आहे!''

''कसलं टेन्शन, मी इतकी वर्षं शिकतोय पण कधी एकाही परीक्षेचं टेन्शन घेतलं नव्हतं.'' पद्माबाई मिष्कीलपणे म्हणाल्या, ''म्हणूनच प्रत्येक वेळी नापास होतोस. तिच्यावर

टेन्शन आहे ते दुसरंच!''

''कसलं?''

''मंगू तिला परीक्षा झाल्याबरोबर उदगीरला घेऊन जाणार म्हणतो.''

''काय सांगता? हे नव्हतं मला ठाऊक!''

''होय, तो कोणाचंही ऐकण्याच्या मन:स्थितीत नाही.''

''तिकडं हिला घेऊन जाऊन काय करणार आहे? शेळ्या, गुरं राखायला पाठवणार आहे की काय?''

''नाही! तिचं लग्न करून मोकळा होणार आहे?''

''लग्न?''

सॅव्हीचं लग्न होणार हे शब्द ऐकताच संग्रामचा चेहरा खाडकन् उतरला त्याला, त्यावर काय बोलावं हे बराच वेळ सुचलं नाही. थोड्या वेळानं तो म्हणाला, ''मावशी एवढ्यात सॅव्हीचं लग्न होऊ नये असं मला वाटतंय, इथं कॉलेजमध्ये २-३ वर्षे तिनं चंदाबेबीसोबत काढावीत असं मला वाटतंय!''

''अरे बाबा, मी तिच्या बापाला खूप विनवलं. पण तो बिलकूल ऐकायच्या मन:स्थितीत नाही.''

संग्रामही काहीसा नाराज होऊन निघाला. जाताना त्यानं औपचारिकरित्या शेवंताला 'बेस्ट ऑफ लक' म्हटलं. त्याच्या सदिच्छा ऐकून शेवंताचे डोळे अश्रूंनी डबडबले! कंठ दाटून आला होता. त्यातच ती म्हणाली, 'थँक्स.'

संग्रामला शेवंताचं कोल्हापुरात झालेलं स्थित्यंतर आठवू लागलं. सात-आठ वर्षांपूर्वी मंगू धनगराच्या सोबत हिरव्या रंगाचं आखूड परकर पोलकं घालून आलेली ती अस्ताव्यस्त केसांची मुलगी जेमतेम ८-९ वर्षांची होती. लाजाळू आणि अबोल! झुंजारारावांच्या जिवावरचा तो बिबळ्याचा हल्ला मंगूच्या धाडसामुळे विफल झाला. तेव्हापासून मंगूचे मोरेंच्या घराण्याशी मित्रत्वाचे संबध निर्माण झाले होते. अधूनमधून मंगू कोल्हापूरला यायचा, पण तो रिकाम्या हाताने येत नसे. कधी जंगलातले आवळे तर कधी रिठे, लोणच्यासाठी कच्च्या वैâऱ्या असं काहीबाही घेऊन येई. सरलाबाई बेबी चंदाचे कपडे शेवंतासाठी पाठवायच्या. मंगूला झुंजारारावांनी खाकी ड्रेस शिवून दिला. त्याला आत्मसंरक्षणासाठी सिंगल बॅरल १२ बोअरची बंदूकही घेऊन दिली.

पुढे पद्माबाईंच्या बंगल्याची वास्तू तयार झाल्यावर सरलाबाईंच्या सूचनेवरून शेवंता कोल्हापुरात पद्माबाईंच्याकडेच येऊन राहिली. पद्माबाईंनी तिला स्वयंपाकपाणी तर शिकवलेच पण त्याचबरोबर तिला पुढचं शिक्षण द्यायचीही तयारी दर्शवली. झुंजारारावांना सुद्धा स्त्री शिक्षणाची आस्था होतीच. त्यांनी तिला बाहेरून दहावीच्या परीक्षेला बसण्यासाठी शिकवणी ठेवली. शेवंताला एकदा सांगितलेलं लक्षात राहायचं. अधूनमधून पद्माबाई शेवंताला मोऱ्यांच्याही घरी घेऊन यायच्या. त्यावेळी सरलाबाई तिचा हात हातात घेऊन म्हणत, ''पद्माबाई ही उदगीरातच राहिली असती तर एव्हाना मंगूनं तिचं लग्नही करून टाकलं असतं. मग तिला शहरी जीवन कसं असतं हे कळलं देखील नसतं!''

त्या दिवशी रंकाळ्यावरच्या बंगल्यात शेवंता आली होती. झुंजारराव आंबवड्याला गेले होते. तिसऱ्या मजल्यावरच्या मागच्या खोलीत संग्राम कसलंतरी पुस्तक वाचत पडला होता. जिन्यावरून पावलाची चाहूल लागल्यावर तो बाहेर आला. बघतो तो शेवंता कठड्याला धरून रंकाळ्याकडं पहात होती.

''सॅव्ही? कधी आलीस? आणि मावशी कुठं आहेत?''

"खाली माँच्याबरोबर बोलत बसल्यात!"

सॅव्हीच्या हातावर हात ठेवून संग्राम म्हणाला ,

"कसा वाटतो आमचा रंकाळा?"

"केवढं मोठ्ठं हे पाणी? आणि 'पलीकडं' दिसतो तो बंगला कोणाचा?" आपला हात बाजूला करीत शेवंता म्हणाली.

"शालिनी पॅलेस!' इथल्या छत्रपतींनी बांधलाय तो! पण राजघराण्यातली एकही व्यक्ती तिथं कधी राहिली नाही! आता तर तिथं हॉटेल होतंय म्हणून ऐकतो! बरं ते जाऊ दे, तुला हा तलाव कसा वाटला ते सांग?"

"काय सांगू. जन्मभर याकडे बघतच रहावं असं वाटतंय!" बेसावधपणे शेवंता बोलून गेली.

तेव्हापासून सवड मिळाली की संग्राम पद्माबाईंच्या बंगल्यावर जाऊ लागला. तिथं शेवंता होती, काहीतरी कारण काढून तो तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करी. पण ती घडाघडा बोलत नसे. "मावशी ही सॅव्ही कधी बोलत नाही?"

"चंदाच्या मैत्रिणीही तसंच म्हणतात! पण जेवण बनवण्यात मात्र पटाईत झालीय हं! परवा तिनंच पांढरा रस्सा बनवला होता. तुझ्या डॅडींना खरंच वाटेना!"

शेवंताची परीक्षा झाल्यावर मंगू तिला ठरवल्याप्रमाणे उदगीरला घेऊन गेला. झुंजारराव, सरलाबाई यांच्या विरोधाला मंगूनं जुमानलं नाही. लव्हाळ्याचा भिवा धनगर समस्त धनगर जमातीचा पुढारी होता. तो जंगलतोडीचे कॉन्ट्रॅक्ट घ्यायचा. त्याच्याकडं बक्कळ पैसा झाला होता. त्यालाही मंगूने आपल्या न्हात्याधुत्या मुलीला कोल्हापूरला ठेवू नये असं वाटत होतं. त्याच्या मेव्हण्याचा एक मुलगा सांगलीत होता. भिवाच्या मनात त्याच्या मेव्हण्याच्या मुलाशी शेवंताचं लग्न व्हावं असं वाटत होतं. एक दोन वेळा त्याचे आणि मंगूचे त्याबाबतीत बोलणेही झाले होते.

शेवंता दहावीच्या परीक्षेला बसणार आहे असं जेव्हा भिवा धनगराला समजलं तेव्हा तो मंगूला म्हणाला, "मंगश्या, तुझ्या पोरीला शाळा शिकवून मास्तरीण करणार हैस का?"

"मास्तरीण कुठली करतोस? सरकार, त्येंची वैनीसाब, पद्माआक्का समदी म्हनत्यात पोरगी हुशार हाय, आनि एक दोन साल शिकूदे!"

"दोन साल? खुळा का येडा रं तू?"

"येळंत लगीन केलं असतंस तर एक-दोन लेकरांची आई झाली असती. काय न्हाई मंगश्या, त्या थोरामोठ्ठ्याच्या नादाला लागू नगो. सरळ पोरीला हिकडं उदगीरला घिऊन यी! माज्या म्हेवण्याचा ल्यॉक बीए फास हाय, उद्या त्यो मामलदार सुदीक हूईल! हैस कुठं?"

मंगूच्या आग्रहास्तव पद्माबाई मोठ्या नाखुषीने शेवंताला सोडायला तयार झाल्या. शेवंता गेल्यानंतर त्या एकट्याच त्या बंगल्यात रहाणार होत्या. झुंजारराव अधूनमधून यायचे पण ते मुक्कामाला रहात नसत. शेवंता गेल्यानंतर पद्माबाईंना बारा तास रहाणाऱ्या एखाद्या मुलीची गरज होती. त्या झुंजाररावांना म्हणाल्या, "शेवंतासारखी दुसरी एखादी मुलगी बघायला हवी."

"बघायला हवी हे खरं, पण तशी विश्वासू आणि प्रामाणिक मुलगी मिळायला हवी ना?"

"तुमच्या खेडोपाडी इतक्या ओळखी आहेत, कुठे ना कुठे अशी मुलगी मिळेलच की?"

"आजकाल पूर्वीचे दिवस राहिले नाहीत पद्माबाई! खेड्यापाड्यातल्या मुलीसुद्धा बनेल

झाल्या आहेत! शिवाय ती मुलगी प्रामाणिक निघेलच याची काय गॅरंटी द्यावी!''

''सरकार मला आता दोन वर्षे घरातलं काहीच बघावं लागलं नव्हतं. धान्य आणण्यापासून ते दळण करून आणेपर्यंत सगळी कामे शेवंता करायची. वेळप्रसंगी भाजी मार्वेâटलाही जायची. आणि एवढं सगळा व्याप सांभाळून अभ्यास करायची. स्वयंपाकपाणीही करायची! परवा तुम्हाला जो पांढरा रस्सा दिला होता तो तिनंच केला होता. फक्त एकदाच मी तिला त्या रश्शाची रेसिपी सांगितली होती.''

''हो मला सगळं पटतं. पण आता यातून मला एकच मार्ग दिसतो!''

''कोणता?''

''पुढारीत एक जाहिरात द्यायची. एखादी १२ तास घरी रहाणारी निराधार मुलगी हवी. जाती गोतीचे बंधन नाही, विनापाश विधवा देखील चालेल!''

''ते तर खरंच. आम्ही आर्मीचे लोक कुठं जातपात मानत होतो?''

''तुमच्या आर्मीचं सोडा, पद्माबाई. आमच्या शाहूमहाराजांनी जातपात मानली? गंगाराम कांबळेला टाऊन हॉलजवळ हॉटेल काढून दिले, स्वत: तिथं जाऊन चहा घेतला. संस्थानात ५० टक्के नोकरीत हरिजनांना नोकऱ्या देऊ केल्या. आमच्या डोळ्यासमोर राजर्षींचा तो आदर्श आहे. बघू, पेपरमधून जाहिरात तर देऊ!''

''चालेल! पण तशी मुलगी मिळेपर्यंत मी काय करू? इकडं अद्याप माझ्या बंगल्याच्या आसपास कोणाची वस्तीही नाही. संध्याकाळ झाली की सारं सामसूम होतंय!''

''त्यासाठी एक करता येईल. तुम्ही सुशिलाताई आणि चंदाबेबीला तुमच्याकडे रहायला बोलवा!''

''त्यांनाही विचारून पाहिलं. त्या म्हणतात, ते तेवढं नको. अतिपरिचयात् अवज्ञा व्हायला नको. आपल्या दोघीत जो जिव्हाळा आहे तो तसाच अबाधित रहावा! त्यांचंही म्हणणं वावगं नाही.''

''सरलाताई काय म्हणतात?''

''आता तिनं माझ्यामागं एकच घोशा लावलाय!''

''कसला?''

''संग्राम कॉलेजचं शिक्षण पूर्ण करील अशी लक्षणं दिसत नाहीत, तेव्हा त्याचं लवकरात लवकर लग्न करावं!''

''एवढ्यात?''

''एवढ्यात म्हणजे? आता त्याला २४ वं वर्ष सुरू आहे. शिवाय सरला म्हणते त्यात थोडं तथ्यही आहे. या जिल्ह्यात जे सहकारी कारखाने झालेत, त्या डायरेक्टरांची मुलं आहेत त्याचे मित्र! अधून मधून तो त्यांच्या जीपमधून नाईट ड्राईव्हला जातो. पहाटे २।।-३ झाले तरी ही 'निओरिच' लोकांची पोरं शिकारीच्या नावाखाली भटकत असतात.''

''चालायचंच, शिकार ही मोऱ्यांच्या रक्तातच आहे ना?''

''हो, पण पद्माताई, आम्हाला बंदुका हाताळायचं पूर्ण ज्ञान झाल्यावरच आम्हाला वडलांनी बंदूक चालवायची परवानगी दिली. आज कालची साखर कारखान्याच्या डायरेक्टरांची पोरं अर्धवट आहेत, परवा गगनबावड्याच्या रस्त्याला जाताना रात्री सर्च लाईटवर रानडुकरांचा कळप दिसला. म्हणून चौघा पाचजणांनी लाईटच्या रोखानं धडाधड थ्.उ च्या गोळ्या झाडल्या नंतर जवळ जाऊन पहातात तो काय? एका गृहस्थाच्या गुऱ्हाळावर सायकलवरून आलेल्या कामगारांच्या सायकलीची मागची काच लाल दिसते म्हणून या गावठी शिकाऱ्यांना वाटले तो रानडुकरांचाच कळप आहे! बिचाऱ्या कामगाराच्या सायकलींचा खुरंदुळा झाला. पोलीसातही

तक्रार गेली. कसेतरी प्रकरण मिटवून टाकले. कामगारांना नव्या सायकली घेऊन द्याव्या लागल्या.''

''त्या शिकारीत संग्रामबाळ होते की काय त्यांच्या समवेत?''

''होता ना, पण तो ड्रायव्हिंग करत होता, तो त्या मूर्खांना नको नको म्हणत असतानाच धडाधड बार काढले त्यांनी. संग्रामच्या हातून अशी चूक होणार नाही. पुन्हा दुसऱ्या एका शिकारीत त्या पोरांनी सांबर म्हणून म्हशीचे वासरू मारले. तेव्हापासून संग्राम थोडा आकसला आहे! म्हणून सरला म्हणते त्याचं लग्न करून टाकावं आणि नवरा बायकोला आंबवड्याच्या शेतावर नवीन घर बांधून तिथं डांबावं. शेतही बघ म्हणून सांगायचं!''

''ते बरं होईल! पण कोणाच्या मुली सांगून आल्या आहेत का?''

''हो, तशा दहा-बारा मुली आल्या आहेत, पण मी त्या मुलींची पूर्ण चौकशी केल्याशिवाय बघायला जाण्याच्या विरुद्ध आहे.''

''तुमचा पत्रिकेवर विश्वास आहे?''

''बिलकूल नाही! तो जन्मला तेव्हा इथल्या पाठकशास्त्रानं त्याची जन्मलग्न कुंडली काढली आहे. त्यात त्यानं तुमच्या मुलाची राजघराण्याशी सोयरीक आहे असं लिहून ठेवलंय. पण आज काल राजघराणी शिल्लक राहिलीत कुठं पद्माबाई?''

''घराणी कुठं जातील? ती आहेतच. फक्त त्यांचा पूर्वीचा डामडौल उरला नाही!''

''तो कसा उरणार? होत्या नव्हत्या त्या जमिनी विकून टाकल्या, बाई आणि बाटलीत सगळा पैसा उडवला, काहीजण रेसमधे पार बुडाले!'

झुंजारराव बोलू लागले की पद्माबाई तल्लीन होऊन ऐकत. त्या म्हणाल्या, ''पण संग्राम बाळांना, मुलगी पहायला जाताना मी सोबत आले तर चालेल?''

''न चालायला काय झालं? तुम्हाला का येता येणार नाही?''

''सरला, सुशिला, तुम्ही सर्वच जण जाऊ की? पण तुम्ही मला असं का विचारलंत? मी आले तर चालेल का म्हणून?''

''मला आपलं तसं वाटलं म्हणून विचारलं! विधवा बायकांना सोबत नेण्याची प्रथा नाही ना?''

''विधवा आणि सधवा? शेवटी तुम्ही माणूसच आहात ना?''

''सरकार, तुम्ही माझ्यावर इतका लोभ करता की मलाच संकोचल्यासारखं वाटतंय! जग काय म्हणत असेल असा सारखा विचार येतो मनात!''

''म्हणजे संपलंच सारं! अहो पद्माबाई, तुम्ही उठसूठ जर या जगाचा विचार करायला लागलात तर सुखाने दोन घासही खाऊ शकणार नाही! जग ही एक काल्पनिक संस्था आहे. तुम्ही कसंही वागा ते कधीही तुम्हाला चांगलं म्हणणार नाहीत. मी मोटारीचा धंदा सुरू केला तेव्हा सरकार दरबारातले लोक मला म्हणाले, ''झुंजारराव कसला हा घाणेरडा व्यवसाय करता? दुसरे काही व्यवसाय नव्हते की काय तुम्हाला?'' कोणी हॉटेल काढलं तर लगेच लोक म्हणणार, जगाच्या उष्ट्या कपबशा विसळायचा कसला धंदा करताय? यासाठी मी कोण काय म्हणेल याचा कधीही विचार करीत नाही. मी तुम्हाला थोडी मदत केली म्हणून तुमची थोडी बहुत प्रॉपर्टी तुम्हाला मिळाली, इथं कोल्हापुरात घर झालं, तर लोक म्हणणार तरुण पैसेवाली विधवा पाहून झुंजारावांनी मदत केली! हे असं कुचकट बोलणारे जे लोक असतात ना ते भ्याड असतात, आपल्या तोंडावर बोलण्याची त्यांची हिंमत नसते!''

बराच वेळ झुंजारराव पद्माबाईंशी बोलत होते. चारच्या सुमारास रंकाळ्यावरून फोन आला. सरलाबाई बोलल्या.

"अहो, त्या खानापूरच्या भोसल्यांच्या मुलीचा फोटो पसंत आहे. ते लोकही चांगले आहेत असा तुम्ही निरोप दिला होता नां, ते लोक उद्या दुपारी मुलगी पहायला या म्हणतात. काय निरोप द्यायचा त्यांना?"

"माझ्याकडे आहे त्यांचा फोन नंबर. मीच त्यांना काय ते कळवतो."

सरलाबाई झुंजारराव यांशी फार अघळपघळ बोलत नसत.

रिसीव्हर खाली ठेऊन ते पद्माबाईंना म्हणाले, "उद्याच जायचंय मुलगी पहायला. तुम्ही तयारीत रहा. मी सरला आणि सुशिलेला घेऊन इकडे येतो. उन्हाच्या आत पोहचायला हवं, म्हणजे संध्याकाळी परत येता येईल!"

"संग्राम येणार ना सोबत?"

"मग! तो तर नवरामुलगा! त्याचीही पसंती अगोदर विचारात घ्यायला हवी!"

"पण तुम्ही एकदा मला म्हणाला होता की मुली पहायला जाण्याअगोदर त्या मुलीची संपूर्ण माहिती हवी, तिच्या स्वभावाची कल्पना हवी. तिच्या आवडीनिवडी ठाऊक असाव्यात!"

"अगदी बरोबर, माझ्या प्राथमिक चौकशीत ती मुलगी पास झालीय!"

"पण तुम्हाला त्या मुलीची माहिती दिली कोणी?"

"पोलीस खात्यात माझे अनेक स्नेही आहेत इथं कोल्हापुरात. काही वर्षे एल.सी.बी. ला काम केलेले श्री. व्ही.बी. भोसले रिटायर होऊन बेळगावात हॉटेल रामदेवच्या मागे रहातात. त्यांच्याकडून मला त्या मुलीची इत्थंभूत माहिती मिळाली. त्या मुलीचं नाव जयश्री, तिला सर्वजण 'जयू' म्हणतात. जयु राणी पार्वतीदेवी कॉलेजामधून ग्रॅज्युएट झालीय, सध्या सेकंड एल.एल.बी.ला आहे. ती पाकशास्त्रात निपुण आहे. शिवाय वॉटर कलर लँडस्केप पेंटिंगही करते. पद्माबाई जे कलावंत असतात ना ते मनानं अतिशय निर्मळ असतात असा माझा अनुभव आहे. मुलगी पहाण्याचा हा जो कार्यक्रम आहे तो केवळ औपचारिक! आमच्या घराण्याशी सोयरीक जमावी असं चिमासाहेबांनाही मनापासून वाटतंय. मग उद्या सकाळी ९-९।। ला निघू इथून. तुम्ही तयार रहा!"

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी सरलाबाई, सुशिलाबाई, चंदाबेबी आणि संग्राम या सर्वांना घेऊन झुंजारराव मोटार होममधून राजारामपुरीतल्या पद्माबाईंच्या बंगल्याकडे आले.

पद्माबाई पांढरी शुभ्र साडी, पांढरा ब्लाऊज घालून तयार होत्या. शिवराम गेल्यापासून त्यांनी रंगीत साड्या नेसणे बंद केले होते. इतके दिवस त्या कपाळावर गंधाची टिकलीही लावत नव्हत्या. झुंजाररावांनी त्यांना ती सक्तीनं लावायला लावली. ते म्हणाले, "आजकाल सर्व विधवा स्त्रिया सर्रास कपाळावर टिकली लावतात तसं केल्यानं काही बिघडत नाही. यापुढं लावत चला टिकली!"

हो ना करीत पद्माबाई तयार झाल्या. त्यावेळी सरलाबाई आणि सुशिलाबाईंना देखील त्यांनी मोकळ्या कपाळानं वावरू नये असं वाटायचं. एवढं सगळं झालं, झुंजाररावांनी आश्रय दिला, चार पैसे मिळवून दिले. लाखमोलाचा आधार दिला तरी पण पद्माबाईंच्या चेहऱ्यावर एक अस्पष्ट अशी निराशेची छटा जाणवत असे. चारचौघीत त्या कधी खळाळून हसत नसत. बराच वेळ त्या एकांतात रहाणं पसंत करीत. एवढंच की झुंजाररावांच्या सोबत आंबवड्याच्या शेतातल्या घरात मात्र त्या त्यांच्या सहवासात रमत. झुंजाररावांच्या तरुणपणातील साहसी शिकारीची वर्णनं ऐकता ऐकता त्या भोवतालचं सारं जग विसरून जात.

गाडीनं कोल्हापूर शहराची हद्द सोडली आणि गाडी हायवेला लागली. झुंजारराव ड्रायव्हिंग करीत होते. शेजारी संग्राम बसला होता. मागे तिघी बायका आणि बेबी चंदा होत्या.

कागल सोडल्यानंतर झुंजारराव म्हणाले, "पूर्वी बेळगावला जाताना आपण कुठल्या दुसऱ्या प्रांतात चाललो आहोत असं वाटत नसे. पण या महाजन कमिशननं आपल्यात दुरावा निर्माण केला. शंभर टक्के मराठी बोलणाऱ्यांचा प्रदेश कर्नाटकात घालून मोकळा झाला तो मूर्ख! त्यावेळी आपले महाराष्ट्राचे नेते आपल्या खुर्च्या सांभाळत बसले. मराठी जनतेवर ढळढळीत अन्याय होतोय हे दिसत असून या पुढाऱ्यांची वाचा बंद झाली होती. आता पुढं हा प्रश्न फारच गुंतागुंतीचा होणार आहे!"

सरलाबाई, सुशिलाबाईंना राजकीय चर्चेत रस नव्हता. पद्माबाईंचं मात्र वाचन अफाट होतं. त्याही काही बोलल्या नाहीत.

"जाऊ द्या झालं, राजकारण काय आपला विषय नव्हे! पण इतिहास मात्र पुढे मागे महाराष्ट्रातल्या या राज्यकर्त्यांना दूषणं दिल्याशिवाय रहाणार नाही." निपाणी, संकेश्वर ओलांडून गाडी काकतीचा घाट चढू लागली. तेव्हा झुंजारराव म्हणाले, "पद्माबाई, पूर्वी या डोंगरात बेरडांची फार मोठी वस्ती होती. ते लोक रात्री अपरात्री जाणाऱ्या गाड्या अडवून लुटायचे! माझ्या गाड्या इकडे कधी येत नव्हत्या. पण विशाळगड मलकापूरला जाणाऱ्या माझ्या गाड्यांवरही एकदा लुटालुटीचा प्रयत्न झाला होता. पण तेव्हा मीच त्या गाडीत होतो. माझ्याजवळ होती बाराबोअर बंदूक. एक दोन बार हवेत काढले धडाधड तेव्हा पळत सुटले बेटे!"

बेळगाव दिसू लागले. तिथले लाल मातीचे रस्ते, दाट हिरवीगार झाडी, मंगलोरी कौलांची घरं दिसू लागली.

0-0

प्रकरण ८

चिमासाहेब भोसले कोडोलीकर यांची दीडशे-दोनशे एकर शेती होती. पण कालांतराने शेतीवर उदरनिर्वाह करणे कठीण होणार होते याचा अंदाज करून त्यांनी आपली बरीच शेती विकून टाकली होती. केवळ आपला आणि गावाचा संबंध संपू नये म्हणून त्यांनी गावाजवळची थोडी बागाईत जमीन ठेवून बाकीची सर्व विकून टाकली. बेळगावात ठळकवाडीत बंगला बांधला. त्यांना दोनच मुलं. मोठा जया आणि त्याच्या पाठीशी जयश्री. सारेजण तिला 'जयू' म्हणत. जया ऑटोमोबाईल इंजिनिअर झाला. त्याला बेंगलोरमधे चांगल्या पगाराची नोकरीही लागली. त्यानं बेंगलोरमधे एका केरळी मुलीशी प्रेमविवाह केला. चिमासाहेबाना थोडंसं खटकलं. पण आपल्या जाणत्या, मिळवत्या मुलाच्या विवाहाला त्यांनी मान्यता देऊन टाकली. एक-दोन वेळ त्रिवेंद्रम्ला त्याच्याकडं जाऊनही आले.

धाकटी जयू मात्र आईवडिलांच्या इच्छेनंच आपला जीवनसाथी पसंत करणार होती. बी.ए. झाल्यावर ती 'लॉ' करीत होती.

चिमासाहेब आपल्या ठळकवाडीतल्या बंगल्याच्या पोर्चमध्ये पाहुण्यांची वाट पहात उभे होते.

झुंजाररावांची आलिशान मोटारहोम 'सह्याद्री' पोर्चजवळ येऊन थांबली. प्रथम संग्राम उतरला. त्यानंतर सरलाबाई, सुशिलाबाई, बेबीचंदा आणि पद्माबाई उतरल्या. रीतीरिवाजाप्रमाणे मुजरे झाले. चिमासाहेब स्टँड कॉलरचा चेक्सचा कोट, डोक्याला फरची टोपी घालून त्या सर्वांचं स्वागत करून म्हणाले,

"काय हो मोरे सरकार, किती वर्षांनी आपण एकमेकांना भेटतो आहोत! तुम्हाला आठवतं का तंजावरला व्यंकोजींच्या नातवाच्या लग्नात आपण भेटलो होतो."

"हो होऽऽ, चांगलंच आठवतंय, पण दोघांनाही वाढत्या व्यापातून वारंवार भेटणं मात्र होत नाही हेच खरं!"

मधल्या दिवाणखान्यात चिमासाहेब आणि झुंजारराव बसले. बायकामंडळी आत गेल्या.

झुंजारराव म्हणाले, "चिमासाहेब, आम्ही इकडं येण्यापूर्वी एका बाबीची चर्चा व्हायला हवी होती!"

"कोणत्या?"

"आमचा संग्राम अद्याप बी.ए. झालेला नाही. तुमची कन्या मात्र ग्रॅज्युएट होऊन कायद्याचे शिक्षण घेते आहे. तेव्हा...?"

"अहो ती घरात बसायला नको म्हणून शिकते आहे झालं. उद्या ती एलएल.बी. झाल्यावर वकिली करणार आहे थोडीच?"

"हां, त्या बाबतीतच आपली चर्चा होणं जरुरीचं होतं असं मला वाटतंय!"

"तुम्हाला चालेल ना लॉ-ग्रॅज्युएट सून?"

"हे काय विचारणं झालं? अहो मला कायद्याचं शिक्षण पूर्ण करता आलं नाही म्हणून निदान संग्रामनं तरी ते पूर्ण करावं असं मला वाटायचं. पण त्यानं माझी निराशा केली. इंटरच्या वर्गातच तो तीन वेळा ठेचकाळला. आता कसातरी ज्युनिअरला गेलाय झालं!"

"तुमच्यासारखा जबरदस्त बाप पाठीशी असताना ते कशाला चिंता करतील?"

"तसं नाही चिमासाहेब, जमाना बदलतोय. बापाच्या धनदौलतीवर किंवा घराण्याच्या मोठेपणावर जगण्याचे दिवस संपले आहेत. ज्याचं त्यानं आपल्या पायावर उभं रहावं."

इतका वेळ ते दोघे बोलत राहिले. तरीही चुकूनही चिमासाहेबांनी जयाचा विषय काढला नाही म्हणून झुंजाररावांनीच विचारलं.

"इंजिनियरसाहेब काय म्हणतात? येतात की नाही कधी इकडे?"

"येतात. दोन जुळी मुलं झालीत, एक मुलगा आणि मुलगी. बायको सेंट झेवियरला शिकवते!"

"अरे व्वा. दोघेही कमावते आहेत तर?"

"आज काल दोघांनी कमवावंच लागतं. बरं संग्राम पुढं काय करणार आहेत?"

"काय करणार? शेतीशिवाय पर्याय नाही. आंबवड्याला छोटं फार्महाऊस बांधावं म्हणतोय, नवरा बायको तिथं राहतील."

"तशी आमच्या जयूलाही शेतीची आवड आहे म्हणा. आमची कोडोलीतली बागाईत दोन वर्षे तीच बघते आहे."

"पण लॉ झाल्यावर ती शेतीत रमेल का?"

"अहो तुमच्या आंबवड्यावरून पन्हाळा किती दूर आहे? तिथं आता 'फुल' कोर्ट झालंय ना? फावल्या वेळेत ती वकिलीही करू शकेल! तुमची परवानगी असेल तर!"

"माझी इच्छा होती मीच स्वत: आंबवड्यात राहून पन्हाळ्यावर वकिली करावी, पण ते जमलं नाही. संग्राम वकील होणं शक्य नाही. उलट जयूनं माझं अपुरं स्वप्न पूर्ण केल्याचं तरी मला समाधान लाभेल."

घेण्यादेण्याचा प्रश्नच उद्भवला नाही. फक्त लग्न कोल्हापुरात व्हावं एवढीच सरलाबार्इंची इच्छा होती. ती इच्छा पूर्ण व्हायलाही काही अडचण निर्माण झाली नाही.

संग्राम आणि जयूचा विवाह ठरल्यातच जमा होता. सरलाबार्इंनाही जयू पसंत पडली. सुशिलाबाई आणि पद्माबाईनाही मुलगी पसंत होती. शेवटी संग्रामची पसंती जरुरीची होती. तो त्या बाबतीत काही बोलत नव्हता. त्याची मूक संम्मती सर्वांनी गृहीतच धरली.

पंधरा दिवसानंतरचा मुहूर्त ठरवण्यात आला. आपली कन्या बेळगावापासून फार दूर जात नाही या कल्पनेनं चिमासाहेब व त्यांच्या पत्नी रत्नमालाबाईही सुखावले.

दुपारी जेवणाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर मंडळी कोल्हापूरला परत निघाली. जाताना गाडीत सुशिलाबाई जयूचं कौतुक करताना म्हणाल्या, "एवढी शिकली सवरलेली आहे. पण चेहऱ्यावर काडीचा गर्व नाही."

"आई जगदंबा पावली म्हणायचं! लग्नानंतर मात्र मी गोंधळपूजा तुळजापूरला करणार बरं!"

"आमची काहीएक आडकाठी नाही." ड्रायव्हिंग करता करता किंचित मान वाकडी करून झुंजारराव म्हणाले,

झुंजाररावांनी पद्माबार्इंना राजारामपुरीत घरी सोडलं, सुशिलाबाई त्यांच्या आग्रहास्तव बेबी चंदासह मुक्कामाला राजारामपुरीतच राहिल्या. रात्रभर त्या दोघी चिमासाहेबांच्या कन्येचं गुणगान करीत होत्या. सुशिलाबाई म्हणाल्या, "संग्रामला नीट

ताळ्यावर आणेल बघा जयू!''

''पण तसा तो वाह्यात आहेच कुठं? शिकला नाही एवढाच त्याचा दोष!''

''साखर कारखानदारांच्या पोरांबरोबर त्याचं हिडणं फिरणं अलीकडे वाढलं होतं. जिजाजींच्या डोक्याला रोज कटकटी निर्माण करीत होता.''

''पण आई!'' मधेच बेबी चंदा म्हणाली, ''तुम्ही जयूची लँडस्केप्स्'' बघितलीत का? मी माडीवर जाऊन पाहून आले. एकापेक्षा एक सरस आहेत.''

''बरं झालं बाई, सरलेला संग्रामची चिंता लागून राहिली होती.''

''पण आता ती संपली! लग्न झाल्यावर त्याला जबाबदारीनं वागावं लागेल!''

मध्यरात्र झाल्यानंतर चर्चा थांबली. बेबी चंदा बसल्याजागीच डुलक्या घेऊ लागली. तेव्हा त्यांच्या चर्चा थांबल्या.

तिकडे बेळगावला चिमासाहेबांच्या वाड्यात दुसऱ्या दिवशी जयूच्या लग्नाशिवाय विषय नव्हता. पत्रिका छापणे, जवळच्या नातेवाईकांना पत्रिका पाठवण्यापूर्वी हाताने पत्र लिहिली गेली. चिमासाहेबांचे घराणेही ऐतिहासिक होते. धार, देवास, इंदोर, ग्वाल्हेर येथील सरदार घराण्याशी त्यांचे संबंध होते. त्या लोकांना पत्रे गेली. लग्न कोल्हापुरात व्हायचे असल्याने मांडव उभा करणे, बँडची व्यवस्था करणे यापैकी काहीही वधू पक्षाला करावे लागणार नव्हते. मराठा लाईट इन्फंट्रीतले बरेच निवृत्त अधिकारी चिमासाहेबांच्या परिचयाचे होते. त्यांना चिमासाहेब समक्ष भेटून निमंत्रण देणार होते.

एक निवृत्त कर्नल चिमासाहेबांना म्हणाले,

''जावईबापूंचं शिक्षण किती झालंय? जयू ग्रॅज्युएट होऊन लॉ करते आहे तेव्हा तिच्या शिक्षणाला शोभेल असा जावई हवा तुम्हाला!'' त्यावर चिमासाहेब म्हणाले, ''त्या बाबतीत मात्र काही विचारू नका.''

''कां हो? काय झालंय?''

''संग्रामला शिक्षणाची फारशी आवड नाही. तो लग्नानंतर शेती करणार आहे आंबवड्याला.''

''शेती? म्हणजे जयूलाही नवऱ्याच्या शेतीत मदत करायला हवी, हातात खुरपं घेऊन!''

''तेवढं काही करावं लागणार नाही म्हणा! त्यांचे आंबवडे गाव पन्हाळ्याच्या अगदी जवळ आहे. जयू तिथं वकिली करू शकते. शिवाय, झुंजारराव म्हणत होते, अद्याप तिथं कोणी लेडी ॲडव्होकेट नाही.''

''हां मग बरं आहे. पण मी या तुमच्या मंगल सोहळ्यात काय मदत करू शकतो?''

''थॅंक्स, लग्नाचा भार झुंजाररावांनी घेतल्यामुळे आम्हाला काहीच करावं लागणार नाही. फक्त मराठा लाईट इन्फंट्रीचा बँड मिळाला असता तर बरं झालं असतं.''

''त्यात काही अडचण नाही. तुमची तारीख नक्की होऊ द्या, म्हणजे मी बँडची व्यवस्था करीन.''

बेळगावच्या मराठा लाईट इन्फंट्रीच्या बँडला एक निराळंच 'ग्लॅमर' होतं. हिरव्या लाल रंगाचा ड्रेस घालणारे बँडचे पथक बँड तर सुरेख वागवायचेच पण त्यांचा ड्रेसही आकर्षक होता.

चिमासाहेब तीन-चार दिवस धावाधाव करीत होते. चार दिवसांनी पोष्टमनने येऊन त्यांना तारेचा लखोटा दिला. त्यांनी तो उघडून वाचला आणि त्यांना सगळं जग आपल्याभोवती फिरतंय असं वाटू लागलं!

ती तार झुंजाररावांची होती. दोन ओळीची ती तार, ती वाचून चिमासाहेबांच्या तोंडाला

कोरड पडली. त्यांनी थोडंसं सावरल्यावर रत्नमालाबाईंना बोलावले आणि म्हणाले, "झुंजाररावांची तार आली आहे. हे लग्न होऊ शकणार नाही. खुलासेवार पत्र नंतर पाठवत आहेत."

रत्नमालाबाई संतापून म्हणाल्या, "लग्न होऊ शकत नाही म्हणजे काय? लग्न हा काही पोरखेळ आहे की काय?"

"तरी बरं आपण अजून पत्रिका छापल्या नाहीत!"

"होऽऽऽ, पण गावोगावी तुम्ही पत्रं पाठवलीत त्याचं काय?"

"काही अपरिहार्य कारणामुळं विवाह होऊ शकणार नाही म्हणून पुन्हा पत्रं लिहावी लागतील." हताश होऊन चिमासाहेब म्हणाले,

"पण अब्रूचं काय? ती परत येणार आहे का?"

माडीवरून खाली आलेल्या जयूला सर्व प्रकार समजला. ती अतिशय समजूतदार होती. ती म्हणाली, "आबा, एवढं ठरलेलं लग्न मोडण्यासारखं काहीतरी सबळ कारण घडलेलं असावं! त्यांचं सविस्तर पत्र आल्याशिवाय काही खुलासा होणार नाही. माँ, तुम्ही उगाच त्रागा करून घेऊ नका! लग्नात विघ्नं येणं काही नवीन नाही. ते कुणाच्याही हाती नसतं!"

चिमासाहेब एक दीर्घ उसासा सोडून म्हणाले,

"तरी मुलगा अभ्यासात हुषार नाही, एका वर्गात दोन दोन तीन तीन वर्षे नापास होतोय म्हटल्यावरच माझं मन थोडं कचरलं होतं."

जयू वयानं लहान असून आईवडिलांना समजावीत होती. पण आता त्यांनाही हे ठरलेलं लग्न मोडण्यासारखं नेमकं कोणतं कारण घडलं आहे हे समजून घेण्याची जिज्ञासा होती.

चिमासाहेबांकडे एक अत्यंत विश्वासू असा दिवाणजी होता. तो त्यांचे आर्थिक व्यवहार आणि शेतीचा व्याप सांभाळायचा. चिमासाहेबांनी त्याला बोलावणे धाडले. त्याला वाटले काही निमंत्रणपत्रं लिहायची राहिली असतील. म्हणून फडणीस चष्मा सावरीत चिमासाहेबांना मुजरा करून अदबीनं बाजूला उभे राहिले.

"दादोबा, आताच झुंजाररावांची तार आलीय हे लग्न होऊ शकणार नाही म्हणून! त्यांचं नंतर खुलासेवार पत्र येईल असा तारेत उल्लेख आहे. पण मला वाटतं तुम्ही आत्ताच कोल्हापूरला जावं आणि झुंजाररावांना अचानक हा निर्णय का घ्यावा लागला याची सविस्तर माहिती काढावी. प्रत्यक्ष झुंजाररावांना न भेटता तुम्हाला ही सर्व माहिती मिळवावी लागणार आहे. कोल्हापुरात तुमचे असंख्य स्नेही आहेत. त्यांच्यामार्फत परस्पर तुम्ही ही माहिती काढावी. तीन-चार दिवस रहावं लागलं तरी हरकत नाही. पण निदान लग्न मोडण्याचं निश्चित कारण तरी आम्हाला समजू शकेल!"

"जी सरकार, आत्ताच ११च्या एस.टी.ने निघतो."

"पण समजलं ना? तुम्हाला मी इथून पाठवलंय याचा झुंजाररावांना पत्ता लागता कामा नये!" दादोबा फडणीस, नाना फडणवीसाचे वंशज होते की काय न जाणे, पण गृहस्थ अत्यंत चाणाक्ष आणि मुत्सद्दी! 'त्याची काही एक चिंता नको' असं म्हणून फडणीस निघाले.

दादोबा कोल्हापुरात गंगावेश तालमीत वस्ताद असलेल्या संभा नागराळेला भेटले. संभाची आणि दादोबांची जुनी मैत्री होती. दादोबा बुद्धिमान माणूस होता. तो डोक्याने 'डावपेच' करायचा पण संभाला फारसं डोकं नव्हतं, तो कुस्तीच्या वेळी समोरच्या पहिलवानावर कशी मात करावी हे शिकवण्यात तरबेज होता.

दादोबांना पहातात संभा लुंगी सावरत उठला. त्याचे दोन्ही कान भज्यासारखे फुगलेले

होते. अंगावर लाल मातीचा थर होता.

"काय बेळगावकर, आज हिकडं काय काम काढलंत!"

"सांगतो, बसा जरा!"

तालमीच्या कट्ट्यावर दोघे बसले. दादोबा म्हणाले, "तुमच्या गल्लीतली मोरे ट्रान्स्पोर्ट कंपनी बंद झाली ना?"

"होय, एस.टी. आल्यावर खासगी मोटार मालक संपलेच की!"

"आता काय करतात ते मालक सध्या?"

"काय करणार? आंबवड्यात पन्नास एकर जमीन आहे. ती जाऊन येऊन करतात!"

"त्यांना मुलं, मुली किती?"

"मुलगी नाही त्यांना. आहे तो एकच दिवटा संग्राम."

"दिवटा का म्हणता त्याला?"

"मग काय म्हणू? अहो शाळेच्या नावानं बोंबा, वडिलांनी लग्न ठरवलं होतं तेही मोऱ्यानी तातडीनं मोडलं!"

"कां?"

"ती एक 'हिस्टरीच' हाय दादोबा! अहो, उदगीरच्या मंगू धनगराचं नाव कधी ऐकलंय का तुम्ही?"

"नाही. त्याचा काय संबंध आहे?"

"त्यानं मोऱ्यांचा मागे जीव वाचविला, कोयत्यानं बिबळ्याचं डोकं फोडलं, नाहीतर त्यादिवशी सरकार मोरे संपल्यातच जमा होते!"

"बरं मग पुढं काय झालं?"

"मंगू धनगराकडं ह्यांचं येणं जाणं वाढलं. मंगूला एकच लेक, शेवंता तिचं नाव!"

"बरं, मग?"

"ती हाय धनगरची लेक. पण रूप म्हणाल तर राजकन्येसारखं! मंग्या धनगराबरोबर जाणं येणं वाढल्यामुळं ती शेवंताही अधूनमधून बापाबरोबर कोल्हापूरला यायची!"

"बरं मग!"

"दादोबाच्या कानाजवळ तोंड नेत हळू आवाजात संभा म्हणाला, "मोरे सरकारची पाव्हणी पद्माबाई, हिनं राजारामपुरीत बंगला बांधलाय! 'रांडमुंड' बाई पण रूपवान बाई, पोर नाही बाळ नाही. तिची 'इस्टेट' तिकडं म्हांकाळ कवठ्याला. तिच्या दिराकडनं मोठ्या हिकमतीनं मोरे सरकारनं तिचा हिस्सा मिळवून दिला."

"पण ती विधवा कशानं झाली?"

"नवरा मिलिट्रीत होता. काश्मीरला त्याची जीप खड्ड्यात कोसळली आणि मेला."

"मला वाटलं लढाईत मारला गेला वाटतं!"

"तसं काय झालं नाही म्हणा, पण मोरे सरकारनं तिच्या दिराच्या तावडीतनं तिची जमीन सोडवून दिली. तेव्हापासून बाई त्यांच्याच आसऱ्याला हाय म्हणंनासा!"

"पण हे मोरेंच्या बायकोला कसं काय पटतं?"

"ते काय कारण कळालं नाही. पण राजरोसपणे मोरे बाईकडं जातात येतात. बरं ही बडी माणसं? ह्यांची मापं कोन काडनार? उडत उडत आमच्या कानावर आल्यालं ते!"

"बरं, मोऱ्यांच्या मुलाचं आमच्या कर्नाटकातल्या एका जमीनदाराच्या मुलीशी ठरलं होतं म्हणे. त्यांचं काय झालं?"

"मोरे सरकारानंच ते मोडलं!"

"कां?"

"मोऱ्याच्या दिवट्या पोरानं त्या मंगू धनगराच्या लेकीला नादी लावलं, आपलं लग्न ठरणार आहे हे माहीत असून त्या धनगराच्या लेकीला 'गरवार' केली की?"

"काय सांगता?"

"देवाच्यान!" गळ्याला चिमटा काढून संभा म्हणाला, "मोरे सरकारांची बायकू म्हणाली, मंग्याला द्या जावा धा पाच हजार आणि त्याची लेक मोकळी करा."

"मोकळी करा म्हणजे?"

"म्हंजे पोटचं पाडून रिकामं व्हा! पर मोरे सरकार शाप न्हाई म्हनलं. मंगू धनगर झाला म्हनून काय झालं, त्यो काय मानूस न्हाई? माजा त्येनं जीव वाचिवलाय, मी त्येला असा दगा देनार नाही! संग्रामचं लगीन मोडणार!"

"अस्सं? आता आलं लक्षात! बरं वस्ताद, तुम्हाला ह्या आतल्या सगळ्या गोष्टी कशा कळतात?"

"सकाळी तालमीत कुस्त्या लावून दिल्या पोरास्नी, चार दोन डाव शिकीवले की दिवसभर मी मोकळाच की? समोर त्या न्हाव्याच्या दुकानाच्या फळीवर बसलं की सगळी रिकामटेकडी माणसं पेपर वाचायला म्हणून तिथं जमत्यात, तिथंच बसल्या बसल्या सगळ्या गावाच्या बारा भानगडी समजल्यात म्हननासा!"

दादोबा फडणीसांनी खिशातून पैशाचं पाकीट काढून त्यातली शंभराची नोट संभाला देऊ केली तेव्हा संभा म्हणाला.

"हे आनि कशाला वो?"

"असू देत ठेव!"

होय नको करत संभा वस्तादानं ते स्वीकारले. दादोबांनी सरळ एस.टी.स्टँड गाठला.

चिमासाहेब लग्न मोडल्याचं समजल्यापासून अस्वस्थ होते. दादोबाला कोल्हापूरला पाठवल्यापासून तो कधी एकदा माहिती घेऊन येतो असं त्यांना झालं होतं. बेळगावच्या स्टँडवरून दादोबा चिमासाहेबांच्या बंगल्याकडं रिक्षानं आला. चिमासाहेब त्यांचीच वाट पहात होते. त्यांना पहाताच चिमासाहेबानी विचारलं,

"काय खुलासा झाला?"

"होय. पापाच्या तिकटीचा संभा वस्ताद गाठला. त्याला या प्रकरणाची बितंबित बातमी आहे!"

"नेमकं कारण समजलं का?"

"होय! होय, आत चला. सगळं सविस्तर सांगतो."

दादोबा फडणीसांनी संग्रामचं लग्न असं तातडीनं का मोडलं ते सांगताना दादोबा म्हणाले,

"मोरे सरकार मात्र दिलाचा सच्चा माणूस बरं का? ते हे प्रकरण समजल्यावर संग्रामला म्हणाले, त्या शेवंताशी संबंध ठेवताना लाज नाही वाटली? गेले सहा महिने घरात तुझ्या लग्नाच्या वाटाघाटी सुरू आहेत आणि तू त्या गरीब पोरीचा गळा कापलास? काही नाही. चिमासाहेबांच्या मुलीशी ठरलेलं तुझं लग्न आता होणं शक्य नाही. शेवंताशीच तुला लग्न करावं लागेल!"

फडणीसकडून ती हकिगत समजल्यावर चिमासाहेबांच्या घरातलं वातावरण शांत झालं. त्या अगोदर तीन दिवसापूर्वी मोऱ्यांच्या घरातलं वातावरण तंग झालं होतं. मंगू शेवंताला घेऊन आला होता. ती फक्त रडत होती. झुंजारराव तिला म्हणाले, "पोरी, तू रडू नको. या

घरची सून होशील! संग्रामला तुझ्याशीच लग्न करावं लागेल.''

''काय? ही या घरात सून म्हणून वावरणार?'' सरलाबाई म्हणाल्या,

''होय, होय ती सून म्हणूनच वावरणार यापुढं. समजलं!''

''पण आपले खानदानी नातेवाईक काय म्हणतील, जग काय म्हणेल?''

''सरला, इतकी वर्ष झाली आपल्या लग्नाला, पण तू मला ओळखलं नाहीस! ज्या शाहू छत्रपतींचं आम्ही अन्न खाल्लंय त्यांनीच आपल्या भाचीला होळकर घराण्यात दिली होती, हे ठाऊक आहे का तुला? छत्रपती जातपात मानत नव्हते. नातेवाईक काय म्हणतील? जग काय म्हणेल? याला मी ही कदापि भीक घालणार नाही. आजच चिमासाहेबांना तारेनं कळवतो. संग्रामचं तुमच्या कन्येशी ठरलेलं लग्न होऊ शकणार नाही असं!''

ते ऐकताच सरलाबार्इंना भोवळ आली होती. संग्रामनं पुढं होऊन त्यांना सावरलं. डोक्यावर पाणी शिंपडलं.

संग्रामच्या लग्नाच्या बाबतीत काहीतरी गडबड झालेली आहे हे समजताच सरलाबार्इंच्या भगिनी सुशिलाबाई तातडीनं तिथं आल्या.

''काय घडलं तरी काय नेमकं?'' आल्यानंतर त्यांनी उभ्याउभ्याच झुंजाररावांना विचारलं! सावध होणाऱ्या सरलाबार्इंच्याकडे पहात झुंजारराव म्हणाले, ''तुमच्या बहिणीला विचारा. मी जातो शेताकडं! डोकं तापलंय माझं!''

सकाळीच मंगू आला होता. त्याला मोरे सरकारांनी थांबवून घेतला होता. घरात घडलेलं सगळं संभाषण त्यानं ऐकलं होतं. तो आंबवड्याला जाताना मोरे सरकारना म्हणाला, ''सरकार असं काय करू नगा. मी कुटं, आनि तुमचं घराणं कुटं!''

''मंग्या, या बाबतीत तू एक शब्द बोलू नकोस, मी एकदा घेतलेला निर्णय बदलत नसतो, नातेवाईक आणि जग दोन्ही तोंडानं बोलतात. तुला सांगतो मंगू, संग्रामचं लग्न शेवंताशीच होणार, संग्राम नाही हो म्हणूच शकणार नाही!''

मंगू आणि शेवंतासह मोटार व्हॅन आंबवड्याच्या रस्त्यावरून न जाता राजारामपुरीकडे चाललेली पाहून मंगूनं सरकाराना विचारलं, ''हिकडं कुटं सरकार?''

''पद्माबार्इंच्याकडे! त्यांना सोबत घेऊन जाऊ शेतावर! त्या बाई सहवासात आल्याशिवाय माझं डोकं थंड होणार नाही.''

एव्हाना पद्माबार्इंना कशाचीच कल्पना नव्हती. मोरे सरकारांच्या तोंडून सारी हकिगत ऐकल्यावर त्या म्हणाल्या,

''हे असं, विपरीत घडायला नको होतं.''

''नको होतं, हे खरं आहे. पण जे घडलंय ते निस्तरायला तर पाहिजे!''

''पण सरलाताèर्इंना काय वाटेल याचा विचार केलात का?''

''तो मी कशाला करू? त्या शेवंताला संग्रामचं लग्न ठरलं आहे म्हटल्यावर काय वाटलं असेल, सांगा की? वर्ष दोन वर्षे तुम्ही त्या पोरीच्या सहवासात होता!''

पद्माबार्इंना काय बोलावं हे सुचेना. त्या गाडीच्या खिडकीतून वाघबिळाची नागमोडी वळणं पहात म्हणाल्या, ''पण मला संग्रामबाळ असं काहीतरी करून ठेवेलं असं कधीच वाटलं नव्हतं!''

''पद्माबाई, तो काय तुम्हाला सांगून असल्या भानगडी करणार होता थोडाच?''

''पण मंगू आहे धनगर. आपण खानदानी कुळातले?''

''पद्माबाई, मागे तुम्हीच मला म्हणाला होता. आम्ही आर्मीचे लोक जात-पात मानत नसतो आणि आत्ताच तुम्हाला मंगूची जात आठवू लागली?''

"तसं नाही सरकार?"

"मग कसं?"

"शेवंताशी लग्न न करताच, ती संग्रामच्या आश्रयाला राहू शकली असती!"

"त्याची रखेली म्हणून? शक्य नाही! ती मोऱ्यांची सून म्हणूनच आमच्या घरात वावरेल!"

मोरेंच्या घराण्यात निर्माण झालेल्या त्या प्रसंगाने पद्माबाईही थोड्या अस्वस्थ झाल्या. त्यावर झुंजारराव म्हणाले,

"शेवंता तुमच्या घरी असताना संग्रामचं तुमच्याकडे येणं जाणं वाढलं होतं. त्यावेळी तुम्हाला थोडी शंका यायला हवी होती."

"तो नेहमी आल्यानंतर माझं कुशल विचारायचा, शेवंताच्या अभ्यासाबाबत चौकशी करायचा, एकदा दोनदा मात्र तो मॉरीस गाडी घेऊन आला होता तेव्हा "मावशी मी शेवंताला युनिव्हर्सिटीची बाग दाखवायला घेऊन जाऊ का?" असं त्यानं विचारलं होतं. मी जा म्हणाले, पण मला त्याचं वागणं त्यावेळी अगदी नॉर्मल वाटलं. नेहमीप्रमाणं हसणं, विनोद करणं!"

"पद्माबाई, गढ्येपंचविशीतली पोरं अगदी अशीच वागतात. स्वत:बद्दल कोणाला यत्किंचितही संशय येऊ देत नाहीत! पण जाऊ दे, आता त्या गोष्टी उगाळून काही उपयोग नाही!"

त्यांच्या मागे गाडीत बसलेल्या शेवंताच्या डोळ्याची धार काही केल्या थांबत नव्हती.

गाडीतून उतरताना झुंजारराव मंगूला म्हणाले, "अरे मंगू, तू माझा व्याही होणार म्हणून आनंदी होशील का असे अश्रू ढाळत बसशील?"

"सरकार आपल्या जोड्याजवळ बसायची माझी लायकी नाही. हे फार वाईट वंगाळ केलंसा बघा!"

"बघा पद्माबाई, त्याची समजूत काढा. तेवढ्यासाठी तुम्हाला घेऊन आलोय."

पद्माबाईंनी त्यावर काहीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही.

रात्री साडेआठ नऊला मंगूला आणि शेवंताला शेतावर सोडून पद्माबाईंना घेऊन झुंजारराव कोल्हापूरला परत निघाले.

0-0

प्रकरण ९

पौर्णिमेची रात्र होती. बाहेर टिप्पूर चादणं पडलं होतं. वाघबिळ उतरून आल्यावर नलवडे वस्तीजवळचा पाझर तलाव लागला. तलावाचं पाणी चंद्रप्रकाशात चमकत होतं. दूर पूर्वेला जोतिबाच्या डोंगरावर लाईट लागले होते. ते मिणमिणत होते.

"सरकार, आपण इथं का थांबलो आहोत?" पद्माबाईंनी विचारलं.

"का थांबलो आहोत? काही प्रश्नांची उत्तरं द्यायची नसतात. मी एका मोठ्या विवंचनेतून बाहेर आलो. अशावेळी मला थोडं 'रिलॅक्स' व्हावंसं वाटलं." शेजारी बसलेल्या पद्माबाईंना जवळ ओढून त्यांचे चुंबन घेऊन झुंजारराव म्हणाले,

"माझा संग्रामच्या बाबतीतला निर्णय तुम्हाला कसा वाटला? खरं खरं सांगा हं?"

"सरकार तुम्ही किती पुरोगामी विचाराचे आहात ते तुम्ही तुमच्या कृतीनं सिद्ध केलं! त्यात वर्ष दीड वर्ष मी शेवंताच्या सहवासात होते. ती अत्यंत सद्गुणी पोर आहे. फक्त तिचा एकच दोष, ती मंगूच्या पोटी जन्मली."

"त्याला तुम्ही दोष म्हणता? माणसानं कोणत्या आई-बापाच्या पोटी जन्मावं हे काय त्याच्या हाती असतं?"

"नसतं, म्हणा, पण समाजातली तुमची प्रतिमा, घराणं या सर्व गोष्टींना शेवंता तुमची सून होणार ही कल्पना सहजासहजी मान्य होण्यासारखी नाही!"

"मला त्या समाजाची पर्वा नाही! मी शेवंताला पुढं शिकवणार! तिला शिकवायला येणारे देशपांडे मास्तर मला एकदा म्हणाले होते. "मुलगी अतिशय बुद्धिमान आहे. तिला अधिक शिक्षणाची संधी मिळाली तर भविष्यात ती नाव कमवू शकेल!"

"भविष्यात? पद्माबाई माझा भविष्यावर बिलकुल विश्वास नाही. जन्मदात्याने आपल्याला जन्म देते वेळीच आपली कुंडली मांडलेली असते. त्यात माणसानं किती जगावं, कुठं रहावं काय, व्यवसाय करावा हे सारं निश्चित करून ठेवलेलं असतं. आपण त्याविषयी अनभिज्ञ असतो. भविष्य कोणीही जाणून घेण्याचा प्रयत्न करू नये. तो कधीही सफल होणार नाही. आता तुमच्याशी विवाह झाल्यावर वर्षा दोन वर्षात शिवरामना अपघाती मरण येईल याची तुम्हाला तरी कल्पना होती का? माणसाला माणसाचं भविष्य समजलं असतं तर कितीतरी अनिष्ट गोष्टी टळल्या असत्या! बरं पद्माबाई, अशा रम्य ठिकाणी अशी निरर्थक चर्चा करण्यात काही अर्थ नाही. या इकडे!"

पद्माबाई झुंजाररावांच्या छातीवर डोकं ठेवून म्हणाल्या, "तुम्हाला एक प्रसंग मी अद्याप सांगितलेला नव्हता."

"कोणता?"

"शिवरामांच्या सोबत मी सिमल्याला गेले होते. एकांतात मला जवळ घेतल्यावर ते मला म्हणाले, 'पद्मा, तू जाणून-बुजून माझ्याशी विवाह करायला तयार झालीस, पण एका गोष्टीचा तू विचार केला नाहीस.'

‘कोणत्या?’ मी विचारलं.

‘मी आहे सैन्यात कोणत्याही क्षणी मला मृत्यू येऊ शकतो! शिवाय काश्मीरचा प्रश्न इतक्यात सुटणार नाही. राज्यकर्त्यांच्या बेअकलीपणानं यात गुंतागुंत झालीय. ते ३७० कलम घालून स्वत:ला तत्त्ववेत्ते समजणाऱ्या राज्यकर्त्यांना त्या ३७० कलमाची गुंतागुंत समजली नाही. पाकिस्तानी राज्यकर्त्यांना काश्मीरचे बुजगावणे दाखवल्याशिवाय सत्तेवर रहाता येणं अशक्य आहे. त्यासाठी घुसखोरी करणं, घातपात घडवून आणणं असली ‘षंढ’ नीती त्यांना आचरावी लागते. यात शूरपणा नाही. पण सांगण्याचं तात्पर्य असं की माझ्या जीविताचं कोणत्याही क्षणी बरं वाईट होऊ शकतं. माझ्या पश्चात तू निराधार राहू नयेस!’’

काही क्षण मला त्यांच्या बोलण्याचा रागही आला. मी काहीशा रागातच म्हणाले, ‘म्हणजे मी काय करावं अशी तुमची अपेक्षा आहे?’

‘तसं घडलं तर, तू पुनर्विवाह करावास. आता आमच्या घराण्यात तू केलेला पुनर्विवाह कोणाला रुचणारही नाही म्हणा!’

मला शिवारामांचे ते शब्द ऐकून खूप यातना झाल्या. मी म्हणाले, ‘तुमच्या मागे मला जगावंसं देखील वाटणार नाही.’

त्यावर शिवराम म्हणाले, ‘पद्मा, आयुष्य एकदाच मिळते. माझा पुनर्जन्मावर विश्वास नाही. पण एकदा मिळालेलं हे आयुष्य माणसानं सुखानं जगावं. पाप पुण्य, जग काय म्हणेल असल्या वायफळ गोष्टींचा विचारही करू नये!’

‘‘शिवरामना भविष्यात आपलं लवकरच काय घडणार आहे याची पुसटशी जाणीव झाली होती की काय न जाणे, पण लगेच ते म्हणाले, विवाह न करताही जर एखाद्या सत्प्रवृत्तीच्या माणसाने तुला आधार द्यायची तयारी दाखवली तर तू बेशक त्याचा आधार घे!

‘‘थोड्याच दिवसांनी त्यांच्या जीपला अपघात झाला. मी निराधार झाले. कवठ्याला त्यांचं प्रेत आणलं होतं. त्यावेळी माझ्या सासरच्या माणसांनी माझं सांत्वन करणे तर दूरच राहिलं, पण ते माझ्याकडं तिरस्काराने पाहू लागले. नंतर नंतर माझ्या जावा मला पांढऱ्या पायाची म्हणून हिणवू लागल्या. दिरांनी तर चक्क माझा इस्टेटीतला हिस्साच नाकारला.

‘‘तेव्हा मला शिवरामांचे ते बोल आठवू लागले. एकदा ते मला म्हणाले होते, ‘पद्मा, बाई किती जरी कर्तबगार असली तरी पुरुषाच्या आधाराशिवाय जगू शकत नाही. यासाठी उत्तरेकडे काही जमातीत भावाच्या मृत्यूनंतर त्याच्या अविवाहित भावांनी विधवा भावजयीशी लग्न करण्याची प्रथा आहे. परवा आमचा लान्सनाईक तिवारी लढाईत मारला गेला तेव्हा त्याच्या भावाने तिवारीच्या विधवा पत्नीशी महिन्याच्या आत विवाह केला. आपल्याकडे या प्रथेला लोक नावं ठेवतील!

‘‘शिवराम सैनिक होते, पण अत्यंत विचारी होते. तुमची माझी सुशिलाताईंनी ओळख करून दिली. तुम्ही मला मदत केलीत. शिवरामांच्या हिश्शाची जमीन मला मिळवून दिलीत तेव्हा मला शिवरामांचेच बोल आठवत होते. ‘पद्मा, स्त्री कितीही कर्तबगार असली तरी पुरुषाच्या आधाराशिवाय जगू शकत नाही.’’

‘‘शिवराम वॉज ए ग्रेट मॅन! पद्मा, मी तुला आश्रय दिला तो तू देखणी, तरुण आणि सधन म्हणून दिला असं तर तुला वाटत नाही ना?’’

‘‘मीच तुमच्याकडे आकर्षले गेले. सरलाबाईंनीही मोठं मन करून माझ्या अन् तुमच्या मैत्रीचा फार बागुलबुवा केला नाही.’’

‘‘अगं तिचं ते इमर्जन्सी हिस्टेरोक्टॉमी झाल्यापासून तीच मला दुसरं लग्न करून घ्या म्हणून मागे लागली होती.’’

चंद्र बराच वर आला होता. दहा वाजायला आले होते. झुंजारराव पद्माबाईंना म्हणाले, "चल, फार उशीर झाला."

दोघांनाही आपण काही तरी अनैतिक करतो आहोत असं वाटलं नव्हतं. त्यापूर्वीही राजारामपुरीतल्या बंगल्यात त्यांची एकशय्या झालेली होती. पण त्यावेळी त्या दोघांत अशी चर्चा झालेली नव्हती. आज झालेल्या या चर्चेमुळे दोघांनाही हलकं हलकं वाटत होते.

शेवंताच्या प्रकरणामुळं झुंजारारावांच्या मनाला आलेली उद्विग्नता पद्माबाईच्या भेटीनंतर काहीशी कमी झालेली होती.

कोल्हापूर शहरातली वाहतूक मंदावली होती. गाडी राजारामपुरीत पद्माबाईंच्या बंगल्यासमोर येऊन थांबली. तेव्हा झुंजारराव म्हणाले,

"मी जातो रंकाळ्यावर."

"एवढ्या उशिरा? आजची रात्र इथंच रहा ना? मी जेवायला काहीतरी लाईट बनवते!"

"लाईट म्हणजे काय?"

"फ्रिजमध्ये अंडी आहेत, हवं तर आम्लेट बनवते, नाहीतर अंड्याचा रस्साही झटपट होण्यासारखी गोष्ट आहे!"

"ठीक आहे. काही बनवा, तिकडं घरी गेल्यावर आज सरला माझ्याशी नीट बोलेल की नाही कुणास ठाऊक?"

"का? त्यांना काय झालंय!"

"मी शेवतांच्या बाबतीत घेतलेला निर्णय तिला मुळीच रुचलेला नाही!"

"सुशिलाताईंना काय वाटतं?"

"त्या बहिणी बहिणी अद्याप घराणं, खानदान, लोक काय म्हणतील या विचारातून बाहेर आलेल्या नाहीत. बघू या, येतील हळूहळू ताळ्यावर. असा माझ्याबद्दलचा अबोला किती दिवस टिकून राहणार आहे?"

"मला काही त्याबाबतीत करता येईल का?"

"तसला काही प्रयोग करू नका. माझ्याप्रमाणं त्या दोघी तुमच्याशीही पूर्वीसारख्या वागणार नाहीत."

"का?" मी विचारलं.

"मला सरलाच्या बोलण्यात त्या बाबतीत थोडा निराळा सूर जाणवला!"

"म्हणजे नेमकं काय म्हणाल्या त्या?"

"ती म्हणते शेवंता वर्ष दोन वर्षे तुमच्या बंगल्यावर होती. संग्राम वारंवार तिथं जात येत होता, तेव्हा पद्माबाईंना थोडी शंका यायला हवी होती."

"असं स्पष्ट म्हणाल्या त्या?"

"स्पष्ट आणि अस्पष्ट. पद्मा, मला बायकांच्या चेहऱ्यावरून काही गोष्टी समजतात! मला आज तुझी थोडी परवानगी हवी आहे!"

"कशाबद्दल?"

"मी थोडीशी व्हिस्की घ्यावी म्हणतो! दोन दिवसापासून माझं डोकं भणभणतंय!"

"घ्या, मी कशाला हरकत घेऊ?"

"तसं नाही हं. काही बायकांना पुरुषांनी ड्रिंक्स घेतल्याचं आवडत नाही म्हणून विचारतो"

"आम्ही आर्मीतल्या बायका. आमच्याकडे नेहमी पार्ट्या व्हायच्या तेव्हा मला त्यात काही निषिद्ध वाटायचा प्रश्नच नाही! फक्त व्यसन न लागावं!"

"मला कधीच व्यसनं लागणार नाही. मी शिकारीला गेलो, एखादी चांगली शिकार मिळाली की 'सेलेब्रेट' करण्यासाठी एखाददुसरा पेग घेतच होतो की! आज तुझ्या सहवासात मला खरोखरच 'रिलॅक्स' वाटतंय."

झुंजाररावांच्या मोटारहोममध्ये छोटासा बार होता. पण तो त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणालाही ठाऊक नव्हता. आपण केव्हातरी मद्य घेतो याची ते कधी वाच्यता करीत नसत.

पद्माबाईंनी आतून प्रâीजमधली पाण्याची बाटली आणि ग्लास आणून त्यांच्यासमोर टेबलावर ठेवले.

झुंजाररावांनी एक पेग भरला. त्यात थोडं पाणी घातलं, ग्लास उंचावून पद्माबाईना म्हणाले,

"चिअर्स पद्मा!"

पद्माबाईंनी फक्त हात उंचावला.

एक घोट घेऊन झुंजारराव म्हणाले, "तुला एक विचारीन विचारीन म्हणत होतो. पण योगच आला नाही. तू शिवरामसोबत कधी 'ड्रिंक' घेतलेस की नाही!"

"जिन घेत होते, पण शिवराम गेल्यापासून मी स्पर्शही केला नाही. शिवरामांच्या आठवणीसाठी मी मद्याला स्पर्श करायचा नाही असं ठरवलंय!"

"आता मी आग्रह करणार नाही. पण समज तो मी केलाच तर काय करशील?"

"मी नाही घेणार आणि तुम्हीही मला तसला आग्रह करूच नका!"

'ओके, ओके', करीत झुंजाररावांनी पुन्हा ग्लास ओठाला लावला.

दोन दिवसापूर्वी मनस्ताप करणारी ती घटना घडल्यापासून झुंजारराव अस्वस्थ होते. आता शेतावरून परत येताना पद्माबाईंच्या सहवासात त्यांना थोडं बरं वाटत होतं. आता दोन पेग व्हिस्की घेतल्यावर फारच हलकं हलकं वाटू लागलं.

जेवताना झुंजारराव म्हणाले,

"पद्मा, तू बाई आहेस. एका निरपराध मुलीवर जर अन्याय होत असेल तर मी कसे निर्णय घ्यावेत तूच सांग?"

"तुम्ही चुकीचा निर्णय घेतला आहे असं मी म्हणणार नाही! पण शेवंता मोऱ्यांच्या खानदानीत सून म्हणून फार मोकळेपणानं वावरू शकणार नाही असं मला वाटतंय!"

"मला त्याची सर्व जाणीव आहे! पण सरलेला माझा स्वभाव माहीत आहे. ती माझ्या निर्णयाविरुद्ध काहीही करू शकणार नाही. तिला शेवंताला सून म्हणून स्वीकारावंच लागेल!"

रात्रीचे अकरा वाजले होते. झुंजाररावांच्या बेडरूममध्ये आडवे झाले. पद्माबाई त्यांच्या पायाशेजारी बसल्या आणि झुंजाररावांचे पाय चेपू लागल्या. त्यावेळी ते म्हणाले,

"मला पाय चेपून घ्यायला आवडतं हे तुला कोणी सांगितलं?"

"कोणीही सांगितलेलं नाही. शिवरामना पाय चेपून घ्यायची सवय होती. मी तुम्हाला त्यांच्या ठिकाणी समजते!"

बोलता बोलता पद्माबाई भावनाविवश झाल्या. त्यांचे डोळे पाणावले. सरकाराना न दिसेल इतक्या हळुवारपणे त्यांनी ते टिपले.

त्यांना बाहुपाशात घेत झुंजाररावांनी म्हणाले, "तुझ्या आयुष्यात एक विक्षिप्त आणि हट्टी माणूस आला आहे असं नाही वाटत तुला?"

"मुळीच नाही. उलट माझं भाग्य म्हणून तुम्ही मला भेटलात."

दुसऱ्या दिवशी सकाळी चहा घेऊन झुंजाररावांनी म्हणाले, "पद्मा, मी निघतो. त्या

दोघींची थोडी समजूत घालण्याचा प्रयत्न करतो. तू एक काम कर!''

''कोणतं?''

''इकडं संग्रामला पाठवून देतो. त्याला माझी भूमिका थोडी समजावून दे! शेवंताशी लग्न करण्यात कसलाही कमीपणा समजू नकोस म्हणावं! त्या बहिणी बहिणी त्याचे कान फुंकायला कमी करणार नाहीत. अगोदरच सुशिलाबाई मला म्हणाल्या होत्या 'संग्रामनं शेवंताशी लग्न न करता तिला मैत्रीण म्हणून ठेवायला काय हरकत होती?' त्या निष्पाप पोरीवर अन्याय होईल असं मला काहीही करायची इच्छा नव्हती. येतो मी.''

बाहेर उभ्या मोटार होमचा स्विच ऑन करून झुंजारराव निघून गेले.

झुंजारराव गेल्यानंतर पद्माबाई त्यांना निरोप देऊन आत आल्या. त्यांच्या बेडरूममध्ये टी-पॉयवर शिवरामांचा सैनिक वेषातला फोटो होता. तो हातात घेऊन त्या कॉटवर आडव्या झाल्या. जेव्हा जेव्हा झुंजारराव पद्माबाईकडे येत तेव्हा प्रत्येक वेळी शिवरामांचे ते शब्द त्यांना आठवायचे! 'पद्मा, बाई कितीही कर्तबगार झाली तरी पुरुषाच्या आधाराशिवाय जगू शकणार नाही. फक्त तो पुरुष स्वभावानं उमदा असावा!'

पद्माबाई कितीतरी वेळ शिवरामांचा फोटो हातात घेऊन कॉटवर पडून होत्या. इतक्यात दारावरची बेल वाजली. पद्माबाईनी उठून दार उघडलं. दारात संग्राम उभा होता.

''अरेच्या. तू इतक्यात कसा आलास? तुझे डॅडी आत्ताच गेले.''

''हो, म्हणून त्यांना पहाण्यासाठीच माँनी मला पाठवलंय्! काल संध्याकाळी घरातून गेल्यानंतर त्यांचा फोन नाही. काही निरोपही नाही. तिकडं रात्रभर माँ त्यांची चिंता करत आहेत!''

''आम्ही शेतावर गेलो होतो. तेथून रात्री आलो. तुझे डॅडी इथंच जेवले. बरीच रात्र झाली होती. म्हणून मीच त्यांना म्हणाले, आजची रात्र रहा इथं, सकाळी उठून जा. जाताना मला म्हणाले होते. मी संग्रामला तुमच्याकडे पाठवतो, त्याची थोडी समजूत काढा!''

''मावशी, समजूत काढायला माझा गैरसमज झालेलाच नव्हता. माँना आणि सुशिलामावशींना थोडा खटकला डॅडींचा निर्णय!''

''म्हणजे तुला डॅडींनी शेवंताच्या बाबतीत घेतलेला निर्णय पसंत आहे तर?''

''तो मला पसंत करावाच लागेल! डॅडींचा स्वभाव मला चांगला माहित आहे, त्यांच्यापुढे काहीही करू शकत नाही!''

''मग बरं झालं, तुला काय वाटत असेल याचीच त्यांना चिंता होती.''

''पण मावशी, माझी शेवंताच्या बाबतीत तुम्हाला एक विनंती आहे.''

''कोणती?''

''लग्नानंतर काही दिवस ती तुमच्याकडे रहावी!''

''घरी का नको?''

प्रकरण ताजं आहे तोवर त्याचं 'सेन्सेशन' असतं. एकदा त्यावर पडदा पडला की कुणाला त्यात काही वाटेनासं होतं!''

''हुषार आहेस हं! बेशक ती माझ्याकडे राहू दे! ती इथून गेल्यापासून मलाही एकटं एकटं वाटत होतं.''

''पण तेव्हा ती मंगूची मुलगी होती. आता ती मोऱ्यांची सून म्हणून इथं वावरेल!''

''काही हरकत नाही. पण सरलाताईंची तशी परवानगी आहे ना?''

''काल सुशिलामावशी आणि माँ रात्रभर चर्चाच करीत होत्या. लग्नानंतर काही दिवस तिने तुमच्याकडे रहावं असा दोघींचाही सूर आहे.''

''ठीक आहे. तुझे डॅडी काय म्हणतात हे प्रथम पहायला हवे!''

''ते नकोच म्हणणार.''

''का?''

''शेवंता मोऱ्यांची सून म्हणूनच घरी वावरायला हवी त्यांना. मोऱ्यांचे रीतीरिवाज, चालीरीती, त्यांची भाषा सर्व तिच्या अंगवळणी पडायला हवंय. एका अर्थी त्यांचंही बरोबर आहे. शेवंता इथं पूर्वी होती, ते ठीक होतं. पण लग्नानंतर तिनं इथं रहावं हे मलाही योग्य वाटत नाही.''

''जसं तुम्हा लोकांना योग्य वाटेल तसं करा. पण लग्नानंतर तिचं नाव शेवंता मात्र राहू नये!''

''काय करायचं त्या नावाचं!''

''मी विचार करून एक नाव ठरवलंय, यशोमती.''

''यशोमती? खरंच छान नाव आहे. मलाही तिला यशोमती म्हणायला आवडेल.''

पुढे पंधरा दिवसांनी विवाह झाला. झुंजाररावांनी वैदिक स्कूलमधले पुरोहित बोलावले. छत्रपतींनी तो पुरोगामी विवाह जुन्या वाड्याच्या भवानी मंडपात करण्याची सूचना केली. वैâ. छत्रपती शाहू महाराज आपल्या आश्रितांचे आंतरजातीय विवाह तेथेच करायचे. त्या जागेला फार मोठी परंपरा होती.

झुंजाररावांनी पुन्हा नातेवाईकाना पत्रे टाकली. पत्रिका छापल्या. पोलीस बँड ठरवला. त्यादिवशी उदगीरचा उभा धनगरवाडा लग्नाला आला होता. मंगूला ब्रिचेस आणि गॅबर्डीनचा कोट शिवण्यात आला. डोक्याला शिवशाही मुंडासं बांधलं गेलं.

झुंजारराव आपल्या खानदानी वेषात डोक्याला पगडी घालून अभ्यागतांचे स्वागत करीत होते. करवीर संस्थानातील पूर्वीचे सर्व जहागीरदार, मानकरी, सरदार हजर होतेच. पाहुण्यांच्या एक एक गाड्या यायला सुरुवात झाली. चोपदार भालदार, त्यांच्या पदव्यांचा उल्लेख करू लागले. देवास, धार ग्वाल्हेरचे माजी संस्थानिक तर आलेच पण त्याचबरोबर एक भगव्या रंगाची मेबा गाडीही आली. खुद्द छत्रपती वधू-वरांना आशीर्वाद द्यायला आले. आता कोणी महत्त्वाचे अतिथी येणार नाहीत असे वाटले. इतक्यात पांढरीशुभ्र ओपल गाडी येऊन थांबली. त्यातून इंदोरचे माजी अधिपती कल्याणसिंग होळकर उतरले. चोपदाराने ललकारी दिली, 'हिज हायनेस इंदोराधिपती महाराज कल्याणसिंग होळकर!' त्या मागोमाग तुतारी निनादली.

सर्वांच्या नजरा कल्याणसिंगांवर केंद्रित झाल्या. उपस्थितांचे अभिवादन स्वीकारीत कल्याणसिंग पुढच्या बाजूला करवीरचे छत्रपती बसले होते, तेथे आले. त्यांनी छत्रपतींना अदबीनं मुजरा केला. छत्रपतींनी त्यांना हाताला धरून आपल्या उजव्या बाजूला बसवले.

ते वातावरण पाहून कोणालाही मोऱ्यांच्या मुलाचे लग्न एका धनगराच्या मुलीबरोबर होते आहे असा विचारही आला नाही. छत्रपतींना विवाहाला येणंच भाग होतं. कारण मोरे छत्रपतींचे सरदार होते. पण इतक्या दुरून इंदोरचे महाराज त्या विवाहाला उपस्थित राहिल्याने त्या सोहळ्यास एक वेगळेच महत्त्व लाभले.

विवाहाची वेळ होताच पुरोहितानी वधूला पाचारण केले. मंगूचा मेव्हणा, शेवंताचा मामा वधूला हाताला धरून विवाहस्थळी घेऊन आला.

बऱ्याच कालावधीनंतर असा सोहळा भवानी मंडपात साजरा होत होता. इतक्यात वधू शेवंता, उर्फ यशोमतीचं तेथे आगमन झालं. त्या विवाह सोहळ्यास अनेक मुलीही हजर होत्या. झुंजाररावांच्या सूचनेनुसार कोणीही स्त्रिया पडद्यात नव्हत्या.

यशोमतीला मोत्याच्या मुंडवळ्या बांधल्या होत्या. त्या आडून तिचे जन्मजात सौंदर्य सर्वांना दिपवून टाकत होते. बेबी चंदा, यशोमतीची करवली झाली होती. तिच्या वर्गातल्या मैत्रिणीही नटूनथटून आल्या होत्या. पण यशोमतीचे सौंदर्य पाहून त्या मुलींना आपण उगाच मेकअप करण्यात वेळ वाया घालवला असे वाटू लागले. अक्षता संपल्या. पोलीस बँड वाजू लागला. त्याच क्षणी जुन्या राजवाडा चौकात धाड् धाड् अशा पाच तोफा उडाल्या.

छत्रपती आणि इंदोरचे महाराज यांनी वधुवरास शुभशीर्वाद दिले. वार्ताहर आणि फोटोग्राफरनी एकच गर्दी केली. लोकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. त्या विवाहाला काही काळ विरोध करणाऱ्या सरलाताई आणि सुशिलाताई याही सगळा विरोध विसरून गेल्या.

यशोमतीनं मोऱ्यांच्या जुन्या वाड्यात धान्याचं माप पायाने ओलांडून प्रवेश केला.

0-0

प्रकरण १०

दुसऱ्या दिवशीच्या महाराष्ट्रातल्या सर्व अग्रेसर वृत्तपत्रातून संग्राम यशोमतीच्या लग्नाची सचित्र बातमी प्रसिद्ध झाली. एका प्रमुख वृत्तपत्राच्या संपादकाने त्या विवाहावर चक्क अग्रलेख लिहून झुंजाररावांचे अभिनंदन केले. त्या अग्रलेखात लिहिले होते, 'छत्रपती शाहूंचा वारसा पुढे चालू ठेवणाऱ्या सरदार झुंजारराव मोऱ्यांचे अभिनंदन!' जे परिचित लग्नाला येऊ शकले नव्हते त्यांनी वृत्तपत्रातील बातमी वाचून झुंजाररावाचे तारा आणि पत्राद्वारे अभिनंदन केले.

या आंतरजातीय विवाहामुळे जग काय म्हणेल ही सरलाबाईंची आणि सुशिलाबाईंची भीती निराधार ठरली. त्यात बेळगाववरून चिमासाहेब भोसल्यांची झुंजाररावांचे अभिनंदन करणारी तार आली होती. नंतर त्यांचे सविस्तर पत्रही आले. झुंजाररावांनी ते बारकाईने वाचले. त्यात त्यांनी लिहिले होते.

'श्रीमंत झुंजारराव मोरे यांना बेळगांववरून चिमासाहेब भोसले यांचा मुजरा. आपल्या चिरंजीवांच्या विवाहाचे वृत्त समजले. त्या अगोदर आपण आमच्या कन्येशी ठरलेला विवाह इतक्या तातडीने का मोडलात याचे कारणही समजले होते. तुमच्या जागी मी असतो, तर तोच निर्णय घेतला असता. वधुवरांना माझे शुभशीर्वाद, चि. जयानेही यशोमतीला नमस्कार सांगितलेला आहे. चि. जयू सौ. यशोमतीला पहायला फार आतुरलेली आहे. माझे करवीरी काही कामानिमित्त येणे घडले तर चि. जयूलाही सोबत घेऊन येत आहे.

पुन्हा एकदा वधु-वरांना शुभाशीर्वाद.

आपला स्नेहांकित

चिमासाहेब भोसले.

झुंजाररावांना अभिनंदनपर इतकी पत्रे आली पण चिमासाहेबांचे पत्र येताच त्यांना अतिशय आनंद झाला. त्यांनी ते पत्र सरलाबाई आणि सुशिलाताईंना दाखवले. त्यावर सुशिलाबाई म्हणाल्या, "त्या जयाला लग्नाची वार्ता समजल्यावर काय वाटेल याचीच मला रुखरुख लागून राहिली होती. आता बरं वाटलं."

"पण त्यांना मी ठरलेलं लग्न का मोडतो आहे हे कुणाकडून तरी अगोदरच समजलं दिसतं आहे. असो! या लग्नामुळे कोणाचंही मन दुखावलं नाही हे महत्त्वाचं!"

लग्नानंतर शुक्रवारी गोंधळविधी पार पडला. गोंधळाच्या जेवणाला कोल्हापुरातील बरेच परिचित आले होते. पण उदगीरवरून मंगूच्या भावकीतलेही पन्नास साठ लोक आले होते. मंगू तर अद्याप भारावलेलाच होता. भवानी मंडपात साजरा झालेला तो शाही विवाहसोहळा एकसारखा त्याला आठवत होता. ते राजे महाराजे, ती चोपदाराची ललकारी, छत्रपतींचे आणि इंदोरच्या महाराजांचे आगमन हे सगळं तो वारंवार डोळ्यासमोर आणत होता. झुंजारराव विवाह झाल्यापासून मंगूला मंगेशराव म्हणत होते. मंगेशराव उदगीरकर असे त्यांनी त्याचे नामाभिधान करून टाकले.

यशोमतीनं पद्माबाईंच्या सहवासात वर्ष दोन वर्ष काढल्यामुळे तिला त्या उच्चभ्रू घराण्यातले रीतीरिवाज ठाऊक झाले होते. मुळातच ती सुंदर होती. त्यात ती विवाहामुळे अतिशय विनम्र आणि शालीन झाली. सरलाबाईंनी वधुवरांना वावरजत्रेसाठी जोतिबाला नेले. तिथं सगळा गुरववाडा यशोमतीला पहायला जमला.

लग्नाला पंधरवडा उलटला, घरचं वातावरण शांत झालं. झुंजारराव‍ांनी संग्रामला विचारलं, "मोरे सरकार, पुढं काय करायचं ठरवलंत?"

"शेती, दुसरं काय करणार?"

"मोटार धंद्याचं फॅड डोक्यातून गेलं ना?"

"तुम्ही नको म्हणता म्हणून काढून टाकलं. नाहीतर २-३ टाटा सुमो घेऊन ड्रायव्हर नेमून टॅक्सीचालकाचा व्यवसाय करायचं ठरवलं होतं."

"ते डोक्यातून काढून टाका. माझ्या सुदैवाने झुंजार ट्रान्स्पोर्टला जे ड्रायव्हर, क्लिनर मिळाले होते, तसले आता तुम्हाला मिळणार नाहीत. ड्रायव्हरच्या ताब्यात गाडी दिलीत की संपलंच! तो पैसे देण्या-घेण्यापासून गाडीतले 'फ्युअल' काढून घेण्यापर्यंत सर्व उद्योग करणार."

"मग दुसरं काय करावं, शेतीच ना?"

"तुमच्या बायकोला विचारून बघा."

"ती काय सांगणार?"

"काय सांगणार? तिच्या एवढी अक्कल तुम्हाला यायला निम्मं आयुष्य खर्ची पडेल! तिनं पहा, लग्न झाल्या झाल्या कॉलेजला नाव घालण्याचं ठरवलेलं आहे. मला त्या पोरीचा खरोखरच अभिमान वाटतो. तिला दहावीला किती टक्के मार्क मिळालेत कधी पाहिलंत का?"

"ठीक आहे. तुमचं प्रोत्साहन आहे तर तिला पुढं शिकू द्या. माझं काही एक म्हणणं नाही. पण शिकून ती पुढं काय करणार आहे?"

"तू माझी निराशा केलीस, मला स्वत:ला लॉ ग्रॅज्युएट व्हायचं होतं. तेही शक्य झालं नाही. यशोमतीला मी लॉ-ग्रॅज्युएट करणार आहे. पन्हाळा शाहूवाडी या भागात अद्याप एकही लेडी ॲडव्होकेट नाही!"

संग्रामच्या चेहऱ्यावर भाव होते ती कसली वकिली करणार? पण झुंजारराव‍ांच्या समोर त्याला काही बोलण्याचं धाडसच झालं नाही.

बेबी चंदाच्या सोबत जाऊन यशोमतीनं अर्धा डझन साड्या घेतल्या. मॅचिंग असे ब्लाऊजही शिवून घेतले. बेबी चंदा तिला पंजाबी ड्रेस घे म्हणत होती. पण यशोमती म्हणाली,

"बेबी, मोऱ्यांच्या खानदानीत मला आयुष्य कंठायचं आहे आणि तेही कोल्हापुरात! लग्नाच्या अगोदर तुमच्या आग्रहास्तव पंजाबी ड्रेस राजारामपुरीत वापरला. हं आता कधी यांच्यासोबत पुण्या-मुंबईला जायचा योग आला तर पहाता येईल!"

पुढे पंधरा दिवसांनी यशोमतीला कोरड्या वांत्या व्हायला सुरुवात झाली. सरलाबाईंची धावपळ उडाली. त्यांनी कोल्हापुरातल्या लेडी डॉक्टरला बोलावून घेतलं. त्या डॉक्टरबाईंनी यशोमतीला तपासलं आणि म्हणाल्या,

"काही एक चिंता करू नका! सारं काही व्यवस्थित आहे. प्रेग्नन्सी लॉगिंगचा काळ आहे. तिला काय खावंसं वाटतं ते विचारून घ्या!"

त्या रात्री सरलाबाईंनी तिला विचारलं, "तुला काय करावंसं वाटतं?"

एक दोन मिनिटं थांबून यशोमती म्हणाली,

"टप्पोरी करवंदं आणि जांभळं!"

"बरोबर आहे. डोंगरची मैना ना तू?"

त्यावर यशोमती दिलखुलास हसली.

"अगं पण आता सीझन आहे का करवंदांचा आणि जांभळांचा? दुसरं आणखीन काय खावंसं वाटतं ते सांग?"

"अननस!"

"हां. ते मात्र मिळू शकतील! अलीकडं कोल्हापुरात ट्रकने अननस येतात. पण यापूर्वी तू अननस कसलं असतं ते खाल्लंस का?"

"हो ऽऽऽ! लव्हाळ्याला भिकू पाटलानं एक दोन वाफे अननसं लावली होती. पण ती मोठी होण्या अगोदरच रानडुकरांनी फस्त केली. दहा पाच मात्र त्यांच्या तडाख्यातून वाचली होती. ती बाबानं आणली होती."

"ठीक आहे. उद्या आणवून घेते!"

सरलाबाई अगदी मनापासून यशोमतीचे लाड करीत होत्या. झुंजाररावांना ते सर्व दिसत होतं.

त्यादिवशी संध्याकाळी झुंजाररावांना पद्माबाईंचा फोन आला. त्या म्हणाल्या, "सरकार, तुमच्याकडं थोडं महत्त्वाचं काम आहे. कधी येता?"

"उद्या सकाळी ब्रेकफास्टलाच येतो. चालेल का?"

"जरूर या!"

रात्रभर झुंजारराव विचार करीत होते. एवढं मला फोन करून बोलावण्यासारखं पद्माचं काय अर्जंट काम असेल? पण त्यांना काही अंदाजच करता येईना. दुसऱ्या दिवशी सकाळी नऊच्या सुमारास ते पद्माबाईंच्या बंगल्यावर पोहचले.

गेल्या गेल्या त्यांनी दारात चढाव काढता काढता पद्माबाईंना विचारले,

"एवढं कसलं अर्जंट काम काढलंस माझ्याकडं?'

"अगोदर ब्रेकफास्ट तरी घ्या. मग निवांतपणे बोलू.'

ब्रेकफास्टला स्क्रंबल्ड एग्ज आणि टोस्ट तयार केले होते. किटलीत चहा होता. ट्रेमध्ये बिस्किटं होती. ती पाहून झुंजारराव म्हणाले,

"पद्मा, अलीकडं मी आहार थोडा कमी केलाय!'

"का?"

"झालं की आता चौपन्न संपली. साठी जवळ आली. या वयात माणसानं आपला आहार थोडा कमीच ठेवावा असं तज्ज्ञ सांगतात! शिवाय पूर्वीसारखा शरीराला व्यायामही नाही. पूर्वी शिकारीत दहा-दहा मैल चालणं व्हायचं! एरव्हीदेखील सकाळी रंकाळ्याचा एक राऊंड व्हायचा! माझ्यासोबत सरलाही यायची!"

चहा झाल्यावर कोचावर आरामात बसता बसता झुंजारराव म्हणाले,

"आता बोल तुझ्या कामाबद्दल!'

"काम असं आहे की माझ्या दूरच्या नात्यातली विमल मला परवा अचानक भेटली. ती गारगोटीला बी.एड. करते आहे! मला म्हणाली बसल्या बसल्या तुलाही ॲडमिशन मिळते का बघ!'"

"म्हणजे तू मास्तरीण होणार तर?"

"तसं नाही. माझाही वेळ चांगला जाईल. नोकरीसाठीच म्हणून मला बी.एड. व्हायचं नाही. लग्नानंतर पुढं काहीच करता आलं नाही. मलाच स्थैर्य नव्हतं. आता तुमच्या कृपेनं ते लाभलंय!"

झुंजारराव काहीसे गंभीर होऊन म्हणाले, "पद्मा ते बी.एड. वाले भरमसाठ डोनेशन घेतात असं मी ऐकलंय!"

"आपणही थोडंफार भरूच की!"

"पण त्या अगोदर एक दुसऱ्या मार्गाने प्रवेश मिळतो का पहावं!"

"कोणत्या?"

"तू आहेस मृत सैनिकाची पत्नी! डिस्ट्रिक्ट सोल्जर बोर्डाच्या अध्यक्षांचं पत्र मिळालं तर थोडक्यात देखील काम होईल!'

"पण हा सर्व व्याप करणार कोण?'

"मी आहेच की. इथल्या डिस्ट्रिक्ट सोल्जर बोर्डचे प्रेसिडेंट आहेत कर्नल पांडे, एकदा त्यांची माझी भेटही झाली होती. पण माणूस मात्र अगदी उमदा वाटला. उद्याच तुझा बायोडेटा घेऊन त्यांच्याकडे जाऊ! ते बी.एड. कॉलेज ज्या संस्थेचं आहे त्या संस्थेचे अध्यक्ष आहेत, रूपसिंग पवार! त्यांनाही मी ओळखतो. पण पद्मा, आजकाल शिक्षणसंस्था चालकांची फक्त ओळख असून भागत नाही. शिक्षणसंस्था म्हणजे राजकीय पुढाऱ्यांनी स्थानिक लोकांना पैसे खाण्याची सोयच करून ठेवलेली आहे. ही मंडळी जाहीररीत्या बोलतात समाजातल्या तळागाळातल्या लोकांना, स्त्रियांना शैक्षणिक सुविधा प्राप्त करून देणं हेच आमचं ध्येय. पण ही सगळी नाटकं असतात! तरी पण पवार हे रजपूत आहेत. छ. शाहू महाराजांनी राजस्थानातल्या काही घराण्यातल्या लोकांना इकडे नोकऱ्या दिल्या. त्यांना इथल्या मातीबद्दल प्रेम वाटावं म्हणून त्यांना सोनतळी कँपाभोवतालची दोनशे एकर जमीनही दिली होती. अजूनही तिथं या रजपूत लोकांची वस्ती आहे. ती रजपूतवाडी या नावानं ओळखली जाते."

"तुम्हाला या कोल्हापूर संस्थानचा पाच पन्नास वर्षांचा इतिहास पाठ आहे म्हणून बरं!"

"पण या वर्षांत जे जुने लोक आहेत तेच तेवढे आजकाल मला ओळखतात! असो. पण पद्मा तू खरोखरच बी.एड. होऊन पुढे काय करणार आहेस?"

"माणसानं फार पुढचं पाहू नये! प्रथम माझं बी.एड. होण्याचं ध्येय आहे!"

"एक गोष्ट तू विसरतेस, बी.एड.ला ॲडमिशन घेणारी मुलं-मुली असतात वीस बावीस, फार तर पंचविशीतली. तू आता अडतीस वर्षांची आहेस. त्या क्लासमध्ये बसायला तुला ऑकवर्ड नाही वाटणार?"

"प्रथम थोडे दिवस वाटेल. पण एकदा सवय झाली की काही वाटणार नाही! शिवाय शिक्षण घ्यायला लाजायचं कारण काय? तसं पाहिलं तर ज्ञानप्राप्तीच्या मार्गावरून वाटचाल करताना कमीपणा कसला आलाय? लग्न झाल्यावर तुम्ही नाही यशोमतीला पुढं शिकवण्याचा निर्णय घेतलात?"

"बरोबर बोललीस पद्मा, पण समज तुला ॲडमिशन मिळाली तर गारगोटीला जाऊन रहावं लागेल!"

"इथं रहायचं ते तिथं! उलट नवीन वातावरणात, नवीन मुलींच्या ओळखी होतील. अभ्यासात वर्ष दीड वर्ष कसं सरेल तेही कळणार नाही!"

काही क्षण विचार करून झुंजारराव म्हणाले, "पण मला तुझ्या सहवासाला मुकावं लागेल. आंबवड्याला शेतावर गेल्यानंतर तुझी आठवण येत राहील. तुझी ओळख झाल्यापासून माझ्यात बरंच स्थित्यंतर झालंय असं परिचित लोक म्हणतात!"

पद्माबाई किंचित् स्मित करून म्हणाल्या, "हो, मलाही ते दिसतंय. तुमचं ते शेत, दोन खोल्यांचं साधं फार्म हाऊस, सभोवार तुम्ही केलेली बागायत शेती. यात माझं देखील मन रमत

होतं. तुमच्या मोटारहोम मधून जवळपासच्या केलेल्या ट्रिप्स, मला कधीही विसरता येणार नाहीत. शिवरामांच्या अकाली आणि अपघाती मृत्यूचं दु:ख केवळ तुमचा सहवास लाभला म्हणून मी थोडीफार विसरले.''

''तुला या वयात परक्या गावी जाऊन रहावंसं वाटण्याला दुसरं काही कारण तर नाही ना?''

''दुसरं काय कारण असणार आहे?''

''संग्रामच्या लग्नामुळं सरला आणि सुशिलेनं तुला दोष दिला होता. त्यामुळं तर तू दुखावली नाहीस ना?''

''अगदी अचूक असं विधान केलंत. खरोखर त्या दोघी या लग्नाच्या प्रकरणावरून माझ्यापासून काहीशा दुरावल्या आहेत असं मला एक सारखं वाटतंय!''

''अगं पण आताशी त्या दोघी यशोमतीचं किती कोडकौतुक करतात ते पाहशील तर थक्क होशील!''

''संग्राम बोलला मला! पण मलाच वाटतं की मी काही काळ तरी तुम्हा सर्वांपासून दूर रहावं.''

''अगं, पण मी काय केलंय?''

''तुम्ही काहीही केलेलं नाही. उलट तुमची भेट झाली नसती तर माझं काय झालं असतं याची मी कल्पनाच करू शकत नाही! माझ्यावर तुमच्या उपकाराचं डोंगराइतकं ओझं झालं आहे!''

''पद्मा, बस्स झाली ही उपकाराची भाषा! तुला बी.एड. होण्यासाठी गारगोटीला रहायला माझी काहीएक हरकत नाही. उलट तुला तिथल्या शिक्षणसंस्थेत ॲडमिशन मिळावी यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे.''

बोलता बोलता पद्माबाईंचे डोळे भरून आले. त्या काहीशा भावनाप्रधान झाल्या आणि म्हणाल्या, ''तसं बघितलं तर मी सरलाबाईंना आणि सुशिलाबाईंनाही दोष देणार नाही. यशोमतीला मला सोबत म्हणून वर्ष दीड वर्ष माझ्या घरी ठेवून घेतलं होतं. संग्राम माझ्याकडं यायचे आणि यशोमतीशी बोलत बसायचे. पण त्या दोघांची मजल इथंपर्यंत जाईल असं मला कधीही वाटलं नव्हतं. जसं संग्राम बेबी चंदाशी बोलायचे तसेच ते यशोमतीशीही मोकळेपणानं थट्टामस्करी करतात असं मला वाटे.''

''पद्मा त्या दोघांचं वय काय होतं? त्यात यशोमती तुझ्याकडं रहायला आल्यापासून किती झपाट्यानं बदलली होती हे तू पहात होतीस ना?''

''पण त्या दोघात इतकी जवळीक निर्माण होईल अशी मी कल्पनाच कधी करू शकले नाही. कदाचित आर्मीतल्या वातावरणाचा तो परिणाम असावा!''

''बरं, आता तू तो विषय डोक्यातून काढून टाक! संग्राम आणि यशोमती हे दोघे विवाहानं एकमेकाशी बांधले गेले आहेत. मला आता एकच चिंता आहे. संग्रामनं काहीतरी कामधंदा करावा. तो शेती करणार म्हणतो पण शेतीसाठी सुद्धा चिकाटी लागते. तिथं आंबवड्याला जाऊन रहावं लागेल. यशोमतीनं देखील तिथं जाऊन रहायची तयारी दाखवली होती. पण अद्याप तिचं शिक्षण पूर्ण झालेलं नाही. ती ग्रॅज्युएट नक्कीच होईल, पण पुढे तिचं नाव 'लॉ' कॉलेजला घालायचा मानस आहे माझा!''

''तिच्या आयुष्याचं तुम्ही सोनं कराल याची खात्री आहे मला!''

''तिच्या आयुष्याचं सोनं करणारा मी कोण? मी फक्त तिला वाट दाखवणारा! जिद्दीनं ती शिकली तर उद्या स्वत:च्या पायावर उभी राहील! पण मला आज खरी चिंता आहे ती

संग्रामची! लग्नापासून एक गोष्ट मात्र चांगली घडली. साखर कारखानदारांची उडाणटप्पू पोरं घरी यायची बंद झाली. जे काम मी करू शकलो नाही ते यशोमतीनं करून दाखवलं!''

''तिनं काय केलं?''

''तिनं संग्रामला समजावून सांगितलं की या पोरांच्या नादानं तुम्ही स्वत:चं वाटोळं करून घ्याल! उदगीरसारख्या आडवळणी खेड्यात लहानाची मोठी झालेल्या यशोमतीला जे व्यवहारज्ञान आहे, ते थक्क करणारं आहे! सरला आणि सुशिला देखील आजकाल तिच्याच तंत्रानं वागतात! परवा काय झालं, बायका बायकात बेबी चंदाचा विषय निघाला. सुशिला म्हणाली बेबी मैत्रिणींच्या घोळक्यात जितकी रमते तितकी माझ्या आणि सरलाच्या सहवासात कधी रमली नाही!''

त्यावर मी म्हणालो, ''अहो ती समवयस्क मुलींच्यातच रमणार, तुमच्यासारख्या म्हाताऱ्या बायकांच्या सहवासात कशी काय रमणार?''

त्यावर सुशिला म्हणाली, ''आम्ही म्हाताऱ्या आहोत कां?''

मी स्वत:ला सावरून घेत म्हणाले, ''सुशिला, मी तुम्हा दोघींचा अपमान करावा या हेतूनं नाही बोललो. पण बेबीसारखी तरुण मुलगी समवयस्कांच्यातच रमणार ना? तुम्ही दोघी तिच्यापेक्षा वयानं मोठ्या नाहीत का?''

''ठीक आहे. पण आम्हाला हवं तर प्रौढ म्हणा की? का चक्क म्हाताऱ्या?'

मी म्हणालो, ''आय एम सॉरी, सुशिला! मी म्हणालो तरी तुम्ही काय लागलीच म्हाताऱ्या झालात!''

ती चर्चा थांबवण्याच्या हेतूनं मी म्हणालो 'आपण यशोमतीचं मत घेऊ!' मी यशोमतीला खाली बोलावलं. ती मला म्हणाली.

''काय डॅडी? मला का बोलावलंत?''

''तूच आता निकाल दे. या दोघींचा बेबी चंदांवर आक्षेप आहे की ती मैत्रिणींच्यात अधिक रमते, आपल्याशी ती काहीशी 'रिझर्व्हड' वागते!''

यशोमती काहीशी गंभीर होऊन म्हणाली, ''बेबी चंदाच्या मैत्रिणी समवयस्क आहेत. तिला त्यांचा सहवासच हवाहवासा वाटणार. पण त्यातली एक मैत्रीण मात्र मला आवडत नाही!''

''कोणती?'' सुशिलाबाईनी विचारलं

''ती सोनाली!''

''का ती काय करते? नटते मुरडते?''

''ते तिचं वयच आहे मावशी, पण ती एकदा बोलता बोलता मला काय म्हणाली ''आपल हे जे वय आहे ते मजा करायचं आहे! एकदा आपली लग्नं झाली अन् संसार मागे लागला की त्यातून मरेपर्यंत सुटका नाही!''

बेबीची दुसरी मैत्रीण सुवर्णा तिथं होती ती म्हणाली, ''मजा म्हणजे काय?'' तर त्यावेळी सोनालीनं आपल्या पर्समधल्या मालाडीच्या गोळ्या काढून दाखवल्या.''

सरलेला त्या गोळ्या कशाच्या आहेत ते ठाऊक नव्हतं. मी समोरच होतो मी म्हणालो,

''अगं सरला, त्या गर्भनिरोधक गोळ्या असतात.''

''अरे बापरे!'' सुशिलेनं तोंडावर हात नेत म्हटलं.

''त्या पोरीची संगत बेबीला सोडायलाच हवी! मला तर वाटत जिजाजी, बेबीलासुद्धा एखादं मध्यमवर्गातला मिळवता मुलगा बघून तिचं लग्न करून टाकावं. तिचा बाप या बाबतीत काहीच करणार नाही! आता सात वर्षे होत आली, माझी मुलगी कशी आहे याची साधी

चौकशीसुद्धा त्यांनी केली नाही!'

मी म्हणालो, "सुशिला, एक दोन वेळा मला तो भेटला तेव्हा तोंड फिरवून गेला. त्याच्याकडून तुम्ही दरमहा पोटगी घेता म्हणून असेल कदाचित!"

सुशिला म्हणाली, "जिजाजी, तो काय मेहेरबानी म्हणून पोटगी देतो की काय? चक्क हायकोर्टापर्यंत मला झगडावं लागलं!"

"असो आपण बेबी चंदाच्या लग्नाच्या दृष्टीनं काहीतरी हालचाली करू!"

त्यावर सरला म्हणाली, "बेबी चंदा भोळसट आहे. योग्य वयातच तिचं लग्न होणं हिताचं आहे."

बेबीनं मात्र त्या दिवसापासून सोनालीची संगत सोडून दिली.

0-0

प्रकरण ११

यशोमतीला डोहाळे लागल्याचं जेव्हा मंगूला समजलं तेव्हा कधी एकदा तिला पहायला जातो असं त्याला झालं. तिला करवंदं आणि जांभळं खावीशी वाटतात हेही त्याला समजलं. पहायला जाताना तिला खावीशी वाटणारी करवंदं आणि जांभळं कुठून मिळणार? तो मोसम करवंदं आणि जांभळांचा नव्हता. पण त्याचे काही वृध्द जातभाई अतिशय अनुभवी होते. गैरमोसमी फळे लागणाऱ्या करवंदाच्या जाळ्या कोणत्या मुलुखात असतात त्याचा त्याला सुगावा लागला. मंगू गगनबावड्यालगतच्या करूळ घाटात गेला. महत्प्रयासाने त्याला करवंदाच्या जाळ्या दिसल्या. त्या सोबत जांभळं काही त्याला दिसली नाहीत. करवंदं तरी घेऊन जावी म्हणून त्यानं पिशवीभर करवंदं कोल्हापूरला आणली.

सरलाबाईंना त्यानं आणलेली करवंदं पहाताच आनंद झाला. तो म्हणाला, "तिकडं करूळ घाटात जाळ्या घावल्या, पर वैनीसाब जांभळं मातोर घावली न्हाईत."

"अरे, तुला आश्चर्य वाटेल. काल सावंतवाडीवरून त्यांचा एक जुना शिकारी मित्र आला होता. तो म्हणाला, "माझ्या परड्यातल्या जांभळाला वर्षातून दोन वेळा मोहोर येतो. मला कल्पना असती तर मी बघून बघून आणली असती. चला निदान तुला करवंदं तरी मिळाली."

"पर शेवंता हाय कुठं?"

"तिला आता डोहाळंजेवणाची निमंत्रण येत आहेत. आज सुशिलेकडं जायचं आहे जेवायला. गाडी पाठवायला सांगितलंय. एवढ्यात गाडी येईलच. आपण सारेच मिळून जाऊ!"

मंगूला कधी एकदा लेकीला बघीन असं झालं होतं. लग्नानंतर तो फारसा कोल्हापूरला येतच नव्हता.

मंगूनं पूर्वीचा वेष टाकून दिला होता. खाकी गॅबर्डीनचा कोट, स्वच्छ धोतर आणि कोल्हापुरी पायताण असा त्याचा पेहराव झाला होता. पूर्वी तो अंगात एक मांजरपाटाची छाटी आणि खाली जुनी खाकी पँट घालायचा. पण मोरे सरकारांनी त्याला सक्त ताकीद दिली होती. कोल्हापूरला यायचं तर मी दिलेला कोट, धोतर, पायात चप्पल हेच हवं!

एकदा झुंजारराव म्हणाले, "अरे तू अंगात तो मांजरपाटाचा बदाम आणि कमरेला लंगोट, खांद्यावर घोंगडं टाकून यायचास. पण लक्षात ठेव आता तू झुंजारराव मोऱ्यांचा व्याही आहेस. माझ्या इभ्रतीला शोभेल असे तू कपडे वापरायला हवेस!"

त्यावर मंगू म्हणाला, "पर सरकार तुमी दिल्याली कापडं घातली ती अंगाला बांधल्यागतीनं हुतंया!"

त्यावर झुंजारराव हसून म्हणाले होते, "तिकडं उदगीरला गेल्यावर तू तुझा तो जाडाभरडा बदाम (बनियन) आणि लंगोट लावून खुशाल फीर. तिथं तुला कोण विचारणार आहे? पर इकडं आलास की येणाऱ्या जाणाऱ्यांना मला तुझी ओळख करून द्यावी लागेल. म्हणूनच मी तुला त्यांच्यासमोर मंगेशराव म्हणतो!"

मंगू म्हणाला, "माज्या बापजन्मी कदी असं घडंल असं वाटलं नव्हतं."

"अरे ही नियतीची किमया आहे. तिची कुणालाही पूर्वसूचना मिळत नसते. तुला गम्मत सांगतो. इथल्या पाठकशास्त्र्यानं संग्राम जन्मला तेव्हा त्याची जन्म लग्न कुंडली तयार केली होती. त्यात संग्राम राजघराण्यातल्या मुलीशी विवाहयोग आहेत असं लिहून ठेवलंय! पण प्रत्यक्षात काय घडलं सांग?"

"सरकार त्या शास्त्र्याला कुनासंगं धाकट्या सरकारांचं लगीन झालं ते समाजलं कां?"

"अरे मी स्वत: त्याला संग्राम-यशोमतीची पत्रिका घरी नेऊन दिली आणि म्हणालो, "शास्त्रीबुवा तुमच पंचांग आता गुंडाळून माळ्यावर टाकून द्या!"

"मग काय म्हनलं?"

"म्हणतो काय? मला म्हणतो मंगू धनगरचा पूर्वजन्मी राजघराण्याशी संबंध असावा!"

"आसं आस्तं कदी सरकार?"

"खुळा का वेडा तू? मंगू, कोणा लेकाच्याला आपण पूर्वजन्मी कोण होतो हे कळतं तरी का? सगळं भंकस आहे रे! देवदिकांना देखील नियती कधी समजली नाही आणि समजणारही नाही. आता पूर्वजन्मावर विश्वास ठेवायचा तर त्याला सायन्सचा म्हणजे शास्त्रीय असा पुरावा आहे का? मी पूर्वजन्म, आत्मा वगैरे बिनबुडाच्या कल्पनांवर कधीच विश्वास ठेवणार नाही. आपल्याला लाभलेला हा माणूस जन्मच खरा. आपले आई बाप हेच खरे. बाकी सतराशे साठ देवबीव सगळे झूट!"

झुंजारराव बोलू लागले की मंगू आचंबित होऊन ऐकत राही. पुन्हा त्यानं कधी तो विषय त्यांच्यासमोर काढलाच नाही.

आज सरलाबाई त्याला सुशिलेच्या घरी जेवायला घेऊन गेल्या. जाताना गाडीत सरलाबाईंनी त्याला बजावलं "तिला एकसारखं शेवंता शेवंता असं म्हणू नका आता. आम्ही तिचं नाव यशोमती ठेवलंय. तिला त्या नावानंच बोलवत जा! शेवंता हे नाव खेड्यात बरं, इथं ते तिला शोभत नाही!"

सुशिलाबाईंच्या घरातून जेवणाचा वास येत होता. बेबी चंदाची घाई उडाली होती. तिनं सोनाली सोडून इतर मैत्रिणींनाही जेवायला निमंत्रण दिलं होतं. सकाळी महाद्वार रोडवरून जाईजुईचा भला मोठा गजरा यशोमतीसाठी आणून ठेवला होता. हिरव्या रंगाच्या रेशमी साडी चोळीत, यशोमतीची गौरवर्णी कांती गर्भारपणामुळं अतिशय आकर्षक दिसत होती. ती डोक्यावरचा पदर खाली पडू देत नव्हती. तिच्या राजकन्येसारख्या रूपाकडं पाहताना ही कधीकाळी उदगीरसारख्या आडवळणी खेड्यात एका मेंढपाळाच्या पोटी जन्मली आहे हे सांगूनही कोणाला पटलं नसतं!

गाडीतून जाता जाता सरलाबाई तिला म्हणाल्या, "तुझ्या बापानं कोकणातले सगळे डोंगर पालथे घालून तुला खावीशी वाटणारी करवंदं आणली!"

यशोमती म्हणाली, "मां, मी खरंच भाग्यवान म्हणून गैरमोसमी अशी मला करंवदं मिळाली. जांभळंही मिळाली असती तर बरं झालं असतं!"

"तीही मिळतील परवा सावंतवाडीवरून त्यांचा एक जुना शिकारी मित्र आला होता. तो म्हणाला, पुढच्या आठवड्यात जांभळं घेऊन येतो!"

"पण तुला बजावते ही दोन्ही फळं जरा बेतानंच खा! करवंदं जास्त खाल्ल्यानं पोट बिघडतं, तर जांभळं जास्त खाल्ल्यानं पित्त वाढतं! मी माझ्या हातानं देत जाईन तेवढीच खायची!"

सरलाबाई, सुशिलाबाईंना अलीकडं एक फार मोठी रुखरुख लागून राहिली होती. या यशोमतीच्या प्रकरणात आपण दोघींनी निष्कारण पद्माबाईंबद्दल गैरसमज करून घेतला असं त्यांना वारंवार वाटे.

सुशिलाबाई म्हणाल्या, "आपण आज गाडी पाठवून पद्माला इकडं जेवायला बोलावून घेऊ!"

ड्रायव्हर गाडी घेऊन गेला. पण पद्माबाई आल्या नाहीत. तो म्हणाला, "घराला कुलूप आहे!"

झुंजाररावांना फोन केला. पण ते गंगावेशीतल्या जुन्या वाड्यातही नव्हते. मोटार होम घेऊन ते सकाळीच पद्माबाईंसमवेत गारगोटीला रवाना झाले होते.

त्या दोघींना समजेना, घराला कुलूप लावून पद्मा कोठे गेली. सरकारही गारगोटीला गेले म्हटल्यावर त्या दोघींना कळेना. आपल्याला काहीच कल्पना न देता ती दोघे गारगोटीला का गेली?

त्या दिवशी त्यांनी त्या बाबतीत अधिक चौकशी केली नाही. यशोमती बेबी चंदाच्या आणि तिच्या मैत्रिणींच्या वयाची. पण लग्नापासून तिच्यात अकाली प्रौढपणा आला होता. ती बाहेर व्हरांड्यात बसलेल्या मंगूकडं आली. तिनं विचारलं, "गावाकडं सगळं बरं आहे ना?"

"समदं ठीक हाय, मला मातोर मधनं मधनं तुझी लई सय येती!"

"तशी काय मी परमुलुखात आहे काय? केव्हाही माझी आठवण आली तर येत जा! गाई, गुरं कशी आहेत?"

"हायेत बरीच म्हनायची! आदनं मदनं एकादं वागरू येतंया, गावातलं एकादं पाडस तोडतंया!"

"फॉरेस्ट खातं काही करत नाही?

"ते काय करणार? फकस्त पैसा खातं! माज्या संगं उगीचच वैऱ्यासारकं वागत्यात!"

"तू काही चिंता करू नको. डॅडी आज इथं नाहीत. ते आल्यावर मीच त्यांना सांगते."

अभयारण्याच्या नावाखाली गरुरेडे बिबळे त्या भागात येऊन राजरोज हैदोस घालीत. गावकऱ्यांनी तक्रार अर्ज दाखल केले तर त्याची दखल घेत नसत.

त्या भागातल्या लोकाना जगणं देखील मुष्कील करून ठेवलं होतं. मग गावकऱ्यांनी निराळीच युक्ती केली. वाघानं एखादी गाय वासरू मारली की तो ते सगळे जनावर खावून टाकत नसे. मारलेल्या जागेवरून ओढत जंगलात नेऊन दाट झुडुपात दडवून ठेवत असे. दुसऱ्या दिवशी सावधपणे तिथं येऊन ते जनावर खात असे. गावकऱ्यांना ते मारलेलं जनावर कोणत्या दिशेला नेलेलं आहे ते मागावरून समजत असे. त्या वाघाने दुसऱ्या दिवशी ते मारलेले खाण्याअगोदर त्याच्यावर 'एन्ड्रीन' किंवा तत्सम विष पसरून ठेवत. वाघाने ते मांस खाल्ले की तोही तडफडून पाय वर करून मरत असे. पण फॉरेस्ट खात्याच्या निदर्शनाला असा प्रकार आला की ते लागलीच ती गाय किंवा मेंढरू कोणाचं याचा तपास करून त्याच्या मालकावर केस दाखल करीत. तशी केस कधी मंगूवर दाखल झालेली नव्हती. पण तरीही हा मंगूच इतर धनगरांना चिथावणी देतो असा त्यांचा संशय होता. म्हणून ते मंगूशी बाकून वागत.

झुंजाररावाच्या मुलाशी मंगूच्या मुलीचं लग्न झाल्याची वार्ता उभ्या महाराष्ट्रभर गाजली होती. त्यामुळं मंगूला त्रास देण्याचं धाडस कुठल्याही फॉरेस्टरला उघडपणे होत नव्हतं!

त्यादिवशी सुशिलाबाईंच्यात जेवणाचा बेत होता. मंगूचं ताट बाहेर व्हरांड्यात वाढून दिलं. आत बेबीच्या मैत्रिणींचा कलकलाट सुरू होता. सुशिलाबाई आणि सरलाबाई पोरींना जेवायचा आग्रह करीत होत्या. यशोमती शांतपणे सर्व ऐकून घेत होती.

दोन वाजले. मुलींना आणि यशोमतीला वाढण्यात आलं. यशोमतीला चांदीच्या ताटात वाढलं होतं. इतर मुलींना साध्या स्टेनलेसच्या ताटात वाढण्यात आलं. बाहेर जेवलेला मंगू हात धुवून आला. त्यानं सहज दारातून डोकावून पाहिलं. पाटावर बसलेली यशोमती चांदीच्या ताटातले जेवत होती. मंगूला काय बोलावं हे सुचेना. तो हळूच दार बंद करून बाहेर व्हरांड्यात येऊन बसला.

सगळ्यांची जेवणं आवरायला तीन वाजले. बेबीच्या मैत्रिणी गेल्यानंतर सरलाबाई म्हणाल्या,

"यशोमती, निघायचं का आता?"

"आपला ड्रायव्हर जेवला कां?" यशोमतीनं विचारलं.

"हो त्याला मंगूबरोबरच वाढलं होतं."

यशोमती लग्नाअगोदर दीड दोन वर्ष पद्माबाईंच्या सहवासात होती. त्यांचं वागणं, बोलणं, पुरुषांशी किंवा वडिलधाऱ्यांशी बोलताना त्यांची राखायची अदब तिनं आत्मसात केली होती. त्या जेवणाला पद्माबाई नाहीत याची तिलाही रुखरुख लागून राहिली.

सरलाबाईंनी संग्रामला त्या दिवशी मुद्दामच सोबत आणलं नव्हतं. तो चुळबुळ करीत होता. पण सरलाबाई त्याला म्हणाल्या, "हा बायकांचा कार्यक्रम आहे. त्यात बेबीच्या मैत्रिणी तिथं येणार आहेत. तुझी तिथं लुडबूड कशाला? तू हवं तर जा शेतावर! मॉरीस गाडी आम्हाला लागेल."

संग्राम एस.टी. नं आंबवड्याला गेला.

इकडं गारगोटीला आल्यावर झुंजारराव संस्थेच्या अध्यक्षांना भेटले. त्या अगोदर पद्माबाईंच्या संदर्भात त्यांनी पत्रव्यवहार केलेलाच होता. झुंजारराव ऑफिसात जाताच अध्यक्ष खुर्चीतून उठले. पद्माबाई बाजूच्या खुर्चीवर बसल्या. ऑफिसात महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छ. शाहू महाराज यांच्या फोटोंच्या बाजूला आणखीन एक दाढीवाल्या गृहस्थांचा फोटो होता. तो झुंजाररावांना ओळखता आला नाही. त्यांनी अध्यक्षांना विचारलं,

"हा फोटो कोणाचा?"

"तुम्हाला ठाऊक नाही? हा आहे धोंडो केशव कर्व्यांचा. यांनीच पुण्यात स्त्रियांच्या शिक्षणासाठी हिंगण्याची संस्था स्थापन केली होती. त्यावेळी पुण्यातून त्यांना प्रतिगामींचा फार विरोध झाला होता!"

"मला सावित्रीबाई फुल्यांची हकिकत ठाऊक आहे. त्या मुलींना शिकवायला जात तेव्हा जुन्या विचारांच्या लोकांनी त्यांच्या अंगावर शेण आणि दगड मारायलाही कमी केलं नाही. खऱ्या अर्थानं आपल्या देशात स्त्री शिक्षणाचा पाया महात्मा फुल्यांनीच रचला. आमच्या शाहू महाराजांनासुद्धा स्त्रिया सुशिक्षित व्हायला हव्यात असं वाटत होतं."

"तर सरकार आम्ही जी ही संस्था सुरू केली आहे, स्त्रियांच्या शिक्षणाला प्राधान्य द्यायचे या आद्य हेतूने. आता काही गोरगरिबांची मुलंही माझ्या शिक्षणसंस्थेत शिकतात."

सरकार म्हणाले, "या पद्माबाई सावंत! विधवा आहेत. शिवराम सावंत मिलिट्रीत होते. पण दुर्दैवाने जम्मू-श्रीनगर रस्त्यावर झालेल्या जीपच्या अपघात ते अकाली गेले. थोडी फार शेती मिळाली यांना सावंतांची,पण त्यांना कसता येणं शक्य नव्हतं. म्हणून दिरांनाच ती विकून टाकली."

झुंजाररावांनी ती शेती मिळवण्याच्या कामात आपण प्रयत्न केले त्याचा ओझरताही उल्लेख केला नाही.

"आता राजारामपुरीत छोटं चार खोल्याचं घर बांधलंय त्यांनी, शिवरामांची थोडी पेन्शनही मिळते. तसा त्यावर यांचा चरितार्थ चालू शकेलही. पण यांनाच बी.एड. व्हायची इच्छा निर्माण झाली. म्हणून तुमच्याकडं घेऊन आलो."

"चांगलं केलंत सरकार, पण या संस्थेत काही थोडं फार डोनेशन स्वीकारण्याची प्रथा आहे. सरकारी जे अनुदान मिळतं ते अतिशय तोकडं आहे. त्यात प्राध्यापकांचे पगार भयंकर वाढवून ठेवलेत सरकारनं! नाईलाजास्तव आम्हाला डोनेशन घ्यावं लागतं!"

"तुमची अडचण बरोबर आहे. पण एका सैनिकाची विधवा पत्नी म्हणून तुम्हाला काही कन्सेशन देता आलं तर पहा!"

अध्यक्ष काहीक्षण विचार करून म्हणाले, "पण या सैनिकाची पत्नी आहेत असा एखादा दाखला मिळाला तर बरे होईल."

झुंजाररावांनी डिस्ट्रिक्ट सोल्जर बोर्डाच्या अध्यक्षाकडनं घेतलेला तो दाखला त्यांना दिला. त्यावर अध्यक्ष काही क्षण विचार करून म्हणाले, "सरकार, कधीही न येणारे तुम्ही आज आमच्या संस्थेत आलात. आम्ही तुमच्या पुरोगामी विचाराने भारावून गेलो होतो. तुमच्या चिरंजीवांच्या विवाहाची हकिगत ऐकून तुमच्या शब्दाचा मान आम्हाला राखायला हवा. आजच संचालक मंडळाची मीटिंग बोलावतो. त्या सर्वांची सम्मती घेतल्याशिवाय मला अंतिम निर्णय घेता येत नाही."

"ठीक आहे. आम्ही एक दिवस थांबतो गारगोटीत! तसे हे गाव मला पऱ्हकं नाही. इथले माजी आमदार आनंदराव देसाई हे माझ्या परिचयाचे आहेत!"

"सरकार, उभा महाराष्ट्र तुम्हाला ओळखतो. आपल्या जिल्ह्यातले एकूण एक लोक आपल्याला पूर्वीपासूनच ओळखतात. तुम्ही मागे चालवलेली झुंजार मोटार ट्रान्सोर्ट, त्यानंतर जिल्ह्यातल्या काही कोकण भागात धुमाकूळ घालणारे नरभक्षकं बिबळे वाघ तुम्ही मारल्याचे आम्हाला ठाऊक आहे."

किंचित हसून झुंजारराव म्हणाले, "पण आताशी कोणत्याही प्राण्याची शिकार करायची नाही, असा फतवा सरकारने काढला आहे. त्यामुळे गरीब शेतकऱ्यांचे अतोनात हाल होताहेत. रानडुक्करे, गवू रेडे, नाचणी, नावली पासून भात, ऊस या पिकांचा नायनाट करत आहेत. फॉरेस्ट खाते असून नसल्यासारखे आहे. उद्या कर्नाटक आणि कारवार भागातून हत्तींचेही कळप आपल्या भागात येतील. शासन दाजीपूरच्या जंगलात अभयारण्याची योजना राबवते आहे ना ती देशाला घातक ठरणार आहे. माणसं मरू द्यात, पण जंगली जनावरांना संरक्षण मिळायला हवे म्हणतात. आजकालचे हे जे राज्यकर्ते आहेत ना त्यांची अन् व्यवहारज्ञानाची फारकत झालेली आहे. फार काळ हे चालणार नाही. लोक या जंगली जनावरांच्या वाढत्या उपद्रवाला कंटाळून एक ना एक दिवस कायदा हातात घेतील झालं!"

"पण अभयारण्य तर पाहिजे म्हणतात."

"म्हणू देत ना, पण ते ठरावीक कुंपणात असावे, त्या भोवताली खड्डे खणावेत. आतल्या आत त्या जनावरांना जगू द्या की?"

सरकार आले होते पद्माबार्इंच्या बी.एड.च्या ॲडमिशनसाठी पण ओघाओघानं जंगली प्राणी आणि शिकार यांचा विषय निघाला की ते तल्लीन होऊन जात.

त्या दिवशी झुंजारराव गारगोटीच्या शासकीय विश्रामगृहावर थांबले. ते राहणार असल्याची बातमी कळताच भुदरगड तालुक्यातले अनेक परिचित त्यांना भेटायला आहे. त्यातल्या एक दोघांनी तर कमालच केली. ते सरकारना म्हणाले,

"खरं म्हणजे आता तुम्ही राजकारणांत उतरायला पाहिजे!"

"मी आणि राजकारणात? अशक्य आ हे. आय हेट इट! या देशातली शंभर टक्के जनता सुशिक्षित झाल्याशिवाय देशातली राजकीय स्थिती सुधारणा नाही. आज जो उठतो तो साखर, नाहीतर सूत कारखाना काढतो, सरकारकडून अनुदान उकळतो. त्यात आपले मार्जिन ठरवून घेतो. कारखान्याला ऊस मिळो नाहीतर टाळे लागो, त्यांना त्याची फिकीर नसते. काही राजकीय क्षेत्रातले लोक अट्टल गुन्हेगार आहेत. मी जर राजकारणात उतरेन तर प्रथम या बदमाषांच्यावर तुटून पडेन. म्हणून त्यांनाही मी राजकारणात यायला नको आहे. चला जाऊ द्या तो विषय. तुमचं बरं चाललंय नां? आनंदरावांचा मुलगाही सध्या आमदार झाल्याचं ऐकतो!"

"हो, काही नव्या पिढीतले लोक ध्येयवादी आणि निस्वार्थी कार्यकर्ते आहेत!"

त्या दिवशी शासकीय विश्रामगृहाच्या कुकला झुंजाररावांनी संध्याकाळी कोंबडी करण्याची ऑर्डर दिली.

पद्माबाईंना झुंजाररावांची राजकीय मतं ठाऊक नव्हती. ती पद्माबाईंसमोर व्यक्त करण्याचा प्रसंगच निर्माण झालेला नव्हता.

त्या संध्याकाळी झुंजाररावांनी घरी सरलाबाईंना फोन केला.

"हॅलो सरला, मी इथे गारगोटीला आलो आहे. पद्माच्या बी.एड.च्या संदर्भात मला यावं लागलं. पण अध्यक्ष म्हणाले, "उद्या निर्णय सांगतो." मग विचार केला पुन्हा यावं लागण्यापेक्षा आज इथंच मुक्काम करावा! सुदैवानं आज कोणा खादीधाऱ्यानं या रेस्टहौसवर पार्टी केलेली नव्हती. असो. उद्या दुपारपर्यंत आम्ही येतो, पण एक विचारायचं राहून गेलं. तुमची यशोमतीच्या डोहाळजेवणाची पार्टी कशी काय झाली?"

"बरी झाली. सुशिलेनं श्रीखंड, पुरी, मसालेभात, पकोडे असा मेनू केला होता. सांगायचं राहून गेलं. यशोमतीला खावीशी वाटणारी करवंद मंगूनं कोकणातून पैदा करून आणलीत, पण त्याला जांभळं मात्र नाही मिळाली!"

"ती आमचा दोस्त सारंग उद्या, परवा सावंतवाडीवरून आणेल! संग्राम काय करतोय? काय शेतावर आहे? बरं बरं, पण मी येईपर्यंत मंगूला ठेवून घ्या. बऱ्याच दिवसात त्याची माझी भेट नाही. सुशिलेला आणि बेबी चंदाला मी विचारलंय म्हणून सांग!"

"जी ऽऽऽ"

फोन संपल्यावर झुंजारराव पद्माबाईंना म्हणाले, "पद्मा, ही घे किल्ली. मोटार होमच्या बारच्या कप्प्यात स्कॉचची बाटली आहे ती घेऊन ये! बऱ्याच कालावधीनंतर या संभाजी कुकनं बनवलेली कोंबडी खायची संधी येते आहे."

पद्माबाई हसत हसत म्हणाल्या, "अलीकडं तुमचं वारंवार होतंय हं हे डॅडी?"

त्यावर झुंजारराव म्हणाले, "पण मी 'ड्रंकर्ड' नाही! कधीतरी अशा नवीन वातावरणात आलो की घ्यायची इच्छा होते एवढं मात्र खरं."

0-0

प्रकरण १२

दुसऱ्या दिवशी सकाळी साडेपाच वाजताच पद्माबाईंना जाग आली. त्या उठल्या आणि बाहेर आल्या. पूर्व उजळत होती. हवेत किंचित गारवाही होता. बघता बघता पूर्व चांगलीच उजळली. चोहोबाजूच्या डोंगरांनी वेढलेलं गारगोटी गाव अतिशय शांत होतं. तसं पाहिलं तर पद्माबाईंनी शिवराम आर्मीत असताना भारताचा खूप प्रदेश बघितला होता. त्या मानानं त्यांना हा गारगोटीचा परिसर अतिशय रमणीय वाटला. गावात आणि आजूबाजूला गर्द झाडी होती. विविध पक्षी आलाप घेत इकडून तिकडे उडत होते. रात्रभर उंच झाडाच्या शेंड्यांवर विश्रांती घेतलेले बगळ्यांचे थवे एका ओळीनं भक्ष्य शोधण्यासाठी बाहेर पडलेले होते.

या वातावरणात आपल्यास वर्षभर राहायला मिळणार म्हणून पद्माबाई खुषीत होत्या.

"बाई, चहा तयार आहे. आणू का?"

बंगल्याच्या कुकनं जवळ येऊन विचारलं, "सरकार अजून उठले नाहीत नां? मलाच अगोदर कशाला चहा केलास? बरं आण, इथं बागेतच घेते मी."

त्या बागेतल्या हौदाच्या कट्ट्यावर बसल्या. कुकने किटलीतून चहा आणि प्लेटमधून बिस्किटं आणली.

"किती वर्षं तुम्ही इथं आहांत?"

पद्माबाई कोणाही कर्मचाऱ्याला 'अहोजाहो' करीत.

"हे माझं विसावं वर्ष आहे बाईसाहेब!"

"बदली नाही होत?"

"झाली तीन चार वेळा. पण इथं येणाऱ्या बड्या अधिकाऱ्यांनीच ती रद्द करून घेतली!"

"का?"

"माझ्यासारखा स्वयंपाक कोणाला जमत नाही असं ते म्हणतात!"

"अगदी खरं आहे. काल रात्री तुम्ही बनवलेली कोंबडी अप्रतिम होती!"

"फक्त कोंबडीच नाही बाईसाहेब, बिर्याणी सांगा, कटलेटस् सांगा. निरनिराळे सूप, पुडींगसुद्धा मी बनवू शकतो."

"कुठं शिकलात हे सगळे पदार्थ?"

"सावंतवाडीत मी राजेसाहेबांच्या घरी हे सर्व शिकलो."

"मग सावंतवाडीला अधूनमधून जाता की नाही?"

"आता या आठदहा वर्षात नाही गेलो. आता तिथं सरकार नाहीत. ते वारले. शिवरामराजे!"

त्या कुकनं शिवराम हे नाव उच्चारताच पद्माबाईंना आपल्या दिवंगत पतीची आठवण झाली.

सूर्य उगवत होता. मघाचे अंधुक दिसणारे डोंगर आणि त्या परिसरातील झाडी स्पष्ट

दिसू लागली. किंचित ओलावलेले डोळे साडीच्या टोकानं टिपून पद्माबाई उठल्या. त्यांना ठाऊक होतं, या जगात कोणी आला नि गेला म्हणून जगरहाटी थांबत नाही. त्या आत आल्या. त्यांनी कॉटवरची मच्छरदाणी बाजूला करून पाहिलं. सरकार अंथरुणावर उठून बसले होते.

"कुठं गेली होतीस?"

"बाहेर बागेत, तिथंच कुकनं चहा दिला."

"मलाही चहा सांग. आलोच मी बाथरूममधून!"

झुंजारराव तोंड धुवून टॉवेलला तोंड पुसत बाहेर आले. पद्माबाई खुर्चीवर बसून होत्या.

"कसं वाटलं गाव?"

"फार छान, वाहनांचा गोंगाट नाही. हवेचं प्रदूषण नाही. मला तर वाटतं अशा गावातच मी जन्मभर राहावं!"

झुंजारराव हसले आणि म्हणाले, "मी शिकारीला गेलो की दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर मला देखील वाटे तिथेच रहावे! पण कसं शक्य आहे ते? माणसानं कुठं रहावे, किती राहावे, काय खावं प्यावं हे नियतीनं आपल्या जन्मवेळेलाच ठरवून टाकलेलं असतं. आता परवा परवापर्यंत तुला आपण गारगोटीत येऊन या संभाच्या हातची कोंबडी खाणार आहोत याची कल्पना होती का?"

"अजिबात नव्हती!"

"तीच तर आयुष्याची गम्मत आहे. आता मंगूची लेक धनगरवाड्यात जन्मलेली, लहानाची मोठी तिथंच झालेली. ती मोऱ्यांची सून होईल याचं कधी कोणी भाकीत करू शकलं असतं का? तेव्हा पद्मा भूतकाल आणि भविष्यकाळ फार आठवत न बसता, आजचा दिवस आणि आत्ताचा क्षण आपला समजून आयुष्य कंठावं!"

झुंजारराव सहसा अशी गंभीर चर्चा करीत नसत. पण योगायोगाने तसा विषयच निघाला तर त्यावर मोजकेच भाष्य करीत. पद्माबाईंनी आपल्या पतीच्या अपघाती निधनाची समग्र हकिगत त्यांना जेव्हा सांगितली तेव्हा ते एवढंच म्हणाले,

"जन्मलेला माणूस केव्हा ना केव्हा जाणारच! त्याबाबत दु:ख आणि हळहळ ही वाटणारच, पण जगरहाटीचा विचार करून दु:ख हळूहळू विसरायलाच हवे."

झुंजारराव स्नान उरकून बसले. पद्माबाईंनी त्यांच्या अगोदरच स्नान उरकले होते. इतक्यात शिक्षणसंस्थेचा शिपाई आला. झुंजाररावांना नमस्कार करून त्यानं आणलेलं पत्र झुंजारावांच्या हाती दिले. ते त्यांनी उघडून वाचले.

"माननीय,

श्री. झुंजारराव मोरे सरकार यांना

स. नमस्कार.

काल आपण आमच्या संस्थेत येऊन गेल्यानंतर मी रात्रीच संचालक मंडळाच्या सदस्यांना बोलावून घेतले. श्रीमती पद्माबाईंच्या बी.एड.च्या ॲडमिशनबद्दल त्यांचा सल्ला घेतला. सांगायला आनंद होतो की सर्व संचालकांनी पद्माबाईंना ॲडमिशन दिली पाहिजे असा एकमुखी निर्णय दिला. ते म्हणाले 'झुंजारराव मोरेंच्या सारखे पुरोगामी विचारांचे गृहस्थ जेव्हा एखादी विनंती करतात ती आपल्याला मान्यच करावी लागेल.' त्यात नुकताच दीड दोन महिन्यापूर्वी तुम्ही केलेल्या चिरंजीवांच्या विवाहाची हकिकत सर्वांनी पेपरमध्ये वाचलेलीच होती. छ. शाहू महाराजांची परंपरा पुढे चालवणारे लोक आज काल करवीरच्या परिसरात दुर्मिळ! त्यांत श्रीमती पद्माबाई सावंत या दिवंगत मेजर सावंतांच्या पत्नी असल्याने त्यांना अग्रक्रमाने 'ॲडमिशन' दिली आहे. नवीन वर्षाचा अभ्यासक्रम महिन्याभरातच सुरू होईल.

त्यांना इथे लेडिज हॉस्टेलवर येऊन रहावे लागणार असल्यामुळे दोन तीन दिवस अगोदरच यावे लागेल.

शिवाय संचालकमंडळाने डोनेशनशिवाय पद्माबाईंना प्रवेश दिला आहे.

कळावे,

आ. विश्वासू

अध्यक्ष आचार्य जावडेकर

अध्यापक महाविद्यालय गारगोटी''

सरकारांनी ते पत्र पद्माबाईंना वाचायला दिले. ते त्यांनी उभ्या उभ्याच वाचले. ते वाचून काहीशा भावनाप्रधान झालेल्या पद्माबाईंनी सरकारांचे चक्क पाय स्पर्शले.

''केवळ आपण माझ्या पाठीशी उभे होता, म्हणून हे शक्य झाले. अजून किती उपकार करणार आहात माझ्यावर माहीत नाही.''

आपल्या पायापासून दूर करीत पद्माबाईंना शेजारी कोचावर बसवून घेत सरकार म्हणाले,

''पद्मा, यापुढे माझ्याशी उपकाराची भाषा नको करू! तुझ्यासाठी वाट्टेल तो त्याग करायची माझी तयारी आहे.''

''पण सरकार, मी यापुढे इथे हॉस्टेलवर रहाणार. तुमची भेट कशी व्हायची?''

किंचित हसून मिशांवरून हात फिरवित झुंजारराव म्हणाले, ''गारगोटी म्हणजे अंदमान नव्हे! कोल्हापूरपासून जेमतेम अर्ध्यापाऊण तासाचा प्रवास! मी महिन्यातून एकदा तरी भेटायला येत जाईन! तुला रूममेट कशी भेटते कुणास ठाऊक. पण ती सुस्वभावी मात्र असावी!''

''ती कशीही असो. मी तिच्याशी जमवून घेईन!''

''मग हरकत नाही. तुला अधेमधे कशाची गरज भासली तर फोन करीत जा. इथं सोनाळीकर आनंदराव देसाई माजी आमदार माझ्या चांगल्या परिचयाचे आहेत.''

त्यांचे बोलणे चालू असतानाच बंगल्यावरचा वॉचमन सांगत आला,

''सरकार, आमदार देसाई आपल्याला भेटायला आलेत! पाठवू का त्यांना?''

''अरे पाठव पाठव, त्यांना शंभर वर्षे आयुष्य आहे. मी आत्ताच त्यांची आठवण केली होती.''

झुंजारराव उठून देसायांच्या स्वागताला पुढे आले. झुंजाररावांचा उजवा हात आपल्या हातात घेत देसाई म्हणाले,

''काय हे सरकार? आपण इथं मुक्कामाला आहात हे मला आज सकाळीच समजलं! आपला वाडा इथं असताना तुम्ही इथल्या रेस्टहौसवर राहिलात?''

हसत हसत झुंजारराव म्हणाले,

''तुम्ही राजकारणातल्या व्यक्ती! बारा महिने तुमच्या भोवती कार्यकर्त्यांचं मोहोळ असतं! तुम्हाला उगाच 'डिस्टर्ब' नको म्हणून कळवलं नाही! बरं शिकार काय म्हणते?''

''जायचं का आज रात्री? रानडुकरांनी फारच उपद्रव द्यायला सुरुवात केलीय!

''अहो, पण शिकारीवर बंदी आलेली आहे.''

''बंदी राहते कागदावरच. इथे आमच्या भागातले शेतकरी त्रस्त आहेत. इकडे फॉरेस्टचे लोकही डुक्करं मारायला फारशी हरकत घेत नाहीत!''

''या खेपेला नको. पुढच्या खेपेला बघू! अहो राहिलंच, या आहेत पद्माबाई सावंत! यांना बी.एड.ला ॲडमिशन पाहिजे होती म्हणून आलो होतो. ती मिळाली. या चालू वर्षापासून

इथंच लेडिज हॉस्टेलवर रहाणार आहेत. तुम्ही जरा अधून मधून त्यांना हवं नको ते पहात जा!''

''नक्कीच मी सुप्रिटेन्डन्टना आजच सांगून ठेवतो. बाकी सरकार आपण चिरंजीवांचं लग्न मात्र धुमधडाक्यात केलंत! आम्ही पेपरमध्ये फोटो आणि बातमी वाचली! अलीकडच्या काळात इतके राजेरजवाडे आणि प्रतिष्ठित लोक कोल्हापुरात लग्नाच्या निमित्ताने एकत्र आले नव्हते!''

''त्याचं काय आहे आनंदराव, तुम्हाला त्या लग्नाची संपूर्ण पार्श्वभूमी ठाऊक नसणार! मला तो विवाह त्याच पद्धतीने करावा लागणार होता!''

''सर्वांनी आपला आदर्श घ्यावा असा तो सोहळा होता! मला फार आनंद झाला. अजून आपला समाज शहाण्णव कुळीतून बाहेर पडत नाही! आमचे राजकीय कार्यकर्ते असं झालं पाहिजे आणि तसं झालं पाहिजे, अशा वल्गना करीत जाहीर भाषणबाजी करतात पण प्रत्यक्ष कृती मात्र करण्याचं त्यांच्याकडे धाडस नसतं!''

''असो, आनंदराव आम्ही आता अध्यक्षांना भेटून, त्यांचे आभार मानून कोल्हापूरला निघतो!''

जेव्हा झुंजारराव कोल्हापुरांत पोहचले. तेव्हा पद्माबार्इंच्या ॲडमिशनचे काम विनासायास पार पडल्यामुळे खुषीत होते. गाडी राजारामपुरीतल्या पद्माबार्इंच्या बंगल्यासमोर आली. पद्माबाई गाडीतून उतरताना सरकारांना म्हणाल्या, ''आपण आत येत नाही?''

''नाही, मी आता जातो रंकाळ्यावर! शिवाय आज शेतीवरही जायला हवं! छोट्या मालकांनी काय काय उजेड पाडलाय बघायला हवं!''

गाडीच्या दारावर हात ठेवून पद्माबाई म्हणाल्या, ''तुम्ही उगीचच संग्रामवर संशय घेता. खरं म्हणजे तो अतिशय सिन्सियर मुलगा आहे. लग्न झाल्यापासून तो अतिशय पोक्त दिसतो!''

''दिसतो पोक्त पण स्वभाव मात्र बदलला आहे, असं वाटत नाही. असो. तुम्ही आता बॅगा भरायला सुरुवात करा. आठ-पंधरा दिवसात तुम्हाला गारगोटीच्या हॉस्टेलवर जायचं आहे.''

''पण सरकार, या बंगल्याचं काय करायचं? वर्षभर इथं रहाणार कोण?''

''थोडे दिवस संग्राम आणि यशोमतीला इथं ठेवावं म्हणतोय! त्यांनाही स्वातंत्र्य! लग्नानंतर ते दोघे कुठे बाहेर असे गेलेच नाही!''

''सरलाबार्इंना त्याबद्दल विचारायला नको?''

''त्यांना विचारायची काय गरज आहे?''

झुंजारराव पद्माबार्इंचा निरोप घेऊन रंकाळ्यावर आले. तेव्हा त्यांना सरलाबार्इंनी ती वार्ता सांगितली. झुंजारराव त्या बातमीमुळे थोडे अस्वस्थ झाले.

सुशिलाबार्इंच्या पतीनी बेबी चंदाचा ताबा आपल्याला मिळावा असा दिवाणी दावा केला होता.

''सुशिला ते समन्स आल्यापासून तुमची वाट पहाते आहे.'' सरलाबाई म्हणाल्या.

''फोन करून त्यांना ताबडतोब इकडं बोलावून घ्या. आपण समक्ष बसूनच चर्चा करू! मी बेबी चंदाला योग्य असं स्थळ शोधत होतो. सुशिलाबार्इंची जबाबदारीतून सुटका झाली असती! पण असं अचानक सयाजीराव डफळेच्या डोक्यात बेबीची कस्टडी मागायचं कसं काय आलं?''

''कुणास ठाऊक! अगोदरच प्रत्येकवेळी मेन्टेनन्सची रक्कम द्यायला टाळाटाळ करायचे. आता तर बेबीचंदाचा ताबाच त्यांनी मागितला!''

"दोन दिवस झाले बेबी एकसारखी रडतेय! 'माँ, काही झालं तरी तुम्हाला सोडून जाणार नाही' म्हणतेय! सुशिलेलाही समजेनासं झालंय, काय करावं? पण इतक्या वर्षानंतर बापाला प्रौढ मुलाचा ताबा कायद्यानं मागता येतो?"

"ज्यावेळी पतिपत्नी विभक्त होतात तेव्हा पाच वर्षे पूर्ण होईपर्यंतचे मूल आईजवळच रहावं असा कायदा आहे! त्या कायद्यात आणखी काय बदल झालाय की काय ते पहायला हवंय!"

दुपारी सुशिलाबाई आणि बेबी चंदा रंकाळ्यावर आल्या. आल्या आल्या बेबी रडायला लागली

"आबा, मी काही झालं तरी मां ना सोडून जाणार नाही!"

"बेबी आम्ही तरी तुला कसं जा म्हणू? रडू नको. काही झालं तरी आम्ही सयाजीला तुझा ताबा देणार नाही!"

सुशिलाबाई म्हणाल्या, "डफळेंच्या बहिणीचा मुलगा त्याच्याजवळ रहातो! एक नंबरचा उडाणटप्पू आहे. त्याच्या गळ्यांत बेबीला बांधायचा त्यांचा डाव आहे! पण सरकार, आता जवळ जवळ अकरा वर्षे झाली बेबी माझ्याजवळ आहे. या अकरा वर्षांत सयाजी कधी मुलीला भेटायलाही आले नाहीत आणि आताच त्यांना एकदम बेबीची आठवण कशी काय आली बघा नां?"

झुंजारराव म्हणाले, "मला काही एक सांगू नका. सर्व काही ठाऊक आहे. विंचूर्णीच्या त्या तारीला घरकामासाठी त्यांनी घरी आणून ठेवलं होतं. आता तिच्याच ताब्यात ते आहेत. सुशिलाबाई, मला त्यांची इत्थंभूत माहिती आहे. फलटण भागातल्या सगळ्या जमिनींची त्यांनी चैनीसाठी वाट लावली. मध्यंतरी राजकारणात पडले होते. मागच्या असेंब्लीच्या इलेक्शनलाही उभे होते. इतकी कमी मते पडली की डिपॉझिटही जप्त झालं! तालुक्यात त्यांना काडीची किंमत नाही. आता कोणाच्या तंत्रानं वागतात कुणास ठाऊक? पण बेबीचा त्यांना असा सहजासहजी ताबा मागता येणार नाही! समजा आपण अगोदरच इकडं बेबीचं लग्न ठरवून टाकलं, तर उलट सयाजीकडून लग्नाचा खर्चही मागता येईल!"

"पण तो देणार कशातून? महिन्याला मला द्यायची पोटगीची रक्कम कधी वेळेवर देता येत नाही. आणि म्हणे बेबीचा ताबा हवा."

स्फुंदत स्फुंदत बेबी म्हणाली, "त्यांनी एकदा फोनवरून मला धमकीही दिली होती. तू सरळपणाने ये नाहीतर तुला पळवून आणावं लागेल म्हणाले."

"एवढी त्याची मजल गेलीय? कोणालाही असं त्याच्या इच्छेविरूद्ध जबरदस्तीनं न्यायला ही काय मोंगलाई आहे की काय? डोंट वरी बेबी! सो लाँग ॲज आय एम हिअर नोबडी कॅन टच यू!"

यशोमती आतून ट्रे मधून चहा, बिस्किटं घेऊन आली. गर्भारपणाचं तेज तिच्या चेहऱ्यावरून व अंगकांतीतून ओसंडत होते. केळीच्या कोवळ्या कोंबासारखे तिचे हात, रसरसशीत बोटं, कसलंही सौंदर्य प्रसाधन न वापरता तिचे दिसणारे ते रूप पाहून झुंजारराव म्हणाले,

"यशोमती, तुला आणि संग्रामला एक वर्षभर पद्माबाईंच्या बंगल्यात रहायला जमेल का?"

यशोमती अदबीनं म्हणाली, "जी"

"बघितलंत सुशिलाबाई, यशोमतीनं का? असं सुद्धा मला विचारलं नाही! यशोमती, तू का? म्हणून मला कसं काय विचारलं नाहीस?"

"पद्माआत्या वर्षभर गारगोटीला रहाणार म्हटल्यावर त्या घरात कोणीतरी आपल्यापैकी रहावंच लागेल!"

"घ्या ऽऽऽ! याला म्हणतात कॉमनसेन्स! सुशिलाबाई खरोखरच मी भाग्यवंत आहे की नाही बोला? अशी व्यवहारी सून मला कुठल्या खानदानी घराण्यात मिळणार होती? पण एक गोष्ट फार चांगली झाली. या लग्नामुळं मला जिल्ह्यात भलतीच प्रसिद्धी मिळाली हो! तिकडं गारगोटीत पद्माला ॲडमिशनही सहजासहजी मिळाली, ते यशोमतीच्या लग्नामुळेच!"

"सुरुवातीला मला आणि सरलेला तुमचा निर्णय पटला नव्हता. पण आता मात्र वाटतं, तुमचा निर्णयच योग्य होता."

झुंजारराव क्षणात गंभीर विषयाला कलाटणीही देत

"मग काय सूनबाई, बापानं आणलेली करवंदं खाल्ली की नाही?" यशोमती किचिंत लाजली आणि म्हणाली, "तुम्ही मला डोंगरची मैना म्हणता ना?"

"हो, पण तीच मैना आता मोरे सरदारांची 'लांडोर' झालीय! बरं तुझा अभ्यास काय म्हणतो?"

"मां म्हणाल्या डिलिव्हरीपर्यंत कॉलेजला जायचं नाही! मग क्लासमधल्या काही मुली येतात घरी, त्याच्याकडून नोटस् घेते, घरीच अभ्यास करते!"

"शाब्बास! सरला कुठं आहे?"

"आहे हो मी इथं, आतून तुमचं संभाषण ऐकतेय. बेबीचं पुढं काय करायचं ठरवलंत? सुशिलेला फार चिंता लागून राहिलीय!"

"चिंता करून कुठला प्रश्न सुटत नसतो. त्याला धैर्यानं सामोरे जावं लागतं! मी आता दोनचार तज्ज्ञ दिवाणी वकिलांचा सल्ला घेतो, आणि वेळ पडलीच तर बेबीच्या लग्नाचंही नाटक करावं लागेल!"

"लग्नाचं नाटक? काहीतरीच काय?"

"अहो वेळी प्रसंगी माणसाला जसं खोटं बोलावं लागतं तसंच आहे हे! मी सहसा आयुष्यात असे प्रकार केलेले नाहीत. पण आता सयाजी जर हट्टालाच पेटला असेल तर ते करावं लागेल, अगदी नाईलाजास्तव!"

बेबी चंदा अतिशय भावनाप्रधान होती. यशोमतीच्या लग्नात ती मुलीकडची करवली म्हणून भवानी मंडपात मिरवली होती. तेव्हा झुंजारारावाच्या बऱ्याच समवयस्कांनी त्यांना 'सरकार, ही नवऱ्यामुलीची करवली कोण हो?' असं विचारलं होतं. लग्नाला निमंत्रित अशी सरदार घराण्यातल्या स्त्रियांनीही बेबी चंदाची चौकशी केली होती.

पण त्यावेळी झुंजारारावांना इतक्यात बेबी चंदाच्या लग्नाची घाई नव्हती. शिवाय तो प्रसंगही तिच्या बाबतीत गांभीर्यानं विचार करण्याचा नव्हता. पण आता मात्र झुंजारारावांना ते सारं आठवू लागलं.

बेबीचंदा बी.ए.च्या शेवटच्या वर्षाला होती. ती किमान ग्रॅज्युएट होईपर्यंत कोणाच्याच डोक्यात तिच्या लग्नाचा विचार आलेला नव्हता.

झुंजारराव माडीवर जाऊन आरामखुर्चीत विसावले. रंकाळ्याचा निळाभोर जलाशय समोर होता. (मायग्रेटरी) फिरस्त्या पाणपक्ष्यांचे थवे त्यावर उतरले होते. एकेकाळी झुंजारारावांनी 'डकशूट' मध्ये प्रावीण्य मिळवले होते. ताशी २५० ते ३०० मैल वेगानं उडणाऱ्या जंगली बदकांच्या त्यांनी ठिकठिकाणी शिकारी केल्या होत्या. पण वय वाढले तशी त्यांची शिकारीची हौस कमी कमी होत गेली.

पण यावेळी त्यांना आठवलं 'आपण पंधरा सोळा वर्षापूर्वी सातारा जिल्ह्यात

डकशूटसाठी गेलो होतो. तिथे छत्रपती प्रतापसिंगांच्या सोबत कासच्या जंगलातही शिकार केली होती. त्यावेळी आपल्याला भेटलेले पाटणचे जहागीरदार मानसिंगराव देसाई, परवा संग्रामच्या लग्नालाही आले होते. त्यांनी त्यावेळी बेबीला पाहून आपल्याजवळ विचारपूस केली होती. पाटणकरांचे खानदान उत्तम आहे. त्यांची मुलंही शिकून मोठी झालेली आहेत. त्यापैकी कोणाशीतरी बेबीच्या लग्नाचा योग जमून आला तर बरे होईल!'

झुंजाररावांना लग्नासारखा विषय असा घाईनं घ्यायचा नव्हता. ते काहीसा विचार करून म्हणाले, "सुशिला, तसं पाहिलं तर खूप लोक बेबीला आपली सून म्हणून करून घ्यायला तयार होतील. पण मला वाटतं घाईनं आपण कोणताही निर्णय घेऊ नये!"

सुशिलाबाईंच्या नवऱ्याने त्यांच्यावर एक प्रकारे अन्यायच केला होता. पतिपत्नीत किरकोळ मतभेद झाले तरी सयाजीरावांजवळ बिलकूल समजूतदारपणा नव्हता. एवढ्या तेवढ्यावरून ते सुशिलाबाईंना चक्क 'चालती हो' म्हणायचे. बेबीचा जन्म झाल्यानंतर सुद्धा त्यांची ही अरेरावी सुरूच होती. सुशीलाबाईंची सहनशीलता संपुष्टात आली. त्यावेळी सरलाबाईंनी त्यांना कोल्हापूरला बोलावून घेतले, आणि सांगितलं, "ताई, तुम्ही कोल्हापुरात स्वतंत्र घर करून रहा. सरकार म्हणत होते, सयाजीकडून 'पोटगी' मागता येईल." झुंजाररावांनी त्यावेळी वकील देऊन सयाजीवर पोटगीची केस सुरू केली. त्यावेळी सयाजीच्या ताब्यात बरीच जमीन होती. दरमहा दोन हजार रुपये सयाजीनं सुशिलाबाईंना पोटगी द्यावी असा निकाल लागला, "केस चालू असताना सयाजीरावांनी पत्नीला दहशत घातली," केस काढून घ्या, नाहीतर तुम्ही जिवंत रहाणार नाही." त्यावेळी झुंजाररावांनी त्यांना निरोप पाठवला, 'सुशिलेच्या केसाला जरी धक्का लागला तर दहा वर्षे तुम्हास तुरुंगात पाठवेन.'

झुंजारराव सुशिलाबाईंच्या पाठीशी असे भक्कम उभे ठाकलेले पाहून सयाजीने सुशिलाबाई आणि झुंजारराव यांचे अनैतिक संबंध असल्याचाही आरोप केला होता. त्यामुळे काही प्रमाणात सरलाबाई आणि सुशिलाबाईंच्यात दुरावा निर्माण झाला होता.

सुशिलाबाईंना ते सहन होण्यासारखं नव्हतं. त्या सरळ मोरेंच्या जुन्या वाड्यात बेबीला घेऊन आल्या. वाड्यात सरलाबाई एकट्याच होत्या.

सुशिलाबाईंनी सरलाबाईंचा हात हातात घेऊन म्हटलं, "ताई, तुम्ही मला कोल्हापूरला येऊन रहा म्हणालात म्हणून मी आले. जिजाजींनीही मला आधार दिला. त्यांनीच माझ्यातर्फे वकील नेमून मला पोटगी मिळवून दिली. तुम्हा दोघा नवरा-बायकोंचे माझ्यावर फार मोठे उपकार झाले आहेत. याची मला सदैव जाणीव असते. सयाजी स्वत:ला खानदान कुळीतले समजत असले तरी त्याचं वागणं अतिशय घाणेरडं आहे. त्यांनी लग्नाअगोदर साताऱ्यात शिकायला असताना काय काय भानगडी केल्या होत्या त्या मला लग्नानंतर समजल्या. जर त्या अगोदर समजल्या असत्या तर मी त्यांच्याशी लग्नच करून घेतलं नसतं. उगाच आपलं खानदान कलंकित होऊ नये म्हणून मी त्यांच्या घरातून बाहेर पडले. मी तेथून बाहेर पडल्यानंतर त्यांनी चैनीसाठी शेदोनशे एकर जमिनीची वाट लावली. आता स्वयंपाकाला विंचुर्णीची तारी म्हणून मोलकरीण नेमली होती. तिच्या तंत्रानं ते वागतात. अशा घाणेरड्या माणसाचं उठल्यावर तोंड देखील पाहू नये. आपले भाऊ मला वर्षभर लागणारं धनधान्य पाठवतात, पोटगीच्या रकमेत मी कशीतरी काटकसरीनं बेबीला लहानाची मोठी केली. तुम्ही दोघांनी मला आधार दिला नसता तर माझी काय दशा झाली असती याची कल्पना करा. सरलाक्का, मी बेबीची शप्पथ घेऊन सांगते की कधी चुकूनही जिजाजींशी अनैतिक वर्तन केलेलं नाही. आणि करणारही नाही. घरात शिलाई मशीन ठेवून मी मुलींचे स्कर्टस् आणि बायकांचे ब्लाऊज शिवून, साड्यावर कशिदा काढून, स्वेटर्स विणून चार पैसे मिळवत होते.

जिजाजींनी सिमल्यावरून मला उलनचे स्वेटर विणायचं मशीन सात वर्षापूर्वी आणून दिलं. मी त्याचे पैसे किती सांगा म्हणाले तर मला म्हणाले माझ्या बहिणीवर जर तुमच्यासारखी आपत्ती आली असती तर मी तिच्याकडून पैसे घेतले असते का?''

बोलता बोलता सुशिलाबाईंचे डोळे भरून आले. त्या आपले अश्रू पुसत म्हणाल्या, ''ताई जेव्हा पद्माबाईही माझ्यासारख्या निराधार होऊन माझ्याकडं आल्या होत्या तेव्हा मीच त्यांना जिजाजींच्याकडे घेऊन आले होते, आठवतं ना? त्यावेळीच मला वाटलं, पद्मा तरुण आहे, निराधार आहे. जिजाजींच्यात आणि तिच्यात काही प्रकरण तर निर्माण होणार नाही ना? त्याबाबतीत तुमच्याशीही बोलले होते. त्यावेळी तुम्हीच म्हणालात माझं ऑपरेशन झाल्यापासून सरकारांच्या स्वभावात फरक पडलाय, ते फारसे कोणात मिसळत नाहीत, मनमोकळेपणानं बोलत नाहीत. पद्माच्या सहवासाने मात्र त्यांच्या वागण्यात फरक पडला. मला त्या सर्व घटना ठाऊक आहेत. पण सरकारांच्यासारखा कर्तबगार माणूस पद्माच्या सहवासात रमतो आहे हे पाहून मलाही थोडं बरं वाटलं. तुमची माझी त्या विषयावर सविस्तर अशी चर्चाही झाली होती.

पुढं संग्रामचं लग्न बेळगावला जाऊन आपण ठरवून आलो. त्यानंतर मंगू आपल्या शेवंताला घेऊन कोल्हापूरला आला. सरकारांना सगळा प्रकार सांगितला. त्यांनी संग्रामचं बेळगावच्या मुलीशी ठरलेलं लग्न मोडून संग्रामचं मंगूच्या दिवस गेलेल्या मुलीशी लग्न करण्याचा धाडशी निर्णय घेतला. त्यावेळी मलाही त्यांचं वागणं आवडलं नव्हतं.

अशी मी मोरे कुटुंबाच्या लहानसहान समस्यांच्या वेळी तुमच्याशी सहमत होते. हे सर्व मी या जन्मी कधी विसरणार नाही!

ताई, माझ्याविषयी तुमच्या मनात काहीसं किल्मिष निर्माण झालं असेल तर ते काढून टाका. मी तुमच्या पाया पडते' असं म्हणून सुशिलाबाईंनी चक्क सरलाबाईंचे पाय धरले. त्यावेळी दोघी बहिणी एकमेकींच्या गळ्यात पडून खूप रडल्या. दोघीतला गैरसमज दूर झाला.

आता सयाजीरावांनी बेबी चंदाचा ताबा मागितल्यापासून सुशिलाबाईंच्या मागे नवीनच कटकट निर्माण झालेली होती.

0-0

प्रकरण १३

सरकार पद्माबार्इंना गारगोटीला सोडून आले. स्वत: झुंजारराव पद्माबार्इंच्या ॲडमिशनसाठी आले होते. नंतर त्या हॉस्टेलवर रहायला आल्या तेव्हाही ते समक्ष आल्याचं पाहून संस्थेच्या कर्मचाऱ्यांना वाटलं की बाई मोरे सरकारांच्या जवळच्या नात्यातल्या असाव्यात! पद्माबाई फक्त एक वर्ष हॉस्टेलवर रहाणार होत्या, पण जेव्हा सरकार त्यांचा निरोप घ्यायला गेले तेव्हा पद्माबार्इंचे डोळे भरून आले.

झुंजारराव म्हणाले, "हे काय पद्मा, तू काय कायमची इथं रहाणार नाहीस? शिवाय अधूनमधून मी तुला भेटण्यासाठी येत जाईन ना?"

"हो, ते मला ठाऊक आहे, पण डॅडी, शिवराम गेल्यापासून माझं मन फार हळवं झालंय हो?"

"साहजिकच आहे. धडधाकट चालत्या बोलत्या मेजरना अपघाती मृत्यू आला या घटनेनं माझ्यासारखा खूप जग बघितलेलाही हळहळेल! पण काही गोष्टी आपल्या हातात नसतात. दु:ख नको करू, अजूनही तुझ्या भविष्यात काही सुखद घटना घडू शकतील!"

डोळे पुसून पद्माबाई म्हणाल्या, "आपल्याला जग काय म्हणेल ही चिंता कधीच भेडसावली नाही. उलट खंबीरपणे तुम्ही माझ्या पाठीशी उभे राहिलात म्हणूनच मला आशेचे किरण दिसू शकले."

"बरं मी निघतो, त्या बेबी चंदाचं काय करायचं ते मला पहायचं आहे!"

"नक्कीच तुम्ही काहीतरी मार्ग काढाल मला विश्वास वाटतो. माझ्या प्रकरणात तुम्ही माझ्या दिरांना फक्त एक नोटीस पाठवून प्रकरण संपवलं होतं."

"पण सयाजी हेकेखोर आहे, तो अशा नोटिशीनं किंवा सामोपचाराच्या भाषेनं बधणार नाही. बहुतेक तो दिवाणी दावा लढवणारच, त्याला कोर्टातच नामोहरम करावं लागेल! बरं निघतो मी, तुला त्या प्रकरणात काय डेव्हलपमेंट झाली, ते नंतर कळवीन! अधूनमधून तुझ्या मोबाईलवर मला फोन करीत जा! शिवाय इथल्या आनंदराव सोनाळीकरांची तुझी ओळख करून दिलेलीच आहे. त्यांनाही सुट्टीच्या दिवशी जाऊन भेटत जा. त्यांचा मुलगा बजरंग हाही राजकारणांत उतरलेला आहे. त्यालाही भेटत जा."

"जीऽऽऽ"

सरकारांची गाडी निघून गेल्यानंतर कितीतरी वेळानं पद्माबाई हॉस्टेलवर आल्या. त्यांना माडीवरची खोली मिळाली होती. तेथून सभोवारचा खूप अंतरावरचा प्रदेश दिसत होता. खिडकीचे गज हातात धरून उभ्या असलेल्या पद्माबार्इंना पूर्व परिचित विमल भेटायला आली.

"काय ताई, तुम्ही ॲडमिशन केव्हा घेतली, ते समजलं देखील नाही, रूममेट कोण मिळाली? आपलं इथलं बरंचसं स्वास्थ्य हे रूममेटवर अवलंबून असतं. मला बाई फार पिडलं माझ्या रूममेटनं!"

"कोण होती ती?"

"होती तिकडची, मराठवाड्यातली. सतराशे साठ लफडी करून नंतर इथं बी.एड. करण्यासाठी आली होती. अतिशय थिल्लर! देखणा तरुण दिसला की बावचाळल्यासारखी करायची! काही करून त्याची ओळख काढायची! ती इथून टळली तेव्हा मीच काय सगळ्या संस्थेतल्या लोकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला होता."

पद्माबाईंना तिच्याबद्दल अधिक माहिती विमलनं दिली असती, पण कोणाच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल काही चौकशी करावी असा त्यांचा स्वभाव नव्हता. विषय बदलण्याच्या हेतूनं त्या म्हणाल्या,

"बरं विमल, इथं मला इंग्रजी, मराठी किंवा हिंदी या तिन्ही भाषांपैकी एक निवडावी लागेल!"

"तुमच्या आवडीची भाषा कोणती?"

"मला इंग्रजी घ्यायला आवडेल. सध्या इथं तो विषय शिकवणारे प्रोफेसर कोण आहेत?"

"सध्या इंग्रजी शिकवायला कोणीही नाही! आता पूर्वीचे राजीनामा देऊन दुसऱ्या कॉलेजात गेले. पुढच्या आठवड्यात अमरावतीहून प्रोफेसर देशमुख येणार आहेत. पण इथं येणारे विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी इंग्रजी क्वचितच ऐच्छिक म्हणून निवडतात!"

"असतील, पण मला लहानपणापासून इंग्रजी आवडतं, शिवाय माझं प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणही इंग्लिश मिडियममधून झालंय. शिवरामांचंही इंग्रजीवर प्रभुत्व होतं. आर्मी ऑफिसर, त्यांच्या बायकाही आपसात इंग्रजीतच बोलायच्या!"

"पण त्यांना हिंदी येत असेल ना?"

"जरी येत असलं तरी साऊथवाल्यांना हिंदीची नफरत आहे. तामिळनाडूकडचे मद्रासी हिंदी चुकूनही बोलत नसत. शिवाय यू.पी. बिहार, गुजराथ या भागातले लोकही इंग्रजीच पसंत करीत! ते काही असो. मला ऐच्छिक विषय म्हणून इंग्लिशच घ्यायचं आहे. आता नवीन प्रोफेसर कसे शिकवतात यावर बरंचसं अवलंबून आहे. अलीकडं इंग्रजीनं मराठी, हिंदीवर आक्रमण केलं म्हणून ओरड केली जाते. पण एक गोष्ट हे लोक विसरतात. इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय व्यवहाराची भाषा आहे. जगातलं सर्वात उत्तमोत्तम ज्ञान इंग्रजी ग्रंथातच आढळते. माणसांना मातृभाषेचा अभिमान जरूर असावा, पण त्याचा सुद्धा अतिरेक होता कामा नये!"

त्या अध्यापक महाविद्यालयात १२ वी पासूनही प्रवेश असे पण तो कोर्स तीन वर्षाचा असे. ग्रॅज्युएट झालेल्यांना एक वर्षाचा कोर्स होता. पद्माबाई ग्रॅज्युएट असल्याने त्यांना फक्त एक वर्षाचा कोर्स पूर्ण करावा लागणार होता.

विमल १२ वी नंतर त्या संस्थेत आली होती. त्यामुळे ती स्वत:ला 'सिनियर' समजत होती. स्वभावाने बोलघेवडी होती.

"तुम्हाला तुमची रूममेट कोण असावी असं वाटतं?"

"कोणी जरी आलं तरी मी तिच्याशी जमवून घेईन. मला तिच्या सहवासात कितीसं रहावं लागणार आहे? जेमतेम एक वर्ष! या जगात असंख्य स्वभावाच्या व्यक्ती भेटतात. आपण प्रत्येकात दोष काढत बसलो तर जगणं असह्य होईल!"

विमलजवळ 'गॉसिप'चं भांडार होतं. ती आपल्या वर्गातील मुलामुलींपासून ते संस्थेतले अधिकारी, प्रोफेसर यांच्या स्वभावाच्या कहाण्या सांगत बसे. पण पद्माबाईंना त्यांत रस नसे.

पद्माबाई संस्थेत दाखल झाल्यानंतर इंग्रजीचे प्राध्यापक सूर्यभान देशमुख गारगोटीला

आले. अगोदरच्या प्राध्यापकाच्या क्वार्टरमध्ये त्यांना रहावं लागणार होतं. पण ज्या परिस्थितीत पूर्वीच्या प्राध्यापकांनी ते क्वार्टर्स सोडलं होतं, त्याची दशा दशा करून ठेवली होती. भिंतींना रंग नव्हता. जागोजागी खिळे ठोकले होते. खालची फरशी फुटलेली होती.

प्राध्यापक देशमुख पस्तीस वर्षाचे गोरे, नाकेले, ओठावरच्या मिशांना कलापूर्ण 'कट' मारलेले, स्वत:च्या वेषाबद्दल अतिशय दक्ष असे होते. ते बूट, पायमोजे, नेकटाय, यापासून सुटाच्या कापडापर्यंत चिकित्सक होते. त्यांनी संस्थेच्या अध्यक्षांना सांगितले, "आपण माझे क्वार्टर व्यवस्थित करेपर्यंत मी इथल्या सरकारी निवासस्थानांत राहीन. जो काय खर्च येईल तो मी देईन, पण मला माझे क्वार्टर मात्र स्वच्छ आणि अद्ययावत हवे!"

संस्थाचालक किंचित हसून म्हणाले,

"सर, इथल्या संस्थेत तसं तुम्हाला फार थोडं काम करावं लागणार आहे. या भागातले बहुसंख्य विद्यार्थी ऐच्छिक इंग्रजी हा विषय घेत नाहीत."

"ते ठीक आहे. पण मला शिकवावे लागणारे विषय तरी अभ्यासावे लागतीलच ना? माझे वसतिस्थान प्रसन्न असावे एवढीच माझी माफक अपेक्षा आहे."

"ठीक आहे. एक चार दिवसात तुमच्या अपेक्षेप्रमाणे ते व्यवस्थित केलं जाईल!" डोळ्यावरचा सोनेरी प्रâेमचा चष्मा पुसून पुन्हा तो डोळ्यावर चढवत प्रो. देशमुख म्हणाले "दाखल झाल्यानंतर लगेचच मी ही सूचना करतो आहे याबद्दल कृपया गैरसमज नसावा!"

संस्थेचे अध्यक्ष ओशट हसत म्हणाले,

"तशी आमची संस्था सधन नाही. सरकारी अनुदानही अपुरं असंच आहे, उगाच या जिल्ह्यातल्या काही सधन शेतकऱ्यांची मदत मिळते म्हणून चाललं आहे. आमचे कर्मचारीही सेवाभावी वृत्तीनंच इथं येतात. पण आम्ही तुमचे पेमेंट मात्र कमी करणार नाही."

पेमेंटचा विषय निघताच प्रा. सूर्यभान देशमुख म्हणाले, "आय ॲम नॉट आल्सो आफ्टर मनी! ग्रामीण भागात काही दिवस वास्तव्य करायला मिळते म्हणून मी अमरावतीवरून इथं आलो."

"तिथं आपली संत्री मोसंबीची बाग आहे असं ऐकलं होतं."

"हो. आठ एकर बागाईतीत चार एकर संत्री आणि चार एकर मोसंबी होतात. आमच्या घरी शेती पहायला दुसरं कोणी नाही. मलाच ती बाग पहावी लागते. मी मळ्यातच रहातो. तिथंच छोटंसं फार्म हाऊस आहे.

"ठीक आहे तुम्ही तुमचं काम सुरू करा. मी जरा आजूबाजूला फेरफटका मारून येतो."

सरकारी गेस्ट हाऊसवर उतरलेले प्रा. सूर्यभान यांच्या स्वभावाचा सहजासहजी कोणाला अंदाज लागत नव्हता.

त्या दिवशी आठवडी बाजार होता. त्या गावात ते नवखे असल्याने त्यांना कोणीच ओळखत नव्हते.

आजूबाजूचे खेडुत बाजारात आले होते. लोकांचा गलका चालू होता. कोबी, फ्लॉवरचे ताजे गड्डे विपुल प्रमाणावर विक्रीला आले होते. प्रा. देशमुखांना काही घ्यायचं नव्हतं. फक्त गावाची ओळख करून घ्यायची होती. इकडची भाषाही काहीशी वेगळी भासली. मराठीच होती, पण नागपुरी वऱ्हाडी भाषेचे टोनिंग त्यात नव्हतं. दुपारी चारच्या सुमारास प्रा. देशमुख रेस्ट हाऊसवर परतले.

संभा स्वयंपाकी आला. त्यानं विचारलं, "साहेब, संध्याकाळी जेवायला काय बनवायचं?"

''तुमची स्पेशालिटी काय आहे?''

''साहेब, मी चिकन चांगलं बनवू शकतो, इकडं येणारे 'गेस्ट' तेच पसंत करतात.''

''बरं मग तेच बनवा, पण मी फार थोडं जेवतो बरं का! रात्री झोपताना ग्लासभर दूध मात्र घेतो. आज मार्वेâटात फळं फारशी दिसली नाहीत!''

''नसतील. पण या भागातली सोनकेळी मात्र फार प्रसिद्ध आहेत.''

''अस्सं!'' असं म्हणत प्राध्यापकांनी पाकिटातून २० रू.ची नोट संभाला देत म्हटलं,

''हे घ्या. डझन सोनकेळी आणून ठेवा!''

इकडे हॉस्टेलवर पद्माबाईंना प्रा. देशमुख संस्थेत दाखल झाल्याचं समजलं होतं.

चारच्या सुमारास विमल घाईघाईनं आली.

''ताई, प्रा. देशमुख आले की आज! तुम्ही नाही बघितलं त्यांना?''

''नाही. आता कॉलेजमधे भेटतीलच की!''

त्यांच्याबद्दल फारशी उत्सुकता न दाखवता पद्माबाई म्हणाल्या.

''काय ग्रँड पर्सनॅलिटी आहे म्हणता! मला इथं कोणीही नवीन येवो त्याचा पूर्वेतिहास समजल्याशिवाय चैनच पडत नाही.''

पद्माबाई किंचित हसून म्हणाल्या

''बरं काय समजलं तुला देशमुखांबद्दल?''

''अमरावतीतल्या प्रख्यात देशमुख घराण्यातले ते आहेत. एम. ए. बी. टी. असून शिक्षण क्षेत्रातला एक सहा महिन्याचा इंग्लंडमधला कोर्स त्यांनी पूर्ण केलेला आहे, स्वभावाने तसे थोडे 'रिझर्व्हड' आहेत. वागणं बोलणं अत्यंत टापटिपीचं आहे. घरचे सधन असल्यामुळे पैसे मिळवणे हा उद्देश नाही. त्यांचं दुसऱ्याशी फारसं जमतही नाही म्हणे.''

त्यावर पद्माबाई म्हणाल्या, ''नाहीतरी तुझी सगळीच माहिती ऐकीव असते. तुला प्रत्यक्ष माहिती नसते! अशा ऐकीव बातम्यांवर माणसानं एकदम विश्वास ठेवू नये विमल! आमचे डॅडी बघ, असा कोणी दुसऱ्याबद्दल काही सांगू लागला तर ते त्यावर मुळीच विश्वास ठेवत नाहीत. मलाही ते वारंवार सांगतात, जग हजार तोंडानं हजार बोलत असतं. पण सत्य काय ते निराळंच असतं. तेव्हा विमल, देशमुखसरांना अद्याप मी काळे की गोरे हे पाहिलेलं सुद्धा नाही. बघू आता ते प्रत्यक्ष क्लासवर येतील तेव्हा हळूहळू त्यांची माहिती होईल.'

नेमकं तेच घडलं. ते क्लासवर आलेला पहिला दिवस. गारगोटीसारख्या धड शहर नाही आणि धड खेडेही नाही अशा गावात सूट, बूट, टाय घालणारे क्वचित. देशमुख सर क्लासवर आले तेव्हा वातावरण काहीसं गंभीर होतं. जून महिना असल्याने बाहेर पावसाळी ढग जमले होते. मधूनच एखादी सर पडून जायची. सरांची रहाण्याची जागा ग्राऊंडच्या पलीकडे तीन चार फर्लांगावर होती.

सरांनी सुरुवात केली.

''गुड मॉर्निंग लेडीज अँड जंटलमेन, माय नेम इज सूर्यभान डेशमुख, आय एम फ्रॉम अमरावती! आय एम सपोज्ड टु टीच यू इंग्लिश! वुई हॅव टु स्टडी ''टू ऑन ए टॉवर', ए फेमस नॉव्हेल बाय थॉमस हार्डी! बिसाईडस्, द पोएट्री सिलेक्शन्स! आय होप यू वुईल टेक इंटरेस्ट इन नॉव्हेल ॲन्ड पोएट्री!''

सरांनी आपली ओळख आणि शिकवायचे विषय यांची थोडक्यात माहिती दिल्यानंतर ते वर्गातल्या मुलामुलींना उद्देशून म्हणाले,

''आय वुड लाईक टु नो युवर नेम्स अँड द नेम्स ऑफ युवर नेटीव्ह प्लेस,'

मागच्या बाकाकडून सरांनी सुरुवात केली.

''माय नेम इज निवर्ती सखाराम सुतार!''

''निवर्ती ऑर निवृत्ती?''

''हं तेच, पण मला सर्वजण निवर्तीच म्हणतात.'' त्यावर वर्गात थोडी खसखस पिकली.''

''ऑल राईट मिस्टर सुतार, वॉट इज द नेम ऑफ युवर नेटीव्ह प्लेस?''

''द नेम ऑफ माय नेटीव्ह प्लेस इज खडकलाट!''

गावाच्या नावावर तसं पाहिलं तर हसण्यासारखं काहीच नव्हतं; पण विद्यार्थ्यात उत्साह होता. अशी जवळजवळ अठ्ठावीस मुलांनी आपली नावं, गावं यांची सरांनी माहिती दिल्यानंतर पुढच्या बाकावर बसलेल्या मुलींच्यावर पाळी आली. त्यातली एक अतिउत्साही मुलगी उठून उभी राहिली.

''सर माय नेम इज कांचन भिमराव वडार''

त्या मुलीचंही नाव आडनाव सर्वांना ठाऊक होतं. तरीही मुलं खुसखुसली. तेव्हा देशमुख सर किंचित रागाने म्हणाले,

''जंटलमेन, देअर इज नथिंग ॲबनॉर्मल ऑर ह्यूमरस. व्हाय डू यू लाफ?''

विद्यार्थी तोंडात मारल्यासारखे गप्प बसले, सरांनी त्याच मुलीला प्रश्न केला.

''हाऊ कम यू हॅव सिलेक्टेड इंग्लिश ॲज युवर व्हॉलंटरी सबजेक्ट?''

''सर, माझा भाऊ खडकीच्या ॲम्युनिशन फॅक्टरीत प्रॉडक्शन विभागात काम करतो. त्याची इच्छा होती मी इंग्रजी ऐच्छिक विषय घ्यावा!''

अशाच आठदहा मुलींनी आपली नावे व गावांची नावे सांगितल्यावर शेवटी पद्माबाई उठून उभ्या राहिल्या. डोक्यावरून पदर घेणाऱ्या 'फेअर लुकींग' अशा पद्माबाईंनी सुरुवात केली.

''सर माय नेम इज मिसेस पद्मा सावंत. आय एम फ्रॉम सांगली डिस्ट्रिक्ट! बट नाऊ आय रिसाईड इन कोल्हापूर''

सर काहीसे गंभीर होऊन ऐकत होते. त्यांनी विचारलं. ''हॅव यू टेकन प्रायमरी अँड सेकंडरी एज्युकेशन इन इंग्लिश मेडियम?''

''यस सर, बीसाईडस् आय लव्ह धिस लँग्वेज.''

''व्हेरी नाईस मिसेस देशमुख, आय कुड नो दॅट प्रâॉम युवर प्रोनौन्सेस! व्हाइल टीचिंग माय सबजेक्ट इफ देअर आर एनी डिफीकल्टीज आय एम ॲव्हेलेबल ॲट एनी टाईम ऑफ द डे! ओके लेडीज अँड जंटलमेन, फ्रॉम टुमारो वुई वुईल कमेन्स आवर सबजेक्ट!''

सरांचे उच्चार अगदी स्पष्ट आणि समजण्यासारखे होते. पहिल्या तासातच विद्यार्थ्यांना सरांच्या स्वभावाची थोडीफार माहिती होऊ शकली.

इतर विद्यार्थ्यांच्या मानाने पद्माबाई प्रौढ होत्या. त्यांनी थॉमस हार्डी व बायरन यांची पुस्तके खरेदी केली होती. शिवाय इतर विषयांवरची काही दुर्मिळ पुस्तके त्यांना सरकारांनी पाठवून दिली.

दुपारी तीनला कॉलेज संपल्यावर पद्माबाई खोलीवर आल्या. अद्याप त्यांना त्यांची पार्टनर मुलगी कोण हे समजलेलं नव्हतं. हातपाय धुवून त्या कॉटवर पडल्या होत्या, इतक्यात त्यांच्या फोनची बेल वाजली. पडल्या पडल्याच त्यांनी फोन कानाला लावला.

''हॅलो पद्मा, काय सुरुवात झाली का कॉलेजला!''

''हो, आज इंग्रजीचे प्राध्यापक तासावर आले होते. परस्परांच्या ओळखीचा कार्यक्रम झाला. प्राध्यापक सूर्यभान देशमुख, अमरावतीचे आहेत.''

"हो हो, मला ते आत्ताच समजलं. आमच्या कृषीतज्ज्ञ पंजाबराव देशमुखांच्या भावकीतले असावेत. कसे वाटले तुला ते?"

"अगदी, 'टीपिकल,' सूट-बूट घालून टाय लावून क्लासवर आले होते. अजूनही इंग्लंडमध्ये असल्यासारखे इंग्रजीचे उच्चार करीत होते!"

"त्यांचं नाव काय म्हणालीस?"

"प्राध्यापक सूर्यभान देशमुख!"

"लग्न झालंय का अद्याप अविवाहित आहेत?"

"असं का विचारता डॅडी?"

"तसं काही खास कारण नाही, पण उगाच माहिती असलेली बरं म्हणून विचारलं झालं."

"डॅडी, मला कोणाच्या खासगी आयुष्यात डोकावायला आवडत नाही. काय करायचंय आपल्याला ते?"

"म्हणतेस ते खरं आहे म्हणा, असो, इकडची आठवण कधी येते का?"

"खूप येतेय, यशोमती कशी आहे? तिचा प्रेग्नन्सी लाँगिगचा त्रास संपला की नाही? संग्रामबाळ शेतावर नियमित जातात की नाही? ती दोघं राजारामपुरीत रमली का?"

"सरला म्हणते यशोमतीला आता उगाच कामाचा ताण नको. सरला अधूनमधून तिथं रहायला जाते. शिवाय मीही असतो अधूनमधून! यशोमतीनं नवीन वातावरणाशी फार लवकर जमवून घेतलं."

"ते मला सर्व ठाऊक आहे डॅडी, पण तुम्ही मद्य कमी केलं की नाही ते सांगा. मला चिंता वाटते!"

"माझी चिंता करू नको."

"हो नाहीतर...!"

"नाहीतर काय?"

"माझी आठवण आली म्हणून घ्यायची, ती आली की मला विसरण्यासाठी घ्यायची. ड्रिंक घेणाऱ्यांना कुठलेही कारण चालते! आता कमी करा सर्व!"

झुंजारराव हसले आणि म्हणाले, "आमचं लग्न होऊन इतकी वर्ष झाली पण सरलेनं मला कधी असा सल्ला दिला नव्हता. पद्मा! मी बिबळ्या वाघाच्या दाढेतून सहीसलामत सुटलो आहे. तसा सहजासहजी कुठल्याही क्षुल्लक कारणाने मरणार नाही."

"एकदम मरणाची भाषा कशाला करता? आता मला भेटायला केव्हा येता सांगा?"

"अगं आत्ता तर फक्त १५ दिवस झाले. आणखी १५ दिवस जाऊ द्यात, शेतावर कामं चाललीत, भातपेरणी सुरू आहे! संग्रामचंही अजून शेतीकडं म्हणावं तसं लक्ष नाही!"

"बरं बेबी चंदाचं काय झालं पुढं? सुशिला दीदींना तिची चिंता लागून राहिलीय. मी सर्वांचं कुशल विचारलंय म्हणून सांगा!"

"ठीक आहे. पंधरा दिवसानंतर मी येऊन जाईन. आणखीन पुस्तकं हवी असतील तर कळव. बाकी ठीक. थांबतो."

झुंजारारावांनी फोन बंद केला. इतक्यात बडबड करणारी विमल आली.

"काय पद्माताई, देशमुख सरांचा तास झाला ना आज."

"हो, प्रथम ओळखीचा कार्यक्रम झाला."

"काय वाटलं तुम्हाला?"

"काय वाटण्याचा प्रश्न येतोच कुठे? विमल, तुला एकदा सांगितलं ना मला कोणाच्या

वैयक्तिक आयुष्यात उगाच डोकावण्याची सवय नाही!''

''तरी पण आता वर्षभर आपण ज्या सरांच्या सहवासात रहाणार आहोत, त्यांच्याबद्दल थोडीफार माहिती करून घ्यायला काय हरकत आहे?''

''हरकत काहीच नाही. पण त्यातून काहीतरी घडतं मात्र निश्चित! जेवढ्यास तेवढं असलेलं बरं!''

''पण तुमचं त्यांच्याबद्दल फर्स्ट 'इंप्रेशन' काय?''

''ते सर काहीसे रिझर्व्हड वाटले. त्यांना 'टिपटॉप' राहिलेलं आवडतं. इंग्लंडमधे काही काळ वास्तव्य घडल्यामुळे चालण्याबोलण्यांत काहीसा ब्रिटिश ढंग आहे. बाहेर पावसाळी हवा आहे, आणि आपलं निवासस्थान दोन तीन फर्लांगावर आहे हे ठाऊक असूनही ते सुटाबुटात आल्याचं पाहून जरा विचित्र वाटलं. जसा देश तसा वेश असावा, नाही का?''

''आमच्या लेडिजरूममध्येही हीच चर्चा झाली.''

''असो, पावसात त्यांचा ड्रेस भिजला काय न भिजला काय. आपल्याला घेऊन काय करायचंय?''

''हो, पण एक उत्सुकता असते ना? शिवाय ते बॅचलरच आहेत म्हणे. दहा एकर संत्र्यामोसंबीची बागायत, फार्म हाऊस, शिक्षण क्षेत्रातल्या पदव्या, यामुळं उपवर मुलींना त्यांच्या चौकशीत स्वारस्य वाटणं साहजिकच आहे!''

''नेहमी पोरी अशाच वागतात?''

''नाही. मुलींच्या दोन जाती आहेत. स्वत:च्या घरी रहाणाऱ्या आणि दुसऱ्या हॉस्टेलवर रहाणाऱ्या! या दुसऱ्या प्रकारच्या मुलींना आपसात चर्चा करण्याचं खूप स्वातंत्र्य असतं. घरी कुटुंबात ते स्वातंत्र्य नसतं! अहो सेक्सबद्दल हॉस्टेलवरच्या मुली अगदी बिनधास्त बोलतात!''

''विमल, माणसाच्या आयुष्यात सेक्सला महत्त्व आहे हे मान्य, पण 'सेक्स' म्हणजेच सर्व काही नव्हे!''

पद्माबाईंना कोणाशीही उगाच फालतू बोलत बसायला आवडत नसे. अप्रत्यक्षरीत्या एक दोन वेळा त्यांनी विमलला त्याबाबतीत स्पष्ट सुनावलंही. विमल गेल्यानंतर पद्माबाईंनी रूमचं दार आतून बंद करून घेतलं. मघाशी ते उघडं होतं तेव्हा विमल बेधडक आत आली होती.

पद्माबाईंना प्रा. देशमुखांबद्दल काही जाणून घ्यायचं नव्हतं. पण उगाचच विमलनं त्यांचा विषय काढला.

क्लासमध्ये पद्माबाई अत्यंत भारदस्त वागत. मर्यादित बोलणं, इतर मुलींच्यासारखी निरर्थक बडबड करण्यात त्यांना स्वारस्य नव्हतं.

बघता बघता महिना गेला. विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यातला परकेपणा हळूहळू कमी झाला.

हॉस्टेलवर जेवणाचीही सोय होती. महिना सहाशे रुपये द्यावे लागत. पण पद्माबाईंना ते जेवण काही रुचेना. शिवाय शिवरामना जिथं जिथं क्वार्टर्स मिळत होत्या. तिथं पद्माबाईना जावं लागे. त्याही ठिकाणी पद्माबाई काही पदार्थ बनवायच्या, दोन्ही व्हेज आणि नॉनव्हेज! इथं कॅन्टीनच्या जेवणाला ठरावीक वास यायचा. ते बनवणाऱ्या स्वयंपाक्याला पगार मिळतो म्हणून तो पदार्थ बनवत असे. ते खाणाऱ्याशी त्याचा काहीच जिव्हाळा नसे. काही मुली कुरकुर करीत, पण इलाज नव्हता.

पद्माबाई सकाळ संध्याकाळ फक्त चपात्या आणि केव्हातरी भाकरी कॅन्टीनमधून मागवायच्या. रूमवरच त्यांनी भाजी, आमटी असे काहीतरी पदार्थ स्टोव्हवर बनवायला सुरुवात केली. त्यामुळे थोडा व्याप वाढला. पण त्या विचार करीत, एका माणसाला असं कितीसं अन्न

लागतं? कधी कोबी, बटाटे भाजी तर कधी आम्लेट बनवायच्या. चुकून कधीतरी थाळी मागवायची.

अध्यक्ष प्राध्यापक देशमुखांना फिरून संस्था दाखवताना लेडिज हॉस्टेलवरही अचानक घेऊन आले. पद्माबाई ॲप्रन बांधून आम्लेट करीत होत्या. त्याचा वास रूममधून येत होता. अध्यक्षांनी बाहेरूनच विचारलं,

"मिसेस सावंत, प्राध्यापक देशमुख आलेत. त्यांना संस्था दाखवायची आहे! आम्ही आत आलो तर चालेल का?'

"याऽऽया ऽऽऽ', पद्माबाईंनी दार उघडलं. प्रा. देशमुख विजार आणि रेशमी शर्ट घालून आले होते. पद्माबाईंनी हसून नमस्कार करून त्यांचे स्वागत केले. आम्लेटचा वास आल्याने प्रा. देशमुख अध्यक्षांना म्हणाले,

"इथल्या विद्यार्थिनींना रूमवर जेवण करण्याची परवानगीही असते तर?"

"परवानगी असते, पण फक्त चहा, पोहे, उप्पीट असे पदार्थ बनवायची! जेवण बनवण्यातच त्यांचा वेळ गेला तर त्या अभ्यास कधी करणार?"

"ते खरंच आहे!"

"सर, कॉफी घेणार?" पद्माबाईंनी विचारलं,

अनपेक्षितरीत्या सर म्हणाले, "मला वाटलं तुम्ही आम्लेट खाणार का म्हणून विचाराल!"

त्यावर पद्माबाई म्हणाल्या,

"हवं तर तेही घ्या. तोपर्यंत मी कॉफी बनवते."

"नको नको, उगाच चेष्टेत म्हणालो, मला तुमच्यावरून इंग्लंडमधील माझ्या रूममेटची आठवण झाली. ती मँचेस्टरची होती. खोलीत अधूनमधून निरनिराळे सूप्स, कटलेटस् असे काही ना काही पदार्थ बनवायची! पुडींग तर अप्रतिम करायची! पण ती काही पदार्थ बनवायला लागली की सारा पसारा मात्र खोलीभर करून ठेवायची. मला ते आवडायचं नाही. मी टिपटॉप राहणारा माणूस! एकदा मी तिला गमतीनं म्हणालो, "इरिना, तुझे पदार्थ मला महागात पडतात, सर्व काही मला आवरावं लागतं." ती अतिशय खिलाडू वृत्तीची होती. मला लागलीच म्हणाली, 'तू नको खाऊ, कॅन्टीनमधला बर्गर आणि हॉटडॉग्जच तुला आवडणार!' पण शेवटपर्यंत ती रूमवर कुकींग करीत होती."

"पण तशी परवानगी होती त्या संस्थेत?"

"इंग्लंड इज ए डेमॉक्रेटिक कंट्री. आपल्या नागरिकांवर नको ते निर्बंध कधी लादणार नाहीत."

पद्माबाईंनी कॉफी बनवली. डब्यातली हंटलीपामरची बिस्किटं प्लेटमध्ये ठेवली. बाहेर देशमुख सर बोलत असताना पद्माबाईंनी कॉफी बनवली होती. संस्थाचालक म्हणाले,

"आमच्या कॅन्टीनच्या आचाऱ्याला अधूनमधून तुम्ही मार्गदर्शन करीत जा. रविवारी नॉनव्हेज बनवतो पण त्यालाही रोजची आमटीचीच चव असते. रविवारी मुलांना बाहेर जायला परवानगी असते. मग बरीच मुलं बाहेर हॉटेलात जातात जेवायला."

प्रा. देशमुखांनी कॉफी घेता घेता पद्माबाईंच्या खोलीचं निरीक्षण केलं. मोजक्याच पण गरजेच्या वस्तू टापटिपीने ठेवल्या होत्या. बेड शेजारच्या टीपॉयवर रंगीत फोटो होता. त्याला फुलं घातली होती.

सरांनी विचारलं, "हे कोण?"

"माझे दिवंगत मिस्टर, मेजर शिवराम सावंत!"

प्रा. देशमुख फोटो न्याहाळत म्हणाले,

"अगदी हँडसम दिसतात!"

पद्माबाई म्हणाल्या, "अत्यंत दिलदार आणि पुरोगामी विचारांचे होते."

शिवरामांच्या आठवणी सांगताना पद्माबाईंचे डोळे ओलावल्याची प्रा. देशमुखांना जाणीव झाली. पण विषय बदलण्याच्या हेतूनं ते म्हणाले, "आपण इथला शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर काय करायचं ठरवलंत?"

"अजून काही ठरवलेलं नाही. बघायचं डॅडी काय म्हणतात ते?"

"डॅडी कोण?"

"सरदार झुंजारराव मोरे, आंबवडेकर! तेच आता माझे पालक आहेत!"

"आय सी ऽऽऽ तेच तुम्हाला ॲडमिशनसाठी इथं घेऊन आले होते. काय?"

"ते तुम्हाला कसं समजलं?"

" मी माझे निवासस्थान रंगवताना चार दिवस इथल्या सरकारी विश्रामगृहावर थांबलो होतो ना तिथला आचारी संभा बोलला मला."

हातातल्या घड्याळाकडं पहात प्रा. देशमुख अध्यक्षांना म्हणाले, "चला गुरुजी, आता बॉईज हॉस्टेलकडं जाऊ!"

"आज नको, आज रविवार आहे. सगळे बाहेर उधळले असणार. केव्हा तरी सोमवार ते शनिवार या कालावधीत तिथं 'सरप्राईज' व्हिजिट देऊ!"

"चालेल!"

"अच्छा, मिसेस सावंत, थँक्स फॉर अ गुड कप ऑफ कॉफी!"

प्रा. देशमुखांची ती भेट अनपेक्षित होती. पण त्या भेटीत दोघांनाही एकमेकांची थोडी फार जवळून ओळख झाली.

0-0

प्रकरण १४

त्यादिवशी सयाजीराव डफळे अचानक कोल्हापूरला आले. त्यांना ठाऊक होतं. आपल्याला बेबी चंदाचा ताबा सहजासहजी मिळणार नाही. कारण सुशिलाबाईंच्या मागे झुंजारराव भरभक्कम असे उभे होते. शिवाय कोल्हापूरला येण्यापूर्वी सयाजीरावांनी बऱ्याच जणांशी सल्लामसलत केली होती. त्यांनी सांगितलं होतं, 'कोर्टात जेव्हा तुमची साक्ष होईल तेव्हा सुशिलाबाईंचा वकील तुम्हाला भलते सलते प्रश्न विचारल्याशिवाय राहणार नाही. तुम्ही घरी स्वयंपाकासाठी म्हणून ठेवून घेतलेल्या तारीबद्दलही विचारणार, तुम्ही किती लोकांचे पैसे बुडवलेत हे विचारणार, शिवाय मागच्या इलेक्शनला तुम्ही भरलेले 'डिपॉझिट' कसे गमावलेत याबाबतही विचारणार. आजपर्यंत तुमची बदनामी फक्त मोजक्याच लोकांसमोर झाली. आता कोर्टदरबारी तुमची बदनामी नोंदवली जाणार, त्यापेक्षा कोणालातरी मध्यस्थ घेऊन हे बेबीचंदाच्या कस्टडीचे प्रकरण मिटवलेले बरे!'

त्यामुळे ते कोल्हापूरला आले होते. त्यांनी झुंजारराव‌ांना फोन केला होता.

झुंजारराव म्हणाले, "मी तुमच्याकडे येण्यापेक्षा तुम्हीच माझ्याकडे या. मी सुशिलाबाईंना बोलावून घेईन."

सयाजीराव एका खादीधारी व्यक्तीला सोबत घेऊन आले. नमस्कार, चमत्कार झाल्यावर झुंजारराव‌ांनी सुरुवात केली. "सयाजीराव, आता अकरा वर्षांनंतर तुम्हास बेबी चंदाची आठवण का यावी?"

"आता ती उपवर झालेली आहे. माझ्या घराण्याच्या रिवाजाप्रमाणं आता तिचं लग्न होणं प्राप्त आहे! पहिली पाच वर्षे मी तिला तिच्या आईजवळ राहू दिलंच की?"

"तुम्ही राहू दिलं नाही, तेव्हा कायद्यानेच तुम्हाला बेबीचा कबजा मागता येत नव्हता!"

"ते खरं आहे हो, पण आत्ताचं बोला!"

त्या खादीधारी गृहस्थाला सरकार म्हणाले, "आपण कोण? आपला आणि यांचा संबध काय ते समजलं तर बरं होईल."

डफळे म्हणाले, "माझे आणि यांचे मित्रत्वाचे संबंध आहेत. फलटण तालुका पंचायत समितीचे हे सभापती आहेत. बुवासाहेब भोसले यांचं नाव!"

झुंजारराव‌ांनी मान डोलावली. आणि म्हणाले, "सयाजीराव, मला वाटतं बेबीची 'कस्टडी' हा तुमचा आणि सुशिलाबाईंचा खासगी प्रश्न आहे. वास्तविक मला सुद्धा त्याबाबतीत हस्तक्षेप करता येणार नाही. पण माझं आणि त्यांचं जवळचं नातं आहे म्हणून या प्रकरणात मी थोडा भाग घेतो आहे. पण या भोसलेंनी या प्रकरणात लक्ष घालणं योग्य ठरणार नाही."

झुंजारराव‌ांना प्रथमदर्शनीच त्या गृहस्थाचा तिरस्कार वाटू लागला होता. त्यांच्या गळ्यात तुळशीची माळ होती. पान खाऊन दात रंगले होते. कपाळावर गंधाचा टिळा आणि बुक्का होता. अंगावर जाड्याभरड्या खादीचे धोतर आणि नेहरूशर्ट. झुंजारराव स्पष्टवक्ते होते.

त्यांनी बुवासाहेबांबद्दल आक्षेप घेतला. जोपर्यंत बुवासाहेब तेथे होते, तोपर्यंत झुंजारराव बेबीच्या बाबतीत काहीच बोलणार नाहीत याची खात्री झाल्याने सयाजीराव भोसलेंना बाहेर घेऊन गेले. आणि म्हणाले, ''बुवासाहेब, तुम्ही थोडावेळ हॉटेलवर थांबा. हा माणूस फार हेकेखोर आहे. तुमच्यासमोर एक शब्द बोलणार नाही.''

नाईलाजास्तव बुवासाहेब निघून गेले.

झुंजारराव्ांनी सुशिलाबाईंना फोन केला.

''सुशिला, तू बेबीला घेऊन ये. सयाजीराव आलेले आहेत. त्यांच्याशी आपली समोरासमोर चर्चा झालेली बरी.''

सयाजीराव म्हणाले, ''तुमच्या चिरंजीवांच्या लग्नाची वार्ता पेपरमध्ये वाचली. फार धुमधडाक्यानं लग्न केलंत म्हणे.''

झुंजारराव म्हणाले, ''हो, ते तसंच करावं लागलं. लग्न ठरवताना तीन पिढ्यांचा पदर लावणाऱ्यांना जग किती पुढं गेलंय हे समजायला हवं होतं!''

''पण संग्रामबाळांना चांगल्या घराण्यातली मुलगी मिळू शकली असती.''

''मिस्टर डफळे, त्या लग्नाबद्दल तुम्ही आता काही चर्चा न केली तर बरं होईल!''

अर्ध्या तासातच सुशिलाबाई आणि बेबी चंदा आल्या. पुढच्या खोलीतून आत जाताना सुशिलाबाईंनी सयाजीरावांकडे ओझरताही दृष्टीक्षेप टाकला नाही. बेबीनं मात्र वडिलांना न्याहाळलं. लहानपणी केव्हा एकदा त्यांना पाहिलं होतं ते तिला धड आठवत नव्हते.

झुंजारराव बेबीला म्हणाले, ''चंदा बेबी इकडं ये, हे तुझे वडील! मला ओळख करून द्यावी लागते आहे. तुला ते घेऊन जायला आलेत.''

तशी बेबी उसळून म्हणाली, ''मी मुळीच जाणार नाही. कोणत्याही कोर्टात त्यांना जाऊ द्या!''

बेबीने एकदम कोर्टाची भाषा करताच सयाजीराव ओशट हसत हसत म्हणाले, ''बेबी, कोर्टात जावं लागू नये म्हणून तर मी इथवर आलो.'' चंदा बेबी तिथं फार न थांबता चेहऱ्यावर तिरस्कार आणून आत निघून गेली.

सरलाबाईंनी बेबी चंदाला आपल्याजवळ बसवून घेत म्हटलं, ''आता इतक्या वर्षांनी बापाला तुझी आठवण आलीय!''

त्यावर सुशिलाबाई म्हणाल्या, ''त्यांच्या घरात तो घंडरगोळी आहे की! त्याच्याबरोबर लग्न लावून द्यायचं असेल. त्याला दहा गावात कोण मुलगी देणार नाही ही त्याची ख्याती.''

त्यावर सरलाबाई म्हणाल्या, ''बघू तरी का आलेत ते? एवढ्यात काही सांगता येत नाही.''

बाहेर झुंजारराव डफळेंना म्हणाले, ''तुम्ही बेबीची कस्टडी मिळवण्यासाठी दिवाणी दावा कराच. तो चालवा. कोर्ट काय निकाल देते ते पाहू!''

''अहो, कोर्टात जायला नको म्हणून तर इथपर्यंत आलोय!''

''ठीक आहे बोला.''

''मी बेबीचा ताबा मागणार आहे.''

''कशासाठी?''

''कशासाठी म्हणजे? ती माझी मुलगी आहे. आता उपवर झाली आहे. आता बाप या नात्याने माझ्यावर तिच्या लग्नाची जबाबदारी आहे.''

''पण बेबीचं लग्न बेबी स्वत: ठरवेल. आता ती चार महिन्यात ग्रॅज्युएट होईल!''

''आपल्या खानदानीत मुलींना स्वत:च लग्न ठरविण्याचे स्वातंत्र्य द्यायची पद्धत नाही.

मोरे सरकार, दुर्दैवाने काही अपरिहार्य कारणामुळे मला माझी प्रॉप्रर्टी थोडीं विकावी लागली. पण म्हणून काही मला माझ्या खानदानीनं वाळीत टाकलेलं नाही. अजूनही लोक आम्हाला मानतात.''

त्यावर झुंजारराव म्हणाले, ''ते तुमच्या इलेक्शनच्या वेळेला दिसून आलंय.''

''इलेक्शनचं द्या सोडून.''

''हे बघा मिस्टर डफळे, काही झालं तरी तुम्हाला चंदाबेबीचा कब्जा मिळणार नाही. बेबीचं मत काय आहे ते आता तुम्ही ऐकलंच. कोर्टात तिचंही म्हणणं ऐकलं जाईल. तुमच्या घरगुती बाबी आम्हाला चव्हाट्यावर आणाव्या लागतील. शिवाय बेबीचं लग्न सुशिलाबाईंनी इकडं ठरवलं तर त्या लग्नाचा खर्चही तुम्हालाच द्यावा लागेल. ते तुम्हाला फार महागात पडेल.''

सयाजीरावांनी बेबीचा कब्जा मागितल्याचा प्रकार त्यांना भलताच खोड्यात टाकणार असे वाटू लागले.

झुंजारररावांनी कोल्हापुरातील ४-६ मुरब्बी दिवाणी वकिलांचा अगोदरच सल्ला घेऊन ठेवला होता. त्यामुळेच ते सयाजीरावांशी इतक्या आत्मविश्वासाने बोलू शकले. ते पाहून सयाजीरावांनी थोडं नमतं घेतलं आणि ते म्हणाले,

''जिजाजी, निदान माझ्यावर सुशिलाची जी पोटगी बसलेली आहे, ती तरी बंद व्हावी.''

''म्हणजे आम्हाला भेटण्यामागे हाच तुमचा हेतू होता तर?''

''काहीही म्हणा. आर्थिक परिस्थितीनं मी पुरता गांजलेलो आहे. माझ्यावरचा थोडा ताण तरी कमी करा.''

''म्हणजे नेमकं काय व्हायला हवंय तुम्हाला?''

''मी बेबीवरचा क्लेम सोडून देतो. आता दरमहा मला सुशिलेला जे दोन हजार रुपये द्यावे लागतात ते तरी बंद व्हावेत! किंवा थोडे कमी तरी व्हावेत!''

''मग सुशिलेनं खावं काय? तिने काही उद्योग व्यवसायही सुरू केलेला नाही. मीच तिला वर्षाला लागेल त्या धान्याचा पुरवठा करतो. आता तुम्ही त्यावरूनही माझा आणि सुशिलेचा बादरायण संबंध जोडायला कमी केले नाही. लाज वाटायला पाहिजे होती. तुम्हाला इथं येताना!''

झुंजारराव संतापून म्हणाले, ''मी म्हणूनच आज तुमच्याशी थोडी चर्चा केली. दुसरा कोणी असता तर त्याला उंबऱ्याच्या आत घेतले नसते!''

सयाजीराव खाली मान घालून बसले होते. झुंजारररावांच्या डोळ्याला डोळा भिडवण्याची त्यांच्यात हिम्मत नव्हती. अर्ध्यापाऊण तासानंतर ते उठले, ''मी निघतो जिजाजी, निदान बेबीच्या लग्नाचा खर्च तरी माझ्यावर लादू नका.'' हात जोडून ते म्हणाले.

''तो पुढचा प्रश्न आहे! मी स्वखर्चाने तिचं लग्न करायला समर्थ आहे.''

सयाजीराव खाली मान घालून निघून गेले. आतून सरलाबाई, सुशिलाबाई आणि बेबी चंदानं ते संभाषण ऐकलं होतं.

सुशिलाबाई एकट्या बाहेर आल्या आणि म्हणाल्या,

''जिजाजी, फार चांगलं केलंत, आता पुन्हा ते बेबीच्या वाटेला फिरकणारच नाहीत.''

''भुक्कड माणूस आहे तो, वडिलार्जित शे दोनशे एकर जमीन विकून खाल्ली! आता ती स्वयंपाकीण तेवढी त्यांच्याजवळ टिकून आहे. तीही एके दिवशी निघून जाईल.''

''बेबी ऽऽऽ बाहेर ये!''

बेबी चंदा सयाजीराव आल्यापासून घाबरून बसली होती. तिला आपल्या हाताला धरून जवळ बसवून घेत झुंजारराव म्हणाले, "मला काय तुझ्या लग्नाची घाई लागलेली नाही. पण तुझा नवरा तू स्वत: पसंत करावास असं मला वाटतं. फक्त तो सालस, सुस्वभावी असावा. व्यसनाधीन नसावा! तसा तुझ्या आढळात कोण असेल तर सांग, जातीपातीचंही बंधन नाही."

सरलाबाई म्हणाल्या, "यशोमतीशी हिचं फार सख्य आहे. तिला सांगून ठेवा!"

"तिला बिचारीला काय सांगू ऽऽ? आता महिना दोन महिन्यात तिला मॅटनिर्टीत जावं लागेल. तिकडं राजारामपुरीत जातेस की नाही, बेबी?" झुंजाररावांनी विचारलं.

"मी आठवड्यातून चार वेळा जाते वहिनीकडे! माझ्या मैत्रिणीही असतात माझ्यासोबत."

"पण आता तिला इकडं आणायला हवंय. कामाचा ताण पडून उपयोगाचं नाही."

झुंजारराव तलावाकडं पहात बसले होते. इकडं घर बांधल्यापासून त्यांचा वेळ फार चांगला जात होता. तासन्तास जरी तलावाकडं पहात राहिलं तरी कंटाळा येत नसे. त्यात झुंजाररावांना पक्षी निरीक्षणाचा छंद होता. प्रत्येक सीझनला तलावावर अनेक जातीची जंगली बदकं येत, रेड पोचर्ड, मालार्ड, पिनटेल. आताशी पश्चिमेकडे बराच गाळ साचून पाण्यात जलपर्णी वाढली होती. ती काढून टाकली तरी पुन्हा वाढे. त्याला कारण होतं. रंकाळ्यात मिसळणारे काही भागातील ड्रेनेजचे पाणी. त्याची कोणा नगरसेवकांना चिंता नव्हती. पाण्यात तरंगता कारंजा तयार कर, कुठं रंकाळा महोत्सवाचं आयोजन कर, यातच सारेजण मशगुल असत. तरी बरं द्वारकानाथ कपूर नावाचे आयुक्त बदलून आले होते. त्यांनी रंकाळा चौपाटी बांधली. दोन रस्ते होते, वरचा पाण्याच्या बाजूचा रस्ता वाहतुकीला बंद करून टाकला. त्यामुळं करवीरकरांची संध्याकाळी फिरण्याची सोय झाली. भेळपुरी, आइसफ्रुट, चहाची छोटी हॉटेलं त्या परिसरात निर्माण झाली.

झुंजाररावांचे बालपण याच करवीर नगरीत गेले होते. बालपणीच्या आठवणींना उजाळा देत ते तिसऱ्या मजल्याच्या गच्चीत आरामखुर्चीवर बसून जुने कोल्हापूर आठवत.

त्या दिवशीसुद्धा ते फिरून आल्यावर माडीवरच्या खोलीत गेले. इतक्यात फोन वाजला. त्यांनी रिसीव्हर उचलून कानाला लावला.

"मी झुंजारराव मोरे बोलतोय. कोण आहे?"

"सरकार मी मंगू बोलतोय, पोलिसांनी मला शाहूवाडीच्या पोलीस ठाण्यात अटक करून आणलंय, मी विष घालून बिबळ्या मारला असा त्यांनी माझ्यावर आरोप ठेवलाय!"

"तू कशासाठी बिबळ्या मारशील?"

"त्येचं काय झालं, उदगीरच्या भागात एक बिबळ्या आला होता. तो आमची चरायला गेलेली वासरं, शेळ्या मोडत हुता, चार दिसाअगोदर त्यानं माझं पांढरं एक वर्सांचं गायीचं वासरू मोडलं, मी फारिस्टरला कळवलं न्हाई! कळवून काय बी उपेग होत न्हाई, मग कशाला कळवू! ते पाडस बिबळ्यानं, वर डोंगराकडं वडत न्हेलं. मला काय करावं समजंना, बंदूक घिऊन झाडावर बसावं आनी पुनाच्यान ते खायाला आल्यावर मारावं म्हटलं तरी बी भ्या! फारिस्टानं माज्यावर बिबळं मारलं म्हनून मला पकडून न्हेलं असतं. बंदूक बी जप्त केली असती! म्हनलं तुमच्या कानावर घालावं तर कुणीतरी माज्या मारलेल्या पाडसावर एंडरीन का की काय म्हंत्यात, ते घातलं. त्या बिबळ्यानं ते खाल्लं आणि तितंच ते लांबडं झालं. म्हनून मलाच पकडून आनलंय. सगळ्यांची गयरं त्याने मोडलीती."

"आत्ता तू कोठून फोन केलास?"

"पोलीस ठाण्यासमोरच्या फोनच्या बूथवरनं, मी फौजदाराला हात जोडून म्हनालो, 'मला तुम्ही पकडून आणलंय म्हणून मोरे सरकारांच्या कानावर घालतो, मला जामिनावर तरी सोडवून न्हेतील.'

"हां बरं केलंस, तो शाहूवाडीला नव्यानं नेमणुकीला आलेला प्रकाश शिंदे माझ्या चांगला परिचयाचा आहे. तू माझा व्याही आहेस हे सुद्धा त्याला ठाऊक असणार. तू काळजी करू नको. मी चार वाजेपर्यंत तिथं येतोय!"

झुंजाररावांना कधी सलग एक महिना स्वास्थ्य लाभत नसे. लग्नाच्या व्यापातून मोकळे होतात न होतात तोच पद्माबाईंच्या ॲडमिशनचा प्रश्न निर्माण झाला. तो सुटतो न सुटतो तोच सयाजीराव डफळ्यांनी बेबीचा ताबा मिळावा म्हणून सुशिलाबाईंना त्रास दिला. त्या गुंत्यातून सुटका होते न होते तोवर हे मंगूचं प्रकरण उद्भवलं!'

झुंजाररावांना शाहूवाडीचे फौजदार शिंदे ओळखत होते. झुंजारराव पोलीस स्टेशनमध्ये येताच, शिंद्यांनी त्यांना सॅल्यूट ठोकला.

झुंजारराव फौजदारांच्या समोरच्या खुर्चीवर बसले आणि त्यांनी विचारलं

"काय प्रकार आहे? मंगूला का पकडून आणलंय?"

"सरकार आमच्याकडं शाहूवाडीच्या फॉरेस्ट ऑफीसकडून फिर्याद दाखल झालीय. मंगूने बिबळ्या वाघास विष घालून मारले असा आरोप त्यांनी केला आहे. त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून योग्य तो तपास करावा."

"पण मंगूनंच त्या बिबळ्याला विष घालून मारलं याला काय पुरावा?"

"आम्ही मंगूच्या उदगीरच्या घराची झडती घेतली, तेव्हा घराच्या मागच्या छपरात एन्ड्रीनची मोकळी बाटली सापडली! शिवाय रावण धनगरने मंगूच्या पाडसास बिबळ्याने ओढून नेलेल्या जागी मंगू गेल्याचे आपण बघितले आहे म्हणतो."

"तुम्ही त्याला अटक करण्यापूर्वी चौकशी केली होती का?"

"होऽऽऽ!"

"मग तो काय म्हणाला?"

"तो म्हणाला मी पाडसावर एन्ड्रीन घातलेलं नाही. ते कुणी घातलं तेही मला ठाऊक नाही."

"बरं ती एन्ड्रीनची बाटली त्याच्या छपरात मिळाल्याबद्दलविचारलं का?"

तो म्हणतो, "मला काहीच माहिती नाही,"

झुंजारराव म्हणाले, "म्हणजे पाडस बिबळ्या ओढून घेऊन गेलेल्या ठिकाणी मंगू गेल्याचं सांगणारा साक्षीदार रावण धनगर आहे तर?"

"हा रावण कोण आहे, याचा व्यवसाय काय आहे याची चौकशी केलीत का?"

"ती आम्ही केली नाही. पण उदगीरात तो रहातो आणि मंगूला चांगला ओळखतो एवढं आम्हाला ठाऊक आहे."

"ठीक, म्हणजे मंगूला अटक करण्याअगोदर तुम्ही त्याचेविरुद्ध सकृतदर्शनी पुरावा असल्याची खात्री करून घेतली होती तर? ठीक आहे! सध्या तो पोलीस कस्टडीत आहे की, मॅजिस्ट्रेट कस्टडीत?"

"आम्ही त्याची पी.सी. रिमांड आठ दिवसाची मागणार आहे!"

"कशासाठी?"

"आणखी काही पुरावा त्याच्याविरुद्ध मिळतो का हे अजमावून पहायचं आहे."

"आता तुम्हाला आणखीन काय पुरावा हवा? मारलेलं गाईचं पाडस मंगूच्या मालकीचं

होतं, ते बिबळ्यानं मारलं आणि डोंगरात ओढत नेलं, त्याठिकाणी मंगू गेल्याचं सांगणारा आय विटनेस, रावण धनगर आहे. मंगूनंच मृत पाडसावर एन्ड्रीन घातलं असावं असा परिस्थितीजन्य पुरावा आहे, शिवाय ती एन्ड्रीनची मोकळी बाटली मंगूच्या छपरात मिळाली याचा पंचनामाही आहेच. मग आता आणखा आठ दिवसाची पोलीस कस्टडी तुम्हाला हवी कशाला?''

''डेप्युटी साहेबच म्हणाले, आणखीन आठ दिवस पी. सी. मिळेल का पहा!'' झुंजारराव खुर्चीवरून उठले. फौजदारही उठून उभे राहिले. निरोप घेऊन जाता जाता झुंजारराव म्हणाले, ''मी आज मंगूला जामिनावर सोडावं म्हणून जे एम. एफ. सी. कोर्टात अर्ज देणार आहे.''

''ठीक आहे सरकार!''

''तुम्हाला मंगूची पोलीस कस्टडी कशासाठी हवी त्याची कारणं द्यावी लागतील! असो, ते तुमचं काम आहे! काय करायचं याचा निर्णय प्रॉसिक्यूशननं घ्यायचा असतो!''

झुंजाररावांनी त्याच दिवशी मंगूला जामिनावर सोडण्यात यावं असा अर्ज दिला. नेहमीप्रमाणे मॅजिस्ट्रेटने ''अदर साईड टु से' असा त्यावर शेरा मारला. शेवटी झुंजाररावांनी सांगितल्याप्रमाणे फौजदारांना आपलं म्हणणं द्यावं लागलं. उगाच काहीतरी कारण द्यायचं म्हणून फौजदारांनी प्रॉसिक्यूटर मार्फत 'आपणाला आणखी काही पुरावा उपलब्ध होण्यासाठी वेळ हवा.' असे आपले म्हणणे दिले. त्यावर झुंजाररावांनी हरकत घेत म्हटलं, ''हे कारण संदिग्ध आहे. आरोपीला निष्कारण डांबून ठेवायचा हा सरकारपक्षाचा प्रयत्न आहे.''

न्यायाधीशाने झुंजाररावांचे म्हणणे ग्राह्य धरून मंगूला जामिनावर सोडण्याची ऑर्डर दिली. झुंजाररावांनी क्रिमिनल प्रोसिजर कोडातले कलम ४ अ मॅजिस्ट्रेटला दाखवून त्या केसमध्ये आरोपीतर्फेâ आपण काम पहायचा निर्णय घेतला. त्यांच्याकडे रीतसर कायद्याची डिग्री नसतानाही त्यांना कोर्टात मंगूची केस चालवायची होती. त्यासाठी त्यांनी नंतर मंगूचे रीतसर वटमुखत्यारपत्रही घेतले.

शाहूवाडीच्या फॉरेस्ट खात्याचा मंगूवर पूर्वीपासूनच रोष होता. त्या रोषाचं कारण म्हणजे त्याने झुंजाररावांचा बचाव करताना मारलेल्या बिबळ्याचे कातडे! फॉरेस्ट खात्याने ते जप्त करून नेले होते. झुंजाररावाचं म्हणणं होतं- ते मंगूला किंवा मलाच द्यायला हवं. त्यांनी त्यावेळी मुख्यमंत्री, वनमंत्री आणि चीफ कॉन्झर्व्हेटर अधिकाऱ्याला तसा विनंती अर्ज दिला होता. नेहमीप्रमाणे चीफ कॉन्झर्व्हेटरनं त्या अर्जाची दखलच घेतली नाही. मंगूने बिबळ्या मारला होता, तो शिकार म्हणून नव्हे तर झुंजाररावांचे प्राण वाचविण्यासाठी! त्यावेळी फॉरेस्ट खात्यानं त्याच्यावर विनापरवाना बिबळ्याची हत्या केली म्हणून खटलाही दाखल केला होता. त्या खटल्यात मंगूची बाजू मांडणाऱ्या वकिलाने कोर्टाच्या निदर्शनास आणले की ही हत्या एका माणसाचे प्राण वाचवण्यासाठी केलेली कृती आहे. इंडियन पिनल कोड आणि क्रिमिनल प्रोसिजर कोडाप्रमाणे एखाद्याचे प्राण वाचवण्यासाठी हल्लेखोरांची हत्या करणेदेखील क्षम्य मानले जाते. तेथे मानव प्राण्याच्या जिवावर उठलेल्या त्या प्राण्याला मारले होते. अशा प्रसंगी दुसऱ्या माणसाला जिवे मारणे जर कायदा क्षम्य मानतो, तर ही बिबळ्या वाघाची हत्या कसा काय गुन्हा होऊ शकतो?

न्यायाधीशांनी त्या खटल्यात मंगूला निर्दोष करून सोडून तर दिले. शिवाय निकालपत्रात मंगूच्या धाडसाचे कौतुकही केले. इतके होऊनही जंगल खात्याने त्या बिबळ्याचे कातडे मंगूकडे न ठेवता आपल्या अधिकारात जप्त करून नेले होते. झुंजाररावांना ते बिलकूल पसंत नव्हते. त्यांनी मुख्यमंत्र्यांना त्या कातड्याचा इतिहास पत्राद्वारे निवेदन केल्यावर मुख्यमंत्र्यांनी फॉरेस्ट खात्याला ते कातडे 'ट्रॉफी' म्हणून झुंजाररावांना देण्याचा हुकूम केला.

फॉरेस्ट खात्याने ते कातडे झुंजाररावांना परत केले. त्यांनी ते आपल्या शिकारखान्यात ठेवले. अपमानित फॉरेस्ट खाते मात्र तेव्हापासून मंगूवर सूड घेण्याची संधीच शोधत होते.

आता या पाडसाच्या प्रकरणांत मंगूला अडकवण्यासाठी आयतीच संधी त्यांना चालून आली. झुंजाररावांना ती सर्व पार्श्वभूमी ठाऊक असल्यामुळे त्या मृत पाडसावर एन्ड्रीन घालून बिबळ्या मारल्याच्या प्रकरणांत मंगूला गोवण्यात आले होते.

उदगीरचा रावण्या धनगर ही एक अजब वल्ली होती. केस पिंजारलेले, डोळे लालसर आणि तारवट्यासारखे दिसणारा रावण्या गावात देवदेवस्की करायचा. अंगात येणाऱ्या बायकांच्या सारखा तो घुमायचा. तो सगळा भागच निरक्षर आणि अंधश्रद्धाळू होता. शिवाय मंगू झुंजाररावाचा व्याही झाल्यापासून तो मंगूचा द्वेष आणि दु:स्वास करीत होता. त्यानेच मंगूचे पाडस बिबळ्याने मारलेल्या प्रकरणात फॉरेस्ट खात्याला उठवून बसवले होते. पोलीसखातेही फारसे खरे खोटे न अजमावता गुन्हा दाखल करून मोकळे झाले. पण गुन्हा दाखल केल्यानंतर तो शाबित करण्याची जबाबदारी मात्र पोलीस खात्यावर पडली होती.

झुंजाररावांना मंगूची केस चालवण्यासाठी वकिलीची सनद नव्हती. म्हणून त्यांनी मंगूचे कायदेशीर वटमुखत्यारपत्र घेतले. साऱ्या जिल्हाभर त्या प्रकरणाची चर्चा झाली.

'झुंजारराव सरकार मंगूचा बचाव करणार!'

विशेषत: फॉरेस्ट खात्यात त्या बातमीची बरीच चर्चा झाली. कारण जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा झुंजारराव फॉरेस्ट खात्यास धारेवर धरत. आता या मंगूच्या केसमध्ये ते त्याचे काम चालवणार म्हटल्यावर फॉरेस्ट खात्यात खूप गाजावाजा झाला. मंगूने आपले गाईचे पाडस बिबळ्याने मारले म्हणून फॉरेस्ट खात्याकडे रीतसर तक्रार नोंदवून नुकसान भरपाई मागायला हवी होती. त्याऐवजी मंगूने बिबळ्याला विष घालून मारायचे काही कारण नव्हते असे त्या खात्याचे म्हणणे होते.

शेवटी एकदाची ती केस शाहूवाडीच्या कोर्टात चौकशीला लागली. फॉरेस्ट खात्याच्या लोकांना तसेच रावण मेंढपाळ, पोलीस पाटील, पंच अशा सर्वांना समन्स गेले.

झुंजारराव जरी वकील म्हणून आजपर्यंत कोर्टासमोर आले नसले तरी आज ते काळा स्टँडकॉलरचा कोट, पांढरी शार्स्कीन पँट, पायात चकचकीत पॉलीश केलेले काळे बूट घालून हजर राहिले. शाहूवाडी तालुक्यात त्यांना असंख्य लोक ओळखत होते. त्यात संग्राम आणि यशोमतीच्या लग्नामुळे ते सर्व मागासवर्गालाही परिचित झाले होते.

बरोबर साडे अकरा वाजता जज्ज बर्वे डायसवर आले. ते येताच झुंजाररावांसह इतर काही वकील उठून उभे राहिले. न्यायमूर्ती बर्वे पस्तीस छत्तीस वर्षांचे, रंगानं गोरे, कुरळ्या केसांचे असे होते. त्यांना वावगं काही खपत नसे. एखादा वकील साक्षीदारांचा उलट तपास चालू असताना काहीतरी इरेलेव्हंट (असंबद्ध) असे प्रश्न विचारू लागला की ते त्या वकिलाला निर्भीडपणे म्हणत, "मिस्टर,--- व्हाय डू यू वेस्ट युवर ॲज वेल ॲज माय प्रेशस टाईम, प्लीज आस्क रेलेव्हंट क्वेश्चन्स!"

झुंजाररावांना न्यायमूर्तींच्या स्वभावाची पूर्णपणे माहिती असल्यामुळे त्यांनी साक्षीदारांना अत्यावश्यक तेवढेच प्रश्न विचारायचे ठरवून टाकले.

सरकार पक्षाचा पहिला साक्षीदार म्हणून रावण मेंढपाळ पिंजऱ्यात येऊन उभा राहिला. सरकारी वकिलांनी त्याने रीतसर शपथ घेतल्यावर व स्वत:चे नाव, गाव, व्यवसाय आणि वय सांगितल्यावर त्याचा सरतपास घ्यायला सुरुवात केली.

"हे बघ रावण, ह्या आरोपीच्या पिंजऱ्यात बसलेल्या आरोपी मंगूला तू ओळखतोस?"

"न्हानपनापास्नं वळीकतो."

"हा काय व्यवसाय करतो?"

"मेंडरं आणि करडं हायती, धा बारा गयर, एक दोन म्हसरं बी हैत त्येची!"

"तू आणि हा मंगू एका गावातच लहानाचे मोठे झाला!"

"पर आता त्यो लई मोटा माणूस झालाय!"

"म्हणजे?"

"मोऱ्या सरकाराचा इवाई झालाय न्हवं?"

"हां ऽऽऽ म्हणून मोठा झालाय म्हणतोस?"

"आता आमच्या जातीतल्यावानी लंगूटी, आणि बदाम घालत न्हाई! खाकी पँट घालतो, वर बुससर्ट घालतो, रानात जातावक्ती खाकी शिकारी कोट घालतो, पाटीला काडतूसी बंदूक आडकिवतो, कमरंला काडतूसाचा पट्टा असतो."

"बरं अलीकडं याची आर्थिक स्थिती कशी आहे?"

"मोऱ्या सरकारचा इवाई झाल्यापास्नं आमा कुना जातभाईला ईचारत न्हाई! लाल दऱ्या मागं चार एकर रान घेतलाय, ततं मंगलूरी छपरांची खोली बांधलीय. मोऱ्या सरकार कवा कवा ततं ऱ्हायालाबी आस्त्यात. कोंबडं, कस्तरं मारून खात्यात!"

"बरं ते जाऊ द्या, या मंगूच्या गाईचं पाडस बिबळ्या वाघानं मारल्याचं तुला ठाऊक आहे का?"

"नसायला काय झालं, ती दिशीच सांच्यापारी. धनगरवाड्यात आरडब्बॉम्ब झाल्याली की!"

"मग मंगूला तू भेटलास का न्हाई?"

"भेट ना तर?"

"काय म्हणालास?"

"लई वंगाळ झालं, फारीष्टराकडं कळीव."

"मग तो काय म्हणाला?"

"त्यो म्हन्ला, झक मारतंय फारीष्ट खातं, मी कुनाला कळीवनार न्हाई, त्या बिबट्याचा काटाच काडतो!"

"मोऱ्या सरकारला बलिवतोस का काय?"

"उटसूट त्येस्नी कशापायी तरास दिऊ, माजा मीच काढतो की बिबट्याचा काटा!"

"मग काय झालं?"

"दुसऱ्या दिवशी दुपारी मी माजी मेंडरं चारायला माळावर निगालो हुतो, तवा मला वरतीकडच्या झाडीतनं मंग्या येताना दिसला. त्येच्या हातात कसलीतरी बाटली हुती!"

"बरं, नंतर काय झालं?"

"गावकरी सांगत आले, बिबट्या पाडसाच्या मुडद्याजवळ मरून पडलाय म्हनून! मग मीबी जावून बगून आलो. बिबट्या निपचिप मरून पडल्याला."

"मग काय झालं?"

"कुनीतरी फारिष्टाला वर्दी दिली, ती तिगं चौगं आन पोलीस हवालदार जीपमदनं आलं, बिबट्या वागाचा आन त्यानं मारलेल्या पाडसाचा पंचनामा केला."

सरकारी वकिलांनी रावणचा सरतपास संपवला. त्यानंतर झुंजारराव त्याचा उलटतपास करण्यासाठी उभे राहिले. त्यांनी सुरुवात केली.

"हे बघ रावण, तूही उदगीरलाच राहतोस?"

"व्हय जी"

"पण तू धनगरवस्ती सोडून बाजूच्या माळावर स्वतंत्र राहतोस!"

"व्हय जी?"

"तू तुझ्या जातभाईंशी फटकून राहतोस?"

"फटकून बिटकून काय न्हाई!"

"तू देव देवस्की करतोस, म्हणून तुला तुझे जातभाई दूर ठेवतात, कोणाच्या लग्नकार्याला तुला बोलावत नाहीत!"

रावण क्षणभर विचार करून म्हणाला,

"तसं काय न्हाई जी. मीच कामधंदा सोडून उगं कुटं जात नाही."

"हे बघ रावण, गेल्या १०-१५ वर्षापासून तुझ्या वागण्यामुळं तुझ्या जमातीचे लोक तुला आपल्यात मिसळून घेत नाहीत!"

"त्येंची विच्छा नाही!"

"मंगू धनगराच्या पोरीचं आमच्या मुलाशी लग्न झालं तेव्हा सगळा गाव, जमातीचे लोक आजूबाजूच्या खेड्यातले लोक कोल्हापूरला लग्नाला आले होते, पण तू आला नव्हतास!"

"मला मंग्यानं बलिवलं नव्हतं!"

"बरं, असो, आता मला सांग, मंगू धनगरानं आम्ही त्याच्या वस्तीवर असताना रात्री माझ्या अंगावर धावून आलेला बिबळ्या मारला, ते बघायला सगळा गाव जमला होता, पण तू गेला नाहीस."

"न्हाई गेलो मी, ती दिशी मलकापूरला गेलो हुतो."

"फॉरेस्ट खात्याला सांगायला! मंगूने, बिबट्याची शिकार केली म्हणून?"

"न्हाई बा, फारिस्टाच्या लोकान्ला पाटलानंच कळीवलं होतं."

"हे बघ रावण, चुगल्या करणे, गावांत भांडणं लावणे हा तुझा छंद आहे. म्हणून गाववाल्यांनी तुला गेली ७-८ वर्षे वाळीत टाकला आहे."

"गाववालं काय, खोबरं तकडं चांगभलं! मंग्यानं लेकीचं लगन झाल्यावर आपला पेराव बदलला. पँट, कोट घालायला लागलाय, त्येला बारा लंबरची लायसनची बंदूक बी घिऊन दिलीयासा, तुम्ही लालदऱ्या खाली चार एकर रान खरेदी केलाय, आता मंग्याची आईट लई वाडलिया!"

त्यावर हसत हसत झुंजारराव म्हणाले,

"तुला ते जाचतंय ना?"

"मला कशापाई जाचंल? आता बारा तास खांद्यावर बंदूक टाकून आस्तोया म्हटल्यावर ज्यो त्यो त्याला रामराम घालत्योय!"

"तू कधी त्याला रामराम नाही घातलास?"

"मी कशापायी घालू? त्येचा त्यो मोट्टा आसंल!"

न्यायाधीश झुंजारारावांना म्हणाले,

"मिस्टर मोरे, आरोपी मंगूची केस चालवताना गम्मत वाटत असेल नाही?"

"यात कसली गम्मत आलीय सर? फक्त मला मंगूनं काही जुजबी इन्स्ट्रक्शन्स दिल्या होत्या."

"ऑल राईट, गो अहेड!'

"हे बघ रावण, त्यादिवशी बिबट्याने मारलेल्या पाडसाजवळून झाडीतून तुला मंगू येताना दिसला, त्याला इकडं कुठं गेला होतास असं विचारलंस का?"

"इचारायला त्यो माज्यासंगं बोलतोय कवा?"

"हां ऽऽऽ असं असं, म्हणजे मंगूचं आणि तुझं बोलणं होतंच नाही म्हण?"

"व्हय व्हय! मंग मी कसा इचारनार?"

"अगदी बरोबर आहे तुझं, बरं मंगूच्या हातात बाटली बघितली असं पोलीसासमोर सांगितलंस?"

"व्हय खरं हाय ते सांगितलं!"

मध्येच जज्ज म्हणाले,

"मिस्टर मोरे व्हाय आर यू क्रॉस एक्झामिनिंग एक्झॉस्टिव्हली धिस विटनेस?"

(एवढा सखोल असा या साक्षीदाराचा उलटतपास कशासाठी करता?'

त्यावर झुंजारराव म्हणाले,

"हा साक्षीदार किती धादांत खोटं बोलतोय हे मला रेकॉर्डवर आणायचं आहे, सर! मंगूने खरोखरच बिबट्याला एन्ड्रीन घालून मारायचे असते, तर त्याने पाडसाच्या अंगावर एन्ड्रीन टाकून मोकळी बाटली तेथून कुठेतरी दूर फेकून दिली असती. हा रावण मी त्याच्या हातात बघितली म्हणतो हे साफ खोटं! हे मला आपल्याला पटवायचं आहे."

"आय सी ऽऽ, गो अहेड."

"हे बघ रावण माझं असं म्हणणं आहे, तू मनापासून मंगूचा द्वेष करीत होतास. त्याची सुधारलेली आर्थिक स्थिती, त्यानं खरेदी घेतलेली जमीन, हे सगळं तुला बघवत नव्हतं, म्हणून मंगूचं पाडस बिबट्यानं मारल्याच्या संधीचा तू फायदा घेण्यासाठी, तूच त्या पाडसावर एन्ड्रीन घातलंस आणि मंगूला शिक्षा व्हावी या दुष्ट हेतूनेच खोटी साक्ष देतो आहेस!"

"मी कशापायी हे करू?"

"तुझा स्वभावधर्म म्हणून! दॅटस ऑल युवर ऑनर!" झुंजारराव रावणचा उलटतपास संपवून खुर्चीवर बसल्यानंतर कोर्टातल्या गर्दीत असलेले जाणकार म्हणू लागले. 'सरकारांनी एखाद्या जातिवंत वकिलासारखा रावण्याचा उलटतपास केला.'

न्यायाधीशांचंही मत तसंच झालं असावं, पण ते काही बोलले नव्हते!

त्यानंतर फॉरेष्टर, पंच, पोलीस पाटील इत्यादींच्या साक्षी झाल्या. त्यानंतर दोन्ही बाजूच्या वकिलांचा युक्तिवाद झाला. सरकारी वकिलांनी औपचारिक असा युक्तिवाद केला. नंतर झुंजारराव उठून उभे राहिले. ते म्हणाले, "युवर ऑनर, प्रामुख्याने या खटल्यात रावण मेंढपाळ याची साक्ष झाली आहे. ती अथपासून इतिपर्यंत धादांत खोटी होती. मंगूने खरोखरच आपल्या मृत पाडसावर एन्ड्रीन घातले असते तर तो ती मोकळी बाटली दाखवत वस्तीवर कशाला आला असता? तेथेच ती जंगलात त्याने फेकून दिली असती. तेव्हा रावण द्वेष आणि सूड बुद्धीने धादांत खोटं सांगतो आहे. ज्याला ७-८ वर्षापासून उभ्या धनगर वाड्याने वाळीत टाकले आहे, अशा माणसावर कोण विश्वास ठेवू शकेल का? हो ठेवू शकेल, ते म्हणजे पोलीस खाते. काहीतरी करून एकदा आरोपीवर चार्जशीट पाठवून मोकळे व्हायचे आणि फॉरेस्ट खात्याची समजूत काढायची एवढाच पोलीसांचा उद्देश. संपूर्ण खटला म्हणजे एका सन्मार्गानं जगणाऱ्या, क्वचित प्रसंगी प्राणाचीही पर्वा न करता एखाद्याचा जीव वाचवणाऱ्या शूर मावळ्याची परंपरा राखणाऱ्या मंगूसारख्या माणसावर निष्कारण सूड घेण्याचाच प्रयत्न होता. मंगू निर्दोष आहे, योगायोगाने तो माझा व्याही झाला ही गोष्ट अलाहिदा, त्याला निर्दोष सोडावे हीच नम्र विनंती." आपला युक्तिवाद संपवून झुंजारराव खाली बसले.

प्रकरण १५

त्यानंतर तिसऱ्या दिवशी मंगूवर भरलेल्या खटल्याचा निकाल लागला. न्यायाधीशांनी मंगूला निर्दोष सोडले. पण त्याच निकालांत त्यांनी फॉरेस्ट खाते आणि पोलीसांवर काही ताशेरे ओढले. न्यायमूर्तींनी निकालपत्रात म्हटलं होतं, "शाहूवाडीच्या फॉरेस्ट खात्याकडं उदगीर परिसरात धनगरांनी बिबळ्या वाघाचा वावर वाढल्याबद्दलचे जे अर्ज केले होते, त्यावर फॉरेस्ट खात्याने कसलीच कारवाई केली नाही आणि केवळ हे एकमेव उदाहरण नव्हे, नेहमीच तिथल्या धनगर लोकांच्या तक्रार अर्जांची वासलात अशीच लावली जाते. वरिष्ठांनी याप्रकारच्या तक्रारींची दखल तात्काळ घेण्याबाबत कनिष्ठांना सूचना द्याव्यात. तसेच तीन वर्षापेक्षा अधिक काळ त्यांना एका ठिकाणी नेमण्यात येऊ नये.

पोलीस खात्याचा अनुभवही त्याहून काही वेगळा नाही, मंगूचे पाडस बिबळ्याने मारले म्हटल्यावर मंगूशिवाय दुसरे कोणीच बिबळ्याला विषप्रयोग करून ठार मारणार नाही असा झटपट निष्कर्ष काढून पोलीसांनी मंगूला अटक करून त्याच्यावर खटला भरला.

या केसमधील तात्पुरते वकील म्हणून माझ्यासमोर आलेल्या झुंजाररावांनी खरं म्हणजे "Malicious Prosecution" दुष्ट बुद्धीने भरलेल्या या खटल्यांत फॉरेस्ट खात्याकडून नुकसान भरपाई मागायला हवी होती. कदाचित तसे झाले असते तर मी त्यांची विनंती मान्यही केली असती. असो. पोलीसांनी आणखी थोडे कष्ट घेतले असते तर त्यांना सत्य काय आहे हे समजून आले असते. पण देशातीलच पोलीस खात्याचा दर्जा कमालीचा घसरलेला असल्याने फक्त शाहूवाडीच्या पोलीसांनाच दोष देण्यात काय अर्थ आहे?

आजकाल समाजात प्राणीप्रेमाचे फार मोठे भरते आले आहे. काही रिकामटेकड्या स्वयंघोषित समाजसेवकांना प्राणी आणि पक्षी प्रेमाचा पुळका आलेला आहे. पक्ष्यांनी प्रचंड प्रमाणात पिकांची नासाडी केली तरी त्यांना मारायला बंदी, तशीच केवळ बिबळे वाघ,गवू रेडे यांच्याबद्दलच अशा लोकांना कणव वाटते असे नव्हे तर शहरात ह्या कुत्र्या मांजरांच्या संरक्षणाचीही जबाबदारी आपलीच आहे असे हे लोक आणि संघटना समजतात. गेल्या वर्षी झोपडीत रहाणाऱ्या गरिबांची कित्येक लहान बालके कुत्र्यांनी ठार मारली तरी नगरपालिका किंवा महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना मोकाट सुटलेल्या आणि वर्षागणिक शेकड्यानं वाढणाऱ्या कुत्र्यांना ठार मारण्याचे आदेश देता येत नाहीत. का तर म्हणे सुप्रीम कोर्टाने मोकाट कुत्र्यांना ठार मारू नये असे आदेश दिलेत. आता माझ्या सारख्या अतिकनिष्ठ न्यायाधीशाने देशातील सर्वोच्च न्याययंत्रणेबाबत अनुद्गार काढणे शिस्तीला अनुसरून ठरणार नाही. तरी पण एक व्यवहारी नागरिक म्हणून मी त्यांना विनंती करू इच्छितो की अशी देशव्यापी बंधनं घालण्यापूर्वी समाज मनाचा कौल किंवा कानोसा घेण्यात यावा. नपेक्षा कालांतराने नि:पक्षपाती अशी जपून ठेवलेली न्याययंत्रणेची प्रतिष्ठा धोक्यात येण्याची दाट शक्यता आहे."

न्यायाधीशांनी त्याच निकालपत्रांत मनुष्य प्राण्यांच्या जीवितास किंवा त्यांच्या पशुधनास वारंवार उपद्रव देणाऱ्या प्राण्यांची हत्या करण्यास शासनाने मान्यता द्यावी असेही

सुचवले.

मलकापूरसारख्या ठिकाणी ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट या अत्यंत कनिष्ठ पदावर काम करणाऱ्या न्यायाधीशाने दिलेल्या त्या निकालाचे पडसाद साऱ्या देशभर उमटले. 'ऊप ऊग्से दf घ्ग्a' या देशातील प्रमुख इंग्रजी वृत्तपत्राने देखील ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट, मलकापूर यांच्या निकालपत्राची दखल घेऊन अग्रलेख लिहिला. शिवाय महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, तरुण भारत, सकाळ या वृत्तपत्रांनीही त्या निकालाबद्दल गौरवोद्गार काढले.

या सर्वांचा परिणाम म्हणजे झुंजारराव मोऱ्यांना अफाट प्रसिद्धी मिळाली. स्वत: पेशानं वकील नसतानाही केवळ मंगूच्या वटमुखत्यार पत्राच्या आधारे त्याचा बचाव करण्याची संधी लाभलेल्या झुंजारारावांना अभिनंदनाचे शेकडो फोन व पत्रे आली.

पण त्यातल्या एका पत्राने मात्र झुंजारारावांचे स्वास्थ्य काहीसे विचलित झाले. कारण ते पत्र गारगोटीहून आले होते आणि महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ते पद्माबाईंनी पाठवले होते. त्या पत्रात लिहिले होते.

प्रिय डॅडी,

तुम्ही मंगूच्या मलकापूरच्या कोर्टात चालवलेल्या केसचा वृत्तांत मी आणि प्रा. देशमुख रोजच्या रोज वाचून त्यावर चर्चा करीत होतो. प्रा. देशमुख मला म्हणाले, या अगोदरपासूनच जर झुंजारारावांनी सनद घेऊन वकिलीपेशा स्वीकारला असता, तर महाराष्ट्रभर त्यांचे एक अत्यंत बुद्धिमान वकील असे नाव झाले असते. प्रा. देशमुख अद्याप तुम्हाला भेटलेले नाहीत, पण आता मात्र त्यांना तुम्हाला भेटायची आतुरता लागून राहिलेली आहे. त्यांना मी मंगूने तुमच्यावर बिबळ्याने केलेल्या प्राणघातक हल्ल्याची हकिगत सांगितली तेव्हा तर ते मला म्हणाले, ''पद्मा, ही हकिगत 'Rescue from the ferocious Bibla Tiger' या मथळ्याखाली Readers Digest मध्ये लिहिण्यासारखी आहे. खरोखरच सर तुम्हाला भेटण्यासाठी आतुर झालेले आहेत.

माझा अभ्यास व्यवस्थित चालू आहे. देशमुखसरांचे मला नेहमीच मार्गदर्शन असते. माझ्याकडे विशेष लक्ष देतात.

आपली आज्ञाधारक
पद्मा

त्या पत्राने झुंजारराव बरेच अस्वस्थ झाले. आजपर्यंत झुंजारारावांना वाटत होते की केवळ आपल्याच पाठिंब्यावर ती राहिली आहे. पण त्या पत्रातील प्रा. देशमुखांचा वारंवार झालेला उल्लेख झुंजारारावांची असूया जागृत करू लागला.

रंकाळ्यावरून सकाळीच ते आंबवड्याला शेतावर आले होते. येतानाच ते पत्र त्यांना मिळाले होते. ते वाचल्यावर व्हरांड्यातून फेऱ्या काढता काढता विचार करू लागले, ''गेल्या तीन चार महिन्यात पद्मा आणि देशमुख यांच्यात बरीच घसट वाढलेली दिसते. पण मला त्याबाबत असं अस्वस्थ वाटायचं कारणच काय? ती माझी कोण? मी तिचा कोण? केवळ एक हितचिंतक! तिची नवऱ्याच्या मालकीची जमीन सोडवून देणारा, एक तिच्याबद्दल सहानुभूती बाळगणारा एक त्रयस्थ! छे ऽऽ! मी केवळ त्रयस्थ कसा? कित्येक रात्री तिने माझ्याशी शय्यासोबत केली! मी सरलेचा पती, ती माझी सौभाग्यवती आणि एकनिष्ठ पत्नी! माझ्या संग्रामची माता, माझ्यावर नितांत प्रेम करणारी माझी गृहिणी, यशोमतीचे मी संग्रामशी लग्न होणार म्हटल्यावर काही दिवस सरलाने माझ्याशी अबोलाही धरला होता, पण भवानी मंडपात, राजे रजवाड्यांच्या साक्षीने संपन्न झालेला तो विवाह सोहळा पाहून पुन्हा तिने माझ्या

निर्णयाविरुद्ध 'ब्र' ही काढला नव्हता. पण संग्राम झाल्यानंतर दुसऱ्या अपत्याची तिची आशा मावळली. सरलेवर 'इमर्जन्सी' व्हॅसेक्टॉमीची शस्त्रक्रिया करावी लागली होती, तेव्हापासून सरलेचा सेक्सही कमी कमी होत गेला. एका घरात, एकत्र असूनही आम्ही विभक्त झाल्यासारखे वागत होतो. पण तिला ते जाणवत होते. त्यावेळी मी दुसरं लग्न करावं असं ती म्हणाली. आणि जेव्हा पद्मा माझ्या सहवासात आली तेव्हा मात्र सरलेने कधीच आक्षेप घेतला नव्हता. उलट मी पद्माला आंबवड्यातच बऱ्यापैकी फार्महाऊस बांधून रहायला द्यावे असेच तिने सुचवले होते.

पण आता हीच पद्मा सर्वस्वी माझी नाही राहिली. प्रा. देशमुखानं तिच्यावर मोहिनी घातलेली दिसते. पद्मा बी.एड. झाली की देशमुख तिला कुठेही वर्ध्याकडे 'जॉब' देईल. ती राजारामपुरीतील आपला बंगला देखील विकून तिकडे निघूनही जाईल! कदाचित हा देशमुख तिच्याशी लग्नही करून घेईल! माझी मैत्रीण होऊन उर्वरित आयुष्य जगण्यापेक्षा ती प्रा. देशमुखांची पत्नी होणे अधिक पसंत करील! ती काय करेल, काय निर्णय घेईल याचा मला आज अंदाजच करता येत नाही."

बराच वेळ झुंजाररावांच्या मनातून पद्माचा विषय जाईना. शेवटी त्यांना तिच्याशी समक्ष चर्चा केल्याशिवाय निश्चित असं काहीही समजणार नव्हतं. फिरून फिरून ते व्हरांड्याच्या आरामखुर्चीवर पाय लांब करून बसले. इतक्यात मागे रोडवर एस.टी. थांबल्याचा आवाज आला. बसल्या जागेवरून त्यांना मागचं काही दिसत नव्हतं. म्हणून त्यांनी समोर फुलांच्या ताटव्याला झारीनं पाणी घालणाऱ्या भिवाला हाक मारली. भिवा हातातली झारी खाली ठेवून झुंजाररावांच्या समोर आला. खरं म्हणजे झुंजाररावांच्या फार्म हाऊसकडे येणाऱ्या पायवाटेवर बसचा स्टॉप नव्हता. झुंजाररावांच्याकडं जायचं आहे म्हटल्यावर कंडक्टर बेल मारून गाडी थांबवत असे.

थांबलेल्या गाडीतून झुंजाररावांच्या शेताच्या पायवाटेनं येणारा मंगू दिसला.

"सरकार, मंगूमामा हैत जी."

"मंगू आला बरं झालं. त्याच्या केसचा निकाल लागल्यापासून त्याची माझी भेटच नव्हती." मंगू यायचा झाला की कधी मोकळ्या हातानं येत नसे. या खेपेला त्यानं 'रातांबे' आणले होते. याच रातांब्याची साल काढून वाळवली की तिचे आमसूल होई. मंगूनं टप्पोरे असे पिशवीभर गुलाबी, किरमिजी रंगाचे रातांबे आणले होते.

"ये,ऽऽऽ!'

मंगू झुंजाररावांना पहिल्यांदा भेटल्या भेटल्या त्यांच्या पायावर डोकं टेकवत असे. पण यशोमतीचं संग्रामशी लग्न झाल्यापासून त्यांनी मंगूला आपल्या पायाला स्पर्श करायचा नाही अशी ताकीद दिली होती. तरी पण प्रथेनुसार तो त्यांना अदबीने वाकून मुजरा करी.

"अरे काय काय झालं मंगू त्यादिवशी? मी मुद्दामच निकालाला हजर राहिलो नव्हतो. नाहीतर मलकापूरच्या लोकांनी उगाचच गुलाल उधळून मला रंगवून टाकलं असतं."

"व्हय, व्हय, सरकार, लई जन म्हनत हुते सरकार कसं न्हाईत आज! भिंगार्डे आन्ना, गांदी होटलवाले, सावऱ्या, गावठानचा सरपंच चौलग्या, मला साऱ्यांनी इचारलं. मी म्हनलं सरकार म्हनले तुला शिक्षा होनार आस्ती तर जामिनाचा अरज द्याला आलो आस्तो. लई मायंदाळ गर्दी जमली हुती, तुमी न्हाईसा म्हनून मलाच गुलालानं लालभडक केलं की लोकांनी!"

"तुझे जातभाई काय म्हणाले?"

"काय सांगू सरकार, त्येनी तर ढोल वाजवतच मला रस्त्यापतोर आनलं! ही गर्दी,

फारीस्टाची लोक त्वांड एवडं करून गेली. फौजदार मातोर माज्या जवळ इऊन माझा हात हातात घिऊन म्हनलं,

"मंगबा, सरकाराना सांगा, आमचंही जरा चुकलंच."

"मग तू लोकांना काय दिलंस का न्हाई?"

"कोपऱ्यावरच्या कोपड्यांच्या हाटेलातली परातभर पेडं वाटलं की! काय खरं न्हवं, लोकं म्हनाय लागली, चार बकरी कापून गावजेवान घाल" हसत हसत मिशावरून पालथी मूठ फिरवीत झुंजारराव म्हणाले, "चार बकऱ्यांनी काय होतंय? बरं ते जाऊ दे, तू मला फोन कुठून केलास?"

"आमच्या भिवा कव्हाळ्याच्यातनं! तेनं त्या राती मला जेवायलाच ठिऊन घिटला, कोंबडं कापलेत! आंब्यातनं "आर्दा" शिसा आनल्या!"

"मग तुझी दिवाळी झाली म्हण! तुझ्या लेकीनं अवघडलेली असतानासुद्धा मला बिर्याणी करून वाढली."

"सारीजन खुशाल हैत न्हवं! धाकलं सरकार, वैनीसरकार, सरलाक्का, पद्माआक्का ऽऽऽ?"

पद्माच्या नावाचा उल्लेख निघताच, झुंजारराव काहीसे गंभीर होऊन म्हणाले,

"ती इथं कुठं असते, गारगोटीला शिकायला असते ना?"

"हांऽऽ व्हय, व्हय, मला बी एक डाव त्येंच्याकडं जायाला होवं." भाबडेपणानं मंगू बोलला.

झुंजाररावांना मंगू अनपेक्षितरीत्या आल्यामुळं खूप बरं वाटलं!

"बरं, तुझा दोस्त काय म्हणतो?"

"कोन वो सरकार?"

"अरे रावण्या? मी त्याला गमतीनं दोस्त म्हणतो!"

लगेच आवाजाची पातळी बदलून मंगू झुंजाररावांच्या कानाजवळ येऊन म्हणाला,

"सरकार, फारिस्टवाल्यानी त्येला निकाल झाल्यावर लई लई मारला, गाववालं बी चिडले हुते. ते रातीतनं कुठं निगून गेलं कुनास ठाव?"

"गाववाल्यांनी त्याला का मारला?"

"उगं गावात ऱ्हाऊन देवदेवस्की करत हुतं. मंतर, तंतर करून लोकास्नी फसवायचा. त्यो निकाल लागल्यावर साऱ्यांनी हात धून घेतला म्हना की! आता ते परत येत न्हाई बगा."

"बरं झालं, औषधाविना खोकला गेला."

इतक्यात फोन वाजला. सरलाताईंनी फोन केला होता. सरकारांनी कानाला रिसीव्हर लावला.

"हॅलो, झुंजारराव बोलतोय!"

"आज जेवायला येताय ना? संग्रामनं नदीत रायफलनं मरळ मारलीय,"

"वाऽऽवा ऽऽऽ बऱ्याच दिवसांनी नदीची मरळ खायला मिळणार, बरं आत्ता मघा मंगूही आला आहे, त्याला सोबत घेऊन येतो.'

"जीऽऽऽ! आपणाला मुद्दाम फोन केला की, गारगोटीला पद्माला डबा पाठवू का?"

पुन्हा पद्माबाईंच्या नावाचा उल्लेख येताच झुंजारराव काहीसे गंभीर होऊन म्हणाले, "बरं पाठवा, आता तिच्याही गळाला एक मोठी मरळ लागलीय!"

झुंजारराव कोणत्या अर्थानं म्हणतात हे सरळ, साध्या भोळ्या सरलाबाईंना कळणं अशक्य होतं.

मोऱ्यांच्या घरी काही गोडधोड पदार्थ बनवले तर कोणीतरी गारगोटीला पद्माला जेवणाचा डबा घेऊन जाई. त्यामुळंच सरलाबाईंनी झुंजारारावांना फोन केला होता.

अलीकडं पद्मा गारगोटीला गेल्यापासून झुंजारराव सहसा मोटार व्हॅन वापरत नव्हते, ते संग्रामची छोटी मॉरीसच वापरत. पण संग्रामही मित्रासमवेत शिकारीला जायचा असला तर त्यांच्या जीपमधूनच जायचा.

रंकाळ्यावरच्या तिसऱ्या मजल्यावरच्या गच्चीत झुंजारराव हातात व्हिस्कीचा ग्लास घेऊन बसले होते. मंगू बाजूच्या वेताच्या खुर्चीवर बसला होता. खाली लेकीला डोळे भरून पाहून तो वर आला होता. सरलाबाईंनी मरळ तळायला घेतली तेव्हा त्या यशोमतीला म्हणाल्या,

"तू इथं किचनमध्ये थांबू नको, तू जा तुझ्या खोलीत, तुला तेलाचा वास नको यायला."

यशोमतीची गौरकाया काहीशी पिवळी दिसू लागली होती. अधूनमधून लेडी डॉक्टरची तपासणी असे. पण जोपर्यंत तिची सुखरूप डिलीव्हरी होत नाही तोपर्यंत सरलाबाईंच्या जिवाला स्वास्थ्य लाभणार नव्हतं.

इतक्यात सुशिलाबाई बेबी चंदाला घेऊन आल्या. त्यांच्यावर आलेलं नवऱ्याचं गंडांतर दूर झाल्यामुळं त्याही निश्चिंत अशा होत्या.

आता त्यांना एकच चिंता होती, बेबी, चंदाच्या लग्नाची! ती अत्यंत सद्गुणी मुलगी होती. पण बापाने लहानपणीच निराधार केल्यामुळे तिच्या चेहऱ्यावर अस्पष्ट असे म्लान भाव दिसत. बेबी चंदा आल्या आल्या यशोमतीच्या खोलीत गेली. त्या जवळजवळ समवयस्कच होत्या.

यशोमतीनं विचारलं, "बेबी, तुझ्या मैत्रिणी काय म्हणतात?"

"मी अलीकडं फारशी बाहेर जात नाही. माँ म्हणतात एकदा तुझं लग्न ठरलं की मी मोकळी झाले; पण वैनी मला असं घाईघाईनं माझं लग्न ठरावं असं नाही वाटत!"

"अगदी बरोबर आहे."

"संग्रामदादा कुठंय?"

"ते अलीकडं घरी कधी असतात? कधी विशाळगडला तर कधी आंब्याला! डॅडी नेहमी ओरडतात तरी त्यांचा मित्रांचा गोतावळा सुटत नाही."

खूप वेळ त्या इकडच्या तिकडच्या गप्पा मारीत बसल्या. नुकत्याच लागलेल्या मंगूचा केसचा निकालाचा विषय निघाला. तेव्हा बेबी म्हणाली, "डॅडींनी तर कमालच केली. अगदी सराईत वकिलासारखी त्यांनी ती केस चालवली."

"बरं झालं बाई, आमच्या मंगू बाबाला त्या रावण्याने फार त्रास दिला होता. तो गाव सोडून गेला म्हणे!" यशोमती म्हणाली.

"डॅडी काय करताहेत बरं?"

"यावेळी गच्चीवर बसून काय करणार? रिलॅक्स होताहेत." अलीकडं यशोमतीच्या बोलण्यात इंग्रजी शब्द यायचे.

बेबी चंदा वर गच्चीत आली. आकाश तारकांनी फुललं होतं. रंकाळ्यावरून येणारा गार वारा सर्वांगाला सुखावत होता. झुंजारराव बेबीला म्हणाले, "ये बेबी, आता आम्हा सर्वांना तुझीच चिंता आहे बघ!" बेबीनं प्रत्युत्तरादाखल किंचित स्मित केलं. थोडावेळ थांबून बेबी चंदा खाली गेली.

0-0

प्रकरण १६

त्या संध्याकाळी राहून राहून झुंजाररावांच्या मनात पद्माचाच विचार येत होता. शेवटी त्यांनी ठरवून टाकलं की आपण पद्माला विसरूनच जायचं, तिची ओळखच झाली नव्हती असं समजायचं. पण तेही त्यांना सहजासहजी शक्य होईना. तिचं वागणं, बोलणं, झुंजाररावांच्याबद्दल तिला वाटणारा जिव्हाळा, आदर! एकदा तर ती दोघं एकांतात असताना ती त्यांना म्हणाली होती, "डॅडी, जन्माला येणारा कोणीही पुरुष किंवा स्त्री संपूर्णत: आदर्श असूच शकत नाही. त्यांच्यात काही ना काही उणीव ही असतेच. पण आता मी दीड दोन वर्षे तुमच्या सहवासात आहे, मला मात्र तुमच्यात कसलीच उणीव आढळली नाही."

मिशावरून पालथी मूठ फिरवीत झुंजारराव म्हणाले, "उणीव नाही कशी? ती भरपूर आहे. पण तुझी माझ्याकडं पहाण्याची दृष्टीच निर्दोष आहे."

"तुम्ही मला आधार दिलात तो माझा थोडाही पूर्व परिचय नसताना. तो देताना तुमच्या माझ्याकडून कसल्याही अपेक्षा नव्हत्या. उलट तरुण वयात माझ्यावर ओढवलेले वैधव्य पाहून तुम्हाला नेहमीच माझ्याबद्दल दया वाटे. जग काय म्हणेल याचा तुम्ही मला मदत करताना कधीच विचार केला नाहीत. उलट मलाच तुम्ही पुनर्विवाह करण्याचा सल्ला दिलात. पण मला दुसरं लग्न करावं असं कधीच वाटलं नाही. मी पुनर्विवाहास तयार आहे असं सर्वांना सांगितलं असतं तर स्वत:ला खानदानी घराण्यातले समजणारे पाच पंचवीस लोक एका पायावर तयार झाले असते. पण अशा अनोळखी व्यक्तीबरोबर आयुष्य कंठायला मी राजी नव्हते. उलट तुमची पुरोगामी मतं, कोणावरही अन्याय होऊ न देण्याची तुमची वृत्ती, मंगूने तुमचे प्राण वाचवले म्हणून त्याच्याशी तुम्ही ठेवलेले मित्रत्वाचे नाते, पुढे संग्रामबाळांचं लग्न ठरल्यानंतरही जेव्हा तुम्हाला शेवंता संग्रामपासून गरोदर असल्याचे समजले तेव्हा उगाच कोणावरही आगपाखड न करता, त्यांचे ठरलेले लग्न मोडून शेवंताशीच संग्रामबाळांचं लग्न करण्याचा घेतलेला निर्णय, त्या लग्नाचे शाही आयोजन, तो सोहळा संपन्न झाल्यावर तुम्ही समाजाला घालून दिलेला आदर्श, हे सर्व एक माणूस कसं काय करू शकतो याचंच मला राहून राहून आश्चर्य वाटे. आणि खरं सांगू डॅडी, तुम्ही मला कसलीही प्रलोभनं न लावताही मीच तुमच्या प्रेमात पडले. त्या वयात मी प्रेमाची भाषा करणं योग्य ठरलं नसतं. कारण तुम्हीही विवाहित होता, एका प्रौढ मुलाचे बाप होता. एस.टी. खात्याची ताबेदारीची नोकरी झुगारून तुम्ही शेती करून स्वत:ची उपजीविका करायचा घेतलेला निर्णय, शेतीचा फारसा पूर्वानुभव नसतानाही त्यात घातलेले लक्ष, बसल्या बसल्या आजूबाजूच्या अडल्यानडलेल्यांना योग्य असे सल्ले देऊन, त्यांनी कोर्टकचेऱ्यांच्या पायऱ्या न झिजवता, आपसात, समंजस आणि समजूतदारपणे सर्व तंटेबखेडे मिटवून टाकण्याचा सल्ला देत होता. माझ्या दिरांनी मला एक गुंठाही जमीन न देण्याचा घेतलेला निर्णय केवळ एका पत्राने त्यांना बदलायला तुम्ही प्रवृत्त केलेत. हे सर्व मी अनुभवलेय, डॅडी, बाई कितीही कर्तबगार असली तरी एखाद्या समर्थ अशा पुरुषाच्या आधाराशिवाय जगू शकत नाही असं. माझे दिवंगत पती मेजर शिवराम नेहमी म्हणत.

केवळ माझं नशीब बलवत्तर म्हणून तुमच्या रूपाने असे समर्थ व्यक्तिमत्त्व मला लाभले. डॅडी, मी तुम्हास मुद्दामच डॅडी म्हणते, कारण तसे तुम्ही माझ्यावर उपकार करून ठेवले आहेत.

मला ठाऊक होतं, तुमच्या आणि माझ्या प्रेमात एक प्रचंड दरी आहे, सरलाआक्कांची! पण माझ्या सुदैवाने त्यांनीही आपल्या मैत्रीला काही आक्षेप घेतला नाही. त्यांच्यावर कराव्या लागलेल्या त्या इमर्जन्सी व्हॅसेक्टॉमीच्या ऑपरेशननंतर त्यांचाही सेक्स कमी झाला होता. त्यावेळी तुम्हालाच एखाद्या 'कंपॅनियनची' गरज होती. माझ्या स्वप्नातही कधी या गोष्टी नसताना त्या नियतीनं जमवून आणल्या.

डॅडी, यापुढे मी सर्वस्वी तुमचीच असेन, तुमचीच म्हणून जगेन आणि तुमचीच म्हणून मरेन.''

हे बोल आपल्याला ऐकवणारी तीच ही पद्मा, आज देशमुखांकडं आकर्षित कशी काय झाली? 'सर माझ्याकडे विशेष लक्ष देतात' या शब्दाचा अर्थ काय?

पद्माचा विषय झुंजाररावांच्या डोक्यातून जायलाच तयार नव्हता म्हणून त्यांनी मंगूला सोबत घेऊन कुठेतरी शिकारीसाठी चार दिवस जावे असे ठरवले.

मोटार व्हॅनमध्ये एक आठवड्याचे रेशन भरले. रायफली, ट्वेल्व्ह बोअर, पॉर्इंट टू टू अशा बंदुका घेतल्या, ड्रिंक्सचा स्टॉक घेतला आणि सरलाबार्इंना सांगण्यासाठी ते किचनमध्ये डोकावले.

''मी एक चार सहा दिवस कोकणात जातो आहे.''

सरलाबाई फ्लॉवर चिरत बसल्या होत्या. त्या थांबल्या, झुंजाररावांच्याकडे पहात म्हणाल्या, ''तुम्ही जायचे नाही, यशोमती दिवसात आहे, तिची सुटका झाल्याशिवाय मी तुम्हाला जायची परवानगी देणार नाही आणि त्यातूनही तुम्हाला जायचे असले तर बेशक जा!''

झुंजाररावांच्या मागे मंगू उभा होता. त्याच्याही मनात यावेळी कुठं जाऊ नये असं होतं.

''काय करायचं रे मंगू?'' मागे वळून मंगूकडे पहात ते म्हणाले.

''वैनी सरकार म्हंत्यात ते बरूबर हाय सरकार! व्हावं तर मागनं जावू!''

झुंजाररावांनी अंगातला शिकारी कोट काढला, कपडे बदलले आणि मंगूला म्हणाले, ''अरे, खरं म्हणजे यावेळी आपण जायचा विचार करायला नको होता. यशोमती पहिलटकरीण. तिची सुखरूप सुटका झाली तर बरंच आहे. नाहीतर सिझरीन, बिझरीन करावं लागलं तर आपण त्यावेळी इथं असायलाच हवं!''

शर्टाचे हात दुमडून झुंजारराव म्हणाले, ''संग्राम कुठं आहे?'' त्यांनी सरलाबार्इंना विचारलं.

''चार दिवस झालेत त्यांचा पत्ता नाही, फोन नाही, बायकोची डिलिव्हरी चार-आठ दिवसावर येऊन ठेपलीय. त्याची काही चिंता आहे का बघा त्याला?''

''आमच्या हयातीत याचं हे असं वागणं, आमचं काय बरं वाईट झाल्यानंतर मागे सगळा आनंदच आहे.''

त्यांनतर चौथ्या दिवशी रात्री यशोमतीच्या पोटात दुखायला सुरुवात झाली. सरलाबाई आणि झुंजाराराव तिला मॅटर्निटीत घेऊन गेले. मंगू घरीच थांबला. सुशिलाबार्इंना निरोप पाठवला. त्याही मध्यरात्रीच्या सुमारास मॅटर्निटीत आल्या.

यशोमतीला मॅडमनी तपासून सरलाबार्इंना सांगितलं, ''डिलिव्हरी नैसर्गिकरीत्या होण्याची शक्यता आहे. आणखी थोडावेळ वेदना सहन करायला हव्यात यशोमतीनी!''

"काही हरकत नाही, होता होईल तो सिझरीन टाळावे, तशी ती फार सोशीक आहे."

सरलाबाई डिलिव्हरी रूममध्ये आल्या. टेबलवर विव्हळत असलेल्या यशोमतीच्या कपाळावरून हात फिरवीत म्हणाल्या,

"बाई म्हणतात आणखीन एक अर्धा पाऊण तास या वेदना सहन केल्यास तर नैसर्गिक डिलिव्हरी होईल."

"नाही हो मम्मी, मला आता अजिबात सहन होत नाही. ते कुठं आहेत? आले का नाही?"

त्याही अवस्थेत यशोमतीला संग्रामची आठवण आली. गेले पाच सहा दिवस त्याचा पत्ता नव्हता. "त्यांचा काही निरोप तरी आला का? आई गऽऽऽ! मम्मी ऽऽऽऽऽ! डॅडी कुठं आहेत?"

"बाहेर व्हरांड्यात आहेत."

यशोमतीला वेदना होत असताना तिची अवस्था अतिशय केविलवाणी झाली होती.

सरलाबार्इंनाही तिथं उभं राहवेना. त्या सिस्टरला सांगून बाहेर आल्या. त्या क्षणी यशोमतीची मोठी किंकाळी ऐकू आली आणि त्यानंतर डिलिव्हरी रूममध्ये शांतता पसरली. सरलाबार्इंची छाती धडधडू लागली. इतक्यात आतल्या शांततेचा भंग झाला. तो नवजात बालकाच्या रडण्याने!

एक सिस्टर धावत बाहेर आली आणि डोकं हातात धरून बसलेल्या सरलाबार्इंना म्हणाली,

"गुड न्यूज मॅडम, इट इज ए मेल चाईल्ड." बाळंतपणाच्या दवाखान्यात रोज अनेक बायका बाळंत होतात. पण तिथल्या स्टाफला किंवा लेडी डॉक्टरांना त्यात विशेष असं काही वाटत नसे. पण झुंजारराव मोऱ्यांची ही 'सून' 'व्ही. आय. पी.' होती. यशोमतीच्या शाही लग्नसोहळ्याची हकिगत महाराष्ट्रभर गाजली होती. अशा यशोमतीचं पहिलं बाळंतपण आपल्या मॅटर्निटीत व्हावं असं अनेक मॅटर्निटी चालवणाऱ्या लेडी डॉक्टरांना वाटायचे त्यामुळेच स्टाफ नर्सेसना विशेष आनंद वाटला.

सरलाबार्इंच्या पाठोपाठ सुशिलाबाईही मॅटर्निटीत आल्या होत्या. सुशिलाबाई म्हणाल्या,

"बरं झालं बाई, यशोमतीची सुखरूप सुटका झाली."

सरलाबाई बराच वेळ काहीही न बोलता बसून होत्या. मघा यशोमतीचं विव्हळणं आणि शेवटची तिची किंकाळी ऐकून त्या सुन्न होऊन गेल्या होत्या. बराच वेळ त्या बसून होत्या. शेवटी त्यांनी समाधानाचा सुस्कारा सोडला आणि म्हणाल्या, "हे कुठं आहेत? त्यांना कळवलं का?"

"होऽ होऽऽ, त्यांनाही समजलं, मंगूही तिथंच आला आहे." सर्वांना यशोमतीची चिंता वाटण्याचं आणखी एक कारण होतं. ती दिसायला अतिशय नाजूक होती. मंगू धनगराच्या पोटी अप्सरेसारखं लावण्य घेऊन जन्माला आलेल्या यशोमतीच्या प्रारब्धात एवढ्या मोठ्या नामांकित खानदानी घराण्याची सून होण्याचे भाग्य लाभले होते. लग्नाच्या वेळी तिचे सौंदर्य पाहूनच घराण्याचा बडेजाव मारणाऱ्यांची वाचा बंद झाली होती. सुरुवातीला तिच्या लग्नाला विरोध करणाऱ्या, सुशिलाबाई आणि सरलाबाईही तिचा मृदू स्वभाव पाहून अल्पावधीतच तिच्यावर भाळल्या होत्या. तिला अप्रतिम अशी बुद्धिमत्ताही लाभली होती. जेमतेम मराठी ३-४ इयत्ता शिकलेल्या यशोमतीनं पद्माबार्इंकडे असताना बाहेरून परीक्षेस बसून दहावी उत्तम मार्कांनं पास होऊन दाखवली होती. पद्माबाई शिवरामांच्या सहवासात असताना त्यांच्याशी

इंग्रजीतच संभाषण करीत. त्याही यशोमतीबरोबर इंग्रजीच बोलत. त्यामुळं ती जेव्हा कॉलेजच्या पहिल्या वर्षाला जाऊ लागली तेव्हा ही मुलगी खेड्यात लहानाची मोठी झालीय हे कोणालाही सांगून पटण्यासारखं नव्हतं.

आठ दिवसानंतर बाळबाळंतिणीला घरी सोडण्यात आलं. दरम्यान झुंजारारावांनी कित्येक किलो पेढे परिचितांना वाटले होते. सगळं काही ठाकठीक होतं. मंगू नातवाचं तोंड पाहून नाचायचा तेवढा बाकी राहिला. आपल्या मुलीला हे असलं भाग्य लाभेल हे त्या उभा जन्म शेळ्यामेंढ्यांमागं काटाकुट्यातून अनवाणी हिंडणाऱ्या बापाच्या कधी स्वप्नातही आले नव्हते.

एक गूढ होतं, यशोमती बाळंत होऊन पंधरा दिवस होत आले तरी संग्रामचा पत्ता नव्हता. तो इतके दिवस गेला कुठे हेच समजायला मार्ग नव्हता. झुंजारारावांनाही आता त्याची चिंता लागून राहिली. नेहमी ज्या साखर कारखान्यातील डायरेक्टरांच्या मुलांसमवेत तो फिरायचा त्यांच्याकडेही चौकशी केली, तेव्हा संग्राम आणि विक्रम डांगरे ही दोन मुलं सांगोला भागात शिकारीसाठी गेल्याचे समजले. सांगोला पोलीस स्टेशनलाही फोन करण्यात आला, पण तेथून ते चार दिवसांपूर्वी पुण्याकडे गेल्याचे समजले.

आता मात्र झुंजारराव आणि सरलाबाई दोघेही अस्वस्थ झाले. त्यानंतर एका मध्यरात्री झुंजारारावांना लोणावळा पोलीस स्टेशनवरून फोन आला.

"तुमचा मुलगा संग्राम याला पुणे येथील सिनेक्षेत्रात काम करणाऱ्या नर्तिकेच्या खून प्रकरणात अटक करण्यात आलेली आहे. सध्या तो पोलीस रिमांडखाली लोणावळा पोलीस स्टेशनच्या लॉकअप् रूममध्ये आहे.!"

झुंजारारावांना समजेना आपण काय ऐकतो आहे. तो पोलीस इन्स्पेक्टर पुढे म्हणाला, "त्याचा मित्र विक्रम डांगरे फरारी आहे, तो सापडल्याशिवाय या गुन्ह्याचा तपास पूर्ण होणार नाही."

विक्रम डांगरे हा लहानपणापासून वाह्यात आणि लाडावलेला होता. त्याला नाचगाणं ऐकण्याचा षोक जसा होता तसाच पिण्याचाही नाद होता. संग्राम त्याच्या नादी केव्हा आणि कसा लागला याची कोणालाही कल्पना नव्हती.

सरलाबाई, सुशिलाबाई दोघीही यशोमतीमध्ये गुंतून पडलेल्या, झुंजारराव पद्माला गारगोटीला बी.एड.ला ॲडमिशन मिळवून देण्यात गढून गेलेले. फावल्या वेळात ते आंबवड्याच्या शेतावरही जाऊन राहायचे. इकडे चिरंजीव काय करतात, कोणाच्या सहवासात असतात याकडं त्यांना लक्ष द्यायला सवडच नव्हती. प्रथम २-३ दिवस तो त्याच्या मामाकडे गेलो, नंतर मित्राच्या गावी गेलो होतो, अशा काहीही थापा मारत असे. पण विक्रम डांगरेच्या बरोबर तो हिंडतो फिरतो याची कोणीही त्यांना खबर दिली नव्हती. विक्रम हा कॉलेजातून 'रस्टिकेट' झालेला वाह्यात मुलगा. बाप सहकारी साखर कारखान्यात डायरेक्टर, राजकारणातही त्यांचा दबदबा, त्यामुळे बापाच्या नावावर मोकाट सुटलेला हा दिवटा चिरंजीव केवळ चैनी करत हिंडत होता. या विक्रमशी त्याची मैत्री जमली. विक्रम त्याच्यासोबत सावंतवाडी, मालवण, वेंगुर्ला अशा सागर किनाऱ्यावरच्या रेस्ट हाऊसमध्ये रहायचा. पण विक्रमचं एक वैशिष्ट्य होतं. तो एका ठिकाणी दोन तीन दिवसापेक्षा अधिक काळ रहात नसे. फिरायला बापानं मर्सिडीज गाडी दिली होती.

त्यादिवशी विक्रम संग्रामला म्हणाला, "संगू, चल आता आपण लोणावळा खंडाळा करून येऊ!"

"लोणावळ्यात तुझ्या ओळखीचं कोण आहे की काय!"

"छेऽऽऽ! चैन करायची तर ती ओळखीच्या गावांत कधीही करू नये! चल, पुण्यात माझी एक मैत्रीण आहे तिला सोबत घेऊन जाऊ, कंपनीसाठी!"

"कोण ती?"

"शी इज ए डान्सर! उत्तम नाचते, गाते. पूर्वी काही सिनेमातही ती छोटी छोटी कामं करायची! शी वॉन्टेड टु बिकम हिरोईन! पण साला त्या इंडस्ट्रीत फार वशिलेबाजी असते रे! एनी वे, आपल्याला ते घेऊन काय करायचंय? एक दोन रात्र आपल्याला तिने कंपनी दिली तरी पुरे!"

"या अगोदर ती तुझ्यासोबत कुठं आली होती?" संग्रामनं विचारलं.

"चिक्कार वेळा, पण सालीचा एक फार मोठा खोडगुण आहे."

"कोणता?"

"साली आपल्याला पिऊ देत नाही! आणि मला सांग संगू, लोणावळ्यासारख्या ठिकाणी गेल्यावर ड्रिंक प्यायचे नाही तर काय ताक प्यायचे?"

संग्राम म्हणाला, "मी तरी कुठं पितो जास्त? तू फारच आग्रह केलास तर एखादा ग्लास बिअर घेतो झालं. पण मलाही ओव्हर ड्रिंक घेतलेलं आवडत नाही! आमच्या डॅडींसारखं आहे माझं! माझे डॅडी दीड पेगच्या वर एक थेंबही कधी जास्त घेत नाहीत!"

"पण बाकीची मजा करतातच की?" विक्रम म्हणाला

"कसली मजा?"

"पद्माबाईंना सोबत घेऊन मोटार होम मधून डोंगर भागात शिकारीच्या निमित्ताने मुक्काम करतातच की! संग्या, मलासुद्धा एखाद्या श्रीमंत तरुण विधवेची मैत्री असावी असं कधी कधी वाटतं बघ!"

विक्रमनं संग्रामच्या डॅडींच्या उल्लेख केल्याचं संग्रामलाही आवडलं नव्हतं. तो म्हणाला, "विक्रम आपल्या हिम्मतीवर वडीलधारी जे करतात, त्यांची कशाला आपण बरोबरी करायची?"

"का तुला राग आला?"

"राग नाही आला, पण आपण वडीलधाऱ्यांचे दोष काढू नये असं वाटतंय!"

"बरं बाबा, राहिलं. तुझ्या डॅडींनी एक सोडून चार मैत्रिणी केल्यातरी माझ्या बापाचं काय जातंय? पण तुला एकदा विचारावंस वाटतंय ते विचारू का?"

"विचार की?"

"तुझ्या मावशी सुशिलाबाईंही नवरा सोडून कोल्हापूरलाच का येऊन स्थायिक झाल्या?"

"तो त्यांचा नवरा त्यांना त्रास देत होता!"

"पण लोक मात्र काही वेगळंच बोलतात म्हणून विचारलं."

"काय बोलतात?"

"तुझ्या डॅडींचं सुशिलाबाईशींच लग्न व्हायचं होतं, पण ते झालं तुझ्या आईशी, पण लग्नापूर्वीपासून सुशिलाबाईंशी झुंजाराराव मोऱ्यांचं 'अफेअर' होतं म्हणे"

"लोक काहीही बोलतात, आपण त्यावर कितपत विश्वास ठेवावा हे आपणच ठरवायचं असतं! विक्रम, मी या खेपेला तुझ्यासोबत नाही आलो तर चालणार नाही का?"

"संग्या, आय एम सॉरी. यापुढं मी तुझे डॅडी, सुशिला मावशी, पद्माबाई यांचा कोणताही विषय काढणार नाही, हे घे प्रॉमिस!"

"बघ हं! यावेळी माँ मला घरातून बाहेर पडायलाच परवानगी देत नव्हत्या. बायकोची

डिलिव्हरी जवळ आलीय, तू बाहेर कुठं मित्रासमवेत दूर भटकू नकोस म्हणत होत्या!''

''वॉट ए ब्लडी जोक! गड्या संगू, तू गावात राहून काय बायकोची डिलिव्हरी करणार होतास? अरे आपलं काम तू केलंस, आता बाकीचं सर्व काही बायकांनीच पार पाडायचं असतं!''

संग्रामला याही विक्रमच्या कॉमेंटस आवडल्या नाहीत. आपण या मूर्खाच्या नादी लागायलाच नको होतं असं वाटू लागलं होतं. पण बोलत बोलत ते दोघे कात्रजचा घाट उतरू लागले होते. आता अधे न मधेच मी पुढं येत नाही असं संग्रामला म्हणणंही कठीण होतं.

पुण्यात गाडी डेक्कन जिमखान्यावरच्या एका चार मजली 'कॉम्प्लेक्स' समोर येऊन थांबली. विक्रमनं हॉर्न वाजवला. तेव्हा संग्राम म्हणाला, ''या गजबजाटात तुझ्या गाडीचा हॉर्न कसा काय ओळखेल ती?''

''कसा काय? अरे ती तर तिची स्पेशालिटी आहे. एक पाच मिनिटं थांब.''

खरोखरच पाचच मिनिटाच्या आत, सव्वीस सत्तावीस वर्षांची ती तरुणी हसत हसत समोरून आली!

''काय चहा कॉफी घेणार का?'' आल्या आल्या तिनं विचारलं.

''पुष्पे, मी चहा कॉफी घेण्यासाठी इथपर्यंत आलो का? चल, बॅग भर. हॉटेल हिलटॉपवर लोणावळ्याला रूम बुक केलीय, आणि हो, तुझी ओळख करून द्यायचंच राहिलं. हा माझा मित्र संग्राम मोरे. याच्या लग्नाचे वृत्त तू वाचले असशील कदाचित! फार गाजावाजा झालाय याच्या लग्नाचा.''

''विक्रम मी कोणाच्या लग्नाच्या बातम्या कधी वाचत नसते!'' ती म्हणाली, ''मला असल्या बातम्यांत इंटरेस्ट नसतो.''

''मग कशाच्या, डायव्होर्सच्या वाचतेस?''

आपण काहीतरी मोठा विनोद केला आहे अशा आविर्भावात विक्रमनं पुष्पाच्या हातावर टाळी दिली.

''बरं, आवर लवकर, सात वाजायला आले. लवकर हॉटेलवर पोहचायला हवे, अगोदरच हिलटॉपवर रूम मिळत नाहीत, तशाच सीझन चालू आहे. मुंबईचे लोक हिलस्टॉपवर रहायला मरतात. कसे बसे मी रिझर्व्हेशन मिळवले आहे.''

पुष्पा खरोखरच नटीसारखी दिसत होती. चालणं, बोलणं, हावभाव अगदी फिल्मी वाटत होते. ती आत गेल्यावर संग्राम म्हणाला,

''तुझी किती दिवसांची ही ओळख?''

''दोन तीन वर्षे झाली असतील! आमच्या राधानगरीच्या फार्महाऊसवर शुटिंग करायला मुंबईचे लोक आले होते. त्यांत हे 'सँपल' होतं. पहिल्या भेटीतच मला म्हणाली, ''तुमचा हेवा वाटावा असं तुमचं फार्म हाऊस आहे. आम्हा मुंबई पुण्याच्या लोकांना आताशी शुद्ध हवा दुर्मिळ झालीय.''

खरोखरच विक्रमचं फार्म हाऊस उंचवट्यावर होतं. विक्रमच्या वडिलांनी स्वत:ची लिफ्ट योजना राबवून पाणी त्या फार्म हाऊसवर नेलेलं होतं. तिथं सहा एकर जमीन सपाट करून त्यात बागाईत केली होती. मागच्या बाजूला कोकण कृषी विद्यालयातून सुधारित अशा हापूस आंब्याची कलमे आणून लावली होती. तिसऱ्या चौथ्या वर्षीच आंब्याला मोहोर आला होता. शिवाय चिक्कू, काजू आणि नारळाची झाडं ओळीनं लावली होती. फार्म हाऊसच्या व्हरांड्यात बसले की समोर राधानगरीचा विस्तीर्ण असा निळाभोर तलाव दिसत असे. डांगरेची शेतीही त्याच तालुक्यात होती. सत्ता आणि पैसा यांच्या जोरावर महत्त्वाकांक्षी काय वाट्टेल ते

करू शकतात याचं ते फार्महाऊस हे उदाहरण होतं.

त्या शुटिंगच्या वेळी तिनं विक्रमला अक्षरश: मोहवून टाकलं. ती म्हणाली,

"जगावं पुण्या-मुंबईत पण मृत्यू मात्र अशा निवांत जागी यावा!"

त्यावर विक्रम म्हणाला होता. "तुम्हाला हवे तितके दिवस इथं येऊन राहा की."

विक्रम तसा दिसायला हँडसम होता, पण बापाच्या सत्तेची गुर्मी चढल्यासारखं त्याचं वागणं होतं. त्यामुळं त्याच्याजवळ फार काळ मित्र टिकत नसत.

आता संग्रामलाही त्याचं बोलणं-वागणं बिलकूल आवडलेलं नव्हतं. आता इथून परतल्यानंतर या विक्रमशी सलगी वाढवायची नाही असा त्यानं नकळत निर्णयही घेऊन टाकला होता.

विक्रम आणि पुष्पा फ्रंटला बसले होते. बसल्या बसल्या तो आपला डावा हात पुष्पाच्या मांडीवर ठेवून उजव्या हाताने ड्रायव्हिंग करत होता. संग्राम असहायपणे ते सर्व पहात होता. पुणे, मुंबई हायवेवरून बेफाम गतीनं वाहनं येत जात होती. उलट रस्ता मोठा झाल्यामुळं लोक बेपर्वाईनं ड्रायव्हिंग करीत होते. संग्रामलाही झुंजाररावांनी फार लहान असल्यापासून ड्रायव्हिंग शिकवलेलं होतं. पण अनेक वेळा ते त्याला सांगत, "हे बघ संग्राम, तीन गोष्टींशी आपण कधी मस्ती करायची नाही. एक पाणी, दुसरं अग्नी आणि तिसर यंत्र! मोटार हे यंत्रच आहे. याच्याशी देखील फार मस्ती करू नये!"

नेमकी तीच आठवण संग्रामाला झाल्याने तो हळू आवाजात विक्रमला म्हणाला,

"विक्या, फार वेगात चालवू नको रे!" मान किंचित तिरकी करून विक्रम म्हणाला,

"तुझी कुंडली एकदा मला पहायला हवी. गाडी जोरात चालवू नको, व्हिस्की पिऊ नको, माईल्ड ड्रिंक्स घेत जा, अशा शामळू माणसासारख्या सूचना सारख्या करीत असतोस!"

त्यावर पुष्पा म्हणाली, "त्यात त्यांची काय चूक आहे? कोणीही व्यवहारी माणूस असाच सल्ला देणार!"

"पण तो ऐकायचा की नाही हे मी ठरवणार! संग्राम तुझी आणि या पुष्पाची रास बहुधा एकच असावी. हिलाही मी व्हिस्की घेतल्याचं आवडत नाही. पण पुष्पे, आपण फार दिवसांनी आज भेटतो आहोत, मी आज 'ब्लॅक ॲण्ड व्हाईट' आणलीय दोराबजीच्यातून! ती तुलाही थोडी प्यावी लागेल!"

पुष्पा हसली आणि म्हणाली, "अगोदर हॉटेलवर तर सुखरूप घेऊन चल!"

शेवटी एकदाचं लोणावळा आलं. विक्रमला रस्त्यावरच्या पोलिसानं शिटी मारून थांबवलं. आणि म्हणाला,

"आमच्या इन्स्पेक्टर साहेबांच्या सूचना आहेत. ड्रायव्हरने मद्य घेतले आहे का हे पाहिल्याशिवाय गाडी पुढे सोडायची नाही."

"कोण आहेत ट्रॅफिक इन्स्पेक्टर?"

"तळेकरसाहेब!"

"हां हां ऽऽऽ ते बॉडीबिल्डर आहेत ते?"

"हो तेच!"

"चला, फार दिवस झाले त्यांनाही भेटून! संग्राम, ते आपल्या राधानगरीला प्रोबेशनर म्हणून सहा महिने होते बघ, तेच तळेकर!"

संग्राम म्हणाला, "मी ओळखत नाही त्यांना!"

गाडी ट्रॅफिक सेंटरसमोर थांबली. आतून ट्रॅफिक इन्स्पेक्टर तळेकर बाहेर आले. विक्रमला पहाताच, "हॅलो डोंगरे साहेब!" असं म्हणत त्यांनी चक्क विक्रमच्या हातात हात

दिला.

"तुम्ही काय प्रोहिबिशन फार स्ट्रिक्ट करण्याचं ठरवलेलं दिसंतय!" विक्रम म्हणाला.

"तसं काही नाही, लोणावळ्याला यायचं म्हणजे दारू प्यायलाच यायचं, आणि येतानाही थोडी टाकूनच यायचं अशी सवय असते कित्येकांना, म्हणून ही तपासणी!"

"आमची घ्या तपासणी, आम्हाला लवकर जाऊ द्या हॉटेलवर! या पुष्पाला उद्याला बॉम्बेला जायचंय शुटींगसाठी!"

"मुंबईला काय प्रत्येक दहा पंधरा मिनिटाला ट्रेन्स आहेत. आरामात उद्या जाऊ शकतात."

इन्स्पे. तळेकरांचा निरोप घेऊन विक्रमने हॉटेल हिलटॉपचे नागमोडी वळण ओलांडून गाडी हॉटेलच्या पोर्चमध्ये आणली. तिथल्या रिसेप्शनिस्टने विक्रमला सॅल्यूट केला. गाडी पार्क करण्यासाठी विक्रमकडून गाडीच्या किल्ल्या घेतल्या.

विक्रम, पुष्पा आणि संग्राम लिफ्टने तिसऱ्या मजल्यावर आले. विक्रमने बॅगा घेऊन येणाऱ्या रूमबॉयला खिडक्या उघडायला सांगितले. खिडक्या उघडताच पश्चिमेकडून गार वाऱ्याची झुळूक आली. संध्याकाळ होताच आकाशात एक-एक तारका उमटू लागली. पुष्पा बाथरूमला जाऊन आल्यानंतर म्हणाली, "विकी, मी नेहमी ड्रिंक्स घेण्यावर टीका करते म्हणतोस ना. पण आज मी इथल्या बारमध्ये थोडी कोनॅक ब्रँडी घेणार आहे."

"वा ऽऽऽ वंडरफुल! कशामुळं तुझ्यात एवढं ट्रान्सफॉर्मेशन झालं?"

"अरे गेल्या आठवड्यात आमचे युनिट शूटींगसाठी माथेरानला गेले होते. तिथं एक फ्रेंच जोडपं हनीमूनसाठी आलेलं होत. त्या फ्रान्सिस्काची अन् माझी मैत्रीच होऊन गेली. तिनं मला प्रथम कोनॅक दिली. खरंच मला ती फार आवडली."

"नो प्रॉब्लेम, इथल्या बारमधून आपण मागवू."

विक्रमनं ब्लॅक ॲण्ड व्हाईटची बाटली उघडली. पुष्पासाठी हिलटॉपच्या बार मधून 'कोनॅक' मागवली. आणि त्यानं गच्चीत उभा असलेल्या संग्रामला विचारलं.

"वॉट अबाऊट यू संगू?"

"मी एक ग्लास बिअर घेतो."

"बीअर कसली पितोस? ही पुष्पा बघ ब्रँडी घेतेय!"

"घेऊ दे. पण मला फक्त बीअरच दे."

संग्रामाला मद्य नवीन नव्हतं. फार वर्षापासून झुंजारराव घरी ड्रिंक्स घ्यायचे, पण त्यांनी कधी दीड पेगच्यावर एक थेंबही कधी घेतला नाही. ते गमतीनं म्हणत, "संग्राम तुला एक सांगून ठेवतो. तेव्हा मी जगात असेन किंवा नसेन पण या बाटलीबाईच्या नादी एवढा लागू नकोस. ही बाटलीबाई कोणाचा केव्हा घात करील सांगता येत नाही."

घरात झुंजारारावांच्या व्हिस्कीच्या, रमच्या बाटल्या नेहमी असायच्या. पण संग्रामला त्यातून डॅडींना नकळत कधी एखादा पेग मारावा असं वाटलं नव्हतं. मित्रांनी फारच आग्रह केला तर तो ग्लासभर बीअर मात्र घेत असे. पण बीअरचे त्याला कधी आकर्षण वाटलं नव्हते.

आज लोणावळ्यातही तो विक्रमच्या आग्रहाला बळी पडला नाही. विक्रम मात्र ताळतंत्र नसल्यासारखा मध्यरात्र होईपर्यंत पीतच राहिला. पुष्पाही एक दोन पेग ब्रँडी घेतल्यावर विक्रमला म्हणाली,

"अरे, आता पुरे कर. तू आख्खी बाटली संपवणार आहेस का? मला भूक लागलीय. जेवण मागव, संग्राम तू जेवणार नां?"

"हो, हो. मघापासून याला सांगावंसं वाटत होतं. पण तू सांगितलंस बरं केलंस!"

विक्रमचा मूड एकदम 'ऑफ' झाला. तो म्हणाला, "पुष्पे साले, तू या संग्यावर भाळलेली दिसतेय? मी तुला इथं घेऊन आलोय. तो नव्हे. पण साली तुझी जातच कॉलगर्लची! जेवतेस कुठं? अगोदर डान्स करून दाखव! अगदी न्यूड डान्स!"

पुष्पा किंचित क्रोधानं म्हणाली,"विक्रम, तुझी दादागिरी बंद कर. मी आज नाचणार नाही!"

"तुझ्या बाप नाचेल रांडे!"

विक्रमनं 'रांडे' हा शब्द उच्चारताच पुष्पानं पुढं होऊन त्याच्या थोबडीत मारली. दोघांची झोंबाझोंबी सुरू झाली. बिचाऱ्या संग्रामला समजेना काय करावं? तो विक्रम आणि पुष्पाला ओढून अलग करू लागला. पण विक्रमच्यातला सैतान जागा झाला होता. त्यानं संग्रामला दूर ढकललं आणि पुष्पाच्या साडीला हात घातला. म्हणाला, "साले, तुला नागडी करून नाचायला लावतो."

संग्राम अक्षरश: भांबावून गेला होता. क्षणभर त्याला वाटले ओरडून हॉटेलच्या लोकांना बोलवावे. पण तोवर संग्रामनं पुष्पाची साडी फेडली होती. त्यानं तिच्या बिकिनीलाही हात घातला होता. ती विक्रमला ओरडून म्हणाली, "बदमाष माणसा, तुझ्यावर कंप्लेन्ट करते थांब!"

चिडलेल्या व्रिकमने हातातील अर्ध्या अधिक फोडलेल्या बाटलीनं पुष्पावर वार करायला सुरुवात केली. ती ओरडत होती.

तिच्यावर फुटक्या बाटलीच्या धारदार कंगोऱ्याने विक्रमने वीस-तीस वार केले. तिच्या गुप्तेंद्रियावर, स्तनावर आणि नितंबावरही त्याने वार केले. एक वार तिच्या गळ्यावर जेव्हा केला तेव्हा ती आचके देत खाली कोसळली. त्यावेळी संग्राम ओरडला, "भडव्या, मेली की ती?"

"मरू दे, मरू दे. त्याच लायकीची होती ती." असं म्हणून खुंटीवरचा ओव्हरकोट चढवून तो खाली गेला. बिचारा संग्राम भेदरून गेला. त्यानं ती फुटकी बाटली हातात घेतली, समोर पुष्पाचा निष्प्राण देह पडला होता. एव्हाना हॉटेलचे वेटर वर धावले. त्यांनी रूमच्या दरवाजातून पाहिलं. संग्रामच्या हातात फुटकी व्हिस्कीची बाटली होती आणि समोर अर्धवट नग्नावस्थेतली पुष्पा शेवटचा श्वास घेत होती.

हॉटेल मॅनेजरने तात्काळ लोणावळा पोलीस स्टेशनला फोन केला. इन्स्पेक्टर काळे दोन हेड कॉन्स्टेबल्स, आणि तीन कॉन्स्टेबल्ससह दहा मिनिटातच 'हिल टॉप'वर आले.

वेटरनी पुष्पाला विक्रमने प्रत्यक्ष मारताना पाहिले नव्हते. त्यांनी पाहिलं ते संग्रामनं हातात फुटकी बाटली घेतलेली आणि नग्नावस्थेत रक्ताच्या थोराळ्यात पडलेली पुष्पा!

पोलीस इन्स्पेक्टर काळेंनी तिथंच संग्रामला अटक केली. तो ओरडून सांगत होता "हिला मी नाही, विक्रमनं मारलंय, तो पळून गेलाय!"

पोलीस आपण आरोपी रेडहँड पकडला या समजुतीत होते!

0-0

प्रकरण १७

नर्तकी आणि त्यात सिनेमा नटी, तिच्या खुनाची वार्ता पसरायला वेळ लागला नाही. दुसऱ्या दिवशीच्या सर्व वृत्तपत्रातून ती बातमी प्रसिद्ध झाली. काही माणसं हयातभर एखादी कला जोपासत असले तरी त्यांचं नाव होत नाही. पण काही दुय्यम दर्जाचे कलावंत मरण पावले किंवा त्यांचं अपघाती निधन झाले की रातोरात त्यांचं नाव होतं. 'प्रख्यात नृत्यांगना आणि हिंदी व मराठी चित्रपट क्षेत्रातली अभिनेत्री पुष्पा सरदेसाई हिचा लोणावळ्यातील हॉटेल हिल टॉपवर खून! खुनी आरोपीला तात्काळ अटक!' खाली सविस्तर बातमी देण्यात आली होती.

पोलीस इन्स्पेक्टर दिलीप काळेंनी संग्रामला पकडल्या पकडल्या त्याची मेडिकल तपासणी करून घेतली. लोणावळ्याच्या सरकारी डॉक्टरांनी रिपोर्ट दिला, 'Accused has consumed alchohol but he is not under the influence of it. His gait is steady, pupils not dilatet.'

M.0. Lonawala

अटक केल्यानंतर संग्राम टाहो फोडून सांगत होता "मी पुष्पाचा खून केला नाही, मी निरपराध आहे."

पोलीस इन्स्पेक्टर काळे त्याच्यावर विश्वास ठेवायला तयार नव्हते. ते वार्ताहरांनी विचारल्यावर म्हणाले, "प्रत्येक रेडहँड पकडलेला आरोपी असेच म्हणत असतो. हॉटेलचे कर्मचारी मयत स्त्रीचा आरडाओरडा ऐकून जेव्हा रूमवर पोहोचले तेव्हा रूमवर आरोपी आणि शेवटचा श्वास घेणारी पुष्पा सरदेसाई यांच्या व्यतिरिक्त कोणीही नव्हते. आरोपीच्या हातात व्हिस्कीच्या फोडलेल्या बाटलीचा टोपणाकडील अर्धा भाग होता. टोक आलेल्या भागावर मृत स्त्रीच्या रक्ताचे डाग होते. ती बोलण्याच्या अवस्थेत नव्हती. आरोपीने मद्य प्राशन केले होते आणि मद्यधुंद अवस्थेतच त्याच्या हातून हा खून घडलेला आहे असे सर्वांना वाटले.

पुण्याला हॉट लाईनवर ग्रामीण भागातील एस.पी.ना वार्ता कळवण्यात आल्याने सकाळी ७-७।। च्या सुमारास ते डिवाय.एस.पी.सह लोणावळ्याला येऊन दाखल झाले.

डिवाय.एस.पी. चौधरींनी विचारले, 'वॉट इज द मोटीव्ह ऑफ द ॲक्युज्ड?' (आरोपीचा गुन्हा करण्याचा हेतू काय होता?)

"आता जो पुरावा उपलब्ध आहे त्यावरून त्याने मद्यधुंद अवस्थेतच मयतावर वार केल्याचे निष्पन्न झाले आहे."

मेडिकल सर्टिफिकेट वाचून डिवायएसपी म्हणाले, "पण डॉक्टर तर तो मद्याच्या अमलाखाली नाही असं म्हणतात."

"सर ज्यावेळी प्रत्यक्ष खून झाला त्यावेळी म्हणजे रात्री साडेबारा एकच्या सुमारास तो नक्की मद्याच्या अंमलाखाली होता. आम्ही त्याला अटक करून जेव्हा दवाखान्यात आणला तेव्हा पहाटेचे तीन वाजले होते. त्यात डॉक्टरांना उठवल्यानंतर ते म्हणाले, "आता यावेळी

त्याची मेडिकल एक्झामिनेशन करता येणार नाही. उजाडायला हवे!'' मध्यरात्रीपासून ते सकाळपर्यंत किती वेळ गेला पहा ना, जवळजवळ सात साडेसाततासांचा अवधी गेला!''

''आरोपीच्या रक्ताचा नमुना घेतला का?''

''होय सर, ब्लड स्पेशल मेसेंजरमार्फत केमिकल ॲनेलीसीससाठी पाठवण्यात आलेलं आहे. The C.A.S. report is awaited!''

एव्हाना ती वार्ता कोल्हापुरात येऊन पोहोचली होती. नुकत्याच बाळंत झालेल्या यशोमतीला ही बातमी कळू देता कामा नये म्हणून दक्षता घेण्यात आली.

पण झुंजारराव मात्र कमालीचे अस्वस्थ झाले. सरलाबाईंच्या डोळ्यातून एक सारखे अश्रू ओघळत होते. तरीही त्या हुंदके देत झुंजारारावांना म्हणाल्या, ''माझ्या संग्रामच्या हातून असं अघोरी कृत्य होणंच शक्य नाही. माझी मनोदेवता मला सांगते.''

सरलाबाईंच्यावर कधीही न खेकसणारे झुंजारराव म्हणाले, ''तुम्हीच त्याला लाडावून ठेवलेले आहे. घरात बायको बाळंत होणार आहे हे हरामखोराला ठाऊक असूनही गेले १२-१५ दिवस त्याचा पत्ता नाही!''

''पण माझं ऐका आपण सरकार, संग्रामच्या हातून हे कृत्य घडलेलेच नसावे.''

''कोणाच्या हातून घडले ते पुढे कोर्ट ठरवेल. आज प्रथमदर्शनी तरी जो पुरावा पोलीसांना मिळाला आहे, त्यात तो दारू प्यायलेला होता. त्याच्या हातात फोडलेली अर्धी दारूची बाटली होती, आणि समोर अर्धनग्न अवस्थेतली अत्यवस्थ पुष्पा सरदेसाई होती. त्या रूममध्ये त्यावेळी तिसरी व्यक्ती नव्हती. मला आता लोणावळा, पुणे अशा वाऱ्या कराव्या लागणार झालं!''

इतक्यात बातमी समजताच सुशिलाबाई आणि बेबी चंदा आल्या. त्यांना पाहून सुशिलाबाईंना हुंदका आवरेना!

''यशोमतीला समजलेलं नाही ना?''

''अजून तरी नाही; पण अशी बातमी आपण किती दिवस तिच्यापासून लपवून ठेवणार आहोत? बरं, आता डोक्याला हात लावून बसण्यात अर्थ नाही. मी आत्ताच निघतो. तरी बरं. माझ्यासोबत मंगू येतोय! तुम्ही उगाच गळा काढून रडत बसू नका. मी जातो. प्रत्यक्ष परिस्थिती पहातो आणि पुढे काय करावं लागेल ते ठरवतो.''

इतक्यात फोनची बेल वाजली.

झुंजारारावांनी रिसिव्हर उचलून कानाला लावला.

''हॅलो, झुंजारराव हिअर!''

''अहो डॅडी, मी पद्मा बोलतेय. आज सकाळी प्रादेशिक बातम्यात ऐकलं, संग्राम मोरे यांनी नर्तकी आणि अभिनेत्री असलेल्या पुष्पा सरदेसाईचा खून केला. पण डॅडी, खरं काय आहे?''

अगोदरच पद्माच्या त्या पत्रापासून झुंजारराव तिच्याशी त्रयस्थासारखे वागत होते. आता अशा परिस्थितीत तिचा फोन आल्यावर ते तुटकपणे म्हणाले, ''अद्याप मलाही डिटेल काही समजलेलं नाही. आता मी लोणावळ्याला निघतो आहे!'' असं म्हणून झुंजारारावांनी रिसीव्हर स्टँडवर ठेवून दिला.

त्यानंतर ज्यांना ज्यांना ती बातमी समजली त्यांचे फोन खणखणू लागले. बेबीचंदा फोन घेत होती आणि त्यांना सांगत होती. ''आम्हालाही अद्याप नेमकं काय घडलंय त्याची वार्ता नाही. आताच डॅडी मंगूमामांना सोबत घेऊन लोणावळ्याला रवाना झाले आहेत.'' तीही फोनवर जास्त लांबड न लावता रिसीव्हर ठेवून देत होती.

पुण्याला जेव्हा जेव्हा काही कामानिमित्त यावे लागे तेव्हा झुंजारराव रावबहादुर ठुबे यांच्या बंगल्यावर थांबत. रावबहादुरांच्या नंतर त्याचे चिरंजीव धैर्यशील आणि झुंजारराव समवयस्क होते. धैर्यशील हे संग्रामच्या लग्नाला कोल्हापूरला आले होते.

झुंजारारावांना पहाताच धैर्यशीलराव खुर्चीवरून उठले आणि म्हणाले, "मलाही आत्ता हेच समजलं? हे असं कसं घडले?"

"नेमकं काय घडलंय ते समजलेलं नाही. प्रत्यक्ष 'आय. ओ. ला' भेटल्याशिवाय समजणार नाही. (आय. ओ. म्हणजे इन्व्हेस्टिगेटींग ऑफीसर, गुन्ह्याचा तपास करणारा पोलीस अधिकारी)

"पण आपण इथपर्यंत स्वत: ड्रायव्हिंग करत आलात?"

"करणार काय, ऐनवेळी कुठला ड्रायव्हर मिळणार?"

"पण आता माझा ड्रायव्हर देतो, त्याला घेऊन जा. माझ्याकडे दोन आहेत!"

नको नको म्हणत असतानाही धैर्यशीलरावांनी चहा आणि बिस्किटं झुंजारारावांना दिली. तेव्हा झुंजाररव म्हणाले, "आता वारंवार मला तुमच्याकडे पुण्याला यावं लागेल. केस सेशन कमिट झाल्यानंतर पुण्यातच चालेल ना?"

"नो, प्रॉब्लेम, इथलेही काही फौजदारी कायद्यातले प्रसिद्ध तज्ज्ञ माझ्या परिचयाचे आहेत. ॲड. पेशवे आणि ॲड. जांभळी यांना तुम्ही ओळखत असालच कदाचित!"

"मी असाच कारणपरत्वे कोर्टात जातो. या मंगूवर फॉरेस्ट खात्याने एक खटला दाखल केलेला होता, तो मी याचे वटमुखत्यारपत्र घेऊन चालवला. आता संग्रामची केसही बहुतेक मलाच चालवावी लागेल असं वाटतंय."

"पुण्यात असताना त्याचवेळी तुम्ही लॉ पूर्ण केला असता तर एव्हाना 'फुलफेज्ड ॲडव्होकेट' झाला असता."

"सगळं खरं, पण आबांच्या अकाली मृत्यूनंतर घरची शेती पहाणारं कोणच नव्हतं ना? असो. निघतो मी,"

ठुबेंचा ड्रायव्हर अनुभवी होता. झुंजारराव गाडीत मागे पाय लांब करून बसले. मंगू पुढे ड्रायव्हरशेजारी बसला. झुंजारारावांनी डोळे बंद करून घेतले, पण आलेली आपत्ती दूर झाल्याशिवाय त्यांच्या चित्ताला स्थिरता लाभणार नव्हती!

गाडी लोणावळ्याला पोहचताच झुंजारराव सरळ पोलीसस्टेशनमध्ये गेले. त्यांनी शिपायाकडून साहेबांना निरोप पाठवला.

"आरोपी संग्राम मोरेचे वडील तुम्हाला भेटू इच्छितात म्हणून सांगा.'

दोनच मिनिटात इन्स्पेक्टर काळेंनी झुंजारारावांना आत बोलावले.

झुंजारारावांचे व्यक्तिमत्त्वच असे प्रभावी होते की एरव्ही कोणाही भेटायला आलेल्या व्यक्तीला पाहून काळे कधी उठून उभे रहात नसत, पण आज झुंजारारावांना पहाताच इन्स्पेक्टर काळेंनी खुर्चीतून उठून झुंजारारावांना अभिवादन करण्यासाठी आपला उजवा हात पुढे केला.

इन्स्पेक्टरांच्या खुर्चीसमोर बसता बसता झुंजारराव म्हणाले, "मी झुंजारराव मोरे. संग्राम माझा मुलगा, नेमका काय आरोप आहे त्याच्यावर?"

"इथल्या हिलटॉप हॉटेलवर पुष्पा सरदेसाई या हिंदी आणि मराठी सिनेमातून अभिनय करणाऱ्या नर्तिकेसह ते रहायला आले होते. परवा मध्यरात्री दारूच्या नशेत त्यांनी हातातली व्हिस्कीची बाटली फोडून त्या फुटक्या बाटलीने पुष्पाच्या सर्वांगावर सव्वीस वार केले. अतीव रक्तस्रावामुळे पुष्पा तात्काळ मरण पावली. तत्पूर्वी आरोपी आणि मयत पुष्पा यांच्यात काही

बोलाचाली झाली असावी असा अंदाज आहे. मद्याच्या नशेत हा गुन्हा घडलेला आहे.''

''पण तो हॉटेल हिलटॉपवर कोणत्या वाहनातून आला होता?''

''कोणीतरी त्यांच्या ओळखीचे गृहस्थ त्यांना तिथं सोडून गेले असं रिसेप्शनिस्टच्या जबानीत निष्पन्न झाले आहे!''

''तो गृहस्थ कोण होता याबाबतीत तुम्ही काही तपास केलात का?''

''आम्ही तो करावा असं वाटलं नाही. असेल कोणीतरी त्या दोघांना ओळखणारा सोडून जाणारा!''

''दोघांना म्हणजे!''

''संग्राम आणि पुष्पा सरदेसाई!''

''मिस्टर काळे, तुमच्या तपासकामात मला कसलीही ढवळाढवळ करायची इच्छा नाही. पण एका फार महत्त्वाच्या गोष्टीकडं तुम्ही दुर्लक्ष केलंत असं मला वाटतं. तसा मलाही फार नसला तरी थोडाफार फौजदारी कायदा समजतो. या दोघांना सोडायला आलेली गाडी कोणत्या मेकची होती याबाबत तरी चौकशी केली का?''

''हो, ती मर्सिडीज होती.''

''तो गाडी घेऊन येणारा गृहस्थ हॉटेलवरून केव्हा परत गेला?''

''मध्यरात्रीच्या सुमारास गेला असावा!''

''खाली पार्क केलेली गाडी त्याला कोणी काढून दिली?''

''ती त्यानेच काढली.''

''दॅटस् इट, मिस्टर काळे, आता माझं जरा ऐका, माझा मुलगा संग्राम याला मी अद्याप इथं भेटलेलो नाही. पण मी तुम्हाला आत्मविश्वासानं सांगतो, हा पुष्पाचा मर्डर संग्रामनं केलेला नाही. जो कोणी गाडी घेऊन आला होता त्यानंच केलेला असावा. असो. त्याबाबतीत आत्ताच चर्चा नको करायला. पण आता मला पोलीस लॉकअपमध्ये संग्रामला भेटता येईल का?''

''नाही, तो आमच्या पी. सी. रिमांडमध्ये आहे.!''

''ठीक आहे. या तुमच्या इन्व्हेस्टिगेशनवर कोणाचे सुपरव्हिजन आहे?''

''डीवाय. एस.पी. चौधरी साहेबांचे!''

''ते कुठं आहेत?''

''ते खंडाळ्याच्या रेस्टहाऊसवर थांबले आहेत, अकरापर्यंत ते इथं येतीलच!''

''ठीक आहे! ते काय म्हणतात?''

''ते म्हणतात, गाडीचा मालक कोण होता, केव्हा गाडी घेऊन परत गेला ही चौकशी आपण करायचं कारणच काय? आरोपी संग्राम त्या रूमवर होता. त्याच्या हातात व्हिस्कीची फोडलेली बाटली होती, शिवाय तो प्यालेला होता, एवढा पुरावा आपल्याला पुरेसा आहे. (bird in hand is worth two in the bush) (हातातला एक पक्षी हा झुडुपातल्या दोन पक्ष्यांपेक्षा अधिक मोलाचा असतो.)

झुंजारराव मिशीवरून पालथी मूठ फिरवीत हसले आणि म्हणाले, ''ठीक आहे, चालू द्या तुमचा तपास, मी आज मॅजिस्ट्रेटची परवानगी घेऊन संग्रामला भेटीन!''

इतक्यात झुंजारारावांना ओळखणारे पूर्वी काही वर्षापूर्वी राधानगरी पोलीस स्टेशनला असलेले ट्रॅफिक इन्स्पेक्टर तळेकर तेथे आहे. त्यांनी झुंजारारावांना अभिवादन केले. इन्स्पेक्टर काळेंना त्यांनी लगेच विचारलं, ''विक्रम डांगरेही हॉटेलवर होता ना?''

इन्स्पेक्टर काळेंची पंचाईत झाली ते म्हणाले, ''मला त्याचं नाव ठाऊक नाही!''

''अहो आता मी सांगतो ना? विक्रम डांगरेला मी फार वर्षापासून ओळखतो आहे. ही

इज ए नटोरियस बूझर! (तो कुख्यात दारुडा आहे.) मी त्यांची गाडी रोड बॅरियरवर थांबवली. तेव्हा संग्राम गाडीत मागे बसलेला होता. फ्रंटसीटवर विक्रम शेजारी पुष्पा बसलेली होती. शिवाय त्या रात्री एकदीडच्या सुमारास हा विक्रम आमचे रोड बॅरियर तोडून पुण्याच्या दिशेनं गाडी घेऊन गेला. ड्रायव्हिंग करताना तो 'झिगझॅग' चालला होता. काल मी साक्षीसाठी जुन्नरला गेलो होतो. इथं परतल्यावर हा प्रकार समजला! म्हणून तात्काळ इकडं आलो.''

झुंजाररावांना इन्स्पेक्टर तळेकरांचे कोणत्या शब्दात आभार मानावेत हे समजेना. झुंजाररावांनी जो अंदाज केलेला होता तो तंतोतंत खरा ठरला.तळेकर इन्स्पेक्टरांची हकिगत ऐकल्यावर झुंजारराव म्हणाले, ''नेमकी हीच शंका मला होती. मला वाटतं मिस्टर काळे तुम्ही या ट्रॅफीक इन्स्पेक्टर तळेकरांचा जबाब नोंदवून घ्या!''

''आमचे डीवाय. एस. पी. चौधरीसाहेब आल्यानंतर आम्ही काय करायचं ते ठरवू!''

त्यावर झुंजारराव म्हणाले, ''ते तुमचं तुम्ही ठरवा.''

इन्स्पेक्टर काळेंची चर्या खाडकन उतरली. ते झुंजाररावांना म्हणाले, ''आपण आता निघायला हरकत नाही.''

''ठीक आहे. बाहेर थांबतो मी, पण तुम्ही आणि तुमच्या वरिष्ठांनी एकदा संग्राम या प्रकाराबद्दल काय म्हणतो ते ऐकून घ्यायला काही हरकत नव्हती!''

झुंजारराव पोलीस स्टेशनमधून बाहेर पडले. मघा त्यांच्या चर्येवर जे चिंतेचं सावट होतं ते आता काहीसं मावळलं होत. संग्राम त्यांचाच मुलगा, त्याला या आरोपातून मुक्त करणं हे त्यांचं कर्तव्यच होतं.

संग्राम लहान असल्यापासून त्याच्या सवयी, आवडी निवडी त्यांना ठाऊक होत्या. संग्रामला मद्याचे फारसे आकर्षण नव्हते. केवळ कधी काळी मित्रांनी फारच आग्रह केला तर तो एखादा ग्लास बिअर मात्र घेत असे. तोसुद्धा फक्त एकच ग्लास. झुंजारराव फार वर्षापासून 'ड्रिंक्स' घेत. त्यांच्या घरी सर्व प्रकारचं मद्य असे. अगदी स्कॉचपासून ते कोल्हापुरी रमपर्यंत. ते सुद्धा काही प्रसंगानेच घ्यायचे. केव्हाही एक दीड पेगच्यावर त्यांनी थेंबही अधिक घेतलेला नव्हता.ते नेहमी म्हणत,'मद्य हे प्रमाणात घेतलं तर ते औषध असतं. त्याचा अतिरेक झाला की त्याचं विषात रूपांतर होतं.' बालपणापासून ही त्यांची शिकवण संग्रामच्या मनावर बिंबवली गेली होती. त्यामुळे दारूच्या नशेत संग्रामनं पुष्पाचा खून केला हा इन्स्पेक्टर काळेंचा तर्क त्यांना कधीच पटला नसता.

इतक्यात पोलीस ठाण्यात गडबड झाली. कॉन्स्टेबल्सनी आपल्या टोप्या ठाकठिक केल्या. डीवाय. एस. पी. चौधरी पोलीस स्टेशनला आले होते. इन्स्पेक्टर काळे आपल्या ऑफिसातून साहेबांच्या स्वागताला पुढे आले. त्यांनी साहेबांना टाचा जुळवून सॅल्युट ठोकला.

''यस, मिस्टर काळे'', हातातली 'बॅटन' काखेत मारून चौधरी साहेबांनी इन्स्पेक्टर काळेंना विचारले. ''काय कमीजास्त?''

''विशेष काही नाही. आरोपी संग्राम मोरे याचे वडील पोलीस स्टेशनला आले आहेत!''

''मोरे? म्हणजे ते समाजसुधारक म्हणून पेपरमधून ज्यांचा गाजावाजा झाला होता, तेच मोरे ना?''

''हो, बाहेर थांबलेत, आपल्याला भेटायचं म्हणतात!''

''मला? फॉर वॉट? आरोपींच्या नातेवाईकाला मी सहसा भेटत नसतो हे नाही का सांगितलं तुम्ही त्यांना?''

''तसं काही बोललो नाही, पण त्यांचा ठाम विश्वास आहे, पुष्पाचा मर्डर संग्रामच्या हातून घडलेलाच नाही.''

"प्रत्येक आरोपीच्या जवळच्यांना तसंच वाटत असतं. बरं बोलवा त्यांना, काय म्हणतात ते पाहू."

झुंजारराव आले. फरची टोपी, अंगात चौकड्याचा स्टँड कॉलरचा कोट, ओठावर करड्या पांढऱ्या मिशा, गोरा रंग, वागण्यात अदब, त्यांचं निरीक्षण करीत चौधरींनी त्यांना विचारलं.

"बोला, का येणं केलंत?"

"हेच की, संग्रामची केस! मला त्याला भेटता येईल का?"

"अहो तो पोलीस कस्टडी रिमांडमध्ये आहे. ॲज ऑफ राईट तुम्हाला भेटता येणार नाही! पण तुम्ही इतक्या लांबून आलेले आहात म्हणून ३-४ मिनिटात भेट आटपा! कॉन्स्टेबल, यांना आरोपी संग्रामच्या लॉकअप रूमकडे घेऊन जा!"

झुंजारराव म्हणाले, "थँक्स."

इन्स्पेक्टर काळे चौधरीसाहेबांपुढे अंग चोरून उभे असताना चौधरीसाहेब म्हणाले,

"मिस्टर काळे, मघा मला रेस्टहाऊसवर ट्रॅफिक इन्स्पेक्टर तळेकर भेटायला आला होता, तो म्हणतो कोण विक्रम डांगरे पाटील हा कुख्यात दारुडा संग्राम आणि पुष्पासोबत होता. आपण त्या रात्री ड्युटीवर असताना हिलटॉपकडून आलेली मर्सिडीज कार रस्त्यावरच्या बॅरीयरला धडक देऊन पुण्याच्या दिशेनं निघून गेली. तेव्हा ट्रॅफिक इन्स्पेक्टर आणि त्यांच्यासोबत ड्युटीवर असलेल्या ट्रॅफिकच्या कॉन्स्टेबल्स लोकांचा जबाबही आपणाला नोंदवून घ्यावा लागेल!"

"यस सर, मलाही तेच वाटलं होतं, पण म्हटलं आपल्याला 'कन्सल्ट' केल्याशिवाय काही निश्चित करायचं नाही."

"होऽऽऽ, शिवाय इन्स्पेक्टर तळेकर म्हणतो, ती 'मर्सिडीस' गाडी बॅरीयरला धडक देऊन पुण्याकडे गेल्या गेल्या आपण कंट्रोलरूमशी संपर्क साधून पुण्याकडे येणारी मर्सिडीज गाडी अडवावी अशा सूचना दिल्या होत्या. ही हॅज डन द राईट थिंग. पण पुढे काय झालं ते समजलंच नाही, कॉन्टॅक्ट द कंट्रोल रूम!"

इन्स्पेक्टर काळेंनी पूना कंट्रोलरूमशी संपर्क साधला.

"यस, आय एम लोणावळा इन्स्पेक्टर काळे हिअर, रात्री ट्रॅफिक इन्स्पेक्टर तळेकरनी तुमच्या ऑफीसला बॉम्बे रोडकडून येणारी मर्सिडीज गाडी रोखण्यासाठी मेसेज दिला होता, त्याचं काय झालं? काय म्हणालात गाडी मिळाली? उजव्या बाजूचा हेडलाईट फुटलेला आहे? अरे, मग हा मेसेज आमच्या पोलीस स्टेशनला का नाही कळवला? काऽऽऽय, ट्रॅफिक ऑफीसला कळवला? ठीक, ठीक, मी करतो कॉन्टॅक्ट!"

रात्री विक्रमने पुष्पाचा दारूच्या नशेत खून केल्यावर तो तात्काळ हॉटेल हिलटॉपवरून आपली गाडी घेऊन पसार झाला होता. लोणावळा सोडताना त्याने रस्त्यावरच्या बॅरियरला धडकही मारली होती. त्यामुळे त्याच्या गाडीचा उजवा हेडलॅप फुटला होता.

डीवाय.एस.पी चौधरींनी इन्स्पेक्टर काळेंना विचारले, "तुम्ही त्या बॅरियरला गाडीने धडक दिलेल्या जागेचा पंचनामा केला की नाही?"

"नाही सर! आम्हाला आत्ताच इन्स्पेक्टर तळेकरनी ती हकिगत सांगितली!"

"मग जा तात्काळ, सगळे साले एकजात बिनडोक. अरे तुमच्या खात्यात कसले बेअक्कल लोक भरलेले आहेत समजत नाही. ट्रॅफिक इन्स्पेक्टर तळेकरने तिथला पंचनामा का केला नाही? आता हायवेवर काही मार्कस् शिल्लक असतील का? जा लवकर, मीही आलोच!"

संग्रामच्या केसला अनपेक्षितरीत्या निराळेच वळण लागले. पूना ट्रफिक पोलीसांना ती मर्सिडीज गाडी त्या रात्री मिळालीच नाही. दुसऱ्या दिवशी तळेगावच्या पश्चिमेस एका सरदारजीच्या ढाब्यावर गाडी लावून विक्रम रात्रभर तेथे राहिला. दारूची नशा उतरल्यावर तो तिथून निघायच्या तयारीत असताना स्टेट ट्रॅफिक पोलिसांनी त्याला गाठले. त्याच्या मर्सिडीज गाडीचा उजवा हेडलाईट फुटलेला होता.

झुंजारराव त्या दिवशी लोणावळ्याला बेहरामच्या हॉटेलवर थांबले. या बेहराम इराण्याला होता शिकारीचा नाद. तो एकदा डी.एस.पी ब्रॅगेंझाच्या सोबत कोल्हापूरला आला होता. त्यावेळी त्याची झुंजारारावांशी ओळख झाली होती.

झुंजारारावांच्या सोबत मंगूही होता. पण त्याला बिचाऱ्याला पोलीस इन्व्हेस्टिगेशनमधल्या गुंतागुंती काही समजत नव्हत्या. फक्त धाकले सरकार ह्या बाईच्या खुनाच्या आरोपातून आता सुटतील असं वाटत होतं.

इन्स्पेक्टर काळे तात्काळ पुण्याला आले. खडकी पोलीस स्टेशनच्या लॉकअप रूममध्ये विक्रम होता. तिथल्या पोलीसांनी रक्ताचे डाग असलेले त्याचे कपडे पंचनामा करून जप्त करून घेतले होते. हॉटेल हिलटॉपवर पकडलेल्या संग्रामच्या अंगावरच्या कपड्यावर मात्र एकही रक्ताचा डाग आढळला नव्हता.

तिकडे कोल्हापूरवरून एकसारखे यशोमतीचे फोन येत होते. झुंजारराव तिला फोनवर वारंवार सांगत होते. "बेटी, सब कुछ ठीक हो जायेगा, डरो मत." झुंजारराव खुषीत असले की ते असेच 'हिंदीत' बोलत.

मयत पुष्पाच्या जखमांतून उडालेले रक्ताचे थेंब, हे ज्या ब्लड ग्रुपचे होते, त्याच ग्रुपच्या रक्ताचे डाग विक्रमच्या कपड्यावरही होते.

त्यानंतर या पार्श्वभूमीवर इन्स्पेक्टर काळेंनी, डीवाय.एस.पी चौधरींच्या समक्ष संग्रामचा सविस्तर असा जबाब नोंदवून घेतला. त्यात त्या दिवशीचा घटनाक्रम चौधरीसाहेबांसमोर निवेदन करून शेवटी तो म्हणाला.

"साहेब, मी या पुष्पाला यापूर्वी ओळखत देखील नव्हतो. त्या रात्री विक्रम ज्या तऱ्हेने स्कॉच प्याला ते बघूनच मला वाटू लागलं. तो आज स्वत:चा किंवा दुसऱ्या कोणाचा तरी घात करणार. म्हणून साहेब मी त्या रूममधून बाहेर गच्चीत येऊन बसलो. तो पुष्पाला म्हणाला, "अंगावरचे सगळे कपडे काढून न्यूड डान्स कर" ती नाही नाही म्हणत होती. उलट त्याने तिला घाणेरड्या शिव्या दिल्या. पुष्पाने त्याच्या थोबाडीत मारली. त्याने तिची साडी फेडून हातातली बाटली फोडून फुटक्या बाटलीच्या कंगोऱ्यानी अर्धनग्न पुष्पावर सपासप वार करायला सुरुवात केली. पुष्पा खाली रक्ताच्या थारोळ्यात कोसळली. तेव्हाच विक्रम थोडासा भानावर आला. आपण पुष्पाला ठार मारल्याचे पाहून तो हातातली बाटली तेथेच टाकून रूमचे दार उघडून जिन्यावरून घाईघाईने खाली उतरला. मी गच्चीचा दरवाजा उघडून आत आलो. शेवटचे आचके देणाऱ्या पुष्पाच्या तोंडात पाणी घातले. ती फुटकी बाटली घेऊन खाली मॅनेजरला सर्व प्रकार सांगावा असं ठरवलं. तोच हॉटेलच्या ३-४ वेटरनी मीच पुष्पाचा खून केला म्हणून मला पकडलं. पुष्पाचा खून विक्रमनं केलेला आहे. मी नाही!"

संग्रामचा तो जबाब ऐकून डीवाय.एस.पी चौधरी म्हणाले, "बघा मिस्टर काळे, तुम्ही घाई गडबडीने, या संग्रामवर आरोप ठेवणार होता. बरं झालं ट्रॅफिक इन्स्पेक्टर तळेकरने सत्य काय आहे हे आपल्या निदर्शनाला आणले."

तिकडे विक्रमच्या मेडिकल तपासणीच्या वेळी त्याचेही रक्त काढून घेण्यात आले. पण विलंब झाल्यामुळे त्याच्या रक्तात अल्कोहोल सापडलेच नाही. संग्रामने मात्र हॉटेल

हिलटॉपवर एक ग्लास बीअर घेतल्याने त्याच्या तोंडाला थोडा वास होता. तेवढ्याने तो दोषी ठरणार नव्हता.

0-0

प्रकरण १८

'पुष्पा सरदेसाईच्या खून तपासाला वेगळीच कलाटणी!' या शीर्षकाखाली वृत्तपत्रातून सविस्तर बातमी प्रसिद्ध झाली. त्या बातमीत पुढं म्हटलं होतं. 'परवा अभिनेत्री पुष्पा सरदेसाई हिच्या खून प्रकरणी ज्या संग्राम मोरेला अटक करण्यात आली होती, त्याला सरकारतर्फेचा प्रत्यक्ष पहाणारा साक्षीदार बनवण्यात आले.' त्या बातमीत ट्रॅफिक इन्स्पेक्टर यांनी तातडीने बजावलेल्या ड्युटीचा उल्लेख करण्यात आला. ट्रॅफिक इन्स्पेक्टर तळेकर यांनी वायरलेसवर कंट्रोलरूमला दिलेल्या मेसेजमुळे आरोपी विक्रम डांगरे पाटील याची मर्सिडीज गाडी तळेगाव येथे पकडण्यात आली, त्यावेळी आरोपी विक्रम डांगरेपाटील प्यालेल्या अवस्थेत सापडला नसला तरी त्याच्या गाडीचा उजव्या बाजूचा हेडलाईट फुटलेल्या अवस्थेत होता, त्याचे अवशेष लोणावळा येथील बॅरियरजवळ सापडले. ते गाडीशी तंतोतंत जुळले. आरोपी विक्रमच्या अंगावर जे रक्ताचे डाग सापडले ते मयत पुष्पा सरदेसाईच्या रक्ताच्या ग्रुपशी जुळले. या परिस्थितीजन्य पुराव्याला भक्कम असा पुरावा लाभला तो संग्राम मोरे याच्या जबानीमुळे!

बेहराम इराणीच्या लॉजवर मुक्काम करणाऱ्या झुंजारराव मोऱ्यांनी ही वृत्तपत्रातली बातमी वाचली आणि ते मंगूला म्हणाले, "बघ, सत्य कसे आपोआप उजेडात येते!"

"व्हय सरकार, हे सगळं तुमच्यामुळे घडलं!"

"माझ्यामुळे कसं घडेल? केव्हा ना केव्हा इन्स्पेक्टर काळेंना संग्राम निरपराध आहे हे समजणारच होते, फक्त ते कोर्टात चार्जशीट जाण्याअगोदर समजलं ते बरं झालं. आता यशोमतीला आणि सरलेला ही बातमी फोन करून कळवायलाच हवी."

इकडे कोल्हापूरला नुकत्याच बाळंत झालेल्या यशोमतीला खात्री होती, की संग्रामच्या हातून असे दुष्कृत्य कधीही घडणार नाही. सरलाबाईंनी गेल्या सहासात दिवसात आपले देव पाण्यात घालून ठेवले होते. त्यांना वाटले माझी देवभक्ती फलद्रूप झाली. मोरेंच्या घराण्यावर अचानक ओढवलेली आपत्ती नाहीशी झाली.

संग्रामने प्रदीर्घ असा जबाब दिला. तो घडलेल्या परिस्थितीशी अत्यंत सुसंगत असा होता. त्याचा जबाब एक्झिक्युटीव्ह मॅजिस्ट्रेट समोर नोंदवण्यात आला.

सकाळी साडेदहाच्या सुमारास डीवाय. एस.पी. चौधरी आणि इन्स्पेक्टर काळे बेहरामच्या लॉजवर झुंजारारावांना भेटायला आले. त्यांना पाहून झुंजारराव आश्चर्यचकित झाले.

सगळेजण समोरच्या हिरवळीवर वेताच्या खुर्च्यांवर बसले. चौधरी डीवाय.एस.पी. झुंजारारावांना म्हणाले,

"माफ करा मोरे सरकार, आम्ही सुरुवातीला तुम्हाला जे बोललो ते विसरून जा!"

हसत हसत झुंजारराव म्हणाले, "काय म्हणालात तुम्ही हे मी विसरूनसुद्धा गेलो."

"आम्ही म्हणालो प्रत्येक आरोपीच्या बापाला आपला मुलगा निरपराध आहे असेच वाटते. शिवाय आम्ही तुम्हाला काही प्रमाणात अपमानास्पद वागणूकही दिली. पण जेव्हा सत्य उघड झालं तेव्हा त्वरित आम्ही आमच्या चुका दुरुस्त केल्या. मला तुम्हाला भेटून तुमची माफी

मागायची होती.''

वाय.एस.पी. चौधरींनी जोडलेले हात आपल्या हातात घेत झुंजारराव म्हणाले,

''साहेब, आजकाल तुमच्यासारखा सुसंस्कृत पोलीस अधिकारी दुर्मिळ!तुम्ही काय अन् हे इन्स्पेक्टर दिलीप काळे काय, तुम्ही दोघांनीही संग्रामला 'आय विटनेस' करण्याचा जो निर्णय घेतला तो अगदी रास्त होता.''

जिल्ह्याचे वरिष्ठ पोलीस अधिकारी आपल्या लॉजवर आल्याचे पाहून बेहराम, वेटरला घेऊन गार्डनमध्ये चहा, बिस्किटं घेऊन आला. बेहरामचा रंग लालभडक होता. डोक्याचे केसही पिंगट होते. मुंबईत बरीच वर्षं तो टॅक्सी चालवत होता. पण महायुद्धानंतर मुंबईचं स्वरूप झपाट्यानं बदलू लागलं होंतं. दिवसेंदिवस मुंबईत बाहेरून येणाऱ्यांची संख्या वाढत चालली होती. गुन्हेगारीच्या प्रमाणातही भरमसाठ वाढ झाली. ज्या दिवशी बेहरामने बाराशे रुपयांचा धंदा केला, त्या रात्री दहाच्या सुमारास तो ताडदेव इथल्या आपल्या चाळीकडे परत जात असताना दिव्याच्या उजेडात एका पॅसेंजरने टॅक्सीला हात केला. बेहराम दिवसभर टॅक्सी चालवून कंटाळला होता. क्षणभर त्याला वाटलं आपण आता भाडं न करता सरळ घराची वाट धरावी. पण बेहराम सज्जन होता. त्यानं ब्रेक दाबला. थांबलेला पॅसेंजर म्हणाला,

''बाम्बे आस्पताल जाना उधर मेरे भाईकी हालत बहोत खतरेमे है! अभी अभी फोन आया था!''

बेहरामने आपल्या डाव्या बाजूचे दार उघडले. तो पॅसेंजर आत आला. गाडी चालू होताच त्याने खिशातला खटक्याचा रामपुरी चाकू बेहरामच्या मानेला लावला. तो म्हणाला ''गाडी बाजूमे लो!, कॅश निकालो! अगर जिंदा रहना चाहता है तो चिल्लाओ मत!''

बेहरामने त्यादिवशी कमावलेले साडेबाराशे रुपये त्या गुंडाच्या हवाली केले. पुढच्या ट्रॅफिक आयलंडजवळ टॅक्सी थांबताच तो भामटा दार उघडून पळून गेला.

बेहराम रात्रभर विचार करीत होता. आता यापुढं मुंबईत रहायचे नाही. प्रामाणिकपणे कष्ट करून खाणाऱ्याचे हे शहर राहिले नाही. आपण लोणावळ्याला जावे, वडिलांचे जुने घर आहे, तेथे लॉज टाकावा, पोटापुरते पैसे निश्चित मिळतील. पूर्वी टॅक्सी ड्रायव्हर म्हणून काम करताना अनेक पोलीस अधिकाऱ्यांशी त्याची ओळख झालेली होती. फक्त लॉज काढल्यापासूनच पोलीस खात्याशी त्याचा संपर्क तुटला होता. आज अचानक डीवाय.एस.पी. चौधरी आणि इन्स्पेक्टर काळे आल्याचं पहाताच त्याने त्यांना चहा पाजायचं ठरवलं.

बेहरामची अन् आपली जुनी ओळख आहे असे सांगताच चौधरींनी विचारले,

''ती कशी काय?''

ब्रॉगेंझा डी. आय.जी. असताना दाजीपूरला शिकारीला यायचे. एकदा सोबत हा बेहरामही आला होता. माझी त्याची जानपहेचान झाली. पुढे त्यानं मुंबई सोडून लोणावळ्याला लॉज टाकल्यानंतर तो मला वारंवार रहायला या म्हणायचा, पण तो योग काही येत नव्हता, तो मात्र आता आमच्या संग्रामनं आणला.''

डीवाय.एस.पी. चौधरी झुंजारावांना कायदेशीर ज्ञान आहे हे समजताच म्हणाले.

''मिस्टर मोरे, खरे तर तुम्ही मोटार धंद्यात शिरण्यापूर्वी वकिलीतच जायला हवे होते.''

''बघू, अलीकडं मलाही 'लॉ' पूर्ण करावं असं वाटू लागलंय! पन्नाशी आली असताना वकील होणं म्हणजे हास्यास्पद आहे असंही वाटतं!''

इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर डीवाय.एस.पी.नी झुंजारावांचा निरोप घेतला.

आता लोणावळ्यातलं काम आटोपलं होतं. कोल्हापूरची ओढ लागली होती. पण पुण्यात धैर्यशील ठुबेंच्यात एखादी संध्याकाळ काढावी लागणार होती. जाण्यापूर्वी ट्रॅफिक

इन्स्पेक्टर तळेकरांचे आभार मानून झुंजारराव मंगूसह पुण्याला रवाना झाले.

लोणावळ्याला येताना झुंजारारावांच्या डोक्यावर प्रचंड ओझं असल्यासारखं वाटत होतं. जाताना ते संपूर्णत: उतरलं होतं.

"मग काय मंगूऽऽऽऽ जावाई या आरोपातून सुटावा म्हणून तुझ्या बिरोबाला साकडं घातलं होतंस की नाही?" जाता जाता झुंजारारावांनी मंगूला विचारलं.

"सरकार तुमाला सांगितलं तर खरं वाटणार न्हाई, पर मी बिरोबाला बकरं कापून शंभर मानसं जेवायला घालीन असा नवस केला होता."

"मलाही जेवायला बोलव त्या जेवणाला!" हसत हसत झुंजारराव म्हणाले. ठुबेंनी दिलेला ड्रायव्हर पुण्यातलाच होता. त्यामुळे तो इतर ड्रायव्हरपेक्षा अधिक शहाणा आणि जाणकार होता. संग्रामच्या केसला कसे अचानक वळण लागले ते त्याला समजले होते. तो म्हणाला,

"सरकार, संग्रामबाळ यापुढं एकदम बदलून जातील! त्यांच्या स्वभावात नक्की बदल घडेल!"

"अगदी बरोबर बोललास! अरे या सहकारी साखर कारखान्याशी संबंधित पोरांशी संगत करू नको असं कित्येक वेळा मी त्याला बजावलेलं होतं, पण आता त्याला चांगलाच झटका बसला! आमच्या बायकोनंच संग्रामला नको इतकं स्वातंत्र्य दिलं होतं. तरी त्याचं लग्न झाल्यापासून तो थोडासा बदललाही होता. पण या विक्रम डांगरे पाटील सोबत लोणावळ्याला त्यानं यायला नको होतं. जन्मभर त्याला हॉटेल हिलटॉप आठवत राहील."

दोन्ही बाजूंनी भरधाव गाड्या जात येत होत्या. रस्ते बंद करण्यात आल्यामुळे 'वन वे' ट्रॅफिक सुरू होतं. तरीही ठुबेंचा ड्रायव्हर अत्यंत सावधानतेनं गाडी चालवत होता. ते पाहून झुंजारराव त्याला म्हणाले, "साठपेक्षा सत्तर पंचाहत्तरने या रस्त्यावर गाडी चालवायला हरकत नव्हती."

ड्रायव्हर म्हणाला, "साहेब मला मालकांनी ताकीद दिलीय, कोणाच्याही चुकीने का असेना, पण गाडीचा ॲक्सिडेंट झाला की तुला नोकरीवरून डिच्चू मिळालाच म्हणून समज! या मालकांनी माझ्या आयुष्याचं कल्याण केलंय सरकार! रहायला तीन खोल्याचं घर बांधून दिलंय, माझ्या मुलाला कलमाडी साहेबांना सांगून मोठ्या कंपनीत सर्व्हिस लावली. मुलीच्या लग्नाला वीस पंचवीस हजार खर्च केले. मी त्यांची नोकरी डोळ्याला दिसेपर्यंत करणार!"

झुंजारराव म्हणाले, "बघ मंगू, प्रामाणिकपणा कसं जन्माचं भलं करत असतो!"

"सरकार, तुम्हाला एक विचारलं तर राग नाही ना येणार?" ड्रायव्हर म्हणाला.

"बेशक विचार"

"एवढे तुमचे नातेवाईक, मित्रपरिवार मोठा असताना तुम्ही मंगू धनगराला कसा काय सोबत आणला?"

"मंगू धनगर? अरे हा माझा व्याही आहे व्याही! याचीच लेक यशोमती माझी सून आहे."

"अरे बापरे, चुकलो हं सरकार! तरीच मागे आमच्या साहेबांनी तुमच्या चिरंजीवांच्या लग्नाचे वर्णन केले होते! तर हेच तुमचे व्याही काय?"

"म्हटले तर व्याही, म्हटलं तर जिवाभावाचा दोस्त! आपला जीव धोक्यात घालून माझे प्राण वाचवणारा माझा निस्सीम भक्त!"

बोलता बोलता गाडी तळेगाव ओलांडून पुण्याच्या परिसरात आली तेव्हा वाहनाची वर्दळ अधिकच वाढली.

धैर्यशीलराव ठुबेंनी वृत्तपत्रातून पुष्पा सरदेसाईंच्या मर्डर प्रकरणाला अनपेक्षितरीत्या मिळालेल्या कलाटणीचे वृत्त वाचलेच होते. ते झुंजाररावांचे अभिनंदन करून म्हणाले, "बरं झालं, तुमच्यावरचं टेन्शन उतरलं. तुम्ही गेलात म्हणून बरं झालं!"

"अहो लोक असं का म्हणतात हेच मला समजत नाही! मी गेलो नसतो तरी हेच होणार होतं. मी त्या गुन्ह्याच्या तपासात कसलीही ढवळाढवळ केली नाही! ट्रॅफिक इन्स्पेक्टर तळेकरनीच खटल्याच्या तपासाला कलाटणी दिली!"

"ते सँडो तळेकर ना? मी चांगला ओळखतो त्यांना, इथं कॅन्टोन्मेंटला बरीच वर्षे होते. त्यांना व्यायामाचे भलतेच वेड आहे, म्हणून आम्ही परिचित त्यांना 'सँडो तळेकर' म्हणायचो!"

सकाळी उठून धैर्यशीलरावांचा निरोप घेऊन झुंजारराव कोल्हापूरला निघाले. काळेंच्या सांगण्यावरून संग्रामला आणखी दोन तीन दिवस लोणावळ्यात थांबावे लागणार होते.

आरोपी विक्रमची १४ दिवसाची पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली.

संग्रामला अटक झाल्याची वार्ता जेव्हा गारगोटीला पद्माबाईंना समजली तेव्हा त्यांनी सरकारांना फोन केला होता. पण झुंजारराव पद्माशी बोलले नाहीत, म्हणून पद्माबाई कोल्हापूरला आल्या होत्या.

"सरलाक्का, हे असं कसं झालं?"

"काय सांगायचं बाई, त्याची वेळ वाईट आणि चांगलीही."

"म्हणजे?"

"त्याला पोलीसांनी खुनाच्या आरोपाखाली अटक केली, आणि नंतर सोडलाही!"

"आता डॅडी आणि संग्रामबाळ कुठं आहेत?"

"तुमचे डॅडी अजून लोणावळ्यातच होते! मला मघाशी फोन आला होता."

एकाग्रतेनं ती हकिगत ऐकणाऱ्या पद्माबाई म्हणाल्या, "मलाही पेपरमधून समजत होतं, पण म्हटलं तुम्हाला प्रत्यक्ष येऊन भेटल्याशिवाय मला बरं वाटणार नाही. यशोमती कुठं आहे?"

"आहे तिच्या खोलीत, या जाऊन!"

बाळाला अंगावर पाजवताना तिने साडीचा पदर आडवा धरला होता. पद्माबाईंनी दाराजवळ येऊन विचारलं, "यश, मी आलेय, आत येऊ का?"

"याऽयाऽऽ बाळाला पाजवत होते," मुलाला मांडीवरून खाली ठेवत यशोमती पद्माबाईंना नमस्कार करण्यासाठी उठली. तेव्हा पद्माबाई म्हणाल्या "अगं बाळाला पाजताना असं मध्येच उठायचं नसतं." तरीपण खानदानी रीतीरिवाज अल्पकाळात आत्मसात केलेली यशोमती डोक्यावरून पदर घेत म्हणाली,"परवा सुशिलामावशी आल्या होत्या. चंदाबेबीच्या लग्नाचं काहीतरी चाललंय वाटतं, पण डॅडी परतल्याशिवाय आपण काही निर्णय घेणार नाही असं म्हणाल्या."

"पण बरं होईल, बेबीला एखादं चांगलं स्थळ मिळालं की मावशींच्या डोक्याला कसली चिंता नाही."

पद्माबाई बी. एड्.ला गेल्यापासून त्यांच्या बोलण्यात वागण्यात काहीसा फरक पडल्याचे जाणवत होते. पूर्वी त्यांना आपले भवितव्य काय असेल याची चिंता भेडसावत असे. झुंजाररावांनी त्यांना आधार दिला हे जरी खरं असलं तरी त्यांना वाटे की आपण सरकारांची 'मैत्रीण' असं गोंडस नाव जरी धारण केलं, तरी जग सरकारांची 'रखेली' म्हणूनच ओळखणार. शिवरामांच्या अकाली आणि अपघाती निधनामुळे त्यांच्या चेहऱ्यावर एक अस्पष्ट असं विषण्णतेचं सावट दिसे. पण या खेपेला त्याचा लवलेशही दिसला नाही. उलट डोळ्यातून

आत्मविश्वास व्यक्त होत होता.

उभ्या उभ्या यशोमती आणि सरलाबाईंना भेटून जाण्यासाठी आलेल्या पद्माबाईंना जेव्हा समजलं की मोरे सरकार कोल्हापूरच्या वाटेवर आहेत तेव्हा त्या त्यांना भेटून जाण्यासाठी थांबल्या.

दुपारी चारच्या सुमारास सरकार आले. आल्या आल्या ते यशोमतीला भेटले आणि बाळाच्या तब्येतीची चौकशी केली.

"हे आले नाहीत?" यशोमतीनं विचारलं.

"तो मागून येतोय. पोलीसांना किरकोळ तपासासाठी त्याची गरज लागणार आहे. पण आता चिंता करण्याचं कारण नाही."

पद्माबाईही त्या खोलीत आल्या. झुंजाररावांना रिवाजाप्रमाणे नमस्कार करून त्या म्हणाल्या, "डॅडी, तुम्ही गेलात लोणावळ्याला म्हणून बरं झालं!"

झुंजारराव किंचित हसून उदगारले, "प्रत्येकाला असंच वाटतंय,पण तुला सांगतो पद्मा, मी जरी गेलो नसतो तरी हेच होणार होतं. डीवाय.एस.पी. चौधरी मला लॉजवर भेटायला आले होते. ते म्हणाले, सरकार आपणाला काहीसा मानसिक ताप झाला हे खरं, पण सत्य काय आहे हे प्रकाशात आणायला खरे कारणीभूत झाले ते ट्रॅफिक इन्स्पेक्टर तळेकर!"

मग निवांतपणे झुंजाररावांनी त्यादिवशीचा घटनाक्रम सर्वांना सांगितला आणि शेवटी ते म्हणाले, "संग्रामला मी आजपर्यंत या साखरसम्राटांच्या काट्यांची संगत सोड म्हणून सांगत होतो, पण त्याला वाटायचं उगाचच आकसापोटी मी त्यांच्याबद्दल असं बोलत असतो. आता त्याला विक्रमनं चांगलाच धडा दिला. यापुढं चुकूनही तो त्या वाह्यात पोरांच्या नादी लागणार नाही. असो, पद्मा, तुझं कसं काय चाललंय?"

"ठीक आहे डॅडी, मला प्रोफेसर देशमुखांचे मार्गदर्शन मिळते, पण ते फार काळ गारगोटीत रहाणार नाही म्हणतात!"

"का? मॅनेजमेंटशी बिनसलं की काय?"

"तसं काही नाही, पण आपल्या जिल्ह्यातल्या शिक्षण क्षेत्रात राजकीय पुढाऱ्यांचा वारंवार होणारा हस्तक्षेप त्यांना पसंत नाही! He is a man of principles बहुधा हे वर्ष झालं की ते परत जातील."

"एकटेच जाणार का?"

पद्माबाई चाणाक्ष होत्या. त्या म्हणाल्या, "म्हणजे? मी नाही समजले तुम्ही मला असं का विचारलंत ते?"

"तुला काय वाटतं? मी असं का म्हणालो असेल?"

"सरांच्याबद्दल ते इथं आल्यापासून अनेक 'गॉसिप्स' उठताहेत. सर हेकेखोर आणि एककल्ली आहेत. एके ठिकाणी वर्ष दीड वर्षापेक्षा अधिक काळ त्यांना रहावंसं वाटत नाही! त्यांना नोकरीची आवश्यकताच नाही. स्वत:ची संत्र्याची मोठी बाग त्यांना वर्षाकाळी चार पाच लाख देते वगैरे वगैरे!"

"पण पद्मा, तू एका महत्त्वाच्या बाबतीत त्यांची माहिती काढलीस का?"

"कोणत्या?" पद्माबाईंनी विचारले.

"Wheather he is married or not? If married where is his wife?"

"सरांचं लग्न झालं होतं. पण बायको थोडी 'ॲबनॉर्मल' होती म्हणून सरांनी तिच्यापासून डायव्होर्स घेतला आहे. सरांनी मला सांगितलंय!"

"मला मात्र अगदी निराळंच समजलंय!"

"कोणी सांगितलं? काय समजलं?"

"अगं, आमच्या धैर्यशील ठुब्यांची सख्खी मावसबहीण होती ती!"

"मग डायव्होर्स का झाला?"

"हे बघ पद्मा, मला त्या खोलात जायचं काही एक कारण नव्हतं. शिवाय मी कोणाच्याही खासगी जीवनाबाबत कधी चौकशी करीत नसतो. सहज धैर्यशीलशी बोलता बोलता त्याच्या मावस बहिणीचा उल्लेख आला एवढंच! देशमुखानं एक लग्न केलं काय आणि दहा केली काय! मला त्याच्याशी काय कर्तव्य होतं?"

"पण मला मात्र हे ठाऊक नव्हतं."

"आता तुला हवंच असेल समजून घ्यायचं तर जा पुण्याला भेट तिला! ती पुण्यातच असते!"

"पण मी अमरावतीलाही जाऊन आले. त्यांची संत्र्याची बागही पाहिली. बागेतले ऑरेंज व्हिला हे फार्म हाऊस फार छान आहे. तिथलं फर्निचर आटोपशीर पण अप टु डेट वाटले. किचनमध्येही स्वच्छता टापटीप आढळली."

"पण बायको जवळ नसताना किचन कोण सांभाळतो?"

"कुक आहे ना? बऱ्याच वर्षापासून तो त्यांच्याकडे आहे!"

झुंजाररावांनी सर्व ऐकून घेतल्यावर ते पद्माबाईंना म्हणाले, "मग तू काय ठरवलंयस?"

"अजून मी कसलाच निर्णय घेतलेला नाही. पण वाटतं, सरांच्या ओळखीमुळं आपल्याला विदर्भात कुठेतरी शिक्षिकेची नोकरी मिळत असेल तर...?"

"त्यांच्याशी लग्न करून घ्यावं! असंच ना?"

"हो, पण त्यापूर्वी मला तुमची परवानगीही घ्यावी लागेल."

"माझी? ती कशासाठी? अगं तू आता स्वतंत्र आहेस, तुझे तू निर्णय घेऊ शकतेस! शिवाय शिवरामनीही जरूर पडल्यास पुनर्विवाह करावा असं वाटलं तर तो करावा असं लिहून ठेवलंय ना?"

"तो भला माणूस होता डॅडी! पण तुम्ही कसे, सगळ्या 'प्रॉन्स आणि कॉन्स' विचारात घेऊन निर्णय घेता! तेव्हा मला तुमचा 'ग्रीन सिग्नल' मिळायला हवा. त्याशिवाय मी निर्णय घेऊ इच्छित नाही."

"आज काही त्याची तातडी नाही ना?"

"मुळीच नाही! सर गारगोटी सोडून जायला अजून चार महिन्याचा अवधी आहे."

"ठीक आहे, तत्पूर्वी तू एकदा पुण्याला जा, धैर्यशीलच्या मावस बहिणीला भेट. तिचे अनुभव ऐक आणि मगच काय निर्णय घ्यावा हे तुझे तूच ठरव." पद्माबाई गेल्यानंतर झुंजारराव संध्याकाळी तिसऱ्या मजल्याच्या गच्चीवर आले. आरामखुर्ची टाकून बसले. जवळच मंगू होता तो म्हणाला,

"सरकार मला उदगीरला जायाला पायजे."

"का रे? कंटाळलास की काय? आता तिथं तुझं कोण आहे?"

"चार गयरं हैत, एक म्हस हाय ती गाब गेलीया, शेजारच्या म्हाकूला सांगून आलोय."

"बरं मग उद्या जा तर! खाली लेकीला भेटलास नव्हं?"

"व्हय जी!"

संध्याकाळ झाली होती. लोणावळ्याला गेल्यापासून झुंजारररावांनी मद्य घेतलेलं नव्हतं.

"मंगू, कपाटातली तेवढी लाल लेबलची बाटली आणि ग्लास घे!"

मंगू आताशी त्यांच्या सहवासात बऱ्यापैकी 'ट्रेन्ड' झाला होता. पेग भरल्यावर-

झुंजाररावांनी आपला ग्लास उंचावला.

'चिअर्स मंगू',

"रामराम सरकार", हे मंगूचे चिअर्स होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी झुंजाररावांनी आंबवड्याला शेतावर जायचा प्लॅन केला. मध्यंतरी बरेच दिवस त्यांना जाता आले नव्हते. ते कपडे करत असतानाच खालून वर्दी आली. "आपल्याला भेटायला कोणीतरी आलंय!"

"नाव विचारून घे!"

नोकर नाव विचारून आला.

"नारायणराव डांगरे पाटील."

"नारायणराव? म्हणजे विक्रमचे वडील? ते आणि आत्ता कशाला आले? बरं पाठव त्यांना वर."

नारायणराव राजकीय पुढाऱ्याच्या वेषात! खादीचा कडक इस्त्रीचा नेहरू शर्ट, डोक्याला टोकदार गांधी टोपी, खादीचेच दुटांगी धोतर, वय साधारण पन्नासच्या आसपास!

"या, या ऽऽऽ बसा."

"सरकार, तुमच्या संग्रामनं काय बरं केलं नाही!"

"का, काय केलं?"

"त्याने त्या नाचणाऱ्या पोरीचा खून केला आणि माझ्या विक्रमवर नाव घातलं."

"तसं घडलेलं नाही नारायणराव, तो खून तुमच्या विक्रमनेच दारूच्या नशेत केला. आमचा संग्राम त्याच्यासोबत गेला होता ही गोष्ट खरी, पण त्याला त्या बाईचा खून करण्याचं काही एक कारण नव्हतं!"

"तुम्ही आपल्या मुलाला वाचवण्यासाठी तसं म्हणणारच हो, पण त्यानं हे काय चांगलं केलं नाही एवढंच सांगायला आलोय मी."

"बसा शांतपणे, मी नुकताच लोणावळ्याला जाऊन आलोय, खरं काय घडले ते सांगतो तुम्हाला! मग दोष कुणाचा आहे ते तुमचं तुम्हीच ठरवा!"

झुंजाररावांनी त्या घटनेची समग्र माहिती नारायणरावांना सांगितली आणि ते म्हणाले,

"तुमचा विक्रम खून झाल्यावर आपली मर्सिडीज गाडी घेऊन पळाला. जाताना रस्त्यावरच्या अडथळ्याला त्याची गाडी धडकली. उजव्या बाजूचा हेडलॅंप फुटला. ट्रॅफिक पोलीसांनी तात्काळ पुण्याला वायरलेस केल्यामुळे त्याला तळेगावला पोलीसांनी अटक केली. तेव्हा त्यांनी तात्काळ त्याची वैद्यकीय तपासणीही केली. तो प्यालेला नव्हता, पण त्याच्या अंगावरच्या कपड्यावर जे डाग होते, ते मृत झालेल्या पुष्पा सरदेसाईच्या रक्ताशी मिळते जुळते होते. शिवाय आमच्या संग्रामचीही लोणावळा पोलीसांनी वैद्यकीय तपासणी केली, त्यात फक्त त्याच्या तोंडाला बीअरचा वास येत होता असे निष्पन्न झालेय. शिवाय संग्रामच्या अंगावर एकही रक्ताचा डाग नव्हता. हॉटेलातील वेटरनी आता विक्रमला पळून जाताना बघितल्याची साक्ष दिलीय! आता तुम्हीच मला सांगा या पुराव्यावरून खरा खुनी कोण आहे?"

नकारार्थी मान हलवून नारायणराव म्हणाले, "तुम्ही कायदा जाणणारे शिवाय तिथं जाऊन मुक्काम ठोकून खऱ्याचे खोटे आणि खोट्याचे खरे करून आला आहात. पण लक्षात ठेवा मी विक्रमला सोडवून आणणारच. जरूर पडली तर सुप्रीम कोर्टापर्यंत जाईन!"

नारायणरावांचा चेहरा लालबुंद झाला होता. ते बसल्या जागेवरून उठले आणि तरातरा

जिना उतरून निघून गेले.

झुंजारराव मंगूला म्हणाले, "बघितलंस मंगू, ही पैशाची मस्ती! गृहस्थ साधं ऐकून घ्यायलाही तयार नाही! एकदम सुप्रीम कोर्टाची भाषा करतो!"

मंगू म्हणाला, "धाकलं सरकारनं कोर्टात त्येंच्या लेकाईरुद्ध साक्ष भरल्यावर हे लईच भडाकनार म्हना!"

"तू म्हणतोस ते बरोबर आहे. पण खरं काय घडलं ते सांगायला कुणाच्या बापाची भीती आहे?"

संग्रामची केसमधून आरोपी म्हणून सुटका झाल्याचे समाधानही झुंजाररावांना लाभू शकले नाही.

दुसऱ्या दिवशी मंगूसह ते आंबवड्याला शेतावर रवाना झाले.

0-0

प्रकरण १९

मध्यंतरी ते दहाबारा दिवस शेताकडे फिरकलेच नव्हते. तरीपण त्यांनी नेमलेला विठू शेतीच्या सर्व कामावर देखरेख ठेवत होता.

"काय विठ्ठल? काय कमी जास्त?"

"सगळं ठीक हाय सरकार, मागच्या आठ दिवसाखाली आपल्या उसाच्या फडात रानडुक्कर शिरला व्हता?"

"काय सांगतोस?"

"व्हय, आजून बी तो व्हरांबळ्यांच्या फडातच हाय! बायली उसाचं निस्त बुडकं चघळून टाकतंय! अर्ध्या एकरातला लकबा व्हरांबळ्याचा ऊस गेला वाळून!"

"फॉरेस्टला कळवले नाही?"

"कळीवलंय. त्यो म्हंतो मारून टाका जावा."

मारून टाका? आनि त्या लखूवर केस करायलाही ते मागेपुढे बघणार नाहीत. इथंही फॉरेस्ट खात्याचा सगळा कारभारच भोंगळा आहे तर!

ठीक आहे, आपण करू त्या डुकराचा बंदोबस्त! मंगू तू लागलीच उदगीरला जायची घाई नको करू! त्या डुकराचा बंदोबस्त करू. मग जा! काय माझ्यावर खटला भरायचा असेल तो भरू दे फॉरेस्टरला!"

त्यावर मंगू म्हणाला, "सरकार आमच्या भागातलं कोकनी, सर्रास आताशी डुकरं मारायला लागल्यात. फारिस्टरला एक फुडची टांग दिली का झालं! गप गुमान बसत्यात!"

झुंजारराव हसून म्हणाले "चांगली युक्ती आहे त्यांची तोंडं बंद करायची! नाहीतरी या उपद्रवी प्राण्यांचा असा एक ना एक दिवस आपल्यालाच बंदोबस्त करायला लागणार आहे!"

झुंजाररावांना फॉरेस्ट खात्याचा उल्लेख केला की मस्तकशूळ उठत असे. मागे उदगीरच्या बिबळ्याच्या प्रकरणात झुंजाररावांना आणि मंगूला फॉरेस्ट खात्याने त्रास देण्याचा प्रयत्न केलेला होता.त्या बिबळ्याचे कातडेही मंगूकडून जप्त करून नेलेले होते, पण मंत्रालयातून ते झुंजाररावांना परत करण्याचा हुकूम झाल्यावर झक मारत ते कातडं झुंजाररावांना परत केलं होतं तेव्हापासूनच झुंजाररावांचं नाव निघालं की फॉरेस्ट खात्यातल्या कर्मचाऱ्यांना आवडत नसे. बरं त्यांना उपद्रव द्यायलाही ते घाबरत. आताशी झुंजाररावांना पुरता महाराष्ट्र ओळखत होता.

त्यादिवशी दुपारी लखू व्हरांबळ्याच्या उसातला डुक्कर बाहेर काढण्यासाठी पाच पन्नास आंबवडेकर जमले. झुंजाररावांनी त्यांना रस्त्याच्या बाजूने हाक्या घालायची सूचना केली. ते म्हणाले, 'हाक्यातून डुक्कर उठला की तो रस्त्याकडे न जाता पूर्वेकडे जावा." व्हरांबळ्याच्या शेताभोवताली लहान मोठे खडक अनादिकालापासून पडले होते. तसे त्या भागातल्या बऱ्याच भागात मोठमोठाले खडक जागोजागी पडून होते. झुंजाररावांच्याकडे एक 'जिऑलॉजीचे' अभ्यासक आले होते. ते म्हणाले, "पृथ्वीवर पूर्वी महाभयंकर असा ज्वालामुखी

भडकला असताना त्यातून बाहेर पडलेल्या लाव्हारसापासून हे खडक बनलेले आहेत.'' लहान मोठ्या आकाराचे ते खडक हलवणेही शक्य नव्हते. लहान लहान खडकांच्या समूहांत एखादा हत्तीच्या आकाराचा सुद्धा खडक होता.

झुंजारराव त्यातल्याच एका मोठ्या त्या खडकावर आपली थर्टी स्प्रिंगफिल्ड 'रायफल' लोड करून बसले. गावकऱ्यांना हाक्यात मार्गदर्शन करायला मंगू स्वत: सामील झाला.

''हाऽऽऽऽ हाऽऽऽऽऽ, हूऽऽऽऽ हूऽऽऽऽ'' असा तोंडाने आवाज करीत हाकेवाले लखूच्या उसातून पूर्वेकडे येऊ लागले. लखूच्या पाऊण एकर उसाच्या डागांत रात्रभर शे दीडशे उसाचे बुडखे चघळून सुस्त होऊन लोळत पडलेला तो 'एक्कूल' उठून बसला आणि त्याने कान टवकारले. हाक्याची चाहूल आपल्या रोखाने येते आहे हे त्याच्या लक्षात आल्यावर तो उठून पूर्वेकडे निघाला. हाक्या जसजसा जवळ येऊ लागला तसा तो एक्कूल आपली गती वाढवू लागला. रात्रभर उसाचे बुडखे चघळून मनसोक्त चिखलात लोळत पडलेल्या डुक्कराला आपल्याला काही तरी धोका आहे हे जेव्हा अंत:प्रेरणेनं समजलं तेव्हा त्यानं तो उसाचा फड सोडून पूर्वेच्या माळाकडं दौडायला सुरुवात केली. तो उसाचा फड सोडून दहाबारा फूट अंतरावर आला असताना, 'ठो ऽऽऽ' असा झुंजारारावांच्या रायफलचा बार त्या खोऱ्यात घुमला. हाकेवाले जिथल्या तिथे थबकले.

उसाच्या फडातून बाहेर पडलेल्या एक्कुलाच्या मानेतून रायफलची गोळी आरपार गेली होती. जागेवरच उलटा होऊन डुक्कर पाय झाडू लागला आणि काही क्षणातच शांत झाला. हाकेवाले फडातून बाहेर येताच त्यांना रक्ताच्या थारोळ्यात पडलेला एक्कुल दिसताच त्यांनी बेहोद जल्लोष केला. हाक्यातले तरुण नाचू लागले. काहींनी आपले डोक्याचे पटके काढून हवेत फडकवले. आनंद कसा व्यक्त करावा हे त्यांना समजेनासे झाले.

झुंजारारावांनी मंगूकडे रायफल दिली आणि ते खडकावरून खाली उतरले. आजपर्यंत शेकडो डुक्कर, उपद्रवी गवू रेडे, 'मॅन इटर' बिबळे टिपणाऱ्या झुंजारारावांना त्या शिकारीचं काही नावीन्य वाटलं नाही.

लोकांनी आजूबाजूचा वाळलेला पालापाचोळा, वाळलेलं गवत, पिंजर त्या डुक्करावर रचून त्याला आग लावली. डुकराच्या अंगावरचे राठ केस जाळून टाकल्याशिवाय डुकराला सोलता येत नाही. लखू व्हरांबळे, विठू माने, मंगू यांनी तो अवाढव्य प्राणी उलटा केला आणि पुन्हा त्याच्यावर दुसरा पालापाचोळा, गवत, भाताचे पिंजर पसरून त्याची मागची बाजू भाजून काढली. नंतर मंगूने आपल्या कोयत्याने जळके केस खरडून टाकले आणि त्याचं पोट फाडून अनावश्यक भाग बाहेर काढून पुरुन टाकला. नंतरचा 'प्रोग्राम' होता तो वाटे घालण्याचा. सगळे वाटेकरी ओळीने जेवायला बसतात तसे बसले. मंगूने प्रत्येकाला एक एक मटणाचा लगदा दिला. त्यात काहीजण हावरट होते. ते मंगूला म्हणाले,

''आणि जरा घाला की, घरात खानारी मायंदाळ मान्सं हैत.''

''आरं सगळ्यास्नी पुरवट्याला याला पायजे का न्हाई?''

असे म्हणेपर्यंत रायफलचा आवाज ऐकून बाजूच्या वस्तीवरची पाच पन्नास माणसं 'वाटा' मिळवण्याच्या आशेनं माळाच्या रोखानं येताना दिसली. ते पाहून झुंजारराव मंगूला म्हणाले,

''मंगू, हाकेवाल्यांना अगोदर दे, पण ती बघ जत्रा येऊ लागलीय, त्यांनाही थोडा थोडा वाटा दे!''

खेड्यातल्या लोकांना रानडुक्कराचे मटण मिळणे ही पर्वणीच असते.

विठू माने म्हणाला, ''फुडची टांग तेवडी फारिस्टरासाठी बाजूला ठिवा!''

''व्हय! व्हय!'' बाजूला थोड्या अंतरावर वेताची खुर्ची टाकून बसलेल्या झुंजाररावांच्याजवळ जाऊन मंगूनं विचारलं.

''सरकार, आपल्याला काय ठिवायचं?''

''माझ्यासाठी काही नको, पण तुझ्या लेकीला डुकराचं लोणचं आवडतंय ना? तिच्यासाठी एक किलोभर पाठवायला हवं! सरला मात्र खात नाही.''

''सुशाक्का आणि बेबीताई तरी खात्यात न्हवं?''

''बरं त्यांनाही थोडं थोडं दे पाठवून.''

असा शिकार वाटपाचा कार्यक्रम आटोपल्यावर झुंजारराव फार्म हाऊसच्या व्हरांड्यात येऊन बसले आणि मंगूला म्हणाले,

''तू राहीनास ना आजचा दिवस! संग्राम आला असला तर भेटून जा!''

खरं तर अलीकडं झुंजाररावांना मंगूशिवाय करमतच नसे. त्यालाही झुंजाररावांच्या सर्व सवयी समजल्या होत्या. आज रंकाळ्यावरच्या तिसऱ्या मजल्याच्या गच्चीत बसून 'व्हिस्की' घेताना त्यांना सोबती मंगू हवा होता. त्या शिकारीत रोमहर्षक असं काहीच घडलेलं नव्हतं. तरी पण प्रत्येक जंगली जनावरांची शिकार हे जातिवंत शिकाऱ्याला एक आव्हान असतं. ते आव्हान पार पडण्यासाठी आपण काय काय अंदाज केले, ते कसे तंतोतंत पार पडले, शिकार झाल्यावर लोकांच्या उत्साहाला आलेलं 'उधाण' याची चर्चा करण्यात सुद्धा एक आनंद असतो. हे सर्व आठवत आठवत एखादा व्हिस्कीचा पेग त्या प्रसंगाची लज्जत कशी वाढवतो, हे कोणाला सांगून पटण्यासारखं नसतं. ते ज्याचं त्यालाच अनुभवावं लागतं. त्यासाठीच सरकारांना आज संध्याकाळी मंगूचा सहवास हवा होता. मंगूनेही काही आढेवेढे घेतले नाहीत. संग्राम लोणावळ्यावरून परत आला असला तर त्याचीही भेट घेण्यास मंगू उत्सुक होता.

आज बऱ्याच दिवसानंतर झुंजाररावांनी आपली मोटारहोम बाहेर काढली होती. पण का कुणास ठाऊक मोटारहोम बाहेर काढली की झुंजाररावांना हमखास पद्माची आठवण यायची!

आजही तसंच झालं. वाघबीळ ओलांडून गाडी पाझर तलावाजवळ येताच झुंजाररावांनी बाजूच्या सपाट जागेवर मोटारहोम थांबवली.

मंगूनं विचारलं, ''सरकार एवडा मोठ्ठा एक्कूल मारलासा, खरं तुमी रंजीस का झालायसा?''

''मंगू, तुला कसं सांगायचं समजत नाही! या ठिकाणी आलो की मला पद्माची आठवण येते! आता मी पन्नाशी ओलांडलेला. घरी सरलासारखी एकनिष्ठ बायको, प्रौढ मुलगा, यशोमतीसारखी सद्गुणी सून, नुकताच मला नातूही झालेला आहे, अशा माणसानं एखाद्या तरुण विधवेवर प्रेम करावं हे जगाच्या दृष्टीनं मूर्खपणाचं ठरेल! पण खरं सांगू, मला पद्मा मनापासून आवडते. तिचं बोलणं वागणं, विनम्रता याला तोड नाही.''

''मग आज त्यास्नी बलवून तरी घ्याचंसा!'' भाबडेपणानं मंगू बोलून गेला.

''अरे तेही आता शक्य नाही. तिच्या कॉलेजातल्या अमरावतीच्या प्रोफेसर देशमुखाच्या जाळ्यात ती सापडलीय! पूर्वीसारखं तिला आताशी माझ्याबद्दल वाटत असेलच याची खात्री नाही. बरं जाऊ दे ते, चल, जाऊ लवकर घराकडे. एखादा पेग घेतल्याशिवाय हे विचारचक्र थांबणार नाही.''

मोटार व्हॅन पुन्हा सुरु केली ती कोल्हापूरच्या दिशेने धावू लागली. गाडीतसुद्धा व्हिस्कीची बाटली होती. पण झुंजारराव ड्रायव्हिंग करताना मद्याच्या थेंबालासुद्धा स्पर्श करीत नसत. शिकारीत आणि ड्रायव्हिंग करतेवेळी ज्यांनी ज्यांनी मद्य घेतलं होतं त्यांनी दुसऱ्याचे

जीव धोक्यात आणलेले होते. कित्येक प्रसंगी अशा मद्यपि लोकांनी त्या अवेळी पिण्याने स्वत:चे प्राणही गमावले होते.

मंगू काही एक कारण नसताना अचानक गंभीर झाला आणि म्हणाला, ''सरकार, तुमच्या जिवाला सूक म्हनून काडीचं न्हाई बगा!''

''अरे याचंच नाव जीवन! माणसाच्या आयुष्यात हवं तसं घडत राहिलं, तर त्या जगण्यातही मजा नाही!''

मंगूला त्या वाक्याचा अर्थ समजला की नाही कुणास ठाऊक, तो विचित्र हातवारे करीत राहिला. असं अनेक वेळा घडायचं. सरकार जसे अत्यंत व्यवहारी होते तसेच ते काहीवेळा भावनाप्रधानही व्हायचे. क्वचित प्रसंगी त्यांना कंठ दाटून आल्यासारखे होई. पण लागलीच ते स्वत:ला सावरीत. असे अनेक प्रसंग त्यांच्या आयुष्यात घडले होते. ज्यावेळी ते पद्माला गारगोटीच्या शिक्षणसंस्थेत सोडून आले तेव्हा परत येताना ते असेच काहीसे भावनाविवश झाले होते. जणू काही पद्माला आपण कायमचेच अंतरलो आहोत असं त्यांना वाटून राहिलं.

आताही तोच प्रकार झाला. त्या केर्लेच्या पाझर तलावाजवळ पद्माची आठवण येताच ते काहीसे भावनाप्रधान झाले. त्यात ती अमरावतीला प्रा. देशमुखांच्या सोबत जाऊन आल्याचे जेव्हा त्यांना समजले तेव्हा पद्मा आपल्यापासून दुरावल्याची त्यांना जाणीव झाली. ती काही सरकारांच्या नात्यातली व्यक्ती नव्हती. तरी पण काही नाती नकळत अशी निर्माण होतात की त्यांच्यापासून दुरावताना माणसाला अतोनात दु:ख होतं. झुंजारराव कोणा मित्राच्या मुलीलासुद्धा सासरी जाताना निरोप देताना उपस्थित रहात नसत.

जातिवंत शिकारी माणूस इतका भावनाप्रधान होऊ शकतो, हे कोणालाही सांगून पटणार नव्हते.

मोटार व्हॅन गॅरेजला लावून झुंजारराव आणि मंगू 'जलदर्शन' बंगल्यावर आले तेव्हा त्यांना संग्राम लोणावळ्यावरून परतल्याचं समजलं. त्यांनी हातपाय धुतले, कपडे बदलले आणि संग्रामला हाक मारली.

''काय काय झालं आम्ही इकडं आल्यानंतर? तुला आणखीन दोन तीन दिवस ठेवून कशासाठी घेतलं?''

''त्यांनी विक्रमला अटक केल्यानंतर तळेगावच्या त्या ढाबेवाल्याचा जबाब घेतला.''

''काय सांगितलं त्यानं जबाबात?''

''तो म्हणाला आमच्या ढाब्यावर तो आला तेव्हा त्याला सरळ चालताही येत नव्हतं. त्याच्या मोटारीचा उजव्या बाजूचा हेडलँप फुटलेला होता. आजची रात्र मी इथंच रहातो म्हणाला. मध्यरात्रीचा सुमार असल्यामुळे आम्ही विचार केला याला जास्त झालीय, सकाळी उतरल्यावर उठून निघून जाईल. त्याने काही खाल्लं नाही, प्याला नाही.

''फौजदारनी विचारले, त्याच्या अंगावरच्या कपड्यावर रक्ताचे डाग नाही दिसले?''

तो ढाबेवाला म्हणाला, ''साहेब, मध्यरात्रीची वेळ, आम्ही कशाला त्याला निरखून पहावं? तोपर्यंत सकाळी साडेसहाला पोलीसच आले. त्याला घेऊन गेले.''

''पण संग्राम, तुला मागे ठेवून घ्यायचं कारण काय?''

''मी जो पोलिसांच्यासमोर जबाब दिला होता, तो उद्या केस कोर्टात गेल्यावर कदाचित मी बदलेन, होस्टाईल होईन असं वाटल्यानं काळे आणि चौधरी साहेबांनी माझा एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेटसमोर जबाब नोंदवून घेतला!''

''पण मुळात तू होस्टाईल होशीलच असा कसा काय अंदाज केला त्यांनी?''

''त्यांना वाटलं की, विक्रमचे वडील सहकार क्षेत्रांतली आसामी आहे. ते माझ्यावरही दडपण आणून मला माझा पोलीसांपुढचा जबाब बदलण्यासाठी भाग पाडतील!

''होय. त्यात त्यांचीही काही चूक नाही! तुला समजलं कां विक्रमचे वडील इथं तणतणत आले होते. 'माझा मुलगा निर्दोष आहे. केवळ संग्रामला वाचवण्यासाठी त्याला आम्ही आरोपी करण्याचे कारस्थान रचले.' असंही म्हणाले. पण आता तुझा जबाब जो एक्झिक्युटीव्ह मॅजिस्ट्रेटसमोर झाला ते एका दृष्टीनं आपल्याही हिताचंच आहे. तो जबाब रेकॉर्डवर आल्यावर नारायणराव डांगरेंचंही तोंड आपोआप बंद होईल! तुला कोणत्याही परिस्थितीत तो जबाब नाकारता येणार नाही. आपण विक्रमला सहाय्य करण्यास असमर्थ आहोत हे आपोआपच सिद्ध होईल! जे होतं ते आपल्या भल्यासाठीच म्हणायचं!''

''तुमच्याकडे येऊन गेल्यानंतर ते लोणावळ्यातही आले होते. त्यांनी पुण्यातली काही राजकीय धेंडं सोबत आणली होती.''

''राजकीय धेंडांना असल्या लफड्याशिवाय दुसरी काही कामं असतात का? पण त्यांचा काही उपयोग झाला नसेल!''

''चौधरी साहेबांनी त्यांना गोड बोलून वाटेला लावलं. तरीही ते हॉटेल व्हॅली व्ह्यू मध्ये लक्झरी सूट रिझर्व्ह करून दोन दिवस तिथं ठाण मांडून होते. नारायणराव डांगरेनीच त्यांची सारी बडदास्त ठेवली होती.''

''बडदास्त ठेवायलाच पाहिजे. स्कॉच शिवाय पुण्यातले पुढारी दुसरं काहीच पीत नाहीत. मला धैर्यशील ठुबेनं सगळी कल्पना दिली होतीच.''

''डॅडी, पण काही झालं तरी मला आता खूप पश्चाताप वाटतोय! मी त्या मूर्खासमवेत लोणावळ्याला जायलाच नको होतं. जातानाच तो असा काही बोलत आणि वागत होता की त्याच्या गाडीतून मध्येच त्याला थांबवून उतरून जावं असं मला वारंवार वाटलं होतं.''

''तुझ्यावर येऊ घातलेल्या संकटाची ती अस्पष्टशी जाणीव तुला झाली असावी! आय एम शुअर यू वुईल नेव्हर रिपीट सच मिस्टेक्स! यशोमती काय म्हणते!''

''ती खूप रडली! मला म्हणाली सिनेमा नटीच्या खून प्रकरणी तुम्ही गोवले गेलात. मोऱ्यांची आजवरची प्रतिष्ठा धुळीला मिळवलीत! डॅडी, माँ, यांना, मला काय वाटलं असेल याची थोडी तरी कल्पना करा!''

मला तिच्यापुढे डोकं आपटून घेऊ की काय असं झालं होतं. आता एकदा तुम्हीच तिला समजावून सांगा. तरच तिचा माझ्यावरचा रोष कमी होईल!!''

''सांगीन, सांगीन, तू चिंता करू नको.'' झुंजारराव नारायणराव डांगरे येऊन गेल्यापासून काहीसे अस्वस्थ होते. सत्य परिस्थिती जाणून न घेता त्यांनी झुंजारराव‌ांच्यावर जे आरोप केले ते अगदीच बिनबुडाचे होते. इन्स्पेक्टर काळे यांनी डीवाय.एस.पी. चौधरींच्या मार्गदर्शनाखाली पुष्पा मर्डर केसचा तपास अत्यंत बारकाईने केला होता. त्यांनी पुण्याला जाऊन पुष्पाच्या आईचा जबाबही नोंदवला होता. त्यात तिच्या आईने सांगितले होते.

''हा विक्रम डांगरे पुष्पाच्या पूर्व परिचयाचा होता. तो अधूनमधून पुष्पाकडे यायचा. बऱ्याच वेळा पुष्पाने त्याला टाळले होते. पुष्पा त्याला 'रस्टीक' म्हणायची. पण त्यानंतर मात्र विक्रमने तिचा विश्वास संपादन केला.

त्यादिवशी तो पुष्पाला म्हणाला, ''आज सोबत माझा मित्र संग्राम मोरे आलेला आहे. मी हॉटेल हिलटॉपवर लोणावळ्याला रूम रिझर्व्ह केली आहे. आज मी जास्त पिणार नाही. संग्राम तर जास्त पीत नाहीच, मी आग्रह केला तर एखादा ग्लास बीअर घेतो. बघ तुला तो आवडेल!''

पुष्पा त्याला म्हणाली, ''त्याला आवडण्यासाठी तू आज मला लोणावळ्याला घेऊन निघालास?''

तो म्हणाला, ''तसं काही नाही, गेल्या वर्षीच त्याचं लग्न झालंय, त्याची बायको अतिशय देखणी आहे.''

''मग मी त्याला कशी आवडेन? जा तू, मी येत नाही आज.''त्यावर विक्रम म्हणाला, ''तुझा काहीतरी गैरसमज होतोय पुष्पा. तो फक्त माझ्या सोबत आला आहे असंच मला म्हणायचं होतं.''

तरीही त्यादिवशी पुष्पा विक्रम सोबत लोणावळ्याला जायला नाखुष होती. ती म्हणाली, ''तू गोड गोड बोलून मला घेऊन जातोस आणि तिथं गेल्यावर दारू पिऊन धिंगाणा घालतोस, तुझा अनुभव आहे मला.''

''अगं पण पुष्पा, तो संग्राम आहे ना सोबत! तो मला प्यायलाच देत नाही. मलाही अलीकडं दारूचा वीट आलाय, तेव्हा प्लीज पुष्पा आज नाही म्हणू नकोस.''

असं म्हणून विक्रम पुष्पाला त्या संध्याकाळी आपल्या गाडीतून घेऊन गेला. त्यावर डीवाय.एस.पी. चौधरींनी शीलाबाईंना विचारलं, ''पुष्पा अशी तरुणांना सोबत मोफत करीत असे की...?''

''ती कधी कोणाकडे पैसे मागत नसे. ते होऊनच तिला परत आणून सोडताना हजार दोन हजार रुपये देऊन जायचे!''

''म्हणजे तुमची पुष्पा कॉलगर्ल होती तर...''

''ते मला माहीत नाही, पण अलीकडं तिचे डान्सचे प्रोग्राम फारसे होत नव्हते, पिक्चरमध्येही तिला 'रोल' मिळत नव्हते.''

''शीलाबाई तुम्ही चित्रपट व्यवसायात काही दिवस होता अशी मला माहिती मिळालीय!''

''होय होते की, पण मी 'मेकअप' वूमन होते. चित्रपटवाले फार बदमाष असतात. पुष्पा लहान असताना माझ्यासोबत स्टुडिओत यायची. तेव्हा ती वयातही आलेली नव्हती. प्रोड्युसर तिला मोठ्या प्रेरमाने मांडीवर घेऊन बसायचे. सुरुवातीला मला वाटायचं वात्सल्याने ते आपल्या मुलीचे लाड करतात, पण पुढे पुढे मला त्यांच्या दुष्ट हेतूची कल्पना येऊ लागली. मी पुष्पाला माझ्यासोबत स्टुडिओत घेऊन जाणे बंद केले. ती वयात आल्यावर तिला चित्रपटातून दुय्यम भूमिका देऊ असं मला सांगितल्यानं मीही होकार दिला. अहो तिला चांगल्या चांगल्या घराण्यातून लग्नासाठी मागण्या आल्या होत्या, पण पुष्पीलाही सिनेमा आवडत होता. तिच्या बरबादीला सुरुवात तिथूनच झाली.''

''शीलाबाई, पूर्वी आपण लोकनाट्यातूनही कामं करीत होता, दादांच्या सोबतही तुम्ही काम केल्याची मला माहिती आहे.''

''दादा कोण?''

''दादा कोंडके. त्यावेळी त्यांची लोकनाट्ये गाजत होती. तमाशाला लोकनाट्य हे नाव मिळालं ते दादांच्यामुळेच...!''

''दादा देव माणूस होता. बोलायचे फार फटकळ. पण वागायला माणूस अतिशय गुणी.''

चौधरी म्हणाले,''शीलाबाई, तुमच्यामुळेच पुष्पाही डान्स करायला शिकली?''

''आता काय सांगायचं साहेब, मी तिला म्हणत होते उगाच तू या सिनेमा आणि डान्सच्या फंदात पडलीस. बारामतीतला एक बागाईतदाराचा मुलगा पुष्पीबरोबर लग्न करतो

म्हणून वेडा झाला होता. पण पोरीनं ऐकलं नाही. आता मागचं सगळं गाऱ्हाणं सांगून काय उपयोग आहे साहेब तुम्हाला? गेली बिचारी मरून, त्या वाद्यानेच घात केला तिचा.''

''वाद्याने म्हणजे कोण म्हणता तुम्ही?''

''त्या विक्रमनेच की. माझी लेक कशी का असेना, चार पैसे मिळवून मला पोसत होती. आता माझा तोही आधार तुटला!'' असं म्हणून शीलाबाई धाय धाय रडू लागली.

0-0

प्रकरण २०

झुंजारराव जरी लोणावळ्यावरून परत आले होते, तरी पुष्पाच्या खुनाच्या तपासाची प्रगती त्यांना इथूनच कळत होती. शिवाय डीवाय.एस.पी. चौधरींची ओळख झाल्यापासून वेळोवेळी ते त्यांच्याशी फोनवर संपर्क साधून होते. झुंजारारावांना शीलाबाई काळी की गोरी ठाऊक नव्हती. पण तिने पोलिसांपुढे दिलेल्या जबाबाचा समग्र वृत्तांत त्यांना संग्रामकडून नंतर समजला होता. त्यामुळे ते त्या प्रकरणात पुन्हा संग्रामचे नाव निष्पन्न होणार नाही हे समजून चुकले होते.

पद्माबाई येऊन गेल्यापासून झुंजारराव मात्र काहीसे अस्वस्थ होते. त्या प्रा. देशमुखांसोबत अमरावतीला जाऊन आलेली हकिगत स्वत: पद्माबाईंनी सांगितली होती. शिवाय उद्या बी.एड.ची परीक्षा झाल्यानंतर पद्माबाईंना प्रा. देशमुखांच्या ओळखीने विदर्भातल्या एखाद्या शिक्षण संस्थेत शिक्षिकेची नोकरी लागण्याची आशा होती.

पद्माबाईंना झुंजारारावांनी प्रा. देशमुखांनी पहिल्या बायकोला घटस्फोट कोणत्या कारणास्तव दिला हे खुलासेवर सांगितलेलं नव्हते. त्याबाबत झुंजारारावच पद्माबाईंना म्हणाले,

"मी त्या बाबतीत अधिक चौकशी केली नाही. कारण तुम्ही एवढ्या प्रा. देशमुखांत 'इनव्हॉल्व' झाल्या असाल अशी मला कल्पनाच नव्हती! तुम्हाला हवं तर जा पुण्याला आणि धैर्यशीलच्या मावसबहिणीला भेटा. तिच्याकडून तुम्हाला हवी ती माहिती मिळेल!"

झुंजारारावांनी सांगितल्यामुळं पद्माबाईंना त्यांच्या तटस्थ वागण्याची थोडी जाणीव झाली.

झुंजारराव कोल्हापूरच्या लॉ कॉलेजात जाऊन आपणाला 'एक्सटर्नली' कायद्याच्या परीक्षेला बसता येणं शक्य आहे का याची चौकशी करून आले होते. तशी परवानगी मिळू शकते हे समजल्यावर प्रश्न आला अभ्यासाचा! आणि आता पन्नाशी उलटून गेल्यावर 'स्टुडंट' बनून परीक्षा द्यायची म्हणजे मोठं कठीण काम होतं. त्याकामी त्यांनी घरातील अत्यंत सुज्ञ अशा व्यक्तीचा सल्ला घ्यायचा ठरवलं. त्यांच्या दृष्टीनं घरातली सुज्ञ व्यक्ती होती, त्यांची सून यशोमती! बाळंतपणामुळं तिच्याही शिक्षणात तात्पुरता खंड पडला होता. पण लवकरच ती एस.वाय. बी.ए.ची तयारी करणार होती. झुंजारारावांची संग्रामनं ग्रॅज्युएट होण्याची इच्छा, यशोमतीच पूर्ण करणार होती.

"तुला काय वाटतं यशोमती, मी कायद्याची परीक्षा या वयात द्यावी?"

"डॅडी, तुम्हीच नाही का मला एकदा म्हणालात, माणसानं नेहमी काही ना काही शिकत रहावं. लोक काय म्हणतील याची बिल्कूल पर्वा करू नये!"

"हो, अगदी बरोबर. म्हणूनच मी आज तुझा सल्ला घ्यायचं ठरवलं आहे. उद्याच पुण्याला जाऊन कायद्याची पुस्तकं खरेदी करून आणतो. आंबवड्याला शेतावर सकाळी एकदा गडीमाणसांना कामं वाटून दिली की दिवसभर मी मोकळाच असतो की शिवाय अलीकडं

आमच्या धाकट्या सरकारांनीही शेतीत थोडं लक्ष घालायला सुरुवात केलीय. आता माझंच मन पूर्वीसारखं एकाग्र होतं की नाही कुणास ठाऊक? पण मी मात्र निष्ठेनं अभ्यासाला लागायचं म्हणतो आहे.''

''माझं तुम्हाला प्रोत्साहन आहे डॅडी! शिवाय माझाही त्यात स्वार्थ आहेच की?''

''तुझा कसला आलाय त्यात स्वार्थ?''

''तुमची कायद्याची पुस्तकं नंतर मला बी.ए झाल्यावर उपयोगी पडतील!''

''अशा अर्थानं म्हणतेस होय! ठीक आहे.''

सरलाबाईंना पद्माबाई येऊन भेटल्या तेव्हा त्या दोघीत काय चर्चा झाली ती झुंजाररावांना समजलेली नव्हती. म्हणून त्यादिवशी दुपारी झुंजाररावांनी सरलाबाईंना माडीवर बोलावून घेतलं.

''काय म्हणत होती पद्मा?''

''ती थोडी नाराज दिसली! सरकार माझ्याशी पूर्वीसारखं वागले नाहीत असं म्हणत होती! पण काय झालंय तरी काय तुमच्या दोघांत?''

''काय व्हायचं? अहो मी संग्रामच्या केसच्या बाबतीत व्यस्त होतो. तेव्हा तिच्याकडे लक्ष द्यायला मला फुरसतच मिळाली नाही. शिवाय ती त्या अमरावतीच्या प्राध्यापकाच्या नादी लागल्याचं मला जेव्हा समजलं, तेव्हा माझ्या अपरोक्ष हिने भलतेच उद्योग सुरू केल्याचं लक्षात आलं!''

''तुम्ही तिला आजपर्यंत आधार दिलात, आपल्या कुटुंबापैकीच एक असं मानलंत आणि असं तडकाफडकी तिला तोडून टाकणंही बरं नव्हे!''

''हे बघा, त्या प्रा. देशमुखांचा धैर्यशील ठुब्यांच्या मावसबहिणीशी विवाह झाला होता. विवाहानंतर वर्षभराच्या आतच देशमुखानं तिला घटस्फोट दिला. तेव्हा मी पद्माला काय सांगितलं की तू तुझ्या सवडीनं पुण्याला जा, आणि धैर्यशीलच्या मावसबहिणीला भेट, तिला काय अनुभव आले ते विचार आणि मगच प्रा. देशमुखांशी संबंध वाढवायचे की नाही हे ठरव! मी तिच्या खासगी बाबतीत उगाच कशाला नाक खुपसू? आजपर्यंत मी तिच्यासाठी जे काही केलं, ते तिच्या भल्यासाठीच ना?''

''होऽऽऽ त्याचीही तिला पूर्ण जाणीव आहे, म्हणूनच तुमच्या या वेळच्या तुटक वागण्याने ती काहीशी दुखावली गेलीय असं मला वाटतंय!''

''असो, त्याबाबतीत आपण आत्ताच काही चर्चा करण्यात अर्थ नाही. तिने पुण्याला गेल्याशिवाय आणि धैर्यशीलच्या मावसबहिणीला भेटल्याशिवाय कोणताही निर्णय घेऊ नये असं अजूनही मला वाटतं! बरं, सुशिलाबाईंच्या बेबीच्या लग्नाचं पुढं काय झालं?''

''दोन तीन स्थळं आली होती, पण ती बेबीला पसंत नाहीत.''

''बेबीची अपेक्षा तरी काय आहे?''

''कुणास ठाऊक, सुशिलाही अलीकडे चिंताग्रस्त असते.''

''हे बघा सरलाबाई, आता माझ्यात पूर्वीसारखा उत्साह उरलेला नाही. आपण कोणाची आणि किती म्हणून चिंता करावी? आता सरळ शेतावर जाऊन रहाणार आणि बऱ्याच वर्षाची अपुरी राहिलेली कायद्याची परीक्षा देणार! यशोमतीनं मला प्रोत्साहन दिलंय.''

''यशोमती? आणि ती तुम्हाला प्रोत्साहन देणार?''

''हो, हो. माझ्या दृष्टीनं आपल्या कुटुंबात तीच एकटी समजूतदार आणि सुज्ञ आहे!''

''तुम्ही द्या परीक्षा, माझी काही हरकत नाही, पण इतक्या वर्षाच्या खंडानंतर तुम्हाला ते कितपत झेपेल याचा थोडा विचार करा.''

"खूप केला आहे! शिक्षणांत काय गोडी असते ती तुमच्यासारख्यांना समजणार नाही!"

"नाही समजो, आजपर्यंत आम्ही संसाराचा गाडा तरी नीट चालवला ना? सर्व्हिस मोटार बंद पडल्यावर किती आर्थिक अडचणी येत होत्या ते माझं मलाच ठाऊक! त्या दोन वर्षांत मी एकही नवीन साडी घेऊ शकले नाही. इतकी बाहेरची निमंत्रणं आली तरी मी कोणत्याही समारंभाला हजर राहिले नाही!"

ती वस्तुस्थिती होती. सरलाबाईंची काटकसर झुंजारराव‍ांनी पाहिलेली होती. त्यामुळे ते त्याबाबतीत काही बोलू शकले नाहीत.

त्याच सुमारास शेतातल्या वाटेकऱ्यांनी जमिनी सोडायला नकार दिला होता. म्हणून नाईलाजास्तव वाटेकऱ्यांना जवळ जवळ दोनशे एकर जमीन फुकापासरी द्यावी लागली होती.

दिवस बदलले तशी परिस्थिती हळूहळू बदलली. पन्नास एकरात पिकणारं धान्य, भाजीपाला मिळत होता. त्यामुळेच सरकार मोरे मिशांवर पालथी मूठ फिरवीत समाजात वावरत होते.

संग्रामचं लग्न झालं आणि मोरे कुटुंबीयांचं गतवैभव हळूहळू त्यांना प्राप्त झालं. सरलाबाईंना वाटलं आपल्या सुनेचाच पायगुण!

झुंजारराव‍ांनी जसे आपण खानदान कुळीतले आहोत असा कधी टेंभा मिरवला नाही, तसेच जेव्हा त्यांची आर्थिक स्थिती बऱ्यापैकी होती तेव्हाही त्यांनी गर्विष्ठपणा केला नाही. येईल त्या परिस्थितीला सचोटीने सामोरे जाणे हा त्यांचा स्वभाव होता.

दिवस चालले होते. बघता बघता सहा महिने उलटले. पद्माबाई बी.एड. झाल्या. प्रा. देशमुख अमरावतीला परत जायला निघाले तेव्हा त्यांनी पद्माबाईंना अगदी सरळसरळ सवाल केला "मग तुमचं काय ठरलं?"

पण प्रा. देशमुखांनी त्यांना असं विचारण्याअगोदर त्या पुण्याला धैर्यशीलच्या मावसबहिणीला भेटून आल्या होत्या. त्यावेळी पद्माबाईंना मृणाल ओळखत नव्हती. ती पी.डब्ल्यू.डी.त क्लार्कची नोकरी करीत होती. आपला भार कोणावरही टाकू नये असं मृणालला वाटत होतं. त्यादिवशी रविवार होता. मृणाल घरीच होती. पद्माबाई रेल्वेतून पुणे स्टेशनवर उतरून रिक्षाने, ठुबे पार्कला आल्या. धैर्यशील त्यादिवशी नगर रोडला आपल्या 'फार्म'कडे गेला होता. मृणालला पद्माबाई नावाची बाई आपल्याला भेटायला येणार याची यत्किंचितही कल्पना नव्हती.

रिक्षाचं बिल देऊन पद्माबाई ठुबेंच्या बंगल्यात आल्या. धैर्यशीलचा अल्सेशियन कुत्रा भुंकला. तो आवाज ऐकून मृणाल भाजी निवडता निवडता उठून बाहेर आली.

"कोण हवंय तुम्हाला?" मृणालनं विचारलं. किंचित स्मित करून पद्माबाई म्हणाल्या.

"मला वाटतं मला हव्या आहात त्या तुम्हीच!"

मृणालनेही किंचित हसत हसत म्हटले,

"कोठून आलात?"

"कोल्हापुरातून! माझं नाव पद्मा सावंत. आपली पूर्वीची ओळख नसताना मी तुमच्याकडे आले. मला माफ करा!"

"त्यात कसलं आलंय माफ करायचं! या आत! वॉश घ्या, मी तोवर चहा करते. मग आपण बोलत बसू!"

मृणाल वागायला अतिशय विनम्र होती. नि:संकोचपणे पद्माबाईंनी त्यांच्या बाथरूममध्ये जाऊन हातपाय धुतले आणि त्या बाहेर आल्या.

"चहा सोबत काही खाणार का?"

"उगाच तुम्हाला त्रास नको. मला चहासोबत एकाद दुसरं बिस्किट असलं तरी चालेल." मृणालनं ट्रेमधून चहा आणि बिस्किटं आणली. पद्माबाई खोलीचं निरीक्षण करून म्हणाल्या.

"इथं तुम्ही एकट्याच असता!"

"होय! माझा मावसभाऊ धैर्यशील पलीकडे रहातो. इथं मी एकटीच असते."

पद्माबाईंनी चहाचा रिकामा कप ट्रेमध्ये ठेवला. थोडा घसा साफ करून त्या म्हणाल्या.

"माझं नाव पद्मा सावंत...

....."

स्वत:ची सर्व इत्यंभूत माहिती देऊन पद्माबाई म्हणाल्या,"वास्तविक या अगोदरच मी तुमच्याकडे यायला हवं होतं. पण मी बी.एड. करीत होते. ती परीक्षा झाली. मी पासही झाले."

आपली माहिती सांगण्याच्या ओघात पद्माबाईंनी झुंजाररावांशी झालेल्या परिचयाचाही उल्लेख केला. त्या म्हणाल्या, "मी निराधार असताना मला एक देवमाणूस भेटला. झुंजारराव मोरे आंबवडेकर सरकार!"

मृणाल चटकन म्हणाली "मी ओळखते त्यांना. आमच्या फॅमिलीशी फार जुने संबंध आहेत त्यांचे. त्यांच्या मुलाचं झालेलं लग्न, त्याच्यावर लोणावळ्याला झालेल्या नटीच्या खून प्रकरणी त्याला झालेली अटक, नंतर सुटका, हे सर्व सर्व मला माहीत आहे."

"तर मी तुमच्याकडे यावे आणि तुमचे प्रा. देशमुखांशी कोणत्या कारणाने मतभेद झालेत हे समक्ष विचारावे अशी खुद्द डॅडींनीच मला सूचना केली होती." प्रा. देशमुखांच्या नावाचा उल्लेख होताच मृणालच्या कपाळावर एक अस्पष्ट अशी तिरस्काराची आठी उमटली.

मृणालनं विचारले, "त्यांची माहिती तुम्ही घ्यायचं कारण काय?"

"त्यांनीच मला लग्नाचं प्रपोजल दिलंय! "डॅडी लोणावळ्याला जाता येता इथं तुमच्या मावसभावाकडे थांबत होते. त्यांना प्रा. देशमुखांनी पहिल्या लग्नानंतर तुम्हाला घटस्फोट दिल्याचं सांगितलं होतं. त्यावेळी तेच मला म्हणाले, 'हवं तर तू जा पुण्याला आणि त्यांना भेटून नेमकं काय घडलं हे विचारून ये.' म्हणूनच मी आपला पूर्व परिचय नसताना इथं तुमच्याकडं येण्याचं धाडस केलं!"

"बरं झालं आलात, आणखी एका व्यक्तीच्या आयुष्याचं होणारं वाटोळे तरी वाचेल!"

"पण नेमकं कारण तरी काय घडलं?"

"पद्माबाई, काय सांगू, अहो असं एखादं दुसरं कारण नाही घडलं, अनेक कारणं घडलेली आहेत. तुम्ही आजचा दिवस माझ्याकडे थांबाल का? आपण निवांतपणे दुपारी जेवण झाल्यावर त्या विषयावर बोलू!"

"चालेल. पण तुमची काही गैरसोय तरी नाही ना होत?"

"बिल्कूल नाही."

बोलत बोलत मृणालने जेवण बनवले.

"तुम्हाला नॉनव्हेज चालतं ना?"

"हो, मी ते बनवते सुद्धा, पण अलीकडे शिवराम गेल्यापासून तसे प्रसंगच आले नाहीत,"

"तुमच्या डॅडींना मात्र नॉनव्हेज चालतं, हे मला ठाऊक आहे."

"अहो ते घराणंच शिकाऱ्याचं आहे. डॅडींनी तरुणपणी खूप शिकारी केल्यात. अजूनही ते तशी संधी आली की सोडत नाहीत. परवाच त्यांनी आपल्या शेतात घुसलेल्या रानडुकराची शिकार केली होती. मी त्यावेळी गारगोटीला होते, पण सरलाआक्कांनी मला डब्यातून डुकराचं लोणचं पाठवलं होतं."

पद्माबाई इतक्या बोलक्या असतील याची मृणालला कल्पना नव्हती. दुपारी दोघी मिळून जेवल्या. आदल्या दिवशी फ्रिâजमध्ये आणून ठेवलेल्या पापलेटची कढी त्यांनी बनवली. एक दोन स्लाईसेस तळल्यासुद्धा!

"मृणालताई, अगदी कोकणी पद्धतीची माशाची कढी बनवलीत, माझं सासर सावंतवाडी, तसे सावंत मंडळी नंतर सांगली जिल्ह्यात कवठेमहांकाळला जमिनी घेऊन राहू लागले. पण त्यांच्या घराण्यातले कोकणी संस्कार गेले नाहीत. आमच्या सासूबाईंना संध्याकाळी मासा नसला तर काहीतरी 'सुक्कट' तरी लागे, त्या वयाच्या सत्याऐंशी वर्षे जगल्या."

जेवणाच्या विषयातून एकमेकींच्या घराण्याचा इतिहासही चर्चिला गेला.

दुपारी मृणालच्या बेडरूममध्ये दोघी आल्या. मृणालने सांगायला सुरुवात केली.

"रावबहादूर ठुबे हे माझ्या मावशीचे मिस्टर! एके काळी त्यांना फार मान होता. राजेरजवाडे आणि संस्थानिक यांच्याकडे त्यांचे येणे जाणे असे.

माझे लग्नाचे वय झाले तेव्हा प्रा. देशमुखांचं स्थळ मला सांगून आले. रावबहादुरांच्या पत्नी थोड्या जुन्या संस्कारातील होत्या. लग्नापूर्वी त्यांनी देशमुखांच्या तीन पिढ्यांची माहिती काढली. त्यात देशमुख नुकतेच इंग्लंडला जाऊन आलेले, दिसायला अतिशय स्मार्ट, घराणं आणि मुलगा पसंत म्हटल्यावर कोणी त्यांची अधिक चौकशीही केली नव्हती, माझं त्यांच्याशी लग्न झालं."

पद्माबाईंनी विचारलं, "कुठं इथं पुण्यात की अमरावतीला?"

"आमचं लग्न झालं नागपुरात. प्रा. देशमुखांना जुन्या पद्धतीचा विवाह पसंत नव्हता, म्हणून त्यांनी रजिस्टर लग्न करण्याचा निर्णय घेतला. माझ्या मावशीचं घराणं जरी सधन होतं, तरी माझ्या वडिलांची सांपत्तिक स्थिती बेताचीच होती. त्यांनीही आमच्या 'रजिस्टर्ड' पद्धतीला काही आक्षेप घेतला नाही. लग्नानंतर आम्ही पंधरा दिवस श्रीनगरला गेलो."

"हनिमूनसाठी?"

"कसंही समजा, पण तिथं गेल्यावर मात्र देशमुखांच्या स्वभावातला एक एक अवगुण मला दिसू लागला. ते 'सॅडीस्ट' होते!"

"म्हणजे? काय करायचे?"

"मला शारीरिक वेदना दिल्याशिवाय ते कामोत्तेजक होतच नव्हते!"

"शारीरिक वेदना द्यायचे म्हणजे नेमकं काय करायचे?"

"नको त्या भागावर चिमटे काढायचे, ओरबाडायचे, माझे केस धरून ओढायचे. असं एक पंधरावीस मिनिटे केल्यावर मात्र ते नॉर्मल व्हायचे. मघाशी मला शारीरिक पीडा देणारे हेच गृहस्थ का याचा मला संभ्रम पडे!"

"माय गॉड? पण हे प्रत्येक वेळी घडायचं?"

"हो ना? माझ्या मनाची विलक्षण कोंडी होऊ लागली. त्यामुळे श्रीनगर शहराभोवतीच्या स्वर्गीय सौंदर्याचा मी आस्वाद घेऊ शकले नाही."

"पण तुमची एकशय्या तर निर्विघ्नपणे पार पडत होती ना?"

"पद्माबाई, आपले शारीरिक हाल करणाऱ्याशी कसलं आलंय संभोगाचं सुख? मी

अत्यंत अस्वस्थ व्हायची!''

''पण बेडरूमच्या बाहेर ते कसे वागायचे?''

''ते एकदम नॉर्मल वागायचे. इंग्लंडमधल्या त्यांच्या मित्र मैत्रिणी, ते ज्या शिक्षणसंस्थेत होते तिथल्या प्राध्यापकांचे स्वभाव-विशेष सांगायचे. त्यावेळी वाटायचं या एवढ्या चांगल्या वृत्तीच्या माणसाला 'सॅडीझम' चा शाप का असावा?''

पंधरा दिवसानंतर आम्ही अमरावतीला परत आलो.''

''पण मृणालताई तुम्ही ज्यावेळी ते नॉर्मल असायचे त्यावेळी त्यांना सुधारण्याचा काही प्रयत्न करून नाही पाहिला?''

''खूप पाहिला. त्यावेळी ते मला म्हणायचे 'फर्गेट अबाऊट इट डार्लिंग!''

''मी अमरावतीवरून चार दिवसासाठी म्हणून जी पुण्याला आले ती कायमचीच! मला इच्छाच होईना देशमुखांचं थोबाड बघायची! सगळ्या सगळ्यांनी मला खोदून खोदून विचारलं, ''मृणाल, तू अमरावतीला का नाही जात? पण मी त्यांना काहीच सांगितलं नाही. मलाच त्यांनी वेड्यात काढलं असतं. पद्माबाई अगदी मनातलं सांगूऽऽ?''

''जरूर सांगा!''

''जो गृहस्थ कारण नसताना आपल्याला शारीरिक पीडा देतो, अनन्वित अत्याचार करतो, त्याच्याशी कोणतीच स्त्री प्रणयही करू शकणार नाही!''

मृणालचा तो भेदक अनुभव ऐकून पद्माबाई म्हणाल्या, ''आमच्या डॅडींचं वागणं अगदी त्याच्याविरुद्ध आहे!''

''डॅडी म्हणजे झुंजारराव?''

''होऽऽऽ तेच, त्यांच्या सहवासांतले क्षण मला अजून आठवतात! वृत्तीनं एवढा कणखर पुरूष, पण आम्ही जेव्हा जेव्हा एकत्र आलो तेव्हा ते क्षण संपूच नयेत असं वाटायचं.''

''हे नव्हतं मला ठाऊक. पण सरकारांना सुस्वभावी व सतशील पत्नीही आहे ना?''

''ते का, आता त्यांच्या मुलाचंही लग्न झालंय की?''

''या वयात देखील ते तुमच्याशी असं प्रेमानं वागतात?''

''मृणालताई, एक सांगू, Man is Polygamous by nature. त्याला आपल्या हक्काच्या पत्नीच्या सहवासात जे सुख लाभत नाही ते मैत्रिणीच्या सहवासात लाभतं. मग तो पुरुष कितीही वर्षाचा असो.''

''पण तुम्ही तर म्हणालात की आपलं लग्न मेजर शिवराम सावंताशी झालं होतं!''

''हो. पण शिवरामनी मला लग्नापूर्वीच कल्पना दिली होती, ते म्हणाले होते, ''हे बघ पद्मा, तू एका सैनिकाशी, म्हणजे सैन्यातल्या अधिकाऱ्याशी लग्न करीत आहेस. आपल्याला हे वैवाहिक आयुष्य किती काळ लाभणार आहे याचा अंदाज करता येत नाही.

पण समज माझं अकालीच काही भलंबुरं झालं, तर तू योग्य अशा गृहस्थाशी पुनर्विवाह करून घे. विवाह करणं जर अशक्य असेल तर एखाद्या कर्तबगार आणि 'डिग्निफाईड' गृहस्थाला मित्र समजून उर्वरित आयुष्य कंठावंस असं मला वाटतं. कारण स्त्री कितीही कर्तबगार असली तरी आजकाल ती एकटी जगू शकत नाही.''

''हे झालं तुमच्या दिवंगत पतीचं मत, पण झुंजाररावकाकांच्या पत्नीला, सरलाताईंना तुम्ही काकांशी मैत्री केल्याचं कसं काय आवडणार?''

''अहो तेही मोठं मनोरंजक कारण आहे! संग्रामच्या जन्मानंतर दोन वर्षांनी सरलाताईंना दिवस गेले. त्यांना आपल्याला एखादी मुलगी व्हावी असं वाटत होतं. पण त्यांच्या गर्भारपणात अचानक त्यांच्यावर 'इमर्जन्सी' हिस्टेरोक्टॉमी ही शस्त्रक्रिया करावी

लागली होती. कन्याप्राप्तीची त्यांची आशा तरी कायमची मावळली. एवढंच नव्हे तर त्या शस्त्रक्रियेपासून त्यांची कामवासनाही लुप्त झाली. डॅडींचं वय होतं त्याव्âेळी फक्त ४२ वर्षांचं! रोजचा व्यायाम, फिरणं, अधूनमधून हंोणाऱ्या शिकारी, यामुळं त्यांनाही अचानक अविवाहिताचं आयुष्य कंठावं लागणार होतं. म्हणून सरलाबार्इंनीच त्यांना सांगितलं होतं "हवं तर तुम्ही दुसरं लग्न करून घ्या. मोऱ्यांच्या घराण्यात दोन दोन लग्न करण्याची परंपराच आहे" पण डॅडींना लग्नाची कल्पना पसंत पडली नाही. ते म्हणाले 'सेक्स लाईफ' म्हणजे आयुष्यातली सर्व सुखे नव्हेत. डॅडी जरी असं म्हणाले असले तरी त्यांच्यावर लादल्या गेलेल्या ब्रह्मचर्याचा नकळत विपरीत असा परिणाम होऊ लागला. भूक लागेना, झोप येईना, मित्रांचा सहवासही त्यांना नकोसा वाटू लागला होता. अशातच पुढे एक दोन वर्षांनी माझ्यावर वैधव्य कोसळले. दिरांनी मला शिवरामांच्या प्रॉपर्टीत हिस्सा दिला नाही. माहेर बऱ्यांपैकी होतं. पण तिथं जाऊन भाऊ आणि भावजया मला आपल्यात सामावून घेतील याचीही शाश्वती देता येत नव्हती. मग मी कायद्यानं मला मिळणाऱ्या प्रॉपर्टीसाठी न्यायालयात धाव घेण्याचं ठरवलं. पण त्या आधी मला मैत्रिणींनी 'झुंजारराव मोऱ्यांचा सल्ला घ्यावा' अशी सूचना केली. मी कोल्हापूरला आले. तिथं सुशिलाबाई डफळे ही माझ्या दूरच्या नात्यातील बहीण भेटली. त्यांना तर त्यांच्या नवऱ्याने टाकले होते. एक मुलीसह त्या सरलाबार्इंच्या आधारानं रहात होत्या."

"सुशिलाबाई या सरलाबार्इंच्या कोण?"

"सख्खी बहीण! पण त्या देखील मोऱ्यांच्या घरात रहात नव्हत्या. आपल्या मुलीच्या, बेबी चंदाच्या सोबत त्या राजारामपुरीत एका भाड्याच्या घरात रहात होत्या. त्यांना मी माझी व्यथा सांगितली तेव्हा त्या म्हणाल्या, "आमचे जिजाजी झुंजारराव मोरे जरी वकील झाले नसले तरी त्यांचा कायद्याचा थोडाफार अभ्यास आहे. शिवाय या भागातल्या लोकांना ते वेळी प्रसंगी मोफत सल्लाही देतात." सुशिलाबार्इंच्यामुळे मी झुंजाररावांपर्यंत पोहचले.

वारंवार होणाऱ्या भेटी गाठीतून नकळत माझ्या मनात त्यांच्याविषयी आपुलकी निर्माण झाली. त्यांनीही नि:स्वार्थीपणे माझ्यावरचा अन्याय दूर व्हावा म्हणून प्रयत्न केले. ते यशस्वी झाले. दिरांनी त्यांना दिलेल्या फक्त एका नोटिशीनेच काम केले."

"मग तुम्ही गारगोटीला बी.एड. करायला कशा गेलात?"

"डॅडीच मला म्हणाले, 'पद्मा तू एवीतेवी बीए झालेलीच आहेस. इकडे आलीस तशी बी.एड. करून घे. कुठेही तुला शिक्षिकेची नोकरी लागू शकेल. प्रत्येक स्त्रीनं आपल्या स्वत:च्या पायावर उभं रहाण्याइतपत समर्थ व्हायला हवं! शिवाय छत्रपती शाहू महाराजांनीही स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन द्यायचं धोरण अवलंबिलेलं होतं. स्वत:च्या अकाली विधवा झालेल्या सुनेला त्यांना डॉक्टर करायचं होतं, पण राणी इंदुमतीचं दुर्भाग्य, त्याच वर्षी छत्रपती शाहू महाराजांचं निधन झालं, हा सर्व इतिहास झुंजाररावांना ठाऊक होता. मी झुंजाररावांना डॅडी म्हणू लागले. कारण खऱ्या अर्थाने ते माझे Friend, philosopher and guardian होते."

"अस्सं, आता आलं लक्षात, या गारगोटीच्या शिक्षणसंस्थेतच तुम्हाला हे महाशय भेटले असणार."

"होऽऽ पण त्यावेळी मला तुम्ही सांगितलेलं काहीही ठाऊक नव्हतं!"

"मी तुम्हाला देशमुखांचा फक्त एक पैलू सांगितला. त्या अगोदर त्यांनी नगरमधल्या एका राजकीय पुढाऱ्याच्या मुलीशी लग्न केलं होतं. तिथूनच त्या मुलीचे दागिने आणि पैसे घेऊन इंग्लंड गाठले होते. तिथंही 'व्हॅलेंटिना' नावाच्या एका पोरीला नादी लावलं होतं. उत्तम पर्सनॅलिटी, इंग्रजीवर प्रभुत्व आणि खोटं बोलण्यात पटाईत, यामुळंच त्या पोरी फसल्या."

पद्माबाईंनी विचारलं, "लग्न करण्यापूर्वी तुम्हाला यातलं काहीच समजलेलं नव्हतं?"

"मुळीच नाही. समजलं असतं तर कोणी जाणूनबुजून या आगीत उडी घेतली असती?"

"माय गॉड, मृणालताई, मला बरी बुद्धी सुचली, मी तुमच्यापर्यंत आले. फार फार उपकार झाले माझ्यावर!"

"माझे कसले उपकार मानता? तुमच्या डॅडींचे माना, त्यांनीच तुम्हाला मला भेटायचा सल्ला दिला ना?"

"हो, मलाही खूप प्रलोभनं दाखवली देशमुखांनी. ही संत्र्याची बाग तुझ्या नावावर करतो, तुला अमरावतीतल्या अहिल्याबाई गर्ल स्कूलमध्ये शिक्षिकेची नोकरी लावतो. माझे ढासळलेले वैवाहिक आयुष्य तूच एकटी सावरू शकशील! अशी खूप प्रलोभनं दाखवली."

"माय गॉड, बरं झालं पद्माताई, तुम्ही योग्य वेळी माझ्याकडे आलांत!"

त्यादिवशी मृणालच्या आग्रहास्तव पद्माबाई पुण्यांत राहिल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी धैर्यशील बायकामुलांसह परतले. त्यांनीही पद्माबाईंना त्यापूर्वी प्रत्यक्ष पाहिलं नव्हतं. त्यांना समजल्यावर म्हणाले,

"आमच्या मृणालशी तुमची ओळख झाली हे फार बरं झालं!"

"त्याहीपेक्षा माझं अधिक भलं झालंय! मृणालताई तुम्हाला सवड मिळेल तेव्हा तुम्ही कोल्हापूरला या. राजारामपुरीत माझा छोटा बंगला आहे."

0-0

प्रकरण २१

प्रा. देशमुखांना जेव्हा गारगोटी सोडण्याची वेळ आली त्यावेळी त्यांनी पद्माबाईंची राजारामपुरीतल्या त्यांच्या बंगल्यावर भेट घेतली.

"मग तुमचा निर्णय पक्का आहे तर?"

"हो ऽऽऽ रोज उठून एक निर्णय बदलण्याचा माझा स्वभाव नाही." पद्माबाई निर्धारानं म्हणाल्या.

"बघा, झुंजाररावांची रखेली म्हणून रहायचं की माझी लग्नाची बायको म्हणून प्रतिष्ठेनं जगायचं!"

"हे पहा मिस्टर देशमुख, तुम्हाला मी एकदा माझा निर्णय सांगितल्यावर तुम्ही मला भेटणार नाही असं मला वाटलं होतं!"

"पण असा एकतर्फी निर्णय तुम्ही कसा काय घेतलात?"

"एकतर्फी नव्हे, पूर्ण विचारांती, आणि प्रत्यक्ष तुमच्या पहिल्या पत्नीला भेटूनच मग मी निर्णय घेतला आहे. यापुढं तुम्ही मला न भेटणंच तुमच्या हिताचं आहे."

"माझं हित आणि अहित कशात आहे हे मी चांगल्या तऱ्हेनं जाणतो. बघा विचार करा. झुंजाररावांच्या पत्नी जरी आज तुमच्या मैत्रीला संमती देत असल्या तरी उद्या त्या देतीलच असे नाही. त्यांनाही जनाची नसली तरी मनाची थोडी लाज असेलच की?"

"मिस्टर देशमुख, या विषयावर मी तुमच्याशी अधिक बोलू इच्छित नाही."

"मग मी झुंजाररावाशी बोलू?"

"ते तुमची भेटच घेणार नाहीत. मी जेव्हा त्यांना तुमचा पूर्वेतिहास सांगितला तेव्हा तेच म्हणाले,"असे 'तो मी नव्हेच' मधल्या काझीसारखे अनेक महाभाग आज समाजात बिनधास्तपणे वावरतात."

"पण त्यांना स्वत:ला सुस्वभावी पत्नी, लग्न झालेला प्रौढ मुलगा, सून असताना त्यांनी तुमच्याशी मैत्री करावी हे त्यांना तरी शोभतं का?"

"मिस्टर देशमुख, तुमच्याजवळ तेवढी हिम्मत असेल तर भेटा डॅडींना! त्यांना काय शोभतं काय शोभत नाही हे ते फार चांगल्या तऱ्हेनं जाणतात! त्यांच्या इतका व्यवहारी माणूस तुम्हाला शोधून सापडणार नाही."

देशमुखांचा नाईलाज झाला. ते संस्थेत आले तेव्हा अकाली वैधव्य आलेली, खानदानी घराण्यात जन्मलेली, असहाय अशी वाटलेली पद्मा सावंत आज आपला आवाज चढवून बोलत असल्याचं पाहून जायला उठलेले प्रा. देशमुख म्हणाले,

"बायकांचं स्वरूप फसवं असतं हेच खरं. तुम्ही निराधार आणि असहाय्य आहात म्हणून मी तुमच्यावर विशेष लक्ष देऊन तुम्हाला पास करून घेतलं. माझ्यामुळंच ही बी.एड.ची पदवी तुम्हाला मिळाली."

"आत्ता तुम्ही माझ्यासमोर जे बोलता आहात ते सार्वजनिक ठिकाणी बोलाल का?"

"मला त्याची काय गरज आहे?"

"असहाय घरंदाज देखण्या मुलींना जाता जाता भुरळ पाडणारे तुम्ही, तिकडे इंग्लंडला का पळून गेलात?"

"पळून नव्हे. Ph.D. करण्यासाठी! पद्माबाई, मी निघतो पण लक्षात ठेवा, गाठ माझ्याशी आहे! तुमची पत्रं मी जपून ठेवलेली आहेत."

"बेशक ठेवा, तुमचे खरे स्वरूप माहीत नसताना ती लिहिलेली आहेत. तुम्ही त्या पत्रांचा गैरवापर कराल तर तुम्हालाच 'न भूतो न भविष्यति' अशा प्रसंगांना तोंड द्यावे लागेल! धडश्या अंगानं जा! नाहीतर तुम्ही मला कसली धमकी देत आहात मला डॅडींना सांगावं लागेल!"

"डॅडी? ते तरी कुठं सद्गुणाचा पुतळा आहेत? कर्नल शिवराम सावंताच्या विधवेला आपल्या मोटार होममधून घेऊन न शोभणाऱ्या वयांत तुमच्याशी प्रेमाचे चाळे करणारी व्यक्ती काय लायकीची आहे हे सगळ्या जगाला ठाऊक आहे."

डॅडींची लाज काढल्यावर मात्र पद्माबाई उठल्या आणि त्यांनी राजारामपुरी पोलीस स्टेशनला फोन लावला.

"हॅलो इन्स्पेक्टर वागळे साहेब, मी पद्मा सावंत बोलते आहे. मी ज्या गारगोटीच्या शिक्षण संस्थेत शिकायला होते. तिथले इंग्रजीचे प्राध्यापक मिस्टर देशमुख इथं माझ्या बंगल्यावर येऊन मला 'ब्लॅकमेल' करीत आहेत. ताबडतोब तुम्ही या किंवा कोणा सबइन्स्पेक्टरना पाठवता?"

पद्माबाई मुद्दाम मोठ्यानं बोलल्या होत्या. दूरवर पोलीस जीपचा सायरन वाजल्याचा अस्पष्टसा आवाज ऐकून प्रा. देशमुख डोक्यावर फेल्ट ठेवून तिथून बाहेर पडले.

पद्माबाईंनी सुटकेचा दीर्घ निश्वास सोडला. दारात आलेल्या पोलीसांच्या जीपमधून उतरणाऱ्या इन्स्पेक्टर वागळेंना त्या म्हणाल्या,

"तुमचं नाव घेताच गेले प्राध्यापक देशमुख!"

"देशमुख?"

"हो. अमरावतीचे आहेत."

मग थोडक्यात पद्माबाईंनी आपल्याला फोन का करावा लागला याचे कारण सांगितले. जाता जाता ते म्हणाले,"आज काल पदव्यांचं शेपूट नावापुढे लावलेले अनेक भामटे शिक्षण क्षेत्रात शिरलेले आहेत. पुन्हा त्यांनी कधी इकडं यायचं धाडस केलं तर आम्हाला तात्काळ कळवा. परवा झुंजारराव मोरेंचा मला निरोप होता. तुमच्यावर थोडं लक्ष ठेवा. तुम्हाला कोणीतरी उपद्रव द्यायची शक्यता आहे म्हणून! "

"माय गॉड, आता मात्र डॅडींची कमालच झाली. मी शिक्षण संपवून इकडं आले आणि एकटीच बंगल्यात असते हे पाहून कोणीतरी मला उपद्रव देईल याचा डॅडीनी अचूक अंदाज केला असणार! ही इज ए ग्रेट मॅन!"

"डेफिनेटली ही इज ग्रेट, नाहीतर इतक्या वर्षाची गॅप पडल्यावर या वयात कोणी कायद्याची पदवी संपादन करण्याची इच्छा धरेल का? तुमच्याशी त्यांचा फोन झाल्यावर सांगा मी येऊन गेल्याचं!"

"जरूर सांगेन, त्यांना फार बरं वाटेल."

प्रा. देशमुखांनी त्यानंतर पद्माबाईंचा नादच सोडून दिला. त्यांच्या मागे एखाद्या पहाडासारखे उभे असणाऱ्या झुंजारारावांना सारा जिल्हा ओळखत होता. कोणी निष्णात शिकारी म्हणून, तर कोणी समाजपरिवर्तनाचा पाया आपल्या एकुलत्या एक मुलाचे यशोमतीचं

संग्रामशी लग्न लावून देणारे समाजसुधारक म्हणून!

झुंजारराव‌ांना नेहमी काही ना काही समस्या भेडसावत असायच्या. आता एक होती ती संग्रामनं विक्रमविरुद्ध कोर्टात साक्ष दिल्यानं, नारायणराव डांगरे त्याला उपद्रव देतील याची. तर आता झुंजारराव‌ाना गारगोटीला राहून बी.एड.ची पदवी संपादन केलेल्या पद्माचं पुढं काय करायचं?

तिने डोक्यातून प्रा. देशमुखांचा विषयच काढून टाकला होता. त्यांच्यापुढं जशा एकामागून एक अशा समस्या निर्माण होत होत्या. त्याचप्रमाणे त्या समस्या सोडवण्याचे मार्गही त्यांना वेळोवेळी सुचत होते. त्यानंतरच्या चौथ्या दिवशीच पुढारीत जाहिरात आली. कोल्हापुरातील 'म.ल.ग. हायस्कूलमध्ये इंग्रजी शिकवणारी शिक्षिका हवी असल्याबद्दलची'

तो अंक घेऊन झुंजारराव पद्माबा◌ंइंकडे आले. 'हे बघ पद्मा, इथल्या महाराणी लक्ष्मीबाई गर्लस् हायस्कूलमध्ये इंग्रजी शिकवणारी शिक्षिका हवी आहे. तू बी.एड. होऊन घरी बसावं असं काही मला वाटत नाही!''

''मीही पुढं काय करावं याचाच विचार करीत होते. बरं झालं, इथल्या इथं नोकरी मिळाली तर!''

पद्माबा◌ंइंच्या समस्येतून झुंजारराव बाहेर पडतात न पडतात तोच सरलाबा◌ंइंनी त्यांना विषण्ण चेहरा करून सांगितलं.

''सुशिलेची बेबी चंदा केरळच्या बेकरीवाल्याच्या मुलाबरोबर पळून गेलीय. सुशिला दोन दिवस जेवलीदेखील नाही.''

''चला बसा गाडीत. आपण दोघेही जाऊन काय प्रकार आहे प्रत्यक्षच पाहून येऊ.''

सुशिलाबाई बहिणीच्या आधाराने मिळणाऱ्या तुटपुंज्या पोटगीच्या रकमेवर कसे तरी दिवस ढकलीत होत्या. बेबीचंदाला एखादं चांगलं स्थळ पाहून तिला उजवून टाकायचं हा त्यांचा मानस होता. तशी ती दिसायला आणि शिक्षणातही उजवी अशीच होती. शिवाय जिजाजी झुंजारराव‌ांचेही त्यांना पाठबळ होते.

बेबीचा मैत्रिणींचा परिवार मोठा होता. ती मैत्रिणींच्या सहवासात मजेत होती. पण अलीकडे ती काहीशी अबोल अशी वागत होती. अशातच फर्नांडिसच्या मुलाबरोबर पळून गेल्याचं सर्वांना समजलं.

झुंजारराव सरलाबा◌ंइंच्या समवेत सुशिलाबा◌ंइंना भेटून नेमकं काय घडलंय ते पहायला आले होते.

त्या दोघांना पहाताच सुशिलाबाईना दु:खाचा उमाळा आला. सरलाबा◌ंइंनी त्यांना आलिंगन देऊन त्यांचा दु:खभार थोडा हलका केला.

झुंजारराव‌ांनी सुशिलाबा◌ंइंना एकच प्रश्न विचारला, ''बेबीचं आता किती वय होतं?''

''परवा चार दिवसांपूर्वीच तिला अठरावं संपलं!''

''म्हणजे मग तिनं त्या फर्नांडिसच्या मुलाबरोबर जर लग्न केलं असेल तर ते बेकायदेशीर ठरवता येणार नाही! पण मला सांगा तुम्ही गोष्टी इतक्या थराला जाईपर्यंत स्वस्थ कशा काय बसलात?''

हुंदका सावरून त्या म्हणाल्या, ''स्वस्थ कुठं बसले? सरलेला अधूनमधून मी बेबीच्या लग्नाचं आता काहीतरी बघायला हवं असं सांगतच होते की!''

''होय. ते खरं आहे, पण बेबी कुठे जाते? काय करते? याकडं तुम्ही लक्ष ठेवायला हवं होतं! बेबीचं लग्न जमवणं मला फारसं कठीण नव्हतं. पण मीच विचार केला, तिला पुढं शिकण्याची हौस आहे तोवर शिकू दे! पण त्या पोराचा आणि हिचा संबंध आला कुठे?''

"तो मलबार बेकरीचा मालक फर्नांडिस. कोल्हापुरातली मलबार बेकरी प्रख्यात आहे. ते तुम्हाला माहीतच आहे. अलीकडे फर्नांडिस मुलाकडे बेकरी सोपवून बेळगांवला आणखी एक बेकरीची ब्रँच सुरू करण्याच्या खटपटीत होता. तो मुलगा दिसायला बऱ्यापैकी आहे."

"तशी दिसायला बऱ्यापैकी असणारी अनेक तरुण पोरं असतात. पण त्याच्याशी बेबीचं सूत जमण्यासाठी तिचा आणि त्या पोराचा कुठंतरी संपर्क यायला हवा!"

"आता तिच्या मैत्रिणी सांगत आहेत. तो मुलगा अधूनमधून बेबीला भेटत होता. कधी कधी ती ब्रेड आणायला जायची! अहो जिजाजी, इथं बाराव्या गल्लीतही मलबार बेकरीचा माल मिळतो. तिथे तो मुलगा अधूनमधून बसायचा! ब्रेड आणायला गेलेली बेबी अधूनमधून भला मोठा केक घेऊन यायची! तू केक कशाला आणलास असं मी विचारलं तर सांगायची कोणत्यातरी मैत्रिणीचा आज वाढदिवस आहे. मी तिला केक भेट देणार आहे. तिच्या मैत्रिणींना तोटा नव्हता. मीही त्या किरकोळ गोष्टी आहेत म्हणून दुर्लक्ष करायची. पण आता तेच मला महागात पडलं." असं म्हणून सुशिलाबाई पुन्हा रडू लागल्या!

"रडून काय होणार आहे? मला बेबीची एकच चिंता आहे. तो फर्नांडिसचा मुलगा चार दिवस तिला केरळात फिरवून वाऱ्यावर सोडतो की काय? त्यानं तिच्याशी लग्न केलं तर ठीकच!"

"लग्न?" मध्येच सरलाबाई म्हणाल्या.

"अहो ते किरीस्ताव आपण...?"

"आपली जातकुळी मिरवायचा हा प्रसंग नव्हे. तो मुलगा कर्तबगार असला आणि त्यानं बेबीला दगा दिला नाही तरी पुरे! आता जातगोत पहायचा जमाना संपला आहे!"

"नवऱ्याने सोडल्यावर मी कसे अब्रूने दिवस काढले ते तुम्ही पाहिलंच. पण एकुलत्या एक कार्टीनं माझ्या तोंडाला काळं फासलं!"

"काळं बिळं फासलं असं समजू नका. मी आजच जातो मलबार बेकरीत. त्याच्या बापाला भेटतो. तो मला चांगला ओळखतो. त्यालाच पटवून देतो, बेबीचं आणि तुझ्या मुलाचं लग्न लावून दे! आम्ही कसलाही विरोध करणार नाही!"

"यशोमतीच्या लग्नाला मी विरोध केला म्हणूनच नशिबानं हे माझ्या वाटणीला दिलं."

सरकार मिशीवरून पालथी मूठ फिरवीत म्हणाले, "सुशिलाबाई, यात कोणी कोणाच्या नशिबी काय लिहिलंय याचा विचार करायचा नसतो. बेबीचंदा काय लहान नव्हती. तिला आपलं हित अहित चांगलं समजत होतं. ठरावीक वयात तरुण-तरुणी एकमेकाकडं आकर्षली जाणारच! निसर्गाचा नियम आहे. समाधानाची गोष्ट एकच, फर्नांडिस मनानं फार उमदा माणूस आहे. तो आपल्या मुलानं परक्या जातीची मुलगी पसंत केली म्हणून मनात अढी धरणारा नाही! आज जवळ तीस-चाळीस वर्षे तो कोल्हापुरात रहातो आहे. छत्रपती राजाराम महाराजांना सकाळी ब्रेकफास्टला मलबार बेकरीचाच ब्रेड लागत असे! खिसमसला त्याची बायको 'डोनटस्' करून पॅलेसवर पाठवायची. फर्नांडिसकडे पॅलेसवरचा दिवाळीचा फराळ कधीही चुकला नव्हता. त्या फर्नांडिसची मला इत्थंभूत माहिती आहे, त्याची एक लहान बहिण होती बनी. अतिशय स्मार्ट होती ती. घरातून कुठे गायब झाली कुणास ठाऊक? वयात आलेल्या मुलींचा कोणी भरवसा द्यावा?"

"म्हणजे सगळं घराण तसलंच आहे तर?" सुशिलाबाईंनी विचारलं.

"हे पहा सुशिलाबाई कोणी कोणाशी लग्न केलं हे माझ्या दृष्टीनं गौण आहे. लग्नानंतर मुलीला सुख लाभेल की नाही हा महत्त्वाचा प्रश्न आहे!"

झुंजारराव आल्यापासून सुशिलाबाई बऱ्याच सावरल्या.

"कुठेही असो. पण ती सुखी असावी. एवढीच माझी इच्छा!" त्या म्हणाल्या.

"हं ऽऽऽ" खुर्चीवरून उठता उठता झुंजारराव म्हणाले,"आता कसं बोललात? तेच ठीक आहे! यापुढं तोंडाला काळंबिळं फासलं हे शब्द उच्चारूच नका! जे घडायचंय ते घडून गेल्यानंतर जास्त विचार करण्यानेच माणसाला त्रास होतो."

बेबी चंदा पळून गेली हे सर्वतोमुखी झालं. पण झुंजारारावांच्या सूचनेनुसार सुशिलाबाईनी तो विषय कोणापुढेही काढला नाही.

त्या दिवशी संध्याकाळी यशोमती तांदूळ निवडीत बसली असताना सरलाबाईंनी तिला विचारलं, "तू पद्माकडे रहात होतीस तेव्हा मधूनमधून बेबी आपल्या मैत्रिणींना सोबत घेऊन पद्माकडे येत होती नां?"

"यायच्या की, पण त्यावेळी त्यांच्या कोणा मैत्रिणीकडूनही बेबीताईंच्या प्रेमाचा सुगावा मला लागला नव्हता!"

"आजकाल शिकलेल्या मुली इतक्या भोळसट नाही राहिल्या. पण तिच्या कोणा मैत्रिणीकडून तरी तिचं ते प्रकरण तुझ्या कानावर कसं आलं नाही?"

"मम्मी, मला तशी थोडी जरी कल्पना असती तरी मी त्यांच्या मागे लागून काहीतरी माहिती मिळवलीच असती! डॅडींना आत्ता ते प्रकरण समजूनही त्यांना त्यांत अनैसर्गिक असं काही वाटलंच नाही ना?"

"तुझे डॅडी परदेशातच जन्माला यायला हवे होते. त्यांचे विचारच काही भिन्न आहेत. माणसात जात आणि धर्म यावरून मतभिन्नता असावी असं त्यांना वाटतच नाही."

"आता बेबी चंदाच्या वडिलांना तिकडे फलटणला बेबीनं आंतरजातीय लग्न केलं म्हणून समजलं तर केवढा गहजब करतील?"

"पण त्यांनी गहजब करण्याचा संबंधच काय?"

"संबंध? अगं काही झालं तरी तो तिचा जन्मदाता बाप आहे. आमच्या खानदानीत यापूर्वी असं काही घडण्याची शक्यता आहे याची एवढी जरी शंका आली तरी मुलीला गोळी घालायची भाषा करतील! तू पाहिलंस ना तुझ्या लग्नालासुद्धा त्यांनी किती नाकडोळे मोडले होते? काळाच्या मागे दहावीस वर्षे असणारी अशी कितीतरी माणसं समाजात असतात!

"सुशिलाबाईंना आता निराळाच प्रश्न भेडसावत आहे!"

"कोणता?"

'डफळे महिन्याकाठी दीड हजार रुपये त्यांना पोटगी देत होते. ते आता फक्त जेमतेम हजार तरी देतील की नाही कुणास ठाऊक?

झुंजारराव दुसऱ्या दिवशीच मलबारीकडे गेले. ते आपल्याकडे एक दोन दिवसांत येतीलच अशी फर्नांडिसना शंका होती.

"या, या, सरकार."

"सरकार कसले म्हणता? आता तुम्ही आमचे व्याही झालात. त्या दोघांचं एकमेकांवर प्रेम होतं तर पळून जायचं काय कारण होतं?"

"तसं काही कारण नव्हतंच म्हणा, तुमची पुरोगामी वृत्ती उभ्या महाराष्ट्राला परिचितच आहे."

फर्नांडिसचा हात आपल्या हाती घेतलेले झुंजारराव म्हणाले, "आपणाला यात काही विचित्र घडलंय असं मुळीच वाटणार नाही. पण डफळे, त्यांचे या भागात असलेले काही नातेवाईक मात्र 'कावकाव' करत रहाणार थोडे दिवस! बरं ते असो, सध्या ते दोघे कुठे आहेत?"

"पणजीला माझ्या बहिणीकडे आहेत. पण मी लवकरच त्याला बेळगावला माझ्या बेकरीची ब्रँच सांभाळायला सांगणार आहे!"

"म्हणजे तुम्हाला त्यांचं हे प्रेमप्रकरण पूर्वीपासून ठाऊक होतं तर?"

"म्हणजे काय? बेबी चंदा आमच्या बेकरीकडे यायची तेव्हा जोसेफशीच बोलत रहायची. मग मीच एकदा जोसेफला विचारले.

"कोणाची आहे ही मुलगी?"

"झुंजारराव मोऱ्यांच्या मेव्हणीची आहे, ती आणि तिची आई इथं भाड्यानं दोन खोल्या घेऊन रहातात, तिच्या आईचं आणि बापाचं पटत नाही."

"पण तू खरोखरंच त्या मुलीवर प्रेम करतोस का उगीच चार दिवस गम्मत म्हणून?"

तो म्हणाला, "डॅडी तसं काही नाही, मी तिच्याशी खिश्चन पद्धतीने विधिवत लग्न करून घेणार आहे. पण तिची आई आम्हाला लग्नाला मान्यता देणार नाही, तीच एक अडचण आहे."

"अडचण बिडचण काही नाही, तू जा सरळ गोव्याला, इलिझा आन्टीला सर्व सांग. तिथंच रजिस्टर लग्न करून घे. आता जमाना झपाट्याने बदलतो आहे. कोणी कोणाशी लग्न केलं याची पंचाईत करायला लोकांना वेळ नाही. तू बेबीचंदाला बेशक पणजीला घेऊन जा. तिला अठरावं संपलं आहे ना?"

"हो, दोन दिवसांपूर्वीच संपलं!"

"मग काहीच हरकत नाही."

बापलेकांची ही चर्चा झाल्यावर जोसेफ म्हणाला, "तुझे काही आधुनिक विचारसरणीचे नातलग आहेत. ते आपल्या लग्नाला विरोध करतील असं वाटत नाही."

"नको नको, जोसेफ ते हरकत करणार नाहीत, पण मम्मी आणि मावशी मात्र आपल्याला बिल्कूल सम्मती देणार नाहीत."

झुंजारराव तास दोन तास फर्नांडिसशी बोलत राहिले.

बेबीचंदाची समस्या झुंजाररावांना आणि तिच्या आईला वाटली तेवढी गुंतागुंतीची नव्हती. फर्नांडिसच्याच सम्मतीने जोसेफनं बेबीचंदाबरोबर पळून जायचा निर्णय घेतला होता.

"हे पहा मिस्टर फर्नांडिस, ते दोघे तिकडे रजिस्टर लग्नही करून घेतील. पण इथल्या मंडळींना त्या दोघांनी रीतसर लग्न केले आहे हे समजायला हवं."

"त्यासाठी मी काय करायला हवं ते सांगा, माझी तयारी आहे!" फर्नांडीस म्हणाला.

"तुम्ही कोल्हापुरात त्यांच्या विवाहाचं रिसेप्शन करा. निदान तेवढं तरी व्हायला हवंय!"

"कबूल! एकदम कबूल!"

फर्नांडिसने जोसेफच्या लग्नाचं रिसेप्शन करायचं मान्य केलं. दोघांच्या सोयीने नंतर तारीख ठरवण्याचं ठरलं.

झुंजारराव घरी येताच त्यांना पुष्पाच्या खुनाची केस पुण्यातल्या सेशन कोर्टात चालणार असल्याची बातमी समजली. पण त्याबाबतीत झुंजाररावांना आता चिंता करण्याचं कारण उरलेलं नव्हतं. संग्राम त्या प्रकरणातला महत्त्वाचा साक्षीदार होता.

"म्हणजे या 'ऑर्डियल' मधून बाहेर पडायला हवंय! डोक्यातल्या विवंचना काही संपत नाहीत!"

"यशोमती, अगं तुझा प्रताप उंबरा ओलांडायला लागलाय! संग्रामला पुढच्या दाराला छोटं सरकदार करून घ्यायला सांग."

"जी ऽऽऽ"

मोरे घराण्याचे रीतीरिवाज अल्पावधीत आत्मसात केलेली यशोमती म्हणाली, "डॅडी आता मी ग्रॅज्युएशन तेवढं पूर्ण करावं म्हणतेय!"

"जरूर, जरूर!"

0-0

प्रकरण २२

नारायणराव डांगरे पाटील केस सुरू व्हायच्या अगोदर आणखी एक प्रयत्न म्हणून झुंजाररावांना भेटायला आले. यावेळी त्यांचा सूर काहीसा नरम झाला होता.

झुंजाररावांना मुजरा करून ते म्हणाले,

"मग कसं कसं करायचं सरकार? मला विक्रमच्या भवितव्याची चिंता वाटायला लागलीय! सगळे साक्षीदार पुणे जिल्ह्यातले. आमच्याबद्दल सहानुभूती वाटावी असा एकही त्यांत नाही. निदान संग्रामबाळानी तरी आपला मित्र म्हणून जबाब थोडा फिरवला तर बरं होईल!

झुंजारराव हसत हसत उद्गारले, "अहो त्यानं जबाब फिरवल्यामुळे केसवर फारसा परिणाम होणार नाही. तुम्ही पुढारी लोक फक्त राजकारण जाणता, तुम्हाला कायद्यातलं काही कळत नाही! अहो संग्राम आज उद्या 'होस्टाईल' होईल म्हणून डीवाय.एस.पी. चौधरींनी त्याचा एक्झिक्युटीव्ह मॅजिस्ट्रेटपुढे जबाब नोंदवून घेतलेला आहे. उद्या पोलीस त्या एक्झिक्युटीव्ह मॅजिस्ट्रेटला तपासतील! आमच्या संग्रामनं खोटी साक्ष दिली म्हणून त्याच्यावर खटला दाखल होईल! आता तुमचा वकीलच यातून काहीतरी मार्ग काढू शकेल! दुसरं कोणीही काही करू शकणार नाही."

"बघा, सरकार, विक्रम चुकलेला आहे हे मला मान्य आहे. पण त्याला आयुष्यात एकवेळ तरी सुधारण्याची संधी द्या!"

"माफ करा नारायणराव, मी तुम्हाला या पुष्पा मर्डर केसमध्ये कसलंही सहाय्य करू शकणार नाही. ती पुष्पाची आई म्हणते तुम्ही तिच्या पूर्व परिचयाचे होता!"

"ती बाई आत्ता काय वाट्टेल ते बोलेल. तिनं मला निरोप पाठवलाय. मला चार लाख रुपये द्या. म्हणजे मी माझी साक्ष बदलते."

"मग द्या की तिला! पण नारायणराव तिने कशीही साक्ष दिली, तरी त्याला काही किंमत नाही. फारतर आपल्या पुष्पाला त्यादिवशी विक्रम न्यायलाच आला नव्हता, एवढं ती सांगू शकेल. पण आय विटनेसचं काय करणार? एक सोडून चार हिलटॉपच्या कर्मचाऱ्यांनी विक्रमला 'इन्व्हॉल्व्ह' केलंय. ते होस्टाईल होतात का पहा! तसं म्हणाल तर विक्रमचं आणि आमचं काहीही वैर नाही. व्हायचं ते होऊन गेलंय. पुन्हा पुष्पा काही जिवंत होणार नाही. तो सनदशीर मार्गाने केसमधून सुटणार असेल तर सुटो! पण त्याचबरोबर माझा संग्राम या प्रकरणात निष्कारण अडकायला नको. काय आलं का ध्यानात?"

"आता ध्यानात येऊन तरी काय उपयोग आहे?" उठता उठता नारायणराव म्हणाले

"थांबा थोडं, तुम्हाला सांगतो, तुमचा विक्रम बेफाम दारू पीत होता. बायकांच्या नादी लागणं हा त्याचा छंद होता, त्याला अप्रत्यक्षरीत्या बरबाद करण्याचं कामही तुम्हीच केलंत!"

"मी काय केलं?"

"त्याला मर्सिडीज गाडी कोणी घेऊन दिली? तो गाडीतून कोणाला घेऊन फिरतो,

याकडं तुम्ही कधी लक्ष दिलं होतं का? आपण पैशाच्या आणि सत्तेच्या बळावर काहीही करू शकतो असा तुमचा भ्रम होता.''

वस्तुस्थितीच तशी होती. त्यामुळं नारायणरावांना झुंजाररावांच्या पुढं कसलाही युक्तिवाद करण्याची हिम्मतच उरली नव्हती. नारायणराव थेट गृहमंत्र्यांपर्यंत जाऊन पोहचले होते. पण तिथं सर्वांनी 'कोर्ट मॅटर' म्हणून त्यांना वाटाण्याच्या अक्षता दिल्या होत्या.

ठरल्या तारखेला पुण्याच्या सेशन कोर्टात पुष्पा मर्डर केस चालली.

'हिलटॉप' हॉटेलमधला एकही साक्षीदार आरोपीला फितुर झाला नाही. काळे फौजदार आणि चौधरी डीवाय.एस.पी. हे अधिकारी साक्षीदारांच्या पाठीवरच होते. पुष्पाच्या कपड्यावरचे रक्ताचे डाग आणि आरोपी विक्रमच्या कपड्यावर उडालेले रक्ताचे डाग एकाच 'ब्लड ग्रुपचे' असल्याचा केमिकल ॲनलायझरचा रिपोर्ट आलेला होता. विक्रमनं दारुच्या नशेत रस्त्यावरच्या बॅरियरला धडक दिलेल्या जागेचे पंच, शिवाय तळेगावला ढाब्यावर जिथे विक्रमला पकडला तेव्हा त्याच्या गाडीचा उजव्या बाजूचा फुटलेला हेडलॅंपबाबत सांगणारे पंच यापैकी कोणीही फुटले नाहीत. प्रॉसेक्युशनची सर्व साक्ष अत्यंत सुसंगत अशी झाली. पुष्पाच्या आईला नारायणरावांनी दोन लाख देण्याचे आमिष दाखवले तरी द्यायची तीच साक्ष तिने दिली. संग्रामनेही अतिशय सुसंगत अशी साक्ष दिली. तपासी अम्मलदार काळे, ट्रॅफिक इन्स्पेक्टर तळेकर आणि त्या केसवर सुपरव्हिजन करणारे डीवाय. एस. पी. चौधरी यांच्याही साक्षी झाल्या. ते तर पोलीस अधिकारीच होते. पुणे जिल्ह्यात इतके सेन्सेशन झालेली ती केस कोणत्याही कारणाने सुटणार नाही याची दक्षता घेण्यात आली होती.

शेवटी पुरावा संपल्यावर आरोपी विक्रमचा जबाब झाला. त्यात त्याने 'आपण स्वेच्छेने मद्य सेवन केलेले नव्हते. ते संग्रामने फसवून पाजले.' असा बचाव घेतला.

ज्यावेळी दारूच्या नशेत एखादा आरोपी गुन्हा करतो, त्यावेळी तो दुसऱ्याने फसवून आपल्याला दारू पाजली होती असे जर सिद्ध करू शकला, तर त्या गुन्ह्यात आरोपीला अत्यंत सवलतीची शिक्षा होऊ शकते. पण विक्रम ते शाबित करू शकला नाही.

त्यानंतर दोन्ही बाजूंच्या वकिलांचा युक्तिवाद, 'Arguments' झाल्या.

न्यायाधीशांनी निकालाची तारीख जाहीर केली. आता सर्वांचं लक्ष त्या केसच्या निकालाकडे लागून राहिलं.

झुंजाररावांनी संग्रमाला थोड्या दिवसासाठी अज्ञात स्थळी पाठवले.

झुंजाराराव निकाल होईपर्यंत पुण्यातच रहाणार होते. धैर्यशीलराव ठुबेंच्या घरी त्या संध्याकाळी झुंजाराराव आणि ठुबे बंगल्यासमोरच्या बागेत वेताच्या खुर्च्यावर बसले होते. ठुबे 'हार्ड ड्रिंक' घेत नसत. त्यांनी फक्त बीअर घेतली. एकमेकांना 'चिअर्स' झाल्यावर ठुबे म्हणाले, ''एकूण केसचा रागरंग कसा दिसतो?''

झुंजाराराव म्हणाले, ''प्रॉसिक्युशनचा पुरावा तरी उत्तमच झाला. पण शेवटी लेखणी आहे ती न्यायाधीशाच्या हातात! अलीकडे न्यायाधीश झाले तरी कोणी कोणाचा भरवसा देऊ शकत नाही.''

''एवढं मात्र खरं, पूर्वीची ज्युडिशिअरीची परंपरा आज उरली नाही हे मात्र खरं! अहो परवाची पुण्यातच घडलेली घटना. भरदिवसा स्टेशनसमोर गोपालदास धर्मशाळेसमोर, मुंबईला जाणाऱ्या टॅक्सीच्या दोघा ड्रायव्हरात काही किरकोळ बाचाबाची झाली आणि एकाने दुसऱ्याला चक्क खिशातला चाकू काढून भोसकले की?''

''मग? पुरावा कसा काय झाला?''

''एक सोडून दहा आयविटनेसेसनी आपण भोसकाभोसकीचा प्रकार स्वत: पाहिला

असे सांगितले. मेडिकल इक्विडन्सही व्यवस्थित झाला.''

''पण इव्हीडन्स ऑफ मोटीव्ह फारसा विचारात घेतला जात नसतो, पूर्वी तो हेतूचा पुरावा शाबित करावा लागे, पण ज्यावेळी गुन्हा घडताना तो प्रत्यक्ष 'आय विटनेसेस'नी बघितलेला असेल. त्यावेळी हेतूच्या पुराव्याची गरज नसते असे 'सुप्रीम' कोर्टाचे रूलींग आहे.

धैर्यशीलराव व्यवसायाने वकील नव्हते. पण त्यांना कायद्यातल्या बारीकसारीक खाचाखोचा ठाऊक होत्या. त्यांनीही झुंजाररावांच्याप्रमाणेच कायद्याचे शिक्षण अर्ध्यातच सोडले होते!

झुंजारराव म्हणाले, ''मला त्या केसच्या निकालाची अशी काय विवंचना नाही. आमच्या संग्रामने विक्रमविरुद्ध साक्ष दिल्यामुळे नारायणराव डांगरे पाटील कशी पावलं उचलणार आहेत याची मात्र विवंचना लागून राहिलीय.''

इतक्यात बंगल्यातून धैयशील ठुब्यांची मावसबहीण मृणाल तिथं बागेत आली. बाजूच्या एका मोकळ्या खुर्चीवर बसत तिने झुंजाररावांना विचारले,

''पद्माबाई काय म्हणतात? माझ्याकडे येऊन एक दिवस राहून गेल्या! त्यांचा पुढचा प्लॅन काय आहे?''

''प्लॅन बीन काही नाही. ती इकडे तुमच्याकडे येण्यापूर्वी देशमुखांसोबत अमरावतीला जाणार म्हणत होती. पण तुम्ही तिचे चांगले 'ब्रेन वॉशिंग' केलेले दिसले!''

''मी त्यांना स्पष्टच सांगून टाकलं तुम्ही भावनेच्या भरात काही निर्णय घ्याल तर नंतर पस्तावाल! तो माणूस फार 'डेंजरस' आहे. केवळ त्यांचं इंग्रजीवर प्रभुत्व आहे आणि ते लंडन 'रिटर्न' आहेत एवढ्यावर जाऊ नका! माझ्या वडिलांनी नेमकी तीच चूक केली होती. त्यांनी त्यांच्या पदव्या आणि घराणं बघितलं! नंतर हळहळत बसले. पण वेळ निघून गेली होती.''

झुंजारराव व्हिस्कीचा एक घोट घेऊन म्हणाले, ''बायका कितीही टक्केटोणपे खाल्ले तरी लवकर शहाण्या होत नसतात हेच खरं! पण ती तुमच्याकडे येऊन गेल्यानंतर मात्र तिने 'चक्क' माझे पाय धरले. म्हणाली, 'डॅडी, मी चुकत होते, तुम्हीच मला सावरलं!' मी म्हणालो, ''मी काय केलं? मला कोणातरी देशमुखानं त्रास देऊन मृणालला घरातून घालवून दिलं एवढंच ठाऊक होतं, पण मी अधिक चौकशी केली तेव्हा पद्माला भुरळ पाडणारा तोच 'देशमुख' आहे असं जेव्हा समजलं तेव्हा तिला जाऊन भेट आणि खरं काय खोटं काय हे पाहून ये असं म्हणालो.''

''फार बरं केलंत. मला त्या स्वभावाने चांगल्या वाटल्या!''

''म्हणून तर या माझ्या वयात तिला आश्रय द्यावा लागला. असो, आता तो विषय संपला आहे. MLG ला एका इंग्रजी शिकवणाऱ्या शिक्षिकेची 'व्हॅकन्सी' आहे अशी परवा 'पुढारीत' जाहिरात होती. आता MLG चं व्यवस्थापन विद्यापीठ हायस्कूलकडे आहे. मीही एकेकाळी विद्यापीठ हायस्कूलचाच विद्यार्थी आहे ना? थोडे फार जुने लोक मला ओळखतात.''

''तिथं त्यांना 'जॉब' मिळाला तर बरंच होईल.''

''मलाही तिची अधूनमधून शेतीच्या कामात मदत होईल!''

''पण संग्रामबाळ अलीकडे तुम्हाला शेतीत मदत करतात म्हणालात ना?''

''करतो, नाही असं नाही, पण त्याचं असावं इतकं शेतीत कॉसन्ट्रेशन होत नाही. आज उद्या मलाच तिथं जाऊन रहावं लागणार आहे.''

''रहायची व्यवस्था आहे ना?''

''आहेत दोन जुन्या पद्धतीच्या खोल्या, पण तिथं एक चार रूमचं 'फार्म हाऊस' बांधावं म्हणतोय, आजकाल लोकांचा भरवसा देता येत नाही. 'लेबर' ही वेळेवर मिळत नाही. स्वत:

हातात खुरपं घेतल्याशिवाय इलाज नाही.''

''तुम्ही हातात खुरपं घेणार?'' धैर्यशीलनी विचारलं.

''खुरपं घेणार म्हणजे तिथं राहून सुपरव्हिजन करणार हो!''

झुंजारराव ठुबे कुटुंबात असे नेहमीच रमून जात. एकतर धैर्यशील आणि ते दोघेही 'व्यवहारी' होते. बदलत्या काळाशी आपण जुळवून घेतलं नाही तर आपण उर्वरित आयुष्य सुखानं कंठू शकणार नाही अशी दोघांचीही खात्री होती.

केसच्या निकालापर्यंत झुंजारराव मुद्दामच पुण्यात राहिले होते. त्यांना निकाल काय लागतो यात तसं पाहिलं तर स्वारस्य नव्हतं.

शेवटी एकदाचा निकाल लागला.

न्यायाधीश ठाकूरनी आरोपी विक्रमला सात वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. निकालात ते म्हणाले, आरोपी विक्रम यानेच दारूच्या नशेत पुष्पाच्या अंगावर हातातल्या फोडलेल्या व्हिस्कीच्या बाटलीने छत्तीस वार केले. त्यामुळे प्रचंड प्रमाणावर रक्तस्राव होऊन पुष्पा मरण पावली. हा प्रकार घडताना प्रत्यक्ष पहाणारा साक्षीदार संग्राम मोरे याने अत्यंत सुसंगत अशी साक्ष दिलेली आहे.

विक्रम हा नारायणराव डांगरे पाटलांचा एकुलता एक मुलगा आहे. त्याची वाताहत करायला नकळत त्याचे वडील हेच कारणीभूत आहेत. या तरुण वयात त्याला हवे तसे पैसे देणे, त्याला मर्सिडीज सारखी गाडी देणे, या गोष्टींचा उल्लेख करण्याचे कारण नव्हते. पण अमर्याद सत्ता आणि पैसा हाती आल्यावर त्यांची मुलेही सद्गुणी निघण्याची कोणी अपेक्षाच बाळगू नये!

या केसच्या तपासाला विपरीत वळण लागणार होते. विक्रम गुन्हा करून हॉटेल हिलटॉपवरून पळून गेल्यानंतर खोलीच्या बाहेर थांबलेला संग्राम आत आला तेव्हा रक्तबंबाळ झालेला पुष्पा आपली शेवटची घटका मोजत होती. विक्रमने रागाने फोडलेली व्हिस्कीची बाटली संग्राम न्याहाळत असताना हॉटेलचे ३-४ वेटर वर आले. त्यांना प्रथम दिसला तो संग्राम! यावरून त्यांनाही वाटलं पुष्पाच्या मृत्यूला तोच कारणीभूत असावा.

पण पोलीस इन्स्पेक्टर दिलीप काळे यांनी शांत चित्ताने सर्व परिस्थिती अवलोकन केल्यावर पुष्पाचा खून हा संग्रामने केलेला नसून त्यांच्या समवेत आलेल्या विक्रमनेच केलेला आहे याची त्यांना खात्री झाली. त्यात ट्रॅफिक इन्स्पेक्टर श्री. तळेकर यांचीही साक्ष अत्यंत महत्त्वाची ठरली. ते तिघे, म्हणजे विक्रम, पुष्पा आणि संग्राम लोणावळ्याला आल्या आल्या तळेकरांना भेटले होते. गुन्हा करून पळून जाताना रस्त्यावरच्या अडथळ्याला विक्रमची गाडी धडकली ही बाब तळेकरांनी तत्काळ इन्स्पेक्टर काळेंच्या निदर्शनाला आणली. एरव्ही सुस्त असणारे पोलीसखाते यावेळी मात्र अत्यंत दक्ष होऊन त्या गुन्ह्याच्या तपासामागे लागले होते.

तत्काळ पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयाशी वायरलेस वरून संपर्क साधल्यामुळे, ढाब्याजवळ पोलिसांनी विक्रमची मर्सिडीस गाडी पकडली. विक्रमने एक रात्र तळेगावला ढाब्यावर काढली होती. त्याची तपासणी केली त्यावेळी तो दारूच्या नशेत नसल्याचे आढळून आले. त्याच्या मर्सिडीस कारचा उजव्या बाजूच्या हेडलँप फुटलेला होता. त्याचे अवशेष, लोणावळ्याच्या रस्त्यावर आढळले. या सर्व घटनेचे पंचनामे कोर्टात शाबितही झालेले आहेत.

आरोपी विक्रमचा बचाव करणाऱ्या वकिलाने आपल्या युक्तिवादात, Argument मध्ये, साक्षीदार संग्रामने त्याला दारू प्यायला भाग पाडले असे म्हटले आहे. पण जेव्हा संग्राम साक्षीदार म्हणून विटनेस बॉक्समध्ये होता तेव्हा त्याने तसे एकही 'सजेशन' केले गेले नव्हते.

याचा अर्थ, विक्रम स्वेच्छेने दारू प्याला होता. त्याला संग्राम कारणीभूत होता असे जरी सुचवले असले, तरी सरळ सरळ हा बचाव after thought, सुचलेला आहे. तो व्यवहाराला धरून मुळीच नाही.

आता विक्रमचे वकील म्हणतात विक्रमने हा खून पूर्व नियोजनाने, ('Preplanned') केलेला नाही. नसेल, पण मद्याच्या आहारी जाऊन एखाद्या निरपराध मुलीचा खून करणे कोणत्याही कारणाने समर्थनीय ठरत नाही.

Prosecution has proved this case beyond reasonable doubt, म्हणून मी आरोपी विक्रमला दोषी धरत आहे. आता खरं म्हणजे त्याला आजन्म कारावासाची शिक्षा देण्याऐवजी याचे वय लक्षात घेऊन मी त्याला सात वर्षे सश्रम कारावासाची सवलतीची शिक्षा देत आहे.

त्याचबरोबर त्याला पाच लाख रुपये दंडही ठोठावला आहे. त्या पाच लाखातले चार लाख रुपये मयत पुष्पाची आई शिलाबाई हिला देण्यात यावेत. दंड न दिल्यास आणखी तीन वर्षे सश्रम कारावास आरोपीस भोगावा लागेल.

G.S.Thakur''

ती शिक्षा ऐकून कोर्टात उपस्थित असलेल्या नारायणराव डांगरे पाटलांना भोवळ आली. त्यांच्या अंगरक्षकांनी त्यांना तात्काळ हॉस्पिटलमध्ये दाखल केले.

तेथे अर्ध्या पाऊण तासाने ते शुद्धीवर आल्यावर म्हणाले, ''विक्रमच्या वकिलांना बोलवा, हायकोर्टाकडे अपिल करा म्हणावे.''

वकील आले आणि नारायणरावांना म्हणाले, ''पाटील, माझा सल्ला ऐकणार आहात का?''

''काय?''

''बिल्कूल अपील करू नका, कदाचित हायकोर्ट Enhancement ची नोटीस काढेल.

''म्हणजे काय?''

''म्हणजे विक्रमची शिक्षा का वाढवू नये याची कारणे द्या, अशी नोटीस! माझ्या दृष्टीनं सात वर्षे ही अत्यंत सवलतीची शिक्षा आहे. हवं तर आणखी तुमच्या कोल्हापूरच्या खास तज्ज्ञांचा सल्ला घ्या.''

नारायणराव विचार करून म्हणाले, ''ठीक आहे. मी कोल्हापूरला जाऊन विचारविनिमय करून मगच निर्णय घेईन.

0-0

प्रकरण २३

त्यादिवशी सकाळी झुंजारराव शेतावर जायच्या तयारीत असताना त्यांना अचानक फोन आला.

'हॅलो झुंजारराव मोरे साहेब का?''

''हो मीच बोलतो आहे! आपण कोण?''

''मी नारायणराव डांगरे पाटील!''

''फोन मला चुकून तर लागला नाही?''

''नाही, नाही, तसं काही झालेलं नाही. मीच तुम्हाला फोन केला होता!''

''बोला, आता काय काम काढलंत माझ्याकडं?''

''जरा तुमच्याशी सल्लामसलत करायची होती!''

''माझ्याशी आणि सल्लामसलत?''

''होय होय तुमच्याशीच!''

''माझ्या घराचे दरवाजे तुमच्यासाठी सदैव उघडे आहेत, फक्त तुम्ही केव्हा येता ते अगोदर कळवा.''

''आज, आता सवड आहे का?''

हातातल्या घड्याळाकडे पहात सरकार म्हणाले,

''बरं, या तर मग, मला शेताकडं आंबवड्याला जायचं होतं. तुम्ही येऊन गेल्यानंतर जाईन!''

''आलोच एक दहापंधरा मिनिटात.''

''ठीक आहे!''

फोनचा रिसीव्हर स्टँडवर ठेवून झुंजारराव विचार करू लागले. परवा तर विक्रमची केस चालू असताना माझं काहीही ऐकण्याच्या मन:स्थितीत नसलेल्या या नारायणरावांना एकाएकी कशी काय उपरती झाली? माझ्याकडे येण्यात त्यांचा काहीतरी 'डाव' तर नसावा? बघू, ते येऊन तर जाऊद्यात, ते आल्याशिवाय तर्कवितर्क करण्यात काय अर्थ आहे?''

साखर कारखान्याची मोटार रंकाळ्यावरच्या मोऱ्यांच्या घरासमोर येऊन थांबली. नारायणराव गाडीतून उतरून आत आले. झुंजाररावांनी त्यांचे स्वागत केले.

नारायणरावांनीच सुरुवात केली.

''परवा मी तुम्हाला लागेल असं काहीतरी बोलून गेलो, कृपा करून ते सर्व विसरून जा!''

त्यांच्या हातात हात देत झुंजारराव म्हणाले,

''हे पहा नारायणराव, मी ते तेव्हाच विसरून गेलो. काही गोष्टी मनात साठवून ठेवायच्या नसतात, त्यामुळं माणसाला त्रास होत रहातो.''

''तुम्हाला आमच्या विक्रमचा निकाल समजला असेलच?''

"होऽऽ मी त्यावेळी पुण्यातच होतो!"

"त्याला झालेल्या सात वर्षाच्या सक्तमजुरीच्या शिक्षेबद्दल तुम्हाला काय वाटतं?"

झुंजारराव काहीसे गंभीर होऊन म्हणाले,

"मला वाटतं जादा शिक्षा होण्यापेक्षा सात वर्षे ही 'मॉडरेट' शिक्षा आहे."

"आमचा वकीलही तेच म्हणतो आहे."

"काय करायचं आजकालच्या पोरांना समजत नाही!"

"आता तुम्ही इथपर्यंत आलात म्हणून खरं सांगू?"

"जरूर सांगा!"

"आपल्या मुलांच्या वाताहतीला आपण वडीलधारेच जबाबदार आहोत. विक्रमला पॉकेटमनी म्हणून तुम्हीच त्याला हवे तितके पैसे देत होता, त्याला मर्सिडीस गाडी नको त्या वयात तुम्हीच दिली. तो वारंवार जातो कुठे, कोणाच्या संगतीत असतो याची कधी चौकशी केली होती का?"

"तीच घोडचूक झाली!"

"आमचा संग्रामसुद्धा लग्नापूर्वी अशीच चैन करायचा, पण एकदा लग्नाचं लोढणं त्याच्या गळ्यात बांधून टाकल्यावर सुतासारखा सरळ आला. तुम्हीही विक्रमचं एक दोन वर्षापूर्वीच लग्न करून टाकायला हवं होतं!"

"आता ते मागचं उकरून काढण्यात काय अर्थ आहे!"

"आता यातून लवकरात लवकर त्याची सुटका होईल याचा मार्ग सुचवा!"

झुंजारराव म्हणाले, "थोडे दिवस राहू देत त्याला तुरूंगात. निदान दारू तरी सुटेल!"

"सगळेजण तसंच म्हणतात, पण शेवटी म्हटलं तुमच्यासारख्या व्यवहारी गृहस्थांचा सल्ला घ्यावा म्हणून आलो होतो."

"ठीक आहे. तुम्ही आपलं मन मोठं करून माझ्याकडे आलात, मला बरं वाटलं. आता माझा सल्ला ऐका, मनुष्य हत्येबाबत विक्रमला झालेली सात वर्षाची शिक्षा तशी काही जास्त नाही. शिवाय जेलमध्ये विक्रम व्यवस्थित वागला, तर त्याच्या सद्वर्तनाचा रिपोर्ट जेलर पाठवू शकतो. त्यात नक्कीच विक्रमची शिक्षा वर्ष दोन वर्षांनी कमी होऊ शकते. त्याचं शिक्षण कुठंपर्यंत झालंय?"

"कॉलेजची दोन वर्ष झालीत, पुढं गेलाच नाही कॉलेजला!"

"हां, आता जेलमध्ये कॉलेजच्या पुढच्या दोन वर्षाचं शिक्षण पूर्ण कर म्हणावं- या वयात मुलं चुकतात म्हणून का त्यांना आपण वाळीत टाकायचं? Let him improve. तुम्ही म्हणत असाल तर मी त्याची जेलमध्ये भेट घेऊन त्याला 'कनव्हिन्स' करीन!"

"काढला तर तुम्हीच मार्ग काढू शकाल म्हणून आज मी तुमच्यापर्यंत आलो!"

"ठीक आहे, आठ पंधरा दिवसातच मी जाईन येरवड्याला, त्याला भेटीन!"

"तसा तो फार भावनाप्रधान मुलगा आहे हो! मला दुसरीच भीती वाटते!"

"कसली?"

"तो आत्मघात तर करून घेणार नाही ना?"

"डोंट वरी, नारायणराव, त्याची तुरुंगातून सुटका झाली रे झाली की आपण त्याचं लग्न करून टाकू."

"पण एवढं रामायण झाल्यावर त्याला मुलगी तरी कोण देणार?"

"त्याची तुम्ही मुळीच चिंता करू नका. Public memory is very short. आता नुकत्याच घडलेल्या या घटना आहेत म्हणून तुम्हाला तसं वाटतं. पण ४-५ वर्षानंतर लोक

विक्रमला शिक्षा झाली होती हे सुद्धा विसरून जातील. आमच्या संग्रामचं यशोमतीशी लग्न झालं तेव्हा असाच गहजब उठला होता. पण आज दोन तीन वर्षानंतर कोणाला ते आठवतही नाही!''

बोलता बोलता अधूनमधून झुंजारराव हातातल्या घड्याळाकडं पहात होते. इतक्यात पद्मा सावंत तेथे आली आणि झुंजारारावांच्या पायावर डोकं ठेवून म्हणाली, ''डॅडी, ही पहा, मला एम. एल. जी. त टीचरचा जॉब मिळाल्याची ऑर्डर!''

तिला आपल्या पायावरून दूर करीत झुंजारराव म्हणाले, ''बरं झालं, तुझ्या आक्कांना आणि यशोमतीला सांग जा!''

पद्मा सावंतबद्दल नारायणराव ऐकून होते पण आज तिला जवळून पहायचा योग आला होता.

पद्मा आत जाण्यापूर्वी झुंजारराव नारायणरावांना म्हणाले, ''ही पहा, मध्यंतरी विधवा झाल्यावर सात वर्षं हिचं शिक्षण बंद पडलं होतं. पण ती इथं आली आणि मी तिला गारगोटीला बी.एड. कॉलेजात घातलं.''

नारायणराव म्हणाले, ''सरकार, तुम्ही अनेकजणांना असं मार्गदर्शन करीत आला आहात. मी त्यादिवशी तुम्हाला रागाच्या भरात बोललो ते विसरून जा! आता मला पश्चाताप वाटतो.'' नारायणरावांनी चक्क हात जोडले.

झुंजारारावांचं व्यक्तिमत्त्व प्रथम दर्शनी पहाणाऱ्याला काहीसे राकट वाटे. पण त्यांच्या सहवासात राहणाऱ्यांचा अनेक वेळा भ्रमनिरास व्हायचा. मनाने ते फार उमदे होते. अविचाराने बोलणाऱ्याचे ते शांत चित्ताने ऐकून घेत. कोणत्याही प्रकारे मनाचा तोल ते ढळू देत नसत. कालांतराने अशी अविचारी भाषा करणाऱ्यालाच आपण चुकलो असे वाटू लागे. त्यांच्या स्वभावाचे बारकावे सहजासहजी कोणाला समजून येत नसत.

नारायणराव निघून गेल्यावर त्यांनी मोटारहोम बाहेर काढली तेव्हा पद्मा आत सरलाबाई आणि यशोमतीशी बोलत बसली होती. यशोमती बाळंतपणानंतर हळूहळू घरकामे करू लागली होती. धुणं भांडी करण्यासाठी वाशी नाक्यावरची एक बाई येत होती. पण जेवण मात्र सरलाबाई स्वत:च करीत. मध्यंतरी जेवण करायला शिवाजी पेठेतली एक बाई यायची, पण तिने बनवलेले पदार्थ अतिशय बेचव लागत. सरलाबाई समोर बसून तिला सूचना देत असत. पण तरीही त्या बार्इंच्या हाताला बिल्कूल चव नव्हती. सरलाबार्इंनी तेव्हापासून स्वयंपाकीण बंद केली. त्या यशोमतीला म्हणाल्या,

''आपण जे अन्न शिजवतो, ते आपल्या जिव्हाळ्याचं माणूस खाणार आहे असं भाडोत्री स्वयंपाकिणीला कधीही वाटत नसतं.'' यशोमतीला त्यांनी हळूहळू पाककलेचे धडे द्यायला सुरुवातही केली होती. तोवर ती बाळंत झाली. दोन महिन्याची विश्रांती घेऊन ती पुन्हा घरकामात सरलाबार्इंना मदत करू लागली. उदगीरसारख्या आडवळणी कोकणी खेड्यात, धनगराच्या पोटी जन्मलेल्या यशोमतीने अल्पावधीतच मोऱ्यांच्या घराण्याचे रीतीरिवाज आणि संस्कार आत्मसात केले होते.

झुंजारारावांनी गाडी स्टार्ट करण्यापूर्वी पद्माला विचारलं, ''तुला ड्युटीवर कधी रुजू व्हायचं आहे?''

''एक तारखेला, येत्या मंगळवारी!''

''मग आज तुझा काही कार्यक्रम नसला तर जाऊ शेताकडं, येतेस?''

''होऽऽऽ! आलेच, सरलाक्कांना सांगून येते.''

''आक्का, मी आंबवड्याला डॅडींच्या सोबत शेतावर जाऊन येते.''

"ठीक आहे, जा, अलीकडे संग्रामही नसतो."

"का कुठं आहे संग्रामबाळ?"

"मलाही ठाऊक नाही, तुझ्या डॅडींना विचार!"

"ठीक आहे, मी विचारीन जाता जाता!"

गाडी शिवाजी पूल ओलांडून रत्नागिरी रोडला लागली.

झुंजारराव म्हणाले, "पद्मा, वीस पंचवीस वर्षामागे या रस्त्याला अजिबात ट्रॅफिक नव्हता. पण आता बघ, वाहनामागे वाहनं धावत आहेत."

"या रोडला कशामुळं ट्रॅफिक वाढला?"

"त्याला अनेक कारणं आहेत. एकतर अफाट लोकसंख्या, त्यात पन्हाळ्याला चैनीसाठी जाणाऱ्यांची संख्या वाढलीय!"

"डॅडी, मी लहान असताना आमच्या आबां बरोबर पन्हाळ्याला आले होते, तेव्हा तिथलं वातावरण इतकं शांत होतं की काही विचारू नका. आता परवा आपण गेलो होतो तेव्हा पाहिलं, सगळा पन्हाळा विद्रूप झालाय! आजूबाजूची झाडी तुटली. जागोजागी बंगले उभे राहिले. बीअरबार आणि हॉटेलं आली. हे सर्व आलं की शांतता आपोआपच भंग पावते!"

"मला सुद्धा पद्मा, पन्हाळ्यावर स्वत:च्या दोन तीन खोल्यांचा टुमदार बंगला बांधावा असं पूर्वी वाटायचं, पण आता ते नको वाटतं!"

"त्यावेळी बांधला असता तर मीही तिथंच राहिले असते! गारगोटी गावसुद्धा अजून शांत आहे. गावची माणसंही प्रेमळ आहेत. आजूबाजूच्या खेड्यापाड्यातून बाजारादिवशी विपुल भाजीपाला येतो! पावसाळ्याचे चार महिने सोडले तर एरव्ही ते गावी जाऊन चार दिवस रहायला चांगले आहे."

बोलता बोलता झुंजारराव म्हणाले, "मला तुला एक प्रश्न विचारावा वाटतो, थोडा नाजूक आहे."

"बेशक विचारा!"

"या अगोदर तू भेटायचीस तेव्हा देशमुख असे, देशमुख सर तसे, सरांना हे आवडतं, ते आवडत नाही, अशी तू गेले सहासात महिने 'सरमय' झाली होतीस, पण अलीकडं तू देशमुखांच्या नावाचा ओझरता देखील उल्लेख करीत नाहीस. ते कसं काय?"

"तुम्ही मला पुण्याला जाऊन मृणालला भेटायला सांगितले. त्याप्रमाणे मी गेले. त्या बिचाऱ्या मृणालने कसलाही आडपडदा न ठेवता मला देशमुख प्रताप सांगितला. माणूस किती बेमालूम असे मुखवटे धारण करीत असेल असे मुळीच वाटले नव्हते!"

"मुखवट्याचं राहू दे, बाकीच्या वैवाहिक आयुष्याबद्दल तिनं काय सांगितलं?"

"इट इज जस्ट हॉरिबल डॅडी! मृणालला त्यांच्या लैंगिक विकृतीचा अतोनात ताप झाला. एकतर त्यांची कामवासना तिला शारीरिक त्रास दिल्याशिवाय उद्दीपित व्हायची नाही आणि एकदा ती झाल्यावर त्यांच्यातला पशू जागृत व्हायचा. त्यांचे सगळे मुखवटे गळून पडायचे. बेडवर तिचे अतोनात हाल व्हायचे. मला मृणाल म्हणाली, 'अनेकवेळा मला त्यांचा जीव घ्यावा असं वाटे! काहीवेळा मला आत्महत्याही करावीशी वाटे! बरं त्या गोष्टींची मी वाच्यताही कोणासमोर करू शकत नव्हते. सतत सात महिने मी त्या यातना सोसल्या, आणि एके रात्री अमरावती सोडली. नागपूरला प्रथम आले. तिथं माझी मैत्रीण रहाते. तिलाही मी सर्व सांगू शकले नाही. मी तिला म्हणाले, मला तात्काळ पुण्याला जायचंय', तिने मला गाडी देऊन पाठवले. पुण्यात मी अचानक आल्याचे पाहून वडलांनी मला विचारले, "अशी अचानक कशी आलीस? फोन नाही पत्र नाही?"

मृणाल म्हणाली, 'तुम्हाला त्याचे कारण नंतर कळेल!' मलाही प्रा. देशमुख कसे आहेत ते तुम्ही मला पुण्याला जाऊन मृणालला भेटायला सांगितलेत, तेव्हाच समजले."

"हो, मुद्दामच तुला जा म्हणालो, कारण बायका आपलं मन फक्त दुसऱ्या बाईजवळच मोकळं करतात. तुला जे मृणालनं सांगितलं ते तिने तितक्या स्पष्टपणे मला नसतं सांगितलं! मग देशमुखांनी तिला परत घेऊन जायचा काही प्रयत्न केला की नाही?"

"केला ना, ते स्वत: पुण्याला आले होते, तेव्हा मृणाल त्यांना म्हणाली "बऱ्या बोलानं मला डायव्होर्स देऊन टाका, नाहीतर तुमचा 'पर्दाफाश' करून टाकीन. तुमचं खरंखुरं रूप जगाला ओरडून सांगेन! माझी मेंटल आणि फिजिकल हॅरॅसमेंट केल्याचं पुराव्यासह न्यायालयात शाबित करीन."

"शाब्बास! अशा पाहिजेत पोरी! नाहीतर नवऱ्याने कितीही त्रास दिला तरी मुळूमुळू रडत बसणाऱ्या पोरीही असतातच!"

"पण डॅडी, एवढे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असलेले, इंग्लंड रिटर्नड्, प्रा. देशमुख असे असतील असं कुणालाही सांगून पटणार नाही. बरं झालं बाई तुम्ही मला मृणालला भेटायचा सल्ला दिलात!"

"जाऊ द्या, पण मृणालला डायव्होर्स मिळाला का?"

"होऽऽऽ त्यांचा बाप देईल! 'माझे आणि मृणालचे वैचारिक मतभेद कधीही मिटणार नाहीत म्हणून मीच तिच्याशी असलेले वैवाहिक संबंध तोडत आहे.' असे ते म्हणाले. शेवटी कोर्टामार्फत डायव्होर्स मंजूर झाला!"

"मग पुनर्विवाहाचा काही विचार केला की नाही मृणालनं?"

"तीच नको म्हणते. तरी पण तिचा कोणीतरी 'बॉयफ्रेंड' असावा अशी मला शंका आहे!"

"कशावरून म्हणतेस?"

"मी तिथे असताना तीन चार वेळा एका गृहस्थाचे फोन आले होते, फोनवर मृणाल त्याला सांगत होती दोन दिवस थांब, माझ्याकडे एक मैत्रीण आलीय! मी तुला इतक्यात भेटू शकणार नाही!"

"आय सी. दॅट इज बट नॅचरल! मृणाल जवळ जवळ तुझ्याच वयाची असेल ना?"

"होय, माझ्यात आणि तिच्यात फक्त एक दिवसाचा फरक, माझा जन्म सात जुलैचा ती जन्मलीय आठ जुलैला! पण डॅडी, तुमच्यामुळे मला एक सद्गुणी, हुषार, विनम्र अशी मैत्रीण लाभली. मी MLG ला कामावर रूजू झाल्यानंतर तिला माझ्याकडे चार दिवस रहायला बोलावणार आहे."

गाडी केर्ल्याचा घाट चढू लागल्यावर झुंजारराव म्हणाले, "बरं झालं, तुला कोल्हापुरातच शिक्षिकेची नोकरी मिळाली. माझ्यावरची एक मोठी जबाबदारी संपली."

"डॅडी, तुम्ही संग्राम बाळांना कुठं पाठवलंत?"

"हे बघ पद्मा, ती पुष्पा मर्डर केस सुरू होती ना, तीत संग्रामची 'आयविटनेस' म्हणून साक्ष होती. त्याने ती साक्ष देऊ नये म्हणून नारायणराव डांगरे पाटलांनी अटीतटीचे प्रयत्न केले. पण संग्राम होस्टाईल होणेच अशक्य होते. विक्रमला शिक्षा झाल्यावर नारायणराव पिसाळल्यासारखे करतील, संग्रामवर सूड उगवण्याचा प्रयत्न करतील म्हणून मीच त्याला बेंगलोरला उज्ज्वला देसाईकडं पाठवले. उज्ज्वलेला तू ओळखतेस ना?"

"तुमची ती आतेबहीण ना? प्रत्यक्ष कधी भेटले नाही, पण त्यांची मोठी फॅक्टरी आहे म्हणे. जवळपास कॉफी प्लँटेशनही त्यांच्या मालकीचं आहे मला सरलाक्कांनी मागेच सांगितलं

होतं.''

''आता सगळं सामसूम झालंय. काल स्वत:हून नारायणराव नाही का आले माझ्याकडं?''

''हो, ते कसं काय हो डॅडी?''

''माझं आणि नारायणरावांचं असं काही पूर्वापार वैर नव्हतंच. त्यांच्या राजकारणात मी कधीही ढवळाढवळ केली नाही. आता योगायोगानं संग्राम त्या खटल्यात गोवला गेला. तो काळे फौजदार, वागळे डीवाय. एस. पी. यांच्या नि:पक्षपाती तपासामुळे सुटला. पण त्याला विक्रमविरुद्ध साक्ष देणं भाग होतं. हे सगळं नारायणरावांना नंतर उमगलं आणि नाईलाजानं ते माझ्याकडं आले. विक्रमला सात वर्षे जरी शिक्षा झाली असली तरी ४-५ वर्षात तो बाहेर येईलही! असो.''

आंबवड्याचं वळण जवळ आलं होतं. झुंजाररावांची मोटार व्हॅन पाहून कामावरचे गडी गाडीकडे धावले.

0-0

प्रकरण २४

यशोमतीनं लॉ केलं. ती ग्रॅज्युएट झालीच होती. आंबवड्याला राहून पन्हाळा आणि मलकापूर कोर्टात तिने प्रॅक्टीस करावी अशी झुंजारारावांची इच्छा होती. स्वत: झुंजारारावांना मात्र कायद्याच्या परीक्षेला बसणे शेवटपर्यंत जमलेच नव्हते. संग्राम ग्रॅज्युएटदेखील होऊ शकला नाही. निदान यशोमतीने तरी आपली सुप्त इच्छा पूर्ण केली याचे समाधान त्यांना वाटत असे.

बेबीचंदाच्या लग्नानिमित्त फर्नांडिसने रेसिडेन्सी क्लबच्या आवारात भले मोठे 'रिसेप्शन' केले. पोलीस बँड आणला. प्रति बिसमिल्ला वाटावेत असे बनारसवरून शहनाईवादक आणले. फर्नांडिसचे कोल्हापुरात असंख्य स्नेही होते. एकूण एक 'सरकार' लोक रिसेप्शनला उपस्थित होते. राजस्थानावरून रुमाली रोटी आणि राजस्थानी 'मुर्गी' बनवणारे जसे आचारी आणले तसेच खास गोवानीज मासे बनवणारे गोमंतक आचारीही आले. कोल्हापुरी फेटा बांधून फर्नांडिस अभ्यागतांचे स्वागत करीत होता. बेबीचंदा निळसर रंगाच्या पंजाबी ड्रेसमध्ये जोसेफबरोबर डायसवर होती. फर्नांडिसने निमंत्रणपत्रिकेत Blessings in presence only, म्हटल्याने, कोणीही सदिच्छेशिवाय काहीही आणले नव्हते. तो समारंभ आंतरजातीय विवाह आहे याचा मागमूसही जाणवत नव्हता. सुशिलाबाई आणि सरलाबाई एका बाजूला बसल्या होत्या. पद्मा थोड्या उशिरा समारंभाला आली.

झुंजाररावांचे बेबीचंदाशी जवळचे नाते असल्याने ते आपला परंपरागत पेहराव, डोक्याला पगडी, बंद गळ्याचा रेशमी कोट, पायात ब्रिचेस अशा वेषात येऊन बसले होते. मंगू भगवा पटका आणि कोट, ब्रिचेस घालून हजर होतो. फर्नांडिसचे काही नातलगही समारंभाला हजर होते.

येणारे जाणारे, झुंजाररावांना मुजरा करून त्यांच्याशी औपचारिक बोलून पार्टीत सामील होत होते. कोल्हापुरातले नामवंत डॉक्टर्स, वकील, पोलीस अधिकारी जुन्या जमान्यातले जहागीरदार हे सर्व वधुवरांना शुभाशीर्वाद देण्यासाठी ओळीने 'डायसकडे' जात होते.

सनईचे सूर थांबायचे, आणि नंतर बँडमास्तर उभा राहून हातातली 'बॅटन' उंचावून पोलीस बँड ताफ्याला इंग्लिश ट्यून वाजवायच्या सूचना द्यायचा. सुग्रास जेवणानंतर 'कसाटा' आईस्क्रिम होते. रात्री जवळ जवळ साडे अकरापर्यंत हा सोहळा चालला.

झुंजाररावांना अलीकडे एकांतवास आवडू लागला होता. तिसऱ्या मजल्यावरून ते फक्त जेवणासाठी खाली येत. दोन्ही वेळचा चहादेखील त्यांना वरच नेऊन द्यावा लागे. शेतावर जाणेही अलीकडे त्यांनी कमी करून टाकले होते. शिकार तर जवळ जवळ बंदच होती.

येऊन जाऊन त्यांना आता एकच विरंगुळा होता. छोटा प्रताप, संग्रामचा मुलगा. तो झुंजाररावांच्याकडे अधूनमधून डॅडी हे काय ते काय, तुम्ही आजपर्यंत किती वाघ मारलेत, ते कसे नि कुठे मारले असे काही ना बाही विचारत राही. झुंजारराव त्याच्याशी मात्र दिलखुलास

वागायचे.

संग्रामने शेतीकडं चांगलंच लक्ष घातलं होतं. यशोमतीही अधूनमधून शेतावर येऊन राहायची. अधूनमधून पन्हाळा आणि मलकापूर या कोर्टात जायची. त्या भागातली ती पहिलीच लेडी ॲडव्होकेट असल्यामुळं लोकांना कौतुक वाटे. स्त्रियांच्या मेन्टेनन्सच्या केसेस चालवण्यात ती 'एक्सपर्ट' समजली जाऊ लागली. तसेच 'डेझर्टेशन' म्हणजे नवऱ्याने बायकोला सोडणे, डायव्होर्स न देता दुसरं लग्न करून घेणाऱ्या विरुद्ध 'बायगॅमस' (द्विभार्या प्रतिबंधक) कायद्याखाली त्याला कोर्टात खेचणे, अशा प्रकारच्या कामात ती विशेष लक्ष घालत असे.

अलीकडे संग्रामची मॉरीस गाडी तिच्याकडेच होती. ती स्वत: ड्रायव्हिंग करी. सोबत कामातली पक्षकार स्त्री असे. अधूनमधून ती कोल्हापूरला गेली की झुंजारराव तिची विचारपूस करीत. त्यावेळी ते तिला काही मौलिक अशा सूचना देत. 'यशोमती, मी तुला वकील केलं ते केवळ तू त्या व्यवसायात पैसा मिळवावा म्हणून नव्हे. तर दीनदुबळ्या स्त्रियांवर होणारा अन्याय, अत्याचार थांबावा म्हणून त्यांना मदत करण्यासाठी. संग्राम सुदैवाने आता शेतीत बऱ्यापैकी लक्ष घालतो आहे. त्यानं आपली पन्नास एकर जमीन उत्तम पिकवली तर आपला घरखर्च चांगल्या तऱ्हेने चालेल. तुला लहानपणापासून गाई म्हशी पाळायची सवय आहेच. शेतावरही तू एक शेड उभी करून दोन तीन जाफराबादी म्हशी पाळायला हरकत नाही. तसेच एक पाचपन्नास लेगहॉर्न किंवा रेडरोड आयलंड सारख्या कोंबड्या पाळल्यास तर संग्रामचा वेळही चांगला जाईल. खरं म्हणजे मलाच ऐन जवानीत या गोष्टी करायला हव्या होत्या. पण काही ना काही प्रकरणांत मी गुंतत जात होतो. माझ्या मनातील अनेक गोष्टी करायच्या कायमचेच राहून गेल्या. तसं पाहिलं तर मी आता 'रिटायर' व्हायला हवं आहे. सगळ्यातून रिटायर!'

अधूनमधून झुंजारराव यशोमतीजवळ असं काही बोलू लागले की ती म्हणे, "डॅडी, अजून तुमची तब्येत ठणठणीत आहे. मनात आणाल ते तुम्ही करू शकाल! वारंवार 'रिटायर' व्हायची भाषा कशाला करता?"

त्यावर ते हसून पिकलेल्या आपल्या मिशांवर पालथी मूठ फिरवीत म्हणत, "यशोमती, खरोखरच काही गोष्टी करायच्या राहून गेल्या असल्या तरी तसा मनानं मी तृप्त आहे. माझ्या सहवासांत आलेल्या व्यक्तींच्या समस्याही मी यथाशक्ती दूर केल्या. त्याचा तपशील काही तुला सांगत नाही. पण अलीकडे मनात वारंवार एक विचार येतो आहे!"

"कोणता?"

"अज्ञातवासात जायचा!"

"डॅडी असलं काही मनात देखील आणू नका. तुम्हाला आम्ही कसलाही उपद्रव देणार नाही किंवा तुमच्याकडून कसल्या अपेक्षाही करणार नाही.

तुम्ही या 'लेक व्ह्यू' बंगल्यात आहांत हीच आम्हा सर्वांना आधार देणारी गोष्ट आहे."

अलीकडे झुंजारारावांनी मद्यप्राशनही बंद केलं होतं. आहारदेखील साधा होता. संध्याकाळचं जेवण जवळ जवळ बंदच होतं.

यशोमतीला झुंजारराव मनात आणतील ती गोष्ट केल्याशिवाय रहात नाहीत याची खात्री होती. त्यामुळे ती खाली सरलाबाईंना वारंवार सांगे,

"मम्मी, जरा डॅडींच्याकडे लक्ष असू द्या. अलीकडे दोन तीन वेळा ते माझ्याजवळ अज्ञातवासाबद्दल बोलले होते. परवा तर मला म्हणाले, "माणसानं ॲक्टिव्ह आहे तोपर्यंतच जगावं, स्वत: दुसऱ्याला भार होईपर्यंत जगणं खरं नाही!"

"काय करायचं बाई, ते अलीकडे आठ-आठ दिवस माझ्याशी बोलतसुद्धा नाहीत. तुझ्या बापाला तरी बोलवून घे! तो आला की त्यांना जरा बरं वाटतं!"

त्यादिवशी मंगू मुक्कामाला रंकाळ्यावरच्या बंगल्यात होता. मध्यरात्र होईपर्यंत ते त्याच्याशी बोलत राहिले. रात्री एक दीडच्या सुमारास झोपी गेले. नेहमीप्रमाणे मंगू कमरेचा कोयता काढून उशाला घेत घोंगड्यावर झोपला.

पहाटेचे तीन वाजले असतील. शिवाजी पेठेतील कोंबडे आरवू लागले. कितीही उशिरा झोपला तरी मंगूला पहाटे तीन साडेतीनच्या सुमारास जाग येई. सवयीनुसार तो घोंगड्यावर उठून बसला. त्याचं झुंजारराव‌ांच्या कॉटकडं लक्ष गेलं. झुंजारराव कॉटवर नव्हते. तो जिना उतरून घाईघाईनं खाली आला. त्यानं सरलाबा‌ईंना उठवलं.

"वैनीसाब सरकार कुठं दिसत न्हाईत!"

"दिसत नाहीत? असं कसं होईल? बाथरूममध्ये बघितलंस?"

" बगितलं जी! कुटंच न्हाईत!" 'सरकाऽऽऽर सरकार' असं म्हणून मंगू टाहो फोडत राहिला. पण प्रतिसाद आला नाही. बघता बघता सकाळ झाली. सरलाबा‌ईंनी आंबवड्याला संग्राम आणि यशोमतीला फोन करून कळवलं. अर्ध्या तासात ती दोघं आली. कधी कधी भल्या पहाटे उठून झुंजारराव 'पुईखडी' या राधानगरी रोडवरच्या टेकडीकडे फिरायला जायचे. तिकडेही संग्राम मॉरीस गाडी घेऊन जाऊन आला. मग मात्र यशोमतीला हुंदका आवरता आला नाही.

डॅडींनी आपलं म्हणणंच शेवटी खरं केलं. त्यांनी 'अज्ञातवास' स्वीकारला.

संग्रामला माडीवर एक जाड लखोटा मिळाला. घरातून परागंदा होण्यापूर्वी झुंजारराव‌ांनी लिहून ठेवलेलं प्रदीर्घ पत्र होतं. त्यानं ते खाली आणलं. यशोमती, सरलाबा‌ईंच्या समोर तो वाचू लागला.

"बऱ्याच वर्षापासूनचे माझे स्वप्न मी आज वास्तवात आणत आहे. अज्ञातवासात जात आहे. तसा मी सर्व बाबतीत तृप्त आहे. तुम्हाला वाटेल अज्ञातवासात जायचे कारणच काय? काही गोष्टींची कारणे सांगता येत नाहीत. मी घरातून निघून गेलो म्हणजे आयुष्याला कंटाळलो असं मात्र समजू नका. माझ्या मनातला 'जिप्सी' आता जागा झाला आहे. मी घर सोडल्यावर रहाणार कुठे, जेवणार कुठे, झोपणार कुठे अशी विवंचना करू नका. या देशात असे असंख्य लोक आहेत की ज्यांना अन्न, वस्त्र, निवारा यापैकी काहीच नसतं. तरीही ते जगतातच ना? आपला देश 'आसेतु हिमाचल' असा पसरलेला आहे. तो कसलाही व्याप मागे न ठेवता मला पहायचा आहे. समुद्रकिनारा, हे तर माझे अतिशय आवडीचे ठिकाण. देवगडसारख्या उंच कड्यावर तासनतास बसावं आणि निळाभोर तो सागर पहात रहावा. आपण किती क्षुद्र आहोत याची जाणीव यापूर्वीही मला सागर दर्शनानं अनेकवेळा झाली होती. अंधाऱ्या रात्री उताणे पडून ग्रह तारका न्याहाळण्यात किती अमाप आनंद असतो तो मी बऱ्याच वेळा अनुभवलेला आहे.

मी अज्ञातवासात गेलो म्हणजे पळपुटेपणा केला असे मात्र कोणी समजू नये. आता मी निघून गेल्यामुळे ज्या व्यक्तींना दु:ख होणार आहे. अशा व्यक्तींसाठी खालील चार शब्द :-

सौ. सरलादेवी, तू माझी सहचारिणी, आजपर्यंत माझ्या सुखदु:खात सहभागी होत आलीस. जेव्हा माझी ट्रान्सपोर्ट कंपनी बंद पडली तेव्हा आपल्याला थोडी आर्थिक टंचाई जाणवू लागली होती. पण सरले, तू त्याची साधी वाच्यता देखील कुणासमोर केली नव्हतीस. तुझ्यावर झालेली ती 'इमर्जन्सी हॅसेक्टॉमी' ची शस्त्रक्रिया, ज्यामुळे तुझी कन्या प्राप्तीची इच्छा कायमची मावळली. त्याचा परिणाम म्हणून की काय तुझी कामवासनादेखील लुप्त

झाली, पण माझ्यावर अन्याय नको म्हणून तू मला दुसरा घरोबा करण्याचा सल्ला दिलास. माझ्या आढळात असा सल्ला देणारी पत्नी कोणाच्या नशिबी आली नसेल! पुढे पद्मा सावंतची अन् माझी भेट झाली. आमची मैत्रीही वाढली. पण तू अत्यंत खिलाडूवृत्तीने ती स्वीकारलीस! माझा पुनर्जन्मावर विश्वास नाही, पण समज तो असलाच तर मला तुझ्यासारखीच पत्नी पुन्हा लाभावी!

दुसरा माझा वारस संग्राम! तू माझ्या इच्छेप्रमाणे कधी वागला नाहीस, नीट अभ्यास केला नाहीस, पण त्याचबरोबर स्वत:ला कसलेही व्यसन लावून घेतले नाहीस. घरात रमपासून ते स्कॉचपर्यंत सर्व प्रकारची दारु असे, पण माझ्या अपरोक्ष तू त्या बाटल्यांना देखील स्पर्श केला नाहीस. आता तुझ्या मित्रांनी खूपच आग्रह केला तर ग्लासभर बीअर मात्र घ्यायचास. विक्रम डांगरेनं त्या डान्सर नटीचा दारूच्या नशेत खून केला, त्या खुनाचा आळ तुझ्यावर आला होता. पण तुझ्या नशिबाने म्हण, अगर माझ्या सदिच्छेमुळे म्हण, तुझे नाव पोलीसांना चार्जशीटमधून वगळावे लागले. माझी आता शंभर टक्के खात्री आहे, यापुढे तू कोणाचीही सखोल माहिती असल्याशिवाय त्याची मैत्री करणार नाहीस. तसा तू फार नशीबवान म्हणून यशोमतीसारखी सुस्वभावी. पत्नी तुला लाभली. पण ती मोऱ्यांची सून म्हणून जेव्हा येऊ घातली होती तेव्हा केवढे प्रचंड वादळ उठले होते. केवळ मी होतो म्हणूनच ते वादळ शमले.

यशोमती! तू मंगूची लेक, लहानपणीच मातृसुखाला पोरकी झालेली. पण विधात्यानं तुझ्या भाळी सरलेसारखी पे्रमळ सासू नियोजित करून ठेवली होती. तिने लग्नाच्या अगोदर नाकडोळे मोडले असले तरी नंतर तुला सुनेसारखे कधीही तिने वागवले नाही. तुझ्या बाळंतपणाचेवेळी तिच्या जिवाची झालेली घालमेल मी माझ्या डोळ्यांनी पाहिली आहे. जेमतेम मराठी ३-४ यत्ता शिकलेली तू, तेही उदगीरच्या धनगर वाड्यातल्या पडक्या शाळेत. पण जेव्हा पद्माला सोबत म्हणून मी तुला राजारामपुरीत आणून ठेवले तेव्हा तू जिद्दीने पुढे शिकत राहिलीस. आज तर तू ग्रॅज्युएट होऊन वकिलीचीही पदवी मिळवलीस. माझी कित्येक वर्षाची वकील होण्याची सुप्त इच्छा तू पूर्ण केलीस. संग्रामला त्या खूनकेसमध्ये अटक झाली तेव्हा तू नुकतीच बाळंत झालेली होतीस, पण तेव्हाही तू निर्धारानं म्हणत होतीस, खुनासारखे कृत्य त्यांच्या (संग्रामच्या) हातून होणारच नाही. तुझ्या लग्नाचा सोहळा ज्यांनी ज्यांनी पाहिला ते लोक जन्मभर तो शाही सोहळा विसरणार नाहीत. छत्रपती आणि इंदोरच्या महाराजांच्या खास उपस्थितीमुळे त्या सोहळ्यास वेगळेच महत्त्व प्राप्त झाले होते.

मंगू! माझा खरंच सांगतो, पुनर्जन्मावर विश्वास नाही. पण मंगूचे नि माझे ऋणानुबंध शतकानुशतकाचे असावेत असं वाटतंय. ती रात्र! उदगीरच्या मंगूच्या झोपडीबाहेर फोल्डींग कॉटवर मी झोपलो होतो. मंगूला माझ्या एकूण एक सवयी माहीत होत्या. मला मच्छरदाणीशिवाय झोप येत नाही. म्हणून त्याने लांब दोर लावून माझ्या कॉटभोवती मच्छरदाणी बांधली होती. यशोमतीनं, नव्हे त्यावेळच्या शेवंतानं, त्या रात्री रानकोंबडीचा रस्सा बनवला होता. मी एक दीड पेग रम घेतली होती. मंगूलाही त्यादिवशी थोडी दिली होती. झोप लागली. रात्री बारा वाजून गेल्यानंतर बाहेर मंद वारा सुटला होता, तो मच्छरदाणीच्या जाळीतून जाणवत होता दूरवर रातकिडे शहनाई वाजवत होते. समोरच्या झाडावरचे असंख्य काजवे सामुदायिकरीत्या प्रज्ज्वलित होत आणि विझून जात. त्या स्वर्गीय वातावरणात मला झोप लागण्यापूर्वी दोन अशुभ घटना घडल्या. एक टिटवी ओरडत गेली. पाठोपाठ धनगर वस्तीवरचे काळे कुत्रे भेसूर रडू लागले. मंगूने त्याला दूर हुसकावले. पण त्या दोन घटनांमुळे बिचारा मंगू अस्वस्थ झाला. काहीतरी अशुभ घडणार असे त्याला वाटले. अन् मध्यरात्री बिबळ्याने माझ्यावर प्राणघातक हल्ला केला. काही एक क्षणाचा विलंब झाला असता तर त्या बिबळ्याने

माझे नरडेच फोडले असते. पण मंगूच्या प्रसंगावधानाने त्याने आपल्या कोयत्याने बिबळ्याच्या कवटीची भकले केली. माझे प्राण वाचले.

आपल्या देशातील फॉरेस्ट खात्याच्या लोकांची खरोखरच मला कीव येते. स्वत:चा जीव धोक्यात घालून माझा जीव वाचवणाऱ्या मंगूवर खटला दाखल केला गेला. नंतर त्यातून तो सुटला. सर्व काही ठाकठीक झालं. ते कातडे आमच्या शिकारखान्यात जुन्या घरात लावून ठेवले आहे. खरं म्हणजे कथा कादंबरीतला वाटावा असा तो प्रसंग, अजनूही मला आठवतो.

मंगूचा अन् माझा ऋणानुबंध तेवढ्यानेच संपला नाही. तर आमच्या चिरंजीवांनी मंगूशी रक्ताचे नाते जखडून टाकले. त्यावेळी ती यशोमती नव्हती, शेवंता होती. तिच्याशी संबंध ठेवला अन् ती गर्भवती झाली. संग्रामचं आम्ही बेळगावच्या मुलीशी लग्नही ठरवून आलो होतो. पण जेव्हा शेवंताला घेऊन मंगू माझ्याकडं रडत आला, तेव्हा सर्व सत्य मला समजले. मग मात्र मी क्षणाचाही विलंब न लावता, संग्रामचं ठरलेलं लग्न मोडलं. संग्रामला शेवंताशी लग्न करणंच भाग पाडलं. पण काही गोष्टींचे समर्थन त्या घडतात तेव्हा करता येत नाही. पण नंतर मात्र आम्हा सर्वांनाच वाटलं की कुठल्याही खानदान घराण्यात अशी सद्गुणी, रूपानं सुंदर, सुस्वभावी मुलगी सून म्हणून आम्हाला लाभली नसती. असो. आता तो इतिहास झाला आहे.

श्रीमती पद्मा सावंत : सल्ला विचारायला आली तू, पद्मा चक्क माझ्या प्रेमातच पडलीस. जेव्हा बीएडला गारगोटीला शिकत होतीस तेव्हा देशमुख नावाचा भामटा तुझ्यावर आपलं मोहजाल टाकत होता. पण सुदैवानं त्याचे खरे रूप मृणाल ही धैयशील ठुब्यांची मावस बहीण हिच्याकडून तुला समजले. पद्मा वेळीच सावध झाली. आता तिला श्थ्उ हायस्कूलमध्ये नोकरी लागली आहे. तिने कोणाही एखाद्या विधुर सुसंस्कृत शिक्षकाशी विवाह करून घ्यावा. मेजर शिवराम सावंत अकाली गेले, पण फार हुषार असले पाहिजेत. आपल्या पश्चात पद्माने कसे रहावे हे त्यांनी अगोदरच लिहून ठेवले होते.

आता राहिली सुशिला डफळे आणि तिची कन्या बेबीचंदा. सुशिलेला तुटपुंजी पोटगी मिळत होती. पण तिच्या हातात फार उत्तम कला आहे. जरीच्या साड्यांवर कर्नाटकी कशिदा काढण्यात तिचा हात कोणी धरू शकणार नाही. तसेच हिवाळ्यात ती उत्तम उलनचे स्वेटर्स बनवते. मीच तिला सिमल्यावरून स्वेटर विणायचं यंत्र आणून दिलंय.

बेबीचंदा लाजरी बुजरी पण अशा लाजणाऱ्या पोरीच प्रेमात पडल्या की काय वाट्टेल ते धाडस करतात. जोसेफ मलबारीही अतिशय देखणा आणि कर्तबगार मुलगा आहे. आम्ही फर्नांडिसला 'मलबारी' म्हणायचो. त्यानं बरीच वर्ष कोल्हापुरात काढलीत. अस्सल खानदानी घराण्याचे त्याच्यावर संस्कार झालेले आहेत.

माझा नातू, प्रताप अतिशय बुद्धिमान आणि चौकस आहे. परवा एकदा दुपारच्या वेळी मला विचारायला आला होता. 'डॅडी' डोंगरची मैना म्हणजे काय हो? मी त्याला म्हणालो, ''तू तुझ्या बडी माँला विचार'' मग तो सरलेकडं गेला. सरला म्हणाली, ''तुझ्या डॅडी आणि मम्मीला विचार.'' पण त्या दोघांपैकीही कोणी त्याला सांगू शकलं नाही. तो जसजसा मोठा होईल तसे त्याला समजत जाईल. 'डोंगराची मैना' या दोन शब्दांनी आमच्या खानदानाला किती हादरवून सोडलं होतं.

असा माझा अत्यंत जवळचा गोतावळा आहे. काही दिवस मला संभ्रम पडला होता, या सर्वाना अचानक सोडून जायचं की नाही. पण त्याचवेळी मला वाटलं, 'Now or Never.' मग मात्र मनाचा निर्धार केला.

माझे हे पत्र वाचून कोणीही अश्रू ढाळू नयेत. माझ्यावर एवढी संकटे आली तरी मी कधी अश्रू ढाळले नाहीत. जगरहाटी प्रचंड आहे. कालांतराने कोणी झुंजारराव मोरे होऊन गेला

हे कोणाला आठवणारही नाही. असो.

"गुड बाय, टु ऑल ऑफ यू ऽऽ"

0-0-0-0